# मंगळवेढा नगरपालिकेचा इतिहास
# (इ.स. १८७४-२०१०)

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# इतिहास विभाग

सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील

विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध


## संशोधक

**अशोक शंकर माने**

## मार्गदर्शक

**विकास लक्ष्मण कदम**


**जानेवारी**

**२०१६**

# प्रतिज्ञापत्र

**मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला "मंगळवेढा नगरपालिकेचा इतिहास (इ.स.१८७४ ते २०१०)"** हा शोध प्रबंध मी प्रा.डॉ.विकास लक्ष्मण कदम यांच्या मार्गदर्शनाखाली लिहीला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठास अथवा अन्य कोणत्याही पदवी किंवा पदवीकेसाठी सादर केलेला नाही.

**स्थळः**

**दिनांकः**

**संशोधक**

**माने ए.एस.**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, प्रा.माने ए.एस. यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी.पदवीसाठी सादर केलेल्या **"मंगळवेढा नगरपालिकेचा इतिहास (इ.स.१८७४ ते २०१०)"** या शोध प्रबंधासाठी केलेले संशोधन माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

प्रा.माने ए.एस. यांनी हा प्रबंध स्वतंत्ररित्या लिहीला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठात कुठल्याही अन्य पदवी अथवा पदवीकेसाठी सादर केलेला नाही. सदर प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या इतिहास विषयातील पीएच.डी.पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

**स्थळः**

**दिनांकः**

**मार्गदर्शक**
**कदम एल.एस.**

# ऋणनिर्देश

सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयात **"मंगळवेढा नगरपालिकेचा इतिहास (इ.स.१८७४ ते २०१०) ",** हा शोध प्रबंध प्रा.डॉ.विकास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करून विद्यापीठास सादर करतांना अत्यंत आनंद होत आहे. प्रा.डॉ.विकास कदम यांनी केवळ मार्गदर्शन केले असे नाही तर संशोधन कार्यात येणाऱ्या अडचणी वेळोवेळी सोडवून संशोधनासाठी प्रोत्साहन दिले. त्यामुळे या संशोधनासाठी त्यांनी केलेल्या सहकार्यामुळे मी त्यांच्या कायम ऋणात राहू इच्छितो.

तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील इतिहास विभाग प्रमुख व समाजशास्त्राचे अधिष्ठाता यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. तसेच शिवाजी विद्यापीठातील डॉ.अरुण भोसले, डॉ.खने व डॉ.लोहार या गुरुजनांचे मोठ्याप्रमाणात सहकार्य लाभले. डॉ.सुखदेव शिंदे यांनी मला संशोधन करण्यास प्रवृत्त केले. तसेच प्राचार्य डॉ.बेलवटकर, प्रा.संजय पाटील, प्रा.हरी कांबळे, प्रा.डॉ.जावळे, डॉ.चंद्रकांत चव्हाण, प्रा.गरड व प्रा.डॉ.विलास निंबाळकर यांचेही वेळोवेळी मला मार्गदर्शन लाभले.

श्री संत दामाजी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एन.बी.पवार यांचे मी ऋण व्यक्त करतो. डॉ.शिंदे, प्रा.कसबे, प्रा.नागटिळक, प्रा.ए.बी.पाटील, प्रा.राजु गायकवाड, प्रा.सावंत, प्रा.वाघमोडे, प्रा.गावकरे, प्रा.गायकवाड डी.एस., प्रा.सुर्यवंशी, प्रा.घाडगे व प्रा.माने ए.एम. यांचेही सहकार्य लाभले. तसेच माझे विद्यार्थी-सहकारी डॉ.जावेद तांबोळी यांनी संशोधन करीत असताना मला मोलाचे सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो.

मंगळवेढा नगरपालिकेचे नगराध्यक्ष, नगरसेवक, प्रशासकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांनी मला संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती लिखित व तोंडी दोन्ही प्रकारे देवून सहकार्य केले त्याबद्दल त्यांचेही आभार मानने मी प्रथम कर्तव्य समजतो.

संशोधन करीत असताना माझे आई-वडिल यांचा आशीर्वाद महत्त्वाचा होता. तसेच कुटुंबाची जबाबदारी पार पाडत असताना व मला संशोधन पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करणारी

माझी पत्नी सौ.चंपावती, मुलगा 'ऋषीकेश', मुलगी 'प्रियंका, प्राजक्ता व प्रज्ञा' यांचे मला शोधप्रबंधासाठी सहाय्य लाभले.

संशोधन कार्यासाठी संगणकीय अक्षरजुळणी श्री.किशोर घुले सर यांनी वेळेत वेळ काढून पूर्ण केले. त्यांच्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार.

**स्थळ :**

**दिनांक :**

**प्रा.अशोकराव माने**

## प्रकरण पहिले

# प्रस्तावना

१.१ प्रास्ताविक

१.२ संशोधन विषयाची निवड

१.३ संशोधन विषयाचा कालखंड

१.४ संशोधनाची उद्दिष्टे

१.५ संशोधनाची गृहितके

१.६ संशोधन समस्या

१.७ संशोधनाच्या सिध्दांत कल्पना

१.८ व्याप्ती व मर्यादा

१.९ संशोधन तंत्र

१.१० संशोधन पध्दती

१.११ संशोधनाची संदर्भ साधने

१.१२ संशोधनाचे महत्त्व

१.१३ संशोधनाचा आराखडा

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## १.१ प्रास्ताविक

मंगळवेढा एक प्राचीन नगर म्हणून ओळखले जाते. सोलापूर पासून ५५ किमी. व पंढरपूर पासून २३ कि.मी. अंतरावर सोलापूरच्या नैऋत्येस शहर वसले आहे. मंगळवेढा नाव कसे उदयाला आले याची अधिक माहिती उपलब्ध नसली तरी स्कंद पुराणात मेतुलिंगपूरी असे संबोधले गेले आहे. प्राचीन नाव मंगळवेढा याचा अर्थ चांगले घर असा होतो. स्थानिक कथेनुसार राजा मंगल याच्या नावावरून मंगळवेढा नाव जोडले आहे. अधिक माहितीनुसार मंगलाई मंदिरामुळे मंगळवेढा नाव पुढे आले.

मंगळवेढा शहराचा अक्षवृत्तीय विस्तार १७°३१'००" उत्तर ७५°२८'००"पूर्व व रेखावृत्तीय विस्तार १७.५१६६७°उत्तर ७५.४६६६७°पूर्व असा आहे. समुद्रसपाटीपासून ४५८ फुट उंचीवर शहर वसले आहे. मंगळवेढ्यामधील नगरपालिका क्षेत्रात १४८.२५ हेक्टर क्षेत्र आहे. मंगळवेढा शहर मिरज राज्यमार्गावरती वसले आहे. सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वाचे शहर म्हणून ओळखले जाते. मंगळवेढ्याजवळून भीमा नदी वाहते, त्यामुळे शेतीतून उत्पन्न मोठ्या प्रमाणात मिळते. ऊस व ज्वारी महत्त्वाचे पीक असले तरी इतर कडधान्यांचेही उत्पादन चांगल्या पध्दतीने होते. चांगल्या कसदार जमिनीमुळे व पुरेशा पाणीपुरवठ्यामुळे मंगळवेढा शहराचे आर्थिक उत्पन्न चांगले आहे.

भारतदेश स्वतंत्र झाल्यानंतर ब्रिटीशांनी रूजवलेल्या काही प्रशासनिक सोई सुविधा टिकून राहिल्या. त्यापैकी नगरपालिका ही सुध्दा नगरविकासाच्या दृष्टीने तेवढीच आवश्यक होती. मंगळवेढा नगरपालिका १८७४ रोजी स्थापन झाली. तेंव्हापासून आजतागायत विकासाच्या नव्या दिशांनी उंची गाठण्याचे कार्य केले. मंगळवेढा नगरपालिकेच्या स्थापनेपासून झालेला विकास व कार्य जाणून घेण्याच्या दृष्टीकोनातून मी 'मंगळवेढा नगरपालिकेचा इतिहास (१८७४ ते २०१०)' या शोध प्रबंधामध्ये नगरपालिकेची सविस्तर माहिती वस्तुनिष्ठपणे दिलेली आहे.

## प्रबंधाचे शिर्षकः

मंगळवेढा नगरपालिकेचा इतिहास-१८७४ ते २०१०

## १.२ संशोधन विषयाची निवडः

आधुनिक काळात प्रशासन व्यवस्थेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना फार महत्त्व आहे. मंगळवेढा नगरपालिकेचा अद्यापपर्यंत या पध्दतीने कोणीही अभ्यास केलेला नाही. मंगळवेढा नगरपालिकेचे वैशिष्ट्य म्हणजे भारतात स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रारंभ आणि विकास गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन यांच्या कारकिर्दीत (इ.स.१८८१ ते १८८४) झाला. मात्र त्यापूर्वी मंगळवेढ्यामध्ये सन १८७४ मध्ये स्थापना झालेली ही नगरपालिका आहे. म्हणून तिच्या कार्याचा आढावा व सर्वांगीण अभ्यास व्हावा या अनुषंगाने हा विषय निवडलेला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाही शिक्षणाच्या प्राथमिक शाळा मानल्या जातात. आधुनिक काळात भारतासारख्या लोकशाही प्रधान राष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्र पुरोगामी घटक राज्य असून त्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याचा इतिहास अभ्यासणे भावी काळात निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था विषयक कायदा करून त्याची ब्रिटिश सरकारमार्फत मंगळवेढा येथील नगरपालिका ही ब्रिटीश सरकारने स्थापन केली. तत्पूर्वी मंगळवेढ्यामध्ये शहराचा सर्वांगीण विकासासाठी इ.स.१८७४ मध्ये नगरपालिकेची स्थापना केली. या स्थानिक स्वराज्य संस्थेचा अद्याप कोणत्याही संशोधकाने अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला नाही. म्हणून या संशोधनांतर्गत इ.स.१८७४ ते २०१० या काळात मंगळवेढा नगरपालिकेने केलेल्या कामगिरीचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला आहे.

मंगळवेढा नगरपालिकेची स्थापना झाल्यापासून या नगरपालिकेने आपले कार्य विकासाच्या दिशेने चालवलेले आहे. नगरपालिकेतील राजकीय घडामोडी नगरपालिकेचे प्रशासन शहराच्या विकासासाठी केलेले कार्य इतर नगरपालिकांसाठी आदर्शवत आहेत. उदा. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान राबविलेले आहे. या नगरपालिकेच्या कार्याचा

अभ्यास केल्यास नवीन निर्माण होणाऱ्या नगरपालिकांना आपली उद्दिष्टे ठरविण्यास मदत होईल. त्यामुळे मंगळवेढा नगरपालिकेचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

## १.३ संशोधन विषयाचा कालखंड

संशोधन विषयाचा कालखंड हा इ.स.१८७४ ते २०१० असा आहे. कारण इ.स.१८७४ मध्ये मंगळवेढा नगरपालिकेची स्थापना झाली. या कालखंडातच अनेक नगराध्यक्षांनी व प्रशासनांनी सुधारणा केल्या. मंगळवेढा संस्थान प्रगतशील बनवले. त्यामुळे नगरपरिषदेचाही विकास झालेला होता.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे:

- मंगळवेढा नगरपालिकेच्या स्थापनेमागील उद्दिष्टांचे विश्लेषण करणे.
- मंगळवेढा नगरपालिकेची प्रशासकीय संरचना अभ्यासणे.
- मंगळवेढा नगरपालिकेचे शहराच्या विकासातील योगदानाचा अभ्यास करणे.
- मंगळवेढा नगरपालिकेच्या राजकीय घडामोडीचा अभ्यास करणे.
- मंगळवेढा नगरपालिकेचे तीर्थक्षेत्र विकासातील योगदानाचा अभ्यास करणे.
- संशोधनाअंती येणारे निष्कर्ष, इतरांना मार्गदर्शनार्थ देण्यायोग्य आहेत याचा आढावा घेवून इतरांना उपलब्ध करून देणे.

## १.५ संशोधनाची गृहितके:

मंगळवेढा शहरातील नागरी कारभाराकरीता नगरपालिकेची स्थापना करण्यात आली आहे.

- मंगळवेढा नगरपालिकेत वेळोवेळी राजकीय स्थित्यंतरे झालेली आहेत.
- मंगळवेढा नगरपालिकेने स्वत:ची प्रशासकीय संरचना निर्माण केली आहे.
- विविध करांच्या रूपाने नगरपालिकेचा आर्थिक विकास होत आहे.
- मंगळवेढा नगरपालिकेने शहराच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे.

- मंगळवेढा नगरपालिकेने तीर्थक्षेत्र विकासासाठी, रक्षणासाठी वेगवेगळ्या योजना राबविलेल्या आहेत.

## १.६ संशोधन समस्या

संशोधनातील पहिली पायरी म्हणजे संशोधन कशाचे करावयाचे ठरविणे व शब्दात मांडणे होय. मंगळवेढा शहराच्या सर्वांगीण विकासात नगरपालिकेचा महत्त्वाचा वाटा आहे. नगरपालिकेमुळे शहराच्या विकासाला शिस्तबध्दपणे चालना मिळाली. मंगळवेढा शहरातील जनसंख्येच्या प्रगतीसाठी व त्यातील मानवी घटकाचा विकास घडवून आणण्यासाठी नगरपालिकेतील विविध उपक्रम राबविले होते. कोणत्याही शहराची सामाजिक व आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा प्रगतशील बनत असते. याचे कारण त्या समाजातील सर्व स्तरातील लोकांच्या अपेक्षांमधील होत जाणारा बदल होय. त्यावरूनच शहराच्या विकासाची प्रतिमा ठरविली जाते. सदरचा संशोधन विषय 'मंगळवेढा नगरपालिकेचा इतिहास (१८७४ ते २०१०) हा आहे. हा विषय निवडण्यामागे कारण म्हणजे मंगळवेढा शहरातील समाजाचा सर्वांगीण विकास होण्यामागे नगरपालिकेचे मोठे योगदान आहे हे निदर्शनास आणणे आहे. म्हणून मंगळवेढा शहरातील नगरपालिकेच्या स्थापनेपासून ते २०१० पर्यंत इतिहास सविस्तर दिलेला आहे. यामध्ये नगरपालिकेने शहराचा विकास करण्यासाठी राबविलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिलेली आहे. मंगळवेढा शहरास ही नगरपालिका एक वरदान ठरलेली आहे. म्हणूनच हा विषय निवडला आहे.

## १.७ संशोधनाच्या सिध्दांत कल्पना

१. मंगळवेढा शहरास ऐतिहासिक व धार्मिक वारसा आहे.

२. नगरपालिकेच्या स्थापनेमुळे मंगळवेढ्याचा विकास झाला.

३. मंगळवेढा नगरपालिकेने शहराची स्वच्छता करून लोकांच्या आरोग्याची विशेष काळजी घेतली.

४. मंगळवेढा नगरपालिकेने शहरातील ऐतिहासिक स्थळांचे व धार्मिक स्थळांचे जतन केले.

५. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून जनतेस शिक्षण मिळाले.

## १.८ व्याप्ती व मर्यादा

संबंधित संशोधन विषयाची व्याप्ती १८७४ ते २०१० या काळापूरती मर्यादित असून मंगळवेढा नगरपालिकेच्या स्थापनेपासून १३६ वर्षाच्या कालखंडाचा अभ्यास केला जाणार आहे. संबंधित संशोधनात मंगळवेढ्याची ऐतिहासीक पार्श्वभूमी व मंगळवेढा शहराचा विकास याची माहिती घेतली जाणार आहे. नगरपालिकेची विविध खाते, बांधकाम विभागाने केलेल्या विविध कामांचा आढावा घेतला जाणार आहे. अस्थापन विभाग, आरोग्य विभाग, जकात विभाग, विद्युत विभाग, नगदी खाते, कर विभाग, वृक्ष विभाग इत्यादी खात्यांचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे. नगरपालिकेच्या शैक्षणिक विभागाचा सखोल अभ्यास केला जाणार आहे. मंगळवेढा नगरपालिकेच्या सन १९४५ ते २०१० पर्यंत झालेले नगराध्यक्षांच्या कार्यांचा आढावा घेतला जाणार आहे. त्याचबरोबर मंगळवेढा नगरपालिका क्षेत्रातील सामाजिक परिस्थिती, वेगवेगळ्या जातीजमातींचा एकोप्याचा आढावा घेतला जाणार आहे. मंगळवेढा नगरपालिकेचे प्रशासन व्यवस्थेबद्दल सविस्तर माहिती घेतली जाणार आहे. नगराध्यक्ष व नगरसेवक यांची मुख्य कर्तव्ये व जबाबदाऱ्या, मुख्याधिकाऱ्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या, नगरपालिका सभा, गणपूर्ती, सभेचा वृत्तांत, अर्थसंकल्प याबद्दल माहिती घेतली जाणार आहे.

## १.९ संशोधन तंत्र

प्रस्तुत संशोधनात विषयाचा अभ्यास करत असताना संशोधनाच्या काही तंत्रांचा वापर करण्यात आला आहे. यासाठी मुळ विषयाच्या संदर्भातील साधनांचे प्राथमिक साधने व दुय्यम साधने असे विभाजन करून निवडलेल्या साधनांच्या आधारे प्रस्तुत विषयाचे विश्लेषण केले आहे. निवडलेल्या साधनांच्या आधारे घटनांची सत्यता तपासण्यात आली आहे. प्रस्तुत साधनांच्या आधारे तळटिपा दिल्या आहेत. संदर्भ यादी, निवडक छायाचित्रे, व योग्य परिशिष्टे दिलेली आहेत. मंगळवेढा शहरातील जाणत्या लोकांशी चर्चा करून काही घटनांचे विश्लेषण केले आहे. योग्य त्या संशोधन तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

## १.१० संशोधन पध्दती:

जिज्ञासा अथवा ज्ञान संपादन करणे ही माणसाची मुलभूत प्रवृत्ती आहे. त्यासाठी तो आपल्या ज्ञानेंद्रियांचा वापर करीत असतो. भोवतालच्या जीवनाचे अवलोकन करतो. त्यापासून विविध प्रकारचे अनुभव घेतो. संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जूनी तथ्ये व तत्त्वे परीक्षणासाठी तयार केलेला चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास होय. इतिहास एक सामाजिक शास्त्र आहे. त्यामुळे सामाजिकशास्त्रात प्रचलित असलेल्या सर्वच संशोधन पध्दती इतिहास संशोधनासाठी उपयुक्त असतात.

आपण कोणती पध्दत वापरावयाची संशोधनासाठी निवडलेल्या विषयावर अवलंबून असते. तसेच कोणत्या प्रकारची माहिती आपल्याला गोळा करावयाची आहे त्यावरही आधारीत असते. या संशोधनासाठी ऐतिहासिक पध्दती, सर्वेक्षणात्मक पध्दती, संदर्भ पध्दतीचा उपयोग केलेला आहे. कागदपत्रांच्या आधारे प्रचलित ज्ञानामध्ये भर घालून एखाद्या प्रश्नावर नवा प्रकाश टाकणे तसेच मुलभूत संशोधनामध्ये काहीतरी भर घालणे हा ऐतिहासिक संशोधनाचा हेतू असतो.

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीसाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेतलेला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या पाठीशी असलेल्या सैध्दांतिक संकल्पना स्पष्ट करण्यासाठी वर्णनात्मक किंवा गुणात्मक पध्दती सैध्दांतिक व विश्लेषणात्मक पध्दतीचाही वापर केलेला आहे. विविध समस्यांचे अन्वयार्थ सांगण्यासाठी वृत्तपत्रे, शासकीय तळटिपा दिलेल्या आहेत. वृत्तपत्रे, शासकीय अहवाल, गॅझेटियर, नगरपालिकेचे वार्षिक प्रशासकीय अहवाल इत्यादी साधनांचा वापर केलेला आहे.

**सर्वेक्षण पध्दती**

- विश्लेषणात्मक पध्दती
- ऐतिहासिक संशोधन पध्दती
- मुलाखत पध्दती
- निरीक्षणात्मक पध्दती
- तुलनात्मक पध्दती
- सांख्यिकी पध्दती

## १.११ संशोधनाची संदर्भ साधनेः

प्रस्तुत शोधनिबंधासाठी नगरपालिकेचे दप्तर, ग्रंथालय, वृत्तपत्रे, मुलाखती, सर्वेक्षण, मासिके, वार्षिक अहवाल, विशेषांक, गौरवअंक, विविध वास्तूप्रकल्प या साधनांचे संकलन करून त्यांचे प्राथमिक व दुय्यम साधनांत वर्गीकरण करणार आहे.

## १.१२ संशोधनाचे महत्त्व

मंगळवेढा शहराच्या विकासात नगरपरिषदेचा वाटा महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे नगरपरिषदेचा प्रशासकीय, शैक्षणिक, शहर स्वच्छता, पाणीपुरवठा, सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या, शिक्षण, भाजीमंडई, शॉपिंगसेंटर, विविध योजना इत्यादीद्वारे शहरातील नागरिकांच्या विकासाला मदत झाली आहे. मंगळवेढा शहराचा विकास कोणकोणत्या उपक्रमातून केलेला आहे तसेच त्यांचे होणारे फायदे इत्यादी गोष्टींचा अभ्यास या संशोधनातून होणार आहे. संशोधन म्हणजे एखाद्या समस्येचा शोध घेऊन त्यावर उपाय सूचविणे. त्यासंशोधनाच्या आधारे आढळलेल्या समस्यांच्या संदर्भात अनेक उपाय सूचविणे व त्याद्वारे शहराचा विकास साधणे या संशोधनाचे महत्त्व आहे.

## १.१३ संशोधनाचा आराखडा:

प्रस्तुत विषयाचा पुढील प्रकरणानुसार अभ्यास केला जाणार आहे.

१. प्रकरण पहिले:

प्रस्तावना

२. प्रकरण दुसरे:

मंगळवेढा शहराची पार्श्वभूमी व मंगळवेढा शहराचा इतिहास.

३. प्रकरण तिसरे:

मंगळवेढा नगरपालिकेची स्थापना व विकास

४. प्रकरण चार:

मंगळवेढा नगरपालिकेचा राजकीय व सामाजिक इतिहास.

५. प्रकरण पाचवे:

मंगळवेढा नगरपालिकेतील प्रशासन संरचना.

६. प्रकरण सहावे:

उपसंहार

**प्रकरण पहिले: प्रस्तावना**

या प्रकरणामध्ये प्रास्ताविक, संशोधन विषयाची निवड, संशोधन विषयाचा कालखंड, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधन समस्या, संशोधनाच्या सिध्दांत कल्पना, व्याप्ती व मर्यादा, संशोधन तंत्र, संशोधन पध्दती, संशोधनाची संदर्भ साधने, संशोधनाचे महत्त्व इत्यादींचा अभ्यास केला जाणार आहे.

**प्रकरण दुसरे: मंगळवेढा शहराची पार्श्वभूमी व मंगळवेढा शहराचा इतिहास.**

**मंगळवेढा शहराची पार्श्वभूमी**

मंगळवेढा शहराला ऐतिहासिक परंपरा फार मोठी आहे. प्राचीनकाळी शालीवाहन शकाच्या सुरुवातीला मंगळवेढा शहर मंगल राजाच्या अधिपत्याखाली होते. परचक्र व चोरापासून संरक्षण व्हावे म्हणून शहराला मजबूत तटबंदी व खंदक होते. शहरावर टेहाळणी करण्यासाठी गावाच्या चारी दिशेस उंच असे बुरुज बांधले होते. सांगोल्याच्या क्रांतीनंतर

पेशव्यांनी मंगळवेढा संस्थान पटवर्धन यांच्याकडे दिले व ठिकाण नगरपालिकेची स्थापना होईपर्यंत पटवर्धन यांच्याकडे होते. शिवाय मंगळवेढ्यामध्ये अनेक संत होऊन गेले. या संतांच्या संदर्भातही या प्रकरणामध्ये माहिती देण्यात येणार आहे.

या प्रकरणात भौगोलिक व राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे.

**प्रकरण तिसरेः मंगळवेढा नगरपालिकेची स्थापना व विकास**

मंगळवेढा ही संतांची भूमी असल्याने या शहराचा दिवसेंदिवस विकास होत आहे. या प्रकरणात मंगळवेढा नगरपालिकेच्या स्थापनेपासून इ.स.२०१० पर्यंत शहर विकासासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणार आहे. त्यामध्ये भुयारी गटार योजना, शहरातील व्यापारीपेठा, पाणीपुरवठा, शैक्षणिक विकास, उद्यानांची उभारणी, ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची देखभाल, आरोग्यविषयक सोयी, सुविधा, भाजीमंडई, रस्तेविकास, रोजगार निर्मिती व शिक्षण विषयक कार्य याबाबत आढावा घेतला जाईल.

**प्रकरण चौथेः मंगळवेढा नगरपालिकेचा राजकीय व सामाजिक इतिहास**

नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर नगराध्यक्ष लोकनियुक्त प्रतिनिधीतून निवडला गेला. अनेक राजकीय पक्ष व अपक्षांनी मंगळवेढा नगरपालिकेत आपले राजकीय स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. याचा अभ्यास या प्रकरणात करणार आहे. तसेच मंगळवेढ्यात अनेक जाती धर्माचे लोक राहतात. मराठा, महार, मांग, चांभार, ढोर, लिंगायत, सुतार, लोहार, कुंभार, मुस्लिम धर्माचे लोक राहतात. या लोकांचे राहणीमान, वंश, परंपरा, रूढी, उत्सव, देवदेवता विशेष म्हणजे गैबीपीराच्या कमिटीचे चेअरमन श्री बबन आवताडे हिंदू आहेत व देवीचे चेअरमन मुलाणी आहेत. अशा प्रकारची एकता मंगळवेढा शहरामध्ये नांदत आहे. कोणत्याही प्रकारचा जातीभेद पाळला जात नाही. याचा अभ्यास या प्रकरणात करणार आहे.

१. १८७४ रोजी नगरपालिका स्थापन झाल्यानंतर झालेल्या निवडणूका व १८७४ पासून ते २०१० पर्यंतचे विविध नगराध्यक्षांची माहिती या प्रकरणात स्पष्ट करणार आहे.
२. मंगळवेढा नगरपालिका स्थापनेपासून २०१० पर्यंत झालेल्या विकासांची माहिती मी या प्रकरणात देत आहे.

३. मंगळवेढा नगरपालिकेतील सामाजिक परिस्थितीचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

**प्रकरण पाचवे: मंगळवेढा नगरपालिकेतील प्रशासन संरचना**

प्रशासन विकासाचा केंद्रबिंदू असते. त्यासाठी प्रशासन भक्कम असावे लागते. प्रशासनाचा विचार करता मंगळवेढा नगरपालिकेच्या स्थापनेपासून सन २०१० पर्यंतची नगरपालिकेची संरचना काय होती, यात प्रशासनासाठी कोणकोणत्या अधिकाऱ्यांची नियुक्ती, वेगवेगळ्या खात्यांची निर्मिती कशी झाली याबाबतचा आढावा या प्रकरणात घेतला जाईल. तसेच नगरसेवक व शहरविकास, नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच शहराच्या विविधांगी विकासासाठी अर्थसंकल्पीय बाबींची माहिती या प्रकरणात दिली आहे.

**प्रकरण सहावे: 'उपसंहार'**

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या अभ्यासानंतर मंगळवेढा शहराची पार्श्वभूमी, मंगळवेढा नगरपालिकेची स्थापना, मंगळवेढा नगरपालिकेतील राजकीय व सामाजिक घडामोडी, मंगळवेढा नगरपालिकेतील प्रशासनाची संरचना आणि नगरपालिकेचे शहर व संतांचे विकासातील योगदान, रोजगार निर्मितीसाठी केलेले प्रयत्न इत्यादी बाबींचे मूल्यमापन करून निष्कर्ष मांडला जाईल.

## प्रकरण दुसरे

# मंगळवेढा शहराची पार्श्वभूमी व मंगळवेढा शहराचा इतिहास

**२.१ प्रस्तावना:**

**२.२ भौगोलिक परिस्थिती:**

**२.३ मंगळवेढा परिसरातील प्रमुख नद्या:**

२.३.१ भीमा नदी:

२.३.२ माण नदी:

**२.४ हवामान:**

**२.५ जमीन व पिके:**

**२.६ मंगळवेढा शहराची लोकसंख्या व क्षेत्रफळ:**

**२.७ प्राचीन कालखंड व मंगळवेढा:**

२.७.१ मंगळवेढा नावाची उत्पत्ती:

२.७.२ मध्ययुगीन कालखंड व मंगळवेढा

**२.८ मंगळवेढ्याचा संक्षिप्त इतिहास**

२.८.१ इ.स. १४०० ते इ.स.१५००

२.८.२ इ.स. १७०० ते इ.स.१८००

२.८.३ इ.स. १८०० ते इ.स.१९००

**२.९ मंगळवेढ्याची लढाई, ऐतिहासिक अभ्यास**

२.९.१ मंगळवेढ्याची लढाई

२.९.२ आधुनिक कालखंड

२.९.३ १८५७ चा उठाव

**२.१० मंगळवेढ्यातील शिल्पवैभव**

२.१०.१ काशीविश्वेश्वर मंदिर

२.१०.२ वरुण मूर्ती

२.१०.३ शरभ

२.१०.४   ब्रह्मदेव मूर्ती

२.१०.५    गणेश मूर्ती

२.१०.६   एकांतद रामय्या शिलापट

२.१०.७  मंगळवेढ्यातील पुरातत्त्वीय साधने

## २.११  मंगळवेढ्यातील संत परंपरा:

२.११.१ श्री संत बसवेश्वर

२.११.२  श्री संत चोखामेळा

२.११.३ संत सोयराबाई

२.११.४ श्री संत कान्होपात्रा

२.११.५ श्री संत दामाजी पंत

२.११.६ श्री टिकाचार्य

२.११.७ श्री संत गोपाबाई

## २.१३ समारोप:

**संदर्भ साधने:**

## प्रकरण दुसरे

# मंगळवेढा शहराची पार्श्वभूमी व मंगळवेढा शहराचा इतिहास

## २.१ प्रस्तावना:

मंगळवेढा हे महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील एक धार्मिक स्थळ आहे. संतांचे माहेरघर, वारकरी सांप्रदायाचे आद्यपीठ म्हणून ओळखले जाते. दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या पंढरपूर पासून केवळ २३ किलोमीटर (१४ मैल) अंतरावर आहे.[१] 'दामाजीपंतांचा मंगळवेढा' म्हणूनही या तीर्थक्षेत्राचा उल्लेख केला जातो. महाराष्ट्रामध्ये अनेक तीर्थक्षेत्रे आहेत. त्यामध्ये देहू, आळंदी (पुणे), नेवासे (अहमदनगर), पैठण (औरंगाबाद), तेर, तुळजापूर (उस्मानाबाद), त्र्यंबकेश्वर (नाशिक), पंढरपूर, बार्शी, मंगळवेढा (सोलापूर) इत्यादी तिर्थक्षेत्रांचा समावेश होतो. मंगळवेढ्यामध्ये अनेक राजे-राजघराणी प्राचीन काळापासून अस्तित्वात होती. त्यामध्ये कलचुरी, बहामनी, देवगिरीचे यादव, आदिलशाही, मराठे इत्यादींनी मंगळवेढ्यावर वेगवेगळ्या कालखंडात आपले वर्चस्व निर्माण केले होते. काळाच्या ओघात जरी ही घराणी नष्ट झाली असली तरी मंगळवेढ्याचे महत्त्व प्राचीन काळापासून टिकून आहे. मंगळवेढ्यातील संत परंपरेने महाराष्ट्रातील आणि कर्नाटकातील माणसांच्या हृदयात वेगळेच स्थान निर्माण केले आहे.[२]

महाराष्ट्रातील संतांनी मंगळवेढ्याचे महत्त्व मुक्त कंठाने गायले आहे. मंगळवेढ्याच्या पावन नगरीत महात्मा बसवेश्वर, श्री दामाजीपंत, श्री संत चोखामेळा, श्री संत कान्होपात्रा, श्री टिकाचार्य, श्री संत गोपाबाई, श्री संत सिताराम महाराज, श्री बाबा महाराज आर्विकर, लतीफ बुवा, स्वामी समर्थ, मौनी बुवा इत्यादी संत होवून गेले. या संतांनी मंगळवेढ्याचा अगाध महिमा सर्वत्र वाढविला.[३]

## २.२ भौगोलिक परिस्थिती:

मंगळवेढा शहर सोलापूर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असून जिल्हा मुख्यालयापासून नैऋत्येस ५४ कि.मी. अंतरावर आहे. मंगळवेढा १७ अंश, १३ उत्तर रेखावृत्त व ७५ अंश २५ अंश पूर्व अक्षवृत्तावर आहे. या शहराची समुद्रसपाटीपासूनची उंची ४५८

मीटर एवढी आहे. मंगळवेढा महाराष्ट्राचे आध्यात्मिक केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूरच्या दक्षिणेस २३ कि.मी. (१४ मैल) अंतरावर आहे. मंगळवेढा या शहरास पंढरपूर, सांगोला, जत व मोहोळ या तालुक्यांच्या सीमा स्पर्श करतात.[४]

मंगळवेढा शहरास दळण-वळणाच्या चांगल्या सोयी आहेत. मंगळवेढा शहरातून प्रमुख राज्यमार्ग क्रमांक ३ (रत्नागिरी-नागपूर) व राज्यमार्ग क्रमांक १४१ (अहमदनगर-विजापूर) मार्ग जातात. मंगळवेढा या प्रमूख राज्य मार्गाने अनेक मोठ्या शहरांना जोडलेले आहे. मंगळवेढा महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सीमेलगत असून विजापूर शहराशी जोडलेले आहे. या शहरासाठी सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन पंढरपूर आणि सांगोला या ठिकाणी आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबईपासून मंगळवेढा सुमारे ३९१ कि.मी. अंतरावर आहे. दळणवळणाच्या दृष्टीने मंगळवेढा शहर महत्त्वाचे आहे.[५]

## २.३ मंगळवेढा परिसरातील प्रमुख नद्याः

भीमा, सीना, भोगावती, नीरा आणि माण या जिल्ह्यातील प्रमुख नद्या आहेत. सोलापूर जिल्हा दुष्काळी भाग असल्याने या ठिकाणी पावसाचे सरासरी प्रमाणही कमी आहे. त्यामुळे येथील नद्यांना फक्त पावसाळ्यात पाणी असते. इतर वेळेस या नद्यांचे पात्र कोरडे असते. भीमा नदी ही एकमेव बारमाही नदी असल्यामुळे या नदीला सोलापूर जिल्ह्याची संजीवनी मानली जाते. या नदीवर उजनी (भीमानगर, ता.माढा) या ठिकाणी धरण आहे. या धरणातून सोलापूर जिल्ह्याला पाणीपुरवठा केला जातो. भीमा नदीवर ठिकठिकाणी असणाऱ्या बंधाऱ्यातून पिण्यासाठी आणि शेतीसाठी पाणीपुरवठा केला जातो.

### २.३.१ भीमा नदीः

मंगळवेढ्यापासून अवघ्या ८ मैलावरून (दक्षिण वाहिनी) भीमा नदी वाहते. भीमा नदी ही कृष्णेची प्रमुख उपनदी असून तिची लांबी सुमारे ८६७ कि.मी. व जलवहन क्षेत्र सुमारे ७०६१९ चौ.किमी. आहे. भीमानदीला 'भीमरथी' या नावानेही ओळखले जाते. धार्मिकदृष्ट्या भीमा नदीला 'महानदी' असे म्हटले जाते. मत्स्यपुराण, वामन पुराण इत्यादीमधून व महाभारत या महाकाव्यातून या नदीचा उल्लेख आढळतो. भीमा नदीच्या उगमाबद्दल अशी एक

अख्यायिका सांगितली जाते की, त्रिपुरासुराचा वध करून भगवान शंकर श्रमपरिहारार्थ भीमाशंकर जवळ आले असता त्या ठिकाणी अयोध्येचा राजा 'भीमक' तप करीत होता. तो शंकरास सामोरा गेला त्यावेळी शंकराने प्रसन्न होवून भीमक राजास 'वर' मागण्यास सांगितले. त्यावेळी भीमक राजाने शंकराला आलेल्या घामाच्या धारांची पुण्यपावन नदी होऊ दे' असा वर मागितला आणि त्याप्रमाणे या नदीचा उगम झाला. भीमक राजाच्या नावावरून या नदीस 'भीमा नदी' नाव प्राप्त झाले.[६] भीमा नदी पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात 'भिमाशंकर' या ठिकाणी उगम पावते. ही नदी आग्नेयेकडे पुणे, अहमदनगर, सोलापूर जिल्ह्यातून वाहत जाऊन कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्ह्याच्या सीमेवर रायचूरच्या उत्तरेस 'कुडलसंगम' येथे कृष्णा नदीस मिळते. सोलापूर जिल्ह्याच्या आग्नेय दिशेने भीमा नदी वाहते. नदीच्या उजव्या तीरावर पंढरपूर, माचणूर आणि डाव्या तीरावर बेगमपूर ही तीर्थक्षेत्रे आहेत.[७]

सोलापूर जिल्ह्यात या नदीच्या काठावर करवली, पंढरपूर, भंडारकवठे, सादेपूर, आवा, टाकळी, माचणूर, बेगमपूर ही तीर्थक्षेत्र आहेत. भीमा नदी पावसाळ्यात दुथडी भरून वाहते आणि इतर वेळी तिचा प्रवाह लहान असतो.

### २.३.४ माण नदी:

राष्ट्रकुट राजा मानांक याने इ.स.३७५ मध्ये माणपूर (सातारा जिल्ह्यातील माण तालुका) वसविले आणि त्या ठिकाणी आपली राजधानी स्थापन केली. मानांक राजाच्या नावावरून माण तालुका माणदेश म्हणून ओळखला गेला. आणि या प्रदेशातून वाहणारी नदी म्हणून या नदीला 'माण नदी' नाव प्राप्त झाले असावे. माण नदीने सांगोला शहराचा पूर्ण परिसर, मंगळवेढ्याचा पश्चिम भाग आणि पंढरपूर तालुक्याचा काही भाग व्यापला आहे. येथील हवामान कोरडे असून पावसाचे सरासरी प्रमाण ४५ मी.मी. असल्यामुळे ही नदी बारमाही कोरडी असते. माण नदी ही महादेवाच्या डोंगररांगेत 'कुळकाजाई' या ठिकाणी उगम पावते. माण नदीला अनेक लहानमोठे ओढे व नद्या येवून मिळतात. त्यामध्ये वाघजाई, बेलवण आणि कोरडा या माण नदीच्या उपनद्या आहेत. वाघजाई नदी ही माण नदीची सर्वात मोठी उपनदी आहे. बेलवण नदीच्या रामघाट नाल्यावर बुद्धीहाळ तलाव  व माण नदीवर राजेवाडी तलाव प्रमुख मोठे तलाव आहेत. माणनदी सातारा जिल्ह्यातून वाहत येवून सांगोला या ठिकाणी

सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करते. पुढे ही नदी मंगळवेढ्याच्या उत्तरेकडून वाहत येवून 'सरकोली' (ता.पंढरपूर) या ठिकाणी भीमा नदीस उजव्या बाजूस मिळते.[८]

## २.४ हवामान:

मंगळवेढा हे ठिकाण समुद्रसपाटीपासून ४५८ मी उंचीवर आहे. मंगळवेढा दुष्काळी भागात येत असल्याने या ठिकाणी पावसाचे सरासरी प्रमाण जून ते ऑक्टोबर महिन्यात २४ इंच (६१० मी.मी.) एवढे असते. येथील हवामान उष्ण आणि कोरडे असून ते ज्वारी, मका, बाजरी, गहू, हरभरा इत्यादी पिकांना अनुकूल असल्याने ही पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. येथील उन्हाळ्यातील तापमान ४० अंश सेंटीग्रेड तर हिवाळ्या १० अंश सेंटीग्रेड एवढे असते.[९]

## २.५ जमीन व पिके:

मंगळवेढ्याची जमीन काळी कसदार आहे. साधारणत: येथील जमिनीचे तीन प्रकार पडतात. काळी जमीन, भुरी (खडकाळ) आणि तांबूस रंगाची जमीन या ठिकाणी पावसाचे प्रमाण कमी असल्याने पावसावर जिरायत शेती केली जाते. बागायती शेती ही विहिरीच्या आणि नदीच्या पाण्यावर केली जाते.

या ठिकाणी पावसाचे सरासरी प्रमाण कमी असल्याने पावसाच्या पाण्यावर आधारित पिके घेतली जातात. येथील जमीन काळी कसदार आणि पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता जास्त असल्याने तेथे ज्वारी, बाजरी, करडई, हरभरा, तूर, करडई, मटकी, जवस, कापूस, भुईमुग, सूर्यफूल ही पिके घेतली जातात. या ठिकाणी ज्वारीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्याने मंगळवेढ्यास ज्वारीचे कोठार असे म्हणतात.

## २.६ मंगळवेढा शहराची लोकसंख्या व क्षेत्रफळ:

मंगळवेढ्यात विविध जाती-धर्मांचे, पंथाचे लोक राहतात. (हिंदू-मुस्लिम, ख्रिश्चन, महार, मांग, चांभार, कुंभार, लोहार, सोनार, परीट, न्हावी) २००१ च्या जनगणनेनुसार मंगळवेढ्याची लोकसंख्या सुमारे २८,७५५ एवढी असून त्यामध्ये ५२ टक्के पुरूष तर ४८ टक्के महिला आहेत. मंगळवेढ्याची साक्षरता दर ६८ टक्के एवढा आहे. मंगळवेढा

नगरपालिकेचे क्षेत्र १.४८ चौ.कि.मी. एवढे आहे. मंगळवेढा तालुक्यामध्ये एकूण १७९ खेडी असून त्यांचे क्षेत्रफळ सुमारे ११४०.९ चौ.कि.मी. एवढे आहे.[११]

## २.७ प्राचीन कालखंड व मंगळवेढा:

प्राचीन मंगळवेढ्याची फार तपशीलाने माहिती उपलब्ध होत नाही. पण काही आलेख, तसेच काही आख्यायिकावरून मंगळवेढ्याचा प्राचीन इतिहास समजतो. मंगळवेढा नावाच्या उत्पत्तीवरून प्राचीन काळाची माहिती मिळते.

### २.७.१ मंगळवेढा नावाची उत्पत्ती:

मंगळवेढा शहरास ऐतिहासिक परंपरा प्राचीन आहे. शहर कधी वसले याबद्दल निश्चित पुरावा मिळत नाही. शालीवाहन शकाच्या सुरुवातीस शहर चालुक्य राजा मंगलेश याच्या अधिपत्याखाली होते. त्याच्या नावावरून मंगळवेढा नाव पडले असावे असे सांगितले जाते. मंगळवेढा शहरास 'मंगळवेढा, मंगळवेष्टित, मंगलिवेढा, मंगलवेढा' अशी नावे वेगवेगळ्या कालखंडात होती. मंगल राजाच्या अगोदर या शहराचे प्राचीन नाव 'जीवनपुरी' होते.[१२] प्राचीन काळी याठिकाणी मंगलाई नावाची देवी होती. तिच्या नावावरूनही या शहरास मंगळवेढा नाव पडले असावे, अशी आख्यायिका सांगितली जाते. 'भीमा महात्म्य आणि स्कंद पुराणात मंगळवेढा शहराचा 'मेतुलिंगपुरी' असा उल्लेख आढळतो.[१३]

कौरवांनी पांडवांना द्युतक्रीडेमध्ये पराजित करून त्यांचे राज्य हिरावून घेतले आणि बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास अशी शिक्षा दिली. या कालावधीत पाच पांडव मंगळवेढा परिसरात वास्तव्यास होते.[१४] त्यावेळी या ठिकाणी जंगल होते आणि जमीन उंचसखल होती. धर्मराजाच्या आज्ञेने अर्जुनाने आपल्या धनुर्विद्येच्या जोरावर तेथील जंगल नष्ट केले आणि भीमाने त्याच्या महाकाय गदेच्या सहाय्याने उंचसखल जमीन सपाट केली आणि त्या ठिकाणी कालांतराने मानवाची वस्ती निर्माण झाली, अशी आख्यायिका सांगितली जाते. [१५]

मंगळवेढ्यामध्ये विविध राजघराण्यांनी राज्य केले. त्यामध्ये कलचुरी, चालुक्य, देवगिरीचे यादव, बहामनी, बीदरशाही, आदिलशाही, मराठे, पेशवे इत्यादी महत्त्वाची आहेत.

पेशवाईनंतर मंगळवेढा पटवर्धनांच्या सांगली संस्थानाचा एक महत्त्वाचा भाग बनला आणि नंतर १९ फेब्रुवारी १९४८ रोजी सांगली संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले.[१६]

### २.७.२ मध्ययुगीन कालखंड व मंगळवेढा

दक्षिणेत कर्नाटक व महाराष्ट्रात इ.स.पाचव्या शतकात चालुक्य घराणे उदयास आले. या घराण्याची दुसरी शाखा बदामीचे चालुक्य ही जास्त प्रसिद्ध होती. याशिवाय लहान शाखा गुजरात, तेलंगणात पसरल्या होत्या.[१७] चालुक्य घराणे मुळचे कर्नाटकचे परंतु इ.स.दहाव्या शतकापासून दक्षिणेतील कल्याणीच्या राजवंशाने स्वत: सोमवंशाशी संबंध जोडण्याचा प्रयत्न केला. या घराण्यातील शेवटचा राजा विजयादित्यने दक्षिणेत येवून त्रिलोचनात्मक राजाचा पराभव केला. त्याच्या मृत्यूनंतर त्यांच्या विष्णूवर्धन या मुलाने कदंब, गंग इत्यादी राज्ये जिंकून आपले राज्य स्थापन केले. चालुक्याचा इतिहास समजण्यासाठी चिनी प्रवाशी 'युआन च्वाँग' चे प्रवासवर्णन आणि चरित्र महत्त्वाचे ठरते.

## २.८ मंगळवेढ्याचा संक्षिप्त इतिहास

आज संताची भूमी म्हणून मंगळवेढा परिचित आहे. हजारो वर्षापासून या शहराला एक भव्य दिव्य ऐतिहासिक परंपरा लाभलेली असून महाराष्ट्रातील अनेक संत सज्जनांचा सहवास या नगरीला लाभला आहे. त्यामुळे समता व बंधुत्त्वाची शिकवण येथून सुरू झाली. जयतिर्थ टिकाचार्यांचे सुरुवातीच्या कालावधीतील वास्तव्य मंगळवेढा येथेच होते. ज्ञानेश्वरांच्या समकालीन आध्यात्मिक लोकशाहीचे प्रणेते चोखोबांनी तर मंगळवेढा आपली कर्मभूमी मानली आणि कुसुखाली आपला देहत्याग केला. मंगळवेढे ही चोखोबाची कर्मभूमी असून ती चोखोबाप्रमाणे दामाजीची कर्मभूमी म्हणून देखील ओळखली जाते.

### २.८.१ इ.स. १४०० ते इ.स.१५००

बहामनी राज्याचे वेळी इ.स. १४५८ ते इ.स.१४६० साली महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. यास श्री दामाजी पंताचा दुष्काळ असेही म्हणतात. श्री दामाजीपंतांनी त्यावेळी तेथील तहसिलदार असल्यामुळे भुकेने, दुष्काळाने पिडीत झालेल्या लोकांकरिता त्यांनी धान्याची पेवे लुटविली. त्याकरिता बादशहाने त्यांना कैद केले असता, पंढरीच्या पांडुरंगाने विठू महाराचे रुप

घेवून दरबारात गेले व त्यांनी बादशहाची बिदागी भरून दामाजीपंतांची सुटका केली. अशी आख्यायिका आहे. मुघल सरदार बहादुर जिलानी याने मंगळवेढा आसपासचा मुलूक जिंकला व मंगळवेढा दिल्लीचे मुघल अंमलाखाली इ.स. १४६५ ते इ.स.१४७५ पर्यंत होते. इ.स.१४९३ मध्ये मंगळवेढे येथे भुईकोट किल्ला बांधला. हा किल्ला एक प्रमुख व मजबूत लष्करी ठाणे म्हणून प्रसिद्ध झाले. बिदर बादशहा महिबुब शहा याने स्वारी करून बहादुर जिलाणीचा पराभव करून त्यास ठार मारून मंगळवेढे हे ठाणे पुन्हा जिंकून आपल्या ताब्यात घेतले.[१८]

इ.स. १३९६ ते इ.स.१४०८ अशी बारा वर्षे दुर्गा देवीचा दुष्काळ या भागात पडला. त्यात मंगळवेढे ही सापडले नंतर इ.स. १४२२ ते इ.स.१४२३ आणि इ.स.१४६७ ते इ.स.१४७४ या साली दोन मोठे दुष्काळ पडून मंगळवेढे गावाची वाताहत झाली. लोक गाव सोडून गेले, देश हैराण झाला. २० वर्षे मंगळवेढे व आसपासची गावे ओसाड राहिली, गावात थोडेच लोक येथे वास्तव्यास राहिले म्हणून इतर गावातून व दूरवरून मोठी घराणी येथे वास्तव्यास आणून त्यांना जमिनी देवून पुन्हा वसाहत करावी लागली. या लोकापैकी नांगावाचे प्रतापरुद्र इंगळे यांना आणून देशमुखी करून दिली. [१९]

आलूर अचालेरे येथून भानशेट होनराव यास आणून देशमुखाच्या तीन तक्षिमा करून दिल्या. अनग येथून कोयाजी बीन नागदेव यास आणून देशमुखाच्या चार तक्षिमा केल्या. विठ्ठल कसगावडे, चंडरस कुलकर्णी ही घराणी गावातच होती, त्यांना पाटील, कुलकर्णी वतने दिली. इतर गावांहून खालील फुगारे, भगरे, हजारे, जठार, उन्हाळे, कोंडुभैरी, धावलींग, मुरडे, ताड, टकले, आयवळे, इंगळे, तानगावडे, तिपनाईक, कसगावडे, गवळी, चौगुले, नाडगौडा, बोदले, जोगन, जावळे, बहिरजी, ढवण, जोशी, काटकर, घाटूळ, घुले, चौधरी, महाजन, खराडे, वाकडे, भांगे, आवताडे, उमाडे, गुंगे, मुदगुल, बोमन्ना, वठारे, होनमाने इ. घराणे मंगळवेढ्याला आली. या लोकांना ज्या ज्या भागात जमिनी दिल्या तेथील झाडी तोडून जंगल साफ करून त्यांनी शेती केली. त्या त्या स्थळाला त्यांची नावे दिली. असून आजही मंगळवेढे शिवारातील जमीन अमक्या स्थळात आहे अशी ओळखली जाते. सर्व स्थळे मिळून ७२ भागात मंगळवेढ्याची जमीन वाटली गेली आहे. इ.स.१४८९ मध्ये मंगळवेढा गाव जिंकून विजापूरच्या आदिलशहाने आपल्या राज्यात सामील केले.[२०]

### २.८.२ इ.स. १७०० ते इ.स.१८००

इ.स. १७०० नंतर मोगल अंमल संपून हा किल्ला मराठयांच्या ताब्यात आला. श्री छत्रपती शाहू महाराज यांनी पांढरे यांना प्रमुख नेमले. इ.स. १७०८ ते इ.स.१७४२ पर्यंत त्यांचा अंमल होता. त्यांनी सध्या उभी असलेली चौबुर्जी इ.स.१७२० ते इ.स.१७३० या काळात बांधल्याचा उल्लेख मिळातो. ही चौबुर्जी मुख्य किल्ल्यातील आतील बालेकिल्ला आहे. तो चौकोनी असून प्रत्येक बाजुची लांबी २३० फुट आहे. भिंत १८ फुट उंच असून १८ फुट रुंद आहे. त्यास रणमंडल, रहाटभुत व बडेखान असे चार बुरुज असून ते २५ फुट लांब व ३० फुट व्यासाचे आहेत. तटाचे रणमंडळ बुरुजावर तास वाजवीत असत. म्हणून त्या बुरुजास तासबुरुज असे म्हणू लागले. सध्या करंदीकर वकील राहतात त्यांच्या घराजवळील हा रणमंडळ बुरुज होय. इ.स. १७४२ ते इ.स. १७५० पर्यंत पंतप्रतिनिधीचा अंमल असून यमाजी शिवदेव हे येथे सरदार होते. इ.स. १७५० पासून प्रथम कामवीसदार म्हणून मंगळवेढ्यास आले नंतर गोविंद हरी पटवर्धन यांना संरजाम हा किल्ला इ.स.१७५१ साली दिला गेला. पटवर्धनांचे मिरज व मंगळवेढे हे दोन महत्त्वाचे किल्ले होते. गोविंद हरी पटवर्धन यांच्यावर पेशवे दरबाराची इतराजी झाली त्यावेळी मंगळवेढे येथे किल्ल्यात येवून राहिले होते. त्यावेळी त्यांनी श्री संत दामाजी मंदिरात सेवा केली. म्हणून त्यांना त्यांच्या कृपाप्रसादामुळे जहागीर परत मिळाली. अशी त्यांची श्रद्धा होती. पुरुषोत्तम दाजी पटवर्धन हे मधःशाम यांचे नातू होते. ते मंगळवेढे येथे राहत होते. इ.स. १७५५ साली श्रीमंत नानासाहेब पेशवे, श्रीमंत भाऊसाहेब व श्रीमंत दादासाहेब पेशवे हे मंगळवेढा येथे येवून काही दिवस राहिले असल्याचा उल्लेख मिळतो. त्यावेळी मंगळवेढे परगणा होता व आंबेगाव (सध्या आंबे, चळे म्हणून असलेले गाव) मंगळवेढे परगण्याखाली होते. ते गाव त्यावेळी श्रीमंत पेशव्यांनी नारायणकृष्ण व पुरुषोत्तम कृष्ण यांना इनाम करून दिला. श्री पुरुषोत्तम दाजी हे श्रीमंत नारायणराव पेशवे याचा खुन झाला त्यावेळी मंगळवेढ्यास राहत होते.[२१]

### २.८.३ इ.स. १८०० ते इ.स.१९००

इ.स.१८०० ते इ.स.१९०० मध्ये पटवर्धन घराण्याच्या वाटण्या होवून मंगळवेढे श्रीमंत चिंतामनराव, आप्पासाहेब, सांगलीकर पटवर्धन यांचे वाटणीस आले. इ.स. १८१८ मध्ये

मंगळवेढ्याहून १३ मैलावर असलेल्या आष्टी गावी शेवटची मराठा-इंग्रज यांच्यात लढाई होवून मराठा साम्राज्य लयास गेले. पेशवे बाजीराव व्दितीय यांचा सेनापती बापु गोखले हे धारातिर्थी पडले. आजही मंगळवेढे शहरात सेनापती बापु गोखले यांचा वाडा पडक्या अवस्थेत आहे. श्री संत चोखामेळा चौकातून पूर्वेस मारवाडी गल्लीतून थोडे पुढे गेले असता आपणास उजव्या हातास तो वाडा असलेला दिसतो. आपल्या तलवारीचे तिखट पाणी इंग्रजास पाजून मराठी साम्राज्य टिकविण्याची खटपट करणारा हा शूर योद्धा मंगळवेढे येथे राहत होता. याचा अभिमान मंगळवेढा जनतेस आज पाहिजे, पण मंगळवेढ्याची जनता बापू गोखले यांना आज विसरली आहे. त्यांचे शहरात कोठेही स्मारक नाही. मराठी राज्य गेले पण महाराष्ट्राचे मन इंग्रजांनी संपूर्ण मारलेले नव्हते. इ.स. १८५७ साली उत्तर भारतात स्वातंत्र्याचा पहिला प्रयत्न होताच त्याचे पडसादही मंगळवेढ्यात उमटलेले दिसतात. या उठावात काही प्रत्यक्ष कृती करत होते. इंग्रज सरकार संशयावरुनही पकडून लोकांना त्रास देत होते. स्वातंत्र्य युद्धात भाग घेतला म्हणून मंगळवेढ्याहून श्री.नारायणराव नाना पटवर्धन, भास्करराव जमखंडीकर, आलमसाहेब काझी व गंगाधरराव आपटे यांना ता. १/१२/१८५७ रोजी पकडून सातार येथे चौकशी करिता नेले. पण नंतर त्यांना सोडून देण्यात आले. चिंतामणराव, आप्पासाहेब नंतर श्रीमंत धोंडीराज तात्यासाहेब हे सांगली संस्थानाचे अधिपती झाले. त्यांना १८५९ साली मुखत्यारी आली. त्यांच्या कारकीर्दीत सांगली संस्थानाचा कारभार काही वर्षे ब्रिटीश सरकारच्या अंमलाखाली होता. इ.स. १८७६ पर्यंत हा किल्ला मजबुत स्थितीत होता. सांगली संस्थानात ब्रिटीश ॲडमिनिस्ट्रेशन आल्यामुळे जॉंईट ॲडीमनिस्ट्रेशन कॅप्टन बेस्ट यांनी किल्ल्याचे दरवाजे कायमचे पाडले व मेजर वॉलरने तट पाडला. तटाची माती व दगड लोकांनी नेले व खंदक ही बुजवले गेले काही बुरुज पडले, काही बुरुज मुद्दाम पाडले गेले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र राष्ट्र झाले १९ फेब्रुवारी १९४८ रोजी ज्यावेळेस सांगली संस्थानचे भारतात विलीनीकरण झाल्यानंतर मंगळवेढे हे शहर सोलापूर जिल्हयातील एक तालुका झाला.[२२]

प्राचीन काळांपासून अनेक राजवंशाचा अंमल मंगळवेढा या शहरावर होता. इ.स. १४०० ते इ.स.१५०० या काळामध्ये मंगळवेढे या गावावर बहामनी राज्याचे राज्य होते. यावेळीच संत दामाजी हे संत होवून गेले. त्यांनी दातृत्वाची दीक्षा या भूमीला दिली. इ.स.१७००

ते इ.स.१८०० या काळामध्ये मंगळवेढ्यातील किल्ल्यावरील मोघल अंमल संपून तो किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आला. हा किल्ला तास बुरुज म्हणून ओळखला जातो. या काळात नानासाहेब पेशवे, श्रीमंत बापुसाहेब व श्रीमंत दादासाहेब पेशवे हे येथे काही दिवस राहिले होते. यावरुन मध्यकालखंडामध्ये सुद्धा इतिहासाच्या दृष्टीने मंगळवेढा शहर अतिशय महत्त्वपूर्ण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पावन स्पर्श या भूमीला झालेला आहे. मंगळवेढा भूमीमध्ये इ.स. १४००-१९०० या कालखंडात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या. असल्यामुळे मंगळवेढ्याचा इतिहास हा महत्वाचा आहे म्हणून त्यावर आणखी संशोधन करण्याची गरज आहे.[२३]

## २.९ मंगळवेढ्याची लढाई, ऐतिहासिक अभ्यास

महाराष्ट्राच्या इतिहासात विशेषतः शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा अभ्यास करीत असताना मंगळवेढा या ऐतिहासिक स्थळांचा अनेकदा उल्लेख मिळतो. अनेक संताचे माहेरघर असणारे मंगळवेढा हे ऐतिहासिक स्थळ आहे. याच ऐतिहासिक स्थळास दामाजी पंतांचा मंगळवेढा म्हणूनही ओळखले जाते. याच मंगळवेढा नगरीमध्ये प्राचीन काळापासून अनेक राज घराण्यांनी राज्य केल्याचे आपणास दिसून येते.

### २.९.१ मंगळवेढ्याची लढाई

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना महाराष्ट्रात केल्यामुळे पुढील काळात आदिलशहा व मुघल यांच्याबरोबर संघर्ष अनिवार्य होता. शाहिस्तेखानाचा पराभव व सुरतेची लूट, पुढील काळात मिर्झा राजे जयसिंगची स्वारी यामुळे दक्षिणेच्या एकूणच राजकारणावर व्यापक परिणाम झाल्याचे दिसते.[२४]

पुरंदरच्या तहावेळी आदिलशहाच्या विरोधात मुघलांना मदत करण्याचे छत्रपती शिवाजी महाराजांनी मान्य केले होते. त्याचाच परिणाम मुघल व आदिलशहा यांच्या झालेल्या लढाईत शिवाजी महाराज यांनी मुघलांच्या बाजूने मंगळवेढ्याच्या लढाईत भाग घेतला. मुघल फौजा आदिलशाही जिंकून घेण्याच्या उद्देशाने म्हसवड, भाळवणी, कासेगाव मार्गे मंगळवेढ्यास हजर झाल्या. याच काळात बहलोलखान यांचा नातू अब्दुल महमुद मुघलास येवून मिळाला.

शिवाजी महाराज व मिर्झा राजे जयसिंग यांची भेट दि. १८ नोंव्हेबर १८६५ रोजी मंगळवेढ्यात झाली. त्यावेळी शिवाजी महाराज मुघलाबरोबर आदिलशहा विरोधात लढण्यासाठी आल्याचा उल्लेख मिळतो. मंगळवेढा येथे मुघल व आदिलशहा यांच्यात झालेल्या लढाईत आदिलशहाकडून वझीर खान व सेनापती शर्जाखान तर मुघलाकडून दिलेरखान व शिवाजी महाराज लढाईत सहभागी होते. शर्जाखान, व्यंकोजी राजे, मुहमद इखलासखान, अब्दुल अहमद, घाडगे, जगताप, बोंधळे, खंडागळे हे आदिलशहाकडून लढत होते. याचा उल्लेख मिळतो. आदिलशहा सैन्य व मुघली सैन्य यांचा प्रथम संघर्ष २५ डिसेंबर १६६५ रोजी घडून आला. या लढाईत मुघल सैन्याचा पराभव झाल्याचा उल्लेख मिळतो.[२५]

२५ डिसेंबर १६६५ रोजी मंगळवेढ्याची लढाई दोन बंधू छत्रपती शिवाजी महाराज व व्यंकोजी राजे परस्पराच्या विरोधात एक मुघलाच्या बाजूने तर दुसरा आदिलशहाच्या बाजूने मंगळवेढ्याच्या दक्षिणेस १० मैल अंतरावर लढत होते. म्हणून ही लढाई मराठयाच्या इतिहासात मंगळवेढ्याची लढाई म्हणून प्रसिद्ध आहे. पुढील काळात औरंगजेब बादशहा शाहू पटवर्धन मराठ्यांचा शेवटचा सेनापती बापू गोखले त्याचप्रमाणे आदिलशहा, निजामशहा, बीदर बादशहा मुघल यांचा मंगळवेढा या ऐतिहासिक स्थळाची असणारा संबंध लक्षात घेत मंगळवेढ्याचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित होते. पुरंदरच्या तहानंतर दक्षिणेत बदलेली राजकीय परिस्थिती मुघल छत्रपती शिवाजी महाराज व आदिलशहा यांच्यातील संबंध या दृष्टीने मंगळवेढ्याच्या लढाई ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होते.

## २.९.२ आधुनिक कालखंड

इ.स.१८१८ मध्ये मंगळवेढ्यापासून ३० मैल अंतरावर असणाऱ्या अष्टी या गावी शेवटी मराठा व इंग्रज यांच्यात २० फेब्रुवारी १८१८ रोजी लढाई झाली. त्यामध्ये मराठ्यांचा पराभव होवून पेशव्यांचा सेनापती बापू गोखले धारातीर्थी पडले. आपल्या पराक्रमाच्या सामर्थ्यावर इंग्रजापासून मराठा साम्राज्य टिकविण्याची धडपड करणारा हा शूर सेनापती (योद्धा) मंगळवेढ्यामध्ये राहत होता. आजही मंगळवेढ्यात सेनापती बापू गोखले यांचा वाडा पडक्या स्थितीत आहे. श्री संत चोखामेळा चौकातून पूर्वेस मारवाडी गल्लीतून थोडे पुढे उजव्या हातास

तो वाडा आहे. आपल्या तलवारीचे तिखट पाणी इंग्रजास पाजून मराठी साम्राज्य टिकविण्याची खटपट करणारा हा शूर योद्धा मंगळवेढे येथे राहत होता.[२६]

### २.९.३ १८५७ चा उठाव

१८५७ च्या राष्ट्रीय उठावाला उत्तर भारतामध्ये सुरुवात झाली. त्यावेळी त्याचे पडसाद मंगळवेढ्यातही उमटलेले दिसतात. काहीजण या लढ्यामध्ये प्रत्यक्ष कृती करत होते. इंग्रज अधिकारी सामान्य माणसांनाही संशयावरून पकडून त्रास देत असत. स्वातंत्र्ययुद्धामध्ये सहभाग घेतला म्हणून नारायणराव कृष्ण पटवर्धन व त्यांचे जावई गंगाधरराव आपटे सायंगावकर, भास्करराव जमखंडीकर, आलमसाहेब काझी आणि १/१२/१८५७ रोजी पकडून सातारा येथे चौकशीकरीता नेले. पण नंतर त्यांना सोडून देण्यात आले. पहिले श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब नंतर श्रीमंत धुंडीराज तात्यासाहेब हे सांगली संस्थानाचे अधिपती झाले. त्यांना इ.स.१८५९ साली मुखत्यारी आली. त्यांचे कारकीर्दीत सांगली संस्थानाचा कारभार काही वर्षे ब्रिटीश सरकारखाली होता. इ.स.१८७६ पर्यंत हा किल्ला मजबूत व शाबूत होता. सांगली संस्थानात ब्रिटीश ॲडमिनिस्ट्रेशन आल्यामुळे जॉईंट ॲडमिनिस्ट्रेशन कॅप्टन वेस्ट यांनी किल्ल्याचे दरवाजे कायमचे पाडले व मेजर वॉलरने तट पाडला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र राष्ट्र झाले आणि १९/०२/१९४८ रोजी ज्यावेळेस सांगली संस्थानाचे भारतात विलिनीकरण झाल्यानंतर मंगळवेढे हे सोलापूर जिल्ह्याचा एक तालूका झाला.[२७]

## २.१० मंगळवेढ्यातील शिल्पवैभव

### २.१०.१ काशीविश्वेश्वर मंदिर

शहराच्या वायव्य कोपऱ्यात प्राचीन सुंदर वास्तू म्हणून किल्ल्यामागील काशीविश्वेश्वराचे मंदिर असा उल्लेख करता येईल. तेथील मुळचे देऊळ इ.स. १० व्या व ११ व्या शतकात म्हणजे चालुक्य कलचुरीचे उत्तर काळात अथवा यादवांचे अधिपत्याखाली बांधले गेले असावे, कारण देवळाचे बांधकाम हे हेमाडपंथी शैलीप्रमाणे आहे. यादवोत्तर काळात हे मंदिर मोडकळीस आले होते. देवगिरीच्या यादवांचे राज्य इ.स. १२३९ मध्ये गेल्यानंतर पुढे मंदिराची हेळसांड झाली. इ.स १५६४ मध्ये मुस्लिम राजवटीत विजापूरच्या गादीवर आल्ली

आदिलशाह असताना हिप्परगीचे श्री. बाहयानी धनाजी कुलकर्णी यांनी इ.स. १४९४, इ.स.१५७२ साली मंदिराचा जिर्णोद्धार केला. याची हकीकत रंगशिळेच्या डावीकडील खांबावर पाच भागात कोरली आहे.[२८]

## २.१०.२ वरुण मूर्ती

शहरात डांगे गल्लीतील शिंदे यांच्या घरात पायाखोदताना ही मूर्ती सापडली. ती दीड फुट लांब व एक फुट रुंद जाडीची आहे. दगडाच्या दोन्ही अंगास ही मूर्ती कोरलेली आहे. मकर वाहन असून वरूण द्विभुज आहे. त्याच्या एका हातात कलख व दुसरा हात वर केलेला आहे. गळयात अलंकार, किरीट, कुंडले व सुहास्यवदनी आहे. वरुण मूर्ती जास्त प्रमाणात आढळत नाहीत.[२९]

## २.१०.३ शरभ

मारुती मंदिराच्या उजवीकडील तीन फुट उंचीची शरभ मूर्ती आहे. हा एक काल्पनिक पशू आहे. याबरोबरच काशी विश्वेश्वर मंदिराच्या पारावरील सूर्यप्रतिमा, विहिरीतील चामुंडा, खंडोबा गल्लीतील महिषासूर मर्दिनीच्या तीन मूर्ती आहेत. कैकाडी विहिरीजवळील पार्श्वनाथ, किल्ल्यातील शिव योग्याची प्रतिमा, गैबीपीर दर्ग्याजवळील शृंगारलेले हत्ती, विखरून पडलेले स्तंभ, तळखेड गणेश पट्टया अशा अनेक धार्मिक व इतिहास प्रसिद्ध व्यक्तिंचा मंगळवेढ्याशी संबंध दाखविणाऱ्या शिल्प वैभवाची जपणूक होवून पुढील पिढीला प्रेरणादायी ठरेल.[३०]

## २.१०.४ ब्रह्मदेव मूर्ती

जगातील बह्मदेवाच्या तीन मूर्तीपैकी एक ब्रह्मदेवाची मूर्ती पुष्कर येथे आहे. दुसरी मुर्ती तारापूर येथे आहे. व तिसरी मुर्ती मंगळवेढ्यातील महादेव विहीरीतील कमानीत पूर्वाभिमुख मूर्ती बसविली आहे. ६ फुट उंच व ४ फुट रुंदीच्या शिळेवर मूर्ती कोरलेली आहे. ब्रह्मदेवाच्या चार मुखापैकी तीन दर्शविलेले आहेत. मधल्यामुखाला लांब दाढी, कोरीव मुकूट, अलंकार, यज्ञोपवीत, हार यांनी सजलेली ही मूर्ती समभंग अवस्थेत असून तिच्या पायात तोडे आहेत. मूर्तीस चार हात असून त्यामध्ये भृक पोथी, कमंडलू व अक्षमाला आहे. मूर्तीच्या पायाजवळ उजव्या बाजूस हंस वाहन कोरलेले आहे. तसेच सरस्वती व डावीकडे देवी प्रतिमा आणि ब्राह्मण

कोरलेला आहे. ही मूर्ती असणे हा एक अपवाद आहे. कारण ब्रह्मदेवाच्या मूर्तीची पूजा केली जात नाही. धार्मिक कथांनुसार ब्रह्मदेवास शाप असल्याने त्यांची पूजा केली जात नाही. त्यामुळे या मूर्ती खूपच कमी प्रमाणात आढळतात.[३१]

## २.१०.५ गणेश मूर्ती

मंगळवेढा गावाच्या दक्षिणेकडे एकवीरा देवीच्या माळाजवळ साडे सहा फुट उंच व साडेचार फुट रुंदीची बैठी असलेली गणेश मूर्ती भग्नावस्थेत आहे. एवढी प्रचंड गणेश मूर्ती मंगळवेढ्याच्या आसपास कुठेही सापडत नाही.[३२]

## २.१०.६ एकांतद रामय्या शिलापट

रामय्या हा इ.स.१२ व्या शतकातील एक शिवभक्त होता. गुलबर्गा जिल्ह्यातील आळंद त्याचे जन्मस्थान होते. तो पुरुषोत्तमदेव या ब्राह्मणाचा मुलगा होता. लहानपणापासून त्याला शिवाची अतिशय तीव्र भक्ती होती. तो पुलिगेरे येथील दक्षिण सोमनाथ शिवलिंगाचा परम भक्त होता. कालांतराने तो आबलूर या गावी आला. या गावी जैनांचे प्राबल्य होते. त्याला शिवाने दृष्टांत दिला की, त्याने आब्बलुरु या ठिकाणी जाऊन जैनांना वादविवादामध्ये जिंकावे.[३३]

त्यानुसार तो त्या गावी आला. वादविवादामध्ये अट अशी होती की, रामय्या आपले मस्तक कापून पुन्हा जोडून दाखवावे. एकांतद रामय्याने हा चमत्कार करून दाखवला व जयपत्र मागितले. परंतु जैनांनी त्यास नकार दिला. प्रकरण कलचुरी नृपती बिज्जला यांच्या समोर गेले. त्यांनी तो चमत्कार पुन्हा करून दाखविल्यानंतर बिज्जलने स्वतः त्यास जयपत्र दिले. रामय्याने अबलूर गावामध्ये बांधलेल्या वीर सोमनाथ देवालया बिज्जलने गोगावे गाव दान दिले. उपलब्ध पुराव्यानुसार एकांदत रामय्याचा काळ इ.स.११३० ते इ.स.११९० असा सांगितला जातो. या शिलापटामध्ये एकूण पाच रकाने आहेत. परंतु पाचवा रकाना फुटून नष्ट झाला आहे.[३४]

## २.१०.७ मंगळवेढ्यातील पुरातत्त्वीय साधने

भारतीय संस्कृती जितकी प्राचीन आहे, तितकीच ती महान आहे. पूर्वीपासून चालत असलेल्या पंरपरा, चालीरीती आजही तेवढ्याच निष्ठेने जपल्या जातात. प्राचीन भारतीय इतिहासापासून आधुनिक कालखंडाच्या इतिहासापर्यंत कितीतरी घटना, भारतीय भूमीत झालेले

बदल, वेगवेगळ्या सत्ताधिशांनी केलेले आक्रमण, विदेशी संस्कृतीनी आपल्या भारतीय संस्कृतीशी केलेली समरसता अशा असंख्य बाबी भारतीय भूमीने पाहिल्या आहेत. भारतीय इतिहास हा फक्त ठरावीक प्रदेशापुरता मर्यादित नसून संपूर्ण भारतभर पसरलेला आहे. खरेतर भारताचा इतिहास हा अमर्यादित आहे. ज्याप्रमाणे एखादा जिल्हा तिथल्या असणाऱ्या तालुक्याशिवाय, तालुका तिथल्या असणाऱ्या गावाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. तसेच इतिहास हा प्रत्येक गावांतील अनेक छोट्या-मोठ्या ऐतिहासिक माहिती पासून बनतो. यामध्ये घडून गेलेल्या घटनेपासून त्या ठिकाणी असलेल्या पुरातत्वीय अवशेषही महत्वाचे असतात.[३५]



**१) स्तंभाचा भाग**

सुंदर शिल्प हे स्तंभाचा मधला भाग असून याला स्तंभमध्य असे म्हणतात. सर्वात खालचा भाग हा तळखडा असतो. त्यावरील भागास स्तंभ असे संबोधतात. त्याच्या स्तंभमध्य हा भाग असतो. सदरील शिल्पात सर्वात खाली चौकोनी भाग असून त्यावर गोलाकार भाग आहे. त्याच्यावर अष्टकोनी भाग आहे. अष्टकोनी भागावर आयातकार भागात भौमितीक नक्षीकाम केले आहे व त्यावर पाना फुलांचे नक्षीकाम आहे. त्यावरील भाग भग्न आहे परंतु हा भाग गोलाकार असावा त्यावर गोलाकार कणी आहे.



**२) स्तंभागा भाग**

सदर शिल्पदेखील स्तंभाचा भाग असून यामध्ये तळखडा चौकोनी त्यावर षटकोनी भाग व त्यावरील भाग दोन सुलट्या बशा होत्या व त्यावर दोन गोलाकार कणी असून त्यावर साखळीचे नक्षीकाम आहे त्यानंतर गोलाकार स्तंभमध्य आहेत.



**५) जैन तिर्थंकर**

सदर मूर्ती ही जैन तिर्थकरांची असून त्यांच्याखाली त्यांची शक्ती कोरली आहे. २४ तिर्थकारांपैकी एका तिर्थकाराची ही मुर्ती आहे.

### ६) द्वारपाल



सदर शिल्प हे वैष्णव द्वारपालचे असून ती निभंगावस्थेत आहे. त्याच्या हातातील आयुध गदा दिसतो तर दुसरा हात भग्न आहे. मुकूट व अलंकारावरून हे वैष्णव द्वारपाल प्रतिमा आहे. याच्या बाजूला चामरधारी स्त्री व निधी कोरला आहे.



### ७) वीरगळ

सदर शिल्प हे वीरगळ असून हे ५ किंवा ३ कप्प्यात कोरले असते परंतु या ठिकाणी फक्त दोनच कप्पे शिल्लक आहे. सर्वात खालचा कप्पा विरगळाचे कारण दुसऱ्या कप्प्यात लढाईचा प्रसंग आहे. वीरगळ म्हणजे गावांचे रक्षण करताना शहिद झालेल्या त्या वीर पुरुषांच्या सन्मानार्थ वीरगळ असते.



### ९) सिंह व्याल

काल्पनिक प्राणी असतो. मेषव्याल, आव्याल, नरव्याल, मुख एक प्राण्याचे व शरीर दुसरे प्राण्याचे असते. मंदिराचा वाद्य सजविण्यासाठी उपयोग करतात.

### १०) कर्णशिला



स्तंभ शिल्पावरील शिल्प कर्ण शिळा असून त्यावर उलटे सर्प असल्यामुळे हे यादव मंदिराचे (स्तंभाचे) वैशिष्ठ आहे.

. मंगळवेढा शहर व तालुका पुरतत्त्वीय दृष्टीकोनातून महत्त्वाचा आहे. मंगळवेढा शहरातील पुरातत्त्वीय साधनांचे जतन होणे गरजेचे आहे. पर्यटनांसाठी शहरातील वास्तू, मंदिरे, संताची स्मारके, अधिक प्रभावीपणे विकसित होणे गरजेचे आहे. या साधनांचे जतन व संवर्धन व्यवस्थित केल्यास पर्यटकांची संख्या वाढू शकते कारण पंढरपूरला आलेले भाविक, शालेय

सहली अधिक प्रमाणात या मंगळवेढ्याला भेटी देवून जातात. तसेच कर्नाटकाकडे जाणाऱ्या सहली सुद्धा मंगळवेढा नगरीला भेट देतात. मंगळवेढ्यातील संत दामाजी महोत्सवामध्ये सर्वच पुरातत्त्वीय साधनांचे प्रदर्शन होणे गरजेचे आहे. त्यामुळे मंगळवेढ्यातील इतिहास सर्वच वयातील जिज्ञासू व्यक्तींना समजू शकेल. सिद्धापूर व मुढवी येथे झालेल्या उत्खननामुळे मंगळवेढा भूमीचा सातवाहन साम्राज्याबरोबर संपर्क होता हे सिद्ध झाले आहे. भविष्यातही श्री संत दामाजी महाविद्यालयातील इतिहास विभाग पुरातत्वीय साईट शोधून विदयापीठ आनुदान आयोगाकडून उत्खनन करु शकतो. तसेच महाविद्यालय Preseration & conservation Center of Mangalwedha Taluka यांचे मोठे संग्रहालय विदयापीठ अनुदानाकडून मिळवू शकते. यासाठी मंगळवेढा शहर व तालुक्यातील पुरातत्त्वीय साधनांचे जतन होणे गरजेचे आहे.[३६]

## २.११ मंगळवेढ्यातील संत परंपराः

मंगळवेढा ही आज संताची भूमी म्हणून परिचीत आहे. मंगळवेढ्याची ऐतिहासिक व अध्यात्मिक परंपरा फार मोठी आहे. हजारो वर्षापासून या शहराला एक भव्य-दिव्य ऐतिहासिक वारसा लाभलेला असून महाराष्ट्रातील अनेक संत सज्जनांचा सहवास या नगरीला लाभला आहे. त्यामुळे समता व बंधुत्त्वाची शिकवण येथून सुरु झाली. श्री टिकाचार्यांचे सुरुवातीच्या कालावधीतील वास्तव्य मंगळवेढा येथेच होते. ज्ञानेश्वरांच्या समकलीन आध्यात्मिक लोकाशाहीचे प्रणेते चोखोबांनी तर मंगळवेढा आपली कर्मभूमी मानली आणि कुसाखाली आपला देहत्याग केला. मंगळवेढे ही चोखोबाची कर्मभूमी असून ती चोखोबाप्रमाणे दामाजीची कर्मभूमी म्हणूनही ओळखली जाते.

### २.११.१ श्री संत बसवेश्वर

इ.स.१२ वे शतक हे महाराष्ट्राच्या नव्हेतर भारताच्या इतिहासात अनेक दृष्टीने महत्त्वाचे होते. कारण भक्ती आंदोलनाच्यादृष्टीने हे शतक महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे हे शतक अनेक स्थित्यंतराचे प्रतीक असल्याचे दिसते. बसव धर्म हा फक्त लिंगायत धर्मियांच्या पुरताच समर्पीत नसून संपुर्ण मानव जातीच्या कल्याणाकरिता उभारलेले ते क्रांतीकारी आंदोलन होते. बाराव्या

शतकात समाजातील टोकाच्या विषम परिस्थितीचा नाश करुन समाजात समानता प्रस्थापित करण्याकरिता बसवेश्वरांच्या नेतृत्वात शरण-शरणींनी प्राणपणास लावलेल्या या कार्यासाठी त्यांनी केलेले जनपर आंदोलन फक्त कर्नाटकाच्या नव्हे, तर संपुर्ण देशाच्या इतिहासातील एक वैशिष्टयपुर्ण घटना होय. म. बसवेश्वरांनी समाजातील सर्वच क्षेत्रात अर्थात नैतिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, साहित्यिक, अध्यात्मिक अशा सर्वच क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. १२ व्या शतकातील त्यांचे क्रांतीकारी विचार आजच्या २१ व्या शतकातही प्रासंगिक असल्याचे दिसतात.[३७]

## २.११.२ श्री संत चोखामेळा

संत चोखामेळा हे श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे समकालीन होते. त्यांची बायको सोयराबाई, बहीण निर्मलाबाई व मुलगा कर्ममेळा असे सर्व कुटूंब विठठल भक्त होते. त्यांनी पुष्कळ अभंग लिहीले असून ते प्रसिध्द आहेत. त्यांनी 'विवेक दिप' म्हणून एक ग्रंथ लिहीला आहे. मंगळवेढे येथे किल्ल्याच्या पूर्वेकडील वेशीचे बांधकाम चालू असता ते एकाएकी कोसळले व त्याखाली श्री चोखोबाराया आणि अनेक मजूर मयत झाले ही घटना शके १२६० म्हणजे इ.स. १३३८ मध्ये वैशाख वद्य पंचमीस झाली. पुढे श्री संत नामदेव महाराज हे मंगळवेढ्यास आले व ज्या अस्थिमधून विठ्ठ्ल विठ्ठल असा आवाज होता त्या अस्थि श्री चोखोबारायांच्या आहेत असे ओळखून त्यांनी त्या पंढरपूरी विठठल मंदिरापुढे सध्या नामदेव पायरी म्हणून जी पायरी दाखविली जाते त्या पायरीसमोर वद्य त्रयादशी रोजी नेऊन ठेविल्या. मंगळवेढे येथे त्यांची पुण्यतिथी वद्य पंचमीस होते व पंढरपूरी वद्य त्रयोदशीस होते. त्या समाधी स्थानावर श्री राजे निंबाळकर फलटण यांनी चांगली घुमटी बांधली आहे.[३८]

## २.११.३ संत सोयराबाई

संत सोयराबाई ही चोखोबांची पत्नी होती. चोखोबांच्या केवळ प्रापंचिक जीवनाशीच नव्हे तर पारमार्थिक जीवनाशी एकरूप झालेली. जातीहीनतेचा दाह चोखोबांबरोबर तिनेही सहन केला. चोखोबांच्या अंतर्बाह्य शुद्धतेचा प्रभाव तिच्यावर होता. विठ्ठलाच्या भक्तीत तीही रममाण

झाली होती. परमार्थभागातील आपले अनुभव तिने अभंगरचना करून व्यक्त केले आहेत. तिच्या प्रत्येक अभंगावर 'चोखोबांची महारीण' अशी नाममुद्रा आहे.

## २.११.४ श्री संत कान्होपात्रा

१२ व्या शतकात मंगळवेढे नगरीत त्यावेळी बीदरचे बहामनी सत्तेचा अंमल होता. मंगळवेढ्यात कृष्ण तलावाच्या शेजारीस एक जुनाट असे महादेवाचे मंदिर आहे आणि त्या मंदिराशेजारी शामा नायकीण नावाची एक नर्तकी नाचगाणे करून त्यावेळच्या अमिर उमरावांना व मुसलमानी सरदारांना खुश करीत असे. तिची किर्ती दुरवर पसरली होती. अशा या शामा नायकीणच्या पोटी सुंदर असे एक कन्यारत्न जन्मास आले. शामाने तिचे नाव कान्होपात्रा असे ठेवले. आपल्या मुलीनेही आपल्याप्रमाणे नाचगाणे करून बड्या श्रीमंतांची मर्जी राखावी असे शामाला वाटू लागले. कान्होपात्रा ही अती सुस्वरूप व सुंदर मुलगी होती. पण वयात आल्यानंतर नायकिणीचा धंदा न करता तिने पांडुरगाच्या भक्तीत वाहून घेतले व ती पंढरपूरास वारकऱ्यासोबत वारीला जात असे. त्यामुळे तिला संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलीची भेट होऊन सहवास लाभला. संत संगतीमुळे तिच्या जीवनात अमुलाग्र बदल झाला व ती नेहमी हरीनाम दंग होत असे व कीर्तन ही करत असे. तीचे अनेक अभंगही प्रसिध्द आहेत.[४०]

## २.११.५ श्री संत दामाजी पंत

मंगळवेढयाच्या सर्व संतापेक्षा श्री दामाजीपंतांची प्रसिध्दी फार आहे. त्यांचेच नावाने ही नगरी ओळखली जाते. इ.स. १४४८ ते १४६० ही दोन वर्षे श्री दामाजीचा दुष्काळ म्हणून ओळखली जातात. याच काळात दामाजीपंतानी मंगळवेढे येथे तहसीलदार असताना बिदर बादशहाचे अवकृपेची भिती न बाळगता सरकारी कोठारातील धान्य भुकेने व्याकूळ झालेल्या व मरणोन्मुख झालेल्यांना वाटले व लाखो लोकांचे जिव दुष्काळ समयी जगविले. बादशहाने या गुन्ह्याबद्दल श्री दामाजीपंतांना पकडून बीदरला नेले. त्यावेळी पांडूरंग विठू महाराचे रुप घेऊन बीदर दरबारात गेला व सहाश खंडी धान्याचे एक लक्ष वीस हजार मोहरा भरून पावती घेऊन आला. त्यामूळे श्री दामाजीपंताना बिदर दरबारात हजर करताच बादशहाने त्यांचा सत्कार करून त्यांना बंधनमुक्त केले व विठू महाराने तुमचे पैसे पोचते केलेचे बादशहाने सांगितले. श्री

दामाजीपंतांना आश्चर्य वाटले व कोण विठू महार व आपणास सोडवण्यासाठी कोण आले होते याबद्दल त्यांना विस्मय वाटला. पंढरीच्या पांडूरंगाची ही कृपा झाल्याची त्यांना खात्री पटताच त्यांनी नौकरीचा तात्काळ राजीनाम दिला व राहीलेले आयुष्य पांडूरंगाच्या सेवेत खर्च केले. प्राणाची पर्वा न करता दुष्काळपिडीत लोकांची सेवा केली म्हणून त्यांचे नाव अजरामर झाले आहे.[४१]

## २.११.६ श्री टिकाचार्य

टिकाचार्य यांचे पूर्ण नाव धोंडूराम रघुनाथ देशपांडे असे होते. त्यांनी जयतिर्थांनी श्रीमान मध्वचार्य यांच्या ग्रंथावर फार मोठ्या टिका लिहिल्या आहेत म्हणून त्यांचे नाव टिकाचार्य असे पडले. धोंडूराम रघुनाथ देशपांडे हे विजयनगरचे राजे रामदेवराय यांचे दरबारी कामास होते. ते महापराक्रमी व घोड्यावर बसण्यात पटाईत होते. ते घोड्यावर बसूनच भिमा नदीच्या महापूरातून पलीकडे जात असत व मध्यपूरात घोड्यावर बसूनच तोंडाने पाणी पीत असत. ते शके १२८७ मध्ये मलखेड येथे समाधिस्थ झाले.[४२]

## २.११.७ श्री संत गोपाबाई

मंगळवेढ्यास गोपाबाईची विहीर म्हणून अति प्राचिन काळापासून प्रसिध्द आहे. ती विहीर मंगळवेढ्याच्या पुर्वेस १ कि. मी. अंतरावर काळ्या रानात आहे. तिचे बांधकाम चागल्या स्थितीत आहे. मंगळवेढे हा परगाणा नेहमी दुष्काळी परिस्थितीने ग्रासलेला असायचा. पाऊस वेळेवर पडायचा नाही. त्यामुळे लोकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागायची. सर्व सामान्य जनता दुष्काळाच्या खाईत अतिशय त्रासून जायची. त्यावेळी मंगळवेढ्यास कासार कुटूंब धनीक होते. त्यांना लोकांचे हाल पाहावत नव्हते. त्यांनी मनात दृढ निश्चय करून काळ्या रानात विहिर काढण्याचे ठरविले. परंतु विहिरीस पाणी लागेल का? या भावनेने ते उद्विग्र व्हायचे व त्यामुळे मनात इच्छा असून सुध्दा मार्ग सुचत नव्हता. ते नेहमी चिंताग्रस्त असायचे. अशा प्रसंगी मंगळवेढ्यास एक अतिशय तेजस्वी तपस्वी आले. मंगळवेढ्यातील जनतेचे पाण्यावाचून होणारे हाल, त्रास त्यांनी साधू महाराजांना कथन केला. त्यांनी त्या शेतक-यास विहीर काढण्याची जागा दाखविली. अशी पण एक दंतकथा आहे की या महाराजाने त्या शेतक-याला

विहीरत पाणी लागण्यासाठी त्या शेतक-याच्या बाळांतीण सूनेस विहिरीत जिवदान द्यावे लागेल असे सांगितले. जनतेच्या कल्याणासाठी गोपाबाई जीवदान देण्यास तयार झाली. थोड्याच दिवसात विहीर खोदली गेली. त्या विहीरीत गोपाबाईला राहण्यासाठी स्वतंत्र खोली पण बांधली गेली, त्यात संसाराचे सर्व साहित्य पण ठेवले गेले. आणि अशा या खोलीत गोपाबाई जाऊन राहीली व नंतर त्या विहीरीला खूप पाणी लागले, पण त्यासाठी गोपाबाईला आपले जीवदान द्यावे लागले.[४३]

## २.१३ समारोपः

प्रस्तुत प्रकरणामध्ये मंगळवेढा शहराच्या पार्श्वभूमी व इतिहासाबद्दल सविस्तर संशोधन करण्यात आले. मंगळवेढा हे शहर प्राचीनकाळापासून राजधानीचे ठिकाण असल्याचे निदर्शनास आले. या शहरावरती अनेक घराण्यांनी राज्य केल्याचे आढळून आले. यात कलचुरी, चालुक्य, यादव, बहामनी, आदिलशाही इत्यादी राजघराण्यांनी मंगळवेढ्यावरती आपला अंमल ठेवला होता. पुरातत्त्वीय साधनांवरून असे निदर्शनास येते. या नगरीमध्येच छत्रपती शिवाजी महाराज व मिर्झा राजा जयसिंग यांची भेट झाली. माचणूर व सिद्धापूर येथील उत्खननामध्ये मंगळवेढ्याचा रोम शहराशी व्यापारी संबंध होते सिध्द करणारे अनेक अवशेष सापडले. मंगळवेढा प्राचीन काळातील राजधानीचे शहर तर होतेच शिवाय या शहराचा संबंध अनेक देश विदेशातील व्यापाऱ्यांशीसुद्धा होता सिद्ध होते. त्यापैकी अनेक शिल्पवैभव मंगळवेढ्यामध्ये आजही आढळून येतात. ब्रह्मदेवांच्या तीन मूर्तीपैकी एक मूर्ती आजही मंगळवेढ्यात आहे.

मंगळवेढ्याच्या धार्मीक पार्श्वभूमीचा विचार करता या नगरीस अनेक संतांचा सहवास लाभल्याचे दिसते. त्यामध्ये संत बसवेश्वर, श्री संत चोखामेळा, संत सोयराबाई, कान्होपात्रा, श्री संत दामाजी पंत इत्यादी संतांची विशेष कार्य मंगळवेढ्यात असल्याचे दिसून येते. श्री संत दामाजी पंतांच्या बाबतीत पहावयाचे झाल्यास मंगळवेढ्याची ओळख ही पंतांच्या कार्यामुळेच निर्माण झाल्याचे दिसते. त्यांनी मंगळवेढ्यातील ज्वारीचे कोठार दुष्काळपीडीत लोकांना वाटल्याचे सर्वश्रृत आहे. त्यामुळे मंगळवेढ्याची ओळखच दामाजीपंतांचा मंगळवेढा म्हणून ख्यात झाली. श्री टिकाचार्य मंगळवेढ्यास वास्तव्यास होते. बाबा महाराज आर्विकर यांनी

मंगळवेढ्यात आपली वर्णी लावली होती. गोपाबाई हिने मंगळवेढ्यातील जनतेचे पाण्यावाचून होणारे अतोनात हाल बघून एका ज्योतिष्याच्या सांगण्यावरून आपला प्राण दिला. याशिवाय स्वामी समर्थ यांचे वास्तव्य मंगळवेढ्यास होते. गहिनीनाथ, गैबीपीर, मुंगीपीर, लतीफबोवा या सर्व जाती-धर्माच्या संतांचे वास्तव्य या मंगळवेढा नगरीस लाभले म्हणून मंगळवेढा ही संतांची भूमी असे म्हटले जाते.

## संदर्भ साधने:


१) महाराष्ट्र राज्य परिचय खंड पहिला, महाराष्ट्र स्थलदर्शन, पृ.७६४-७६५

२) चौधरी डी.एम., पंढरपूर नगरीचा इतिहास, अप्रकाशित पीएच.डी.प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर २००६ (प्रस्तावना).

३) जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोश, खंड (६), भारतीय संस्कृती कोश निर्मीती मंडळ, पुणे, १९७०, पृ.६३३-६३४.

4) Maharashtra State Gazettear Solapur District, P.No.867.

५) अभ्यंकर शंकर वासुदेव, भारतीय तीर्थक्षेत्र व मंदिरे, भक्तिकोष पंचम खंड, आदित्य प्रतिष्ठान, पुणे,३० मार्च २००६, पृ.११४८.

६) जोशी महादेवशास्त्री, उपरोक्त, पृ.५४८.

७) जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश खंड (१२), महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९८५, पृ.५२९.

८) इंगोले कृष्णा ज्योतिराम, माणदेशः स्वरूप आणि समस्या, माणगंगा प्रकाशन, सांगोला, प्रथमावृती, १९८८, पृ.१०.

9) Sangshetti R.M., Ancient History of Solapur District, Unpublished M.Phil thesis (History), Shivaji University, Kolhapur, June 1997, Page No.16

10) District Census Hand book, Solapur, 1991, Page No.286.

११) दैनिक लोकमत, २४ ऑक्टोबर २००८, पृ.२८६.

12) Bhatiya, J.K., Primary Census Abstract General Population, Census of India Series-14, Maharashtra Part (I), 1997.

१३) जोशी महादेवशास्त्री, उपरोक्त, पृ.६३३..

१४) अभ्यंकर शंकर वासुदेव, उपरोक्त, पृ.११४८.

१५) श्री.श्रीमद्. ए.सी. भक्तिवेदांत, भगवत्गीता पार्श्वभूमी.

१६) आवताडे नानासाहेब व्यंकटेश, श्रीसंत दामाजी चरित्र, श्रीसंत दामाजी संस्था मंगळवेढा, २००६. पृ.८.

17) Karmarkar E.S., A Study of Scial economic life of the Sangli State, Unpublished Ph.D.thesis(History), 1986, Submeeted Shivaji University, Kolhapur.

१८) जोशी लक्ष्मणशास्त्री खंड ५ वा, उपरोक्त, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६, पृ.७८१.

१९) कित्ता, पृ.७८२.

२०) कित्ता, पृ.७८३.

२१) कित्ता, पृ.७८५.

२२) इंगोले कृष्णा, जोतीराम, उपरोक्त, पृ.२१.

२३) कित्ता, पृ.२२.

२४) मीराशी वी.वी., कलचुरी नृपती आणि त्यांचा काळ, २६ ऑक्टोबर १९५६, नागपूर, पृ.६.

२५) कित्ता, पृ.३१.

२६) जोशी लक्ष्मणशास्त्री खंड ३ रा, उपरोक्त, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९७६, पृ.३६७.

२७) देशपांडे प्र.न., राजवाडे वि.का., संशोधन मंडळ, धुळे, त्रैमासिक, २४ मार्च २०११, पृ.२१.

२८) देशमुख गोपाळ मारुती, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास (मराठा कालखंड), भाग-१, (इ.स.१६००-१८५०), रेवू प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००९, पृ.४४.

२९) आपटे डी.व्ही., महाराष्ट्र इतिहास मंजिरी, निवडक ऐतिहासिक उतारे, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९२३, पृ.१४-१५.

३०) जक्कल विठ्ठल नरसप्पा, सोलापूर शहराचा इतिहास, स्टीम प्रकाशन, सोलापूर, १९२८, पृ.२०.

३१) दैनिक संचार वृत्तपत्र, उपरोक्त, सोलापूर आवृत्ती.

३२) देशपांडे प्र.न., राजवाडे वि.का., संशोधन मंडळ, धुळे, त्रैमासिक, २४ मार्च २००१, पृ.२१.

३३) जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोश, खंड (६), भारतीय संस्कृती कोश निर्मीती मंडळ, पुणे, १९७०, पृष्ठ क्र.२३९.

३४) कित्ता, पृष्ठ क्र.२४०.

३५) उपरोक्त गोपाळ देशमुख, पृष्ठ क्र.५८.

३६) कित्ता, पृष्ठ क्र.६०.

३७) कामत अशोक, महात्मा बसवेश्वर, सत्संग प्रतिष्ठान, प्रकाशन पुणे, १९९९, पृ.५५

३८) गोसावी र.रा., श्री संत सकलगाथा, सारथी प्रकाशन, पुणे, २०००, पृ.१२८

३९) बहिरट भा.प. व भालेराव प्र.ज्ञा, वारकरी सांप्रदायाचा उदय व विकास, व्हिनस प्रकाशन, १९७२, पृ.१२४

४०) पद्मावती श्रोतीय, संत चोखामेळा आणि परिवार, गोकुळा मासिक, प्रकाशन, १९९७, पृ.११४.

४१) दायमा ब्रीजमोहन, सकल संतवाणी, गीता प्रेस, गोरखपूर, १९९९, पृ.१२६.

४२) केतकर व्य.श्री., महाराष्ट्र ज्ञानकोश, महाराष्ट्र ज्ञानकोश मंडळ, १९५६, पृ.२२७

४३) कित्ता, पृष्ठ क्र.२४१.

### प्रकरण तिसरे

# मंगळवेढा नगरपालिकेची स्थापना व विकास

**३.१ प्रस्तावनाः**

**३.२ भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहासः**

**३.३ प्राचीन काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थिती**

**३.४ मध्ययुगीन काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थितीः**

**३.५ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे टप्पेः**

३.५.१ पहिला टप्पाः

३.५.२ दुसरा टप्पाः

३.५.३ तिसरा टप्पाः (१९२० ते १९३९)

३.५.४ चौथा टप्पा (१९३७ ते १९४७):

३.५.४.१ चौथा टप्पा (१९९० ते पुढे):

**३.६ नगरपालिकेचा विकासः**

**३.७ लॉर्ड मेयॉरः**

**३.८ लॉर्ड रिपनः**

**३.९ मंगळवेढा नगरपरिषदेची विविध खातीः**

३.९.१ सामान्य प्रशासन विभागः

३.९.२ सार्वजनिक बांधकाम खातेः

३.९.३ बांधकाम विभागाने केलेली कामेः

अ) गटारे बांधणीः

ब) सार्वजनिक संडासः

क) सार्वजनिक मुताऱ्याः

ड) समाज मंदिरे व धर्मशाळाः

इ) मार्केट (मंडई):

ई) नगरपालिकेचे गाळेः

उ) फळफळावळ माकेटः

३.९.४ पाणी पुरवठा समिती:

अ) भविष्यकालीन पाणी पुरवठा:

ब) वेतन खर्च

क) रिक्त पदांची माहिती:

क) शासकीय कर्मचारी:

३.९.५ आरोग्य समिती

३.९.६ जकात विभाग:

३.९.७ मंगळवेढा शहरातील जकात नाके:

३.९.८ नगदी खाते:

३.९.९ विद्युत विभाग:

३.९.१० दप्तर खाना:

३.९.११ कर विभाग:

३.९.१२ अन्न निरीक्षक विभाग:

३.९.१३ वृक्ष विभाग:

३.९.१४ आग प्रतिबंधक विभाग:

**३.१० मंगळवेढा नगरपरिषदेचे शैक्षणिक विकासातील योगदान**

**३.११ नगरपरिषदेची स्वच्छता, साथीचे आजारासंबंधीत व बांधकामासंबंधीत उपाययोजना**

**३.१२ समारोप**

## प्रकरण तिसरे

# मंगळवेढा नगरपालिकेची स्थापना व विकास

## ३.१ प्रस्तावना:

मंगळवेढा नगरपालिकेची स्थापना ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे. या नगरपालिकेमुळे मंगळवेढा शहराचा कायापालट झाला. मंगळवेढा शहरास इतर शहराप्रमाणे चांगला दर्जा प्राप्त झाला. जनतेस अनेक सोयी-सुविधा प्राप्त झाल्याने लोकांची प्रगती होवून शहराची प्रगती अल्पकाळातच झाली. शहराच्या विकासामध्ये या नगरपालिकेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. नगरपालिकेस लाभलेले अध्यक्ष व पदाधिकारी यांनी लवकरच नगरपालिका नावारूपास आणली. त्यामुळे नगरपरिषदेच्या विकासाबरोबरच शहराचाही विकास होण्यास मदत झाली.

नगरपालिका प्रशासनानेही चांगल्या प्रकारे आपले कार्य सांभाळले. त्यामुळे लोकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी दूर होण्यास मदत झाली. लोकांच्या अन्न-वस्त्र-निवारा या गरजा भागविण्यासाठी नगरपालिकेने विशेष प्रयत्न केले. म्हणून या प्रकरणात मंगळवेढा नगरपालिकेची स्थापना कशी झाली, नगरपालिका स्थापनेचा पूर्वइतिहास, विकासाचे टप्पे, ब्रिटीश काळात स्थानिक स्वराज्य संस्थेचा झालेला विकासही माहिती पाहणार आहोत. तसेच नगरपालिकेतील विविध खात्यांचे कामकाज कसे चालत होते, लोकांचा प्रतिसाद कसा मिळत होता याविषयीही सविस्तर माहिती पाहणार आहोत.[०१]

## ३.२ भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास:

मंगळवेढा नगरपालिकेचा इतिहास पाहण्यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास पाहणे आवश्यक आहे. कारण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून शहराचा कारभार पाहण्यासाठी नगरपालिकेची स्थापना झालेली आहे. कोणत्याही देशाची लोकशाही यशस्वी व्हावयाची असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमीका महत्त्वाची आहे.

टेकवेव्हील यांच्या मतानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्त्व लक्षात येते. कोणतेही राष्ट्र आपल्या स्वतंत्र सरकारची स्थापना करीत असेल तरी त्यातून स्थानिक स्वराज्य संस्था किंवा नगरपालिका वगळता येणार नाहीत.

भारतात ही वस्तुस्थिती यापूर्वी समजून घेण्याचा थोड्याफार प्रमाणात प्रयत्न झाला होता. परंतु त्याला मूर्त स्वरूप खऱ्या अर्थाने ब्रिटीश काळात दिले गेले. लिंडसे म्हणतो की, ब्रिटीश काळी भारतात असणारे स्थानिक स्वयंशासनावरून समजते की, भारतात अस्तित्त्वात असणाऱ्या संस्थांमध्ये ज्या चांगल्या योजना व घटक रूढ होते ते जसेच्या-तसे ठेवण्यात आले. आणि काही अनावश्यक नियम व घटनांमध्ये बदल करण्यात आला. ज्या गोष्टी लोकांसाठी इंग्लंडमध्ये फायदेशीर ठरल्या होत्या. त्या नियमावली भारतातील स्थानिक स्वराज्य निर्मितीसाठी योजन्यात आल्या.[२] त्याची अंमलबजावणी करीत असताना त्यांनी ब्रिटीश सरकारला फायदेशीर असणाऱ्या नियमावलीची व घटनांच्या बाबी समाविष्ट केल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निर्मितीत पारदर्शकता व सर्वसुधारणेचा विचार संकुचित झाला. त्याची अंमलबजावणीचा प्रयत्न करत असताना ब्रिटिशांच्या संकुचित वृत्तीमुळे परिस्थिती सुधारण्याऐवजी बिघडत गेली.

## ३.३ प्राचीन काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थिती

प्राचीन काळापासून स्थानिक संस्थांचे अस्तित्व भारतात असलेले दिसून येते. प्राचीन काळात राजा हा प्रशासनाचा प्रमुख असून त्याला प्रशासन चालविण्यासाठी व महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी मंत्र्यांची आवश्यकता होती. ही गरज पूर्ण करण्यासाठी राजा हा मंत्रिपरिषदेची निर्मिती करीत असे. या मंत्रिपरिषदेने घेतलेले निर्णय राजाला मान्य नसले तर ते बंधनकारक नसत. तरीही राजा त्या निर्णयांचा आदर करीत असे. प्राचीन काळात वैदिक काळात राजाच्या मदतीसाठी सभा व समिती यांचे अस्तित्व होते. राजा हा यांच्या सहाय्यानेच आपला राज्यकारभार करीत असे. परंतु उत्तर वैदिक काळात मंत्रिपरिषद अस्तित्त्वात आली.

ही मंत्रिपरिषद राजाला सर्व बाबतीत सल्ला देण्याचे कार्य करीत असे. त्या सल्ल्यानुसार राजा 'अमात्य' व 'मंत्री' यांच्या मदतीने राज्यकारभार करावा अशी अपेक्षा होती. राजाला अन्य महत्त्वाच्या गोपनीय बाबीसंबंधी सल्ला देण्यासाठी अलीकडच्या काळातील कॅबिनेटसारखी एखादी समिती होती. या सदस्यांची संख्या ८ पर्यंत होती व मंत्रिपरिषद त्याहून थोडी होती, असे महाभारताच्या 'शांतिपर्व' भागात सांगितले आहे. राजाचा पुरोहित हा राजगुरु

विद्वान व सत्शील असावा अशी अपेक्षा होती. वास्तवात हाच राजाचा मुख्य सल्लागार होता. त्यामुळे वैदिक काळातील सभा व समिती नाममात्र स्वरूपात होती.[३]

सम्राट चंद्रगुप्त मौर्य याने या पध्दतीची मंत्रिपरिषद स्थापना केली होती. तो राजधानीच्या ठिकाणाहून या मंत्रिपरिषदेच्या सहाय्याने राज्यकारभार पाहत असे. यामध्ये राजधानीच्या ठिकाणी नगराचा कारभार पाहण्यासाठी जी समिती होती तिला नगरसभा असे म्हटले जात होते तर ही समिती नगरातील सुखसोयी आणि स्थानिक प्रशासन राजाच्या विचाराने पाहात असत. चंद्रगुप्त मौर्याच्या काळात नगर प्रशासनास बरीच स्वायत्तता होती. नगराची व्यवस्था ३० नगर सदस्यांच्या सहा समित्यांद्वारे पाहिली जात होती. नगराची व्यवस्था ३० नगर सदस्यांच्या सहा समित्यांद्वारे पाहिली जात होती. मेगॅस्थेनीसने प्रत्येकी ५ सदस्यांची उल्लेखलेल्या ६ समित्या होत्या. यामध्ये करसमिती, परदेशीयांसाठी समिती, जनगणना समिती, वाणिज्य समिती, उद्योग समिती व शिल्पकला समिती इत्यादी होत्या. यामध्ये नगर सदस्यांची नियुक्ती करण्यात येत होती. नगरप्रशासनास स्वायत्तता असल्याने तक्षशिला नगर प्रशासनाने नाणी पाडण्याचे कामदेखील अंगावर घेतले होते. शाळा, दवाखाने, बंदरे, मंदिरे, पाणीपुरवठा, रस्तेदुरुस्ती, बाजारतळ इत्यादी सार्वजनिक कल्याण कामे नगर प्रशासनाकडे होती. नगराच्या प्रमुखास 'नगरक' असे संबोधले जाते. एकंदरीत मौर्यकालीन नगरप्रशासन तत्कालीन ग्रीक नगर राज्यापेक्षा सरस होते. लोकांना नागरी सुविधा पुरविल्या जात असत. या नगरसभेच्या मार्गदर्शनाखाली केली जात असत. तसेच खेड्यातील प्रशासनसुध्दा लोकांच्याकडून पाहिले जात असे. ग्राम प्रशासनामार्फत खेड्यातील सुखसोयीविषयी अधिक लक्ष पुरवित असत.[४]

अशा प्रकारची नगरप्रशासन व्यवस्था गुप्तकाळामध्येसुध्दा होती. त्यामुळे प्राचीन काळातही स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात होती असे स्पष्ट होते.

## ३.४ मध्ययुगीन काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थिती:

मध्ययुगीन कालखंडात छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी आपल्या स्वराज्याचे प्रशासकीय विभाग पाडले होते. या प्रशासकीय विभागाचा राज्यकारभार करण्यासाठी तेथे अधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती. तर राजधानीच्या ठिकाणाहून

राज्यकारभार करता यावा. यासाठी राजांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली होती. अष्टप्रधान मंडळ छत्रपती शिवाजी महाराजांना सल्ला देण्याचे काम करीत असे. या मंत्र्यांच्या नियंत्रणाखाली सर्व प्रशासन व्यवस्था योग्यरितीने राबविली होती. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य म्हणजे लष्करी प्रजासत्ताक होय.[५]

## ३.५ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे टप्पे:

१७ व्या शतकात ब्रिटिशांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचा आढावा घेवून टप्प्याटप्प्याने तिच्या विकासास प्रारंभ केला. डॉ.महेश्वरी यांच्या मते भारतात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाचे पाच टप्पे सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे-

### ३.५.१ पहिला टप्पा:

मद्रास येथे ब्रिटीश सत्ताधिशांनी सन १६८७ मध्ये भारतातील पहिली महानगरपालिकेची स्थापना केली. त्यातूनच भारतात स्थानिक स्वराज्य संस्थेस प्रारंभ झाला होता. नगरपालिका स्थापन करण्याचा मुख्य उद्देश वस्तूवरील जकात कर गोळा करणे हा होता. परंतु स्थानिक व्यापाऱ्यांनी प्रत्यक्ष कर देण्यास नकार दिला. परिणामी ब्रिटिशांनी हा पहिला प्रयोग अयशस्वी ठरला. पुढे सन १७२६ मध्ये चार्टर ॲक्ट पास करण्यात आला. त्यानुसार मद्रास महानगरपालिकेच्या स्थापनेचा आदेश रद्द करण्यात आला. या कायद्यानुसार प्रशासनापेक्षा न्यायालयीन अधिकार अधिक देणेत आले. याच पार्श्वभूमीवर मुंबई व कलकत्ता येथे नवीन कोर्टाची स्थापना करण्यात आली.[६]

सन १७९३ च्या चार्टर ॲक्टनुसार भारतीयांना स्थानिक स्वराज्य संस्था देण्यात आल्या. या स्थानिक स्वराज्य संस्थाचा कारभार पाहण्यासाठी 'जस्टीस ऑफ पीस' यांची नियुक्ती करण्यात आली. मुंबई, कलकत्ता, मद्रास या तीन शहरामध्ये गव्हर्नर जनरलकडून अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली. यांचे मुख्य काम शहरातील घरावर व जागेवर कर बसवणे हे होते. याशिवाय ते शहरात शांतता नांदण्यासाठी लागणारी पोलिस यंत्रणा, शहरासाठी लागणाऱ्या इतर सुखसोयी पुरवित असत. सन १८४२ मध्ये बंगाल कायदा पास झाला. यानुसार नगरपालिका प्रशासन जिल्हा स्तरापर्यंत जावून पोहोचले. शहर पंचायत कमिटीची

स्थापना झाली. शहरातील लोकांच्या आरोग्याचे रक्षण हा प्रमुख उद्देश होता. परंतु तेथील रहिवाशांनी याला विरोध करून कर देण्यास नकार दिला.

याच काळात स्थानिक स्वराज्य संस्थेचा विकास करण्यासाठी सन १९५० मध्ये एक कायदा केला त्यानुसार देशांतर्गत म्युनिसिपल बोर्डाची स्थापना करण्यात आली. सन १८५० ते १८५५ या काळात भारतात अनेक शहरातून नगरपालिकेची स्थापना करण्यात आली. लॉर्ड मेयोनने सन १८७० मध्ये एक ठराव पास करून आर्थिक विकेंद्रीकरणाचा मुद्दा मांडला. त्यामुळे आर्थिक विकास व भारतीय लोकांना प्रशासनात सहभागी करून घेण्यात आले. याशिवाय केंद्राकडे एकवटलेली सत्ता राज्यांकडे सुपुर्द करण्यात आली.[७]

## ३.५.२ दुसरा टप्पाः

या काळात लॉर्ड रिपन याने सन १८८२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचा कायदा पास करून घेतला. या कायद्यानुसार लोकांना राजकारणात सहभाग घेता येऊ लागला. त्यामुळे लोकांना आपले राजकारणातील ज्ञान वाढविण्यास संधी मिळाली. त्यानुसार सन १८०८ मध्ये विकेंद्रीकरणासाठी एक रॉयल कमिशन नियुक्त करण्यात आले. या कमिशनने स्थानिक संस्थेचा विकास करण्यासाठी पुढील मुद्दे मांडण्यात आले.

प्रत्येक खेड्यात ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात यावी, स्थानिक सभासद बहुमताने निवडले जावेत, म्युनिसिपालटीनी त्यांचा सभापती हा सभासदाकडून निवडावा, शहरातील मुलांच्या प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी त्यांनी स्वीकारावी व त्यांना लागणारा खर्च त्यांनी स्वतःच भागवावा.[८]

## ३.५.३ तिसरा टप्पाः (१९२० ते १९३९)

सन १९१९ च्या माँटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा कायद्याने प्रांतांना जबाबदार शासनपध्दती निर्माण करण्यात आली. त्यानुसार काही खाती प्रांताकडे तर काही केंद्राकडे ठेवण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थेकडे सार्वजनिक आरोग्य, बांधकाम, शिक्षण, महसूल, पाणी व्यवस्थापन, वन, सहकारी संस्था ही खाती देण्यात आली. अशा प्रकारे स्थानिक स्वराज्य संस्थेचा कारभार ठरविण्यात आला.[९]

### ३.५.४ चौथा टप्पा (१९३७ ते १९४७):

सन १९३५ च्या कायद्याने प्रांतिक सरकारला पूर्ण स्वायत्तता मिळाली. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेस अधिक अधिकार मिळाले. विकास कामासाठी लागणारा पैसा व त्यासंबंधीचे अर्थ खाते त्यांच्याकडे देण्यात आले. त्यामुळे त्यांना विकास कामात कसलाही अडथळा राहिला नाही. आर्थिक विकासाचा आराखडा तयार करण्याचा अधिकार स्थानिक समितीला मिळाला. परंतु या सर्व गोष्टीवर भारतमंत्र्यांचे नियंत्रण होते. दुसऱ्या महायुध्दानंतर भारतमंत्र्यांनी राजीनामे दिल्याने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विकासाला पुन्हा अडथळा निर्माण झाला. स्वातंत्र्यानंतर पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थेस महत्त्व प्राप्त झाले. सन १९४८ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मंत्र्यांची सभा घेण्यात आली होती. या सभेत पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले की, " स्थानिक स्वराज्य संस्था ह्या खऱ्या अर्थाने लोकशाहीचा पाया आहेत. वास्तविक पाहता आपल्याला उच्च लोकशाहीविषयी विचार करणेची सवय लागायला हवी तरच उच्च लोकशाहीचा पाया भक्कम होईल."

### ३.५.४.१ चौथा टप्पा (१९९० ते पुढे):

सन १९५० मध्ये भारतीय राज्यघटनेने सर्व राज्यांना स्थानिक राज्याचा दर्जा दिला गेला. स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या कमिट्यांची नियुक्ती करण्यात आली होती. या कमिट्यांनी अनेक सूचना केल्या होत्या त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थिती मजबूत करण्यासाठी व उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी त्यांनी काही हरकती व सूचना मागविल्या होत्या.[१०]

सध्या भारतातील लोकशाही सरकारच्या वाढत्या प्रोत्साहनामुळे स्थानिक स्वराज्य संस्था अधिक कार्यक्षम व कर्तव्यदक्ष होत आहेत. नागरिकांच्या दैनंदिन व्यवहाराशी निगडीत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांबद्दलची पूर्वग्रहदूषित उदासिनता सोडून त्या सुधारणासाठी शक्य ते प्रयत्न करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

अशाप्रकारे भारतात ब्रिटिश अंमल स्थिरस्थावर झाल्यावर सन १८५० च्या सुमारास शहरे व गावातील स्थानिक स्वराज्य संस्था भागविण्यासाठी नगरपालिका व लोकल बोर्ड

यासारख्या संस्थांची गरज भासू लागली. सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील सोयी उदाहरणार्थ शिक्षण, रस्ते, पिण्याचे पाणी, गटारे, विश्रांतीगृहे, दवाखाने, आणि इतर सोयींच्या विकासासाठी सन १८६३ पासून स्थानिक साधनांद्वारे निधी गोळा केला जाऊ लागला. मुंबई प्रांतास सन १९६९ मध्ये मुंबई लोकल फंड ॲक्टद्वारे जिल्हा व उपविभागीय लोकल फंड समित्यांची स्थापना झाली. या समित्यांद्वारे लोकल फंडाच्या प्रबंधाचे काम करण्यात येऊ लागले. समित्यांमध्ये काही शासकीय व काही खाजगी सभासद असत. जिल्हा समितीत शासनातर्फे जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, सहायक जिल्हाधिकारी, कार्यकारी अभियंता, शिक्षण निरीक्षक आणि गावाचे मालक व जमिनमालक सभासद असत. उपविभागीय समितीत सहाय्यक जिल्हाधिकारी, मामलेदार, सार्वजनिक बांधकाम अधिकारी, शिक्षण उपनिरीक्षक आणि खेड्याचे मालक व तीन जमिनमालक सभासद असत. उपविभागीय समिती आपल्या जिल्हा समितीकडे निश्चित कार्यक्रम अंदाज पत्रक तयार करण्यासाठी पाठवित असत. प्रशासकीय कामासाठी जिल्हा लोकल फंडाची दोन विभागात विभागणी करण्यात आली होती. सन १८६३ पासून लोक फंडाद्वारे रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण व आरोग्यविषयक कामे सुरू करण्यात आली. सन १८८२ ते ६३ मध्ये जिल्ह्यात लोकल फंडाची एकूण जमा रक्कम १,८९,१९० रुपये तर खर्च २२२४६० रुपये होता. त्यापैकी बांधकामाकरीता १८३४५ रुपये व शिक्षणासाठी ११०५६ रुपये खर्च करण्यात आला होता.[११]

## ३.६ नगरपालिकेचा विकासः

आधुनिक नगरराज्यांचा उगम ग्रीक नगरराज्यातून झाला. ग्रीकानंतर ही रोमन साम्राज्यात नगरराज्यांचे स्वरूप बदलले नव्हते. मात्र नंतरच्या काळात नगरपालिकांचे राजकीय अधिकार कमी झाले आणि नागरिकांच्या सोयींवर व विकासावर भर देण्यात आला. त्यातूनच नगरपरिषदेचा उगम झाला. इंग्लंडमध्ये नगरपालिकेला विशेष सवलती आणि संरक्षण दिले होते. विल्यमने दिलेल्या सनदेमुळे पन्नास हजारापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांची व्यवस्था 'बरोज' (नगरपरिषद) तर्फे ठेवली जात होती.[१२] असे शहराचे संरक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचा अधिकार नगरपरिषदांना देण्यात आला होता. नागरिकांचे

संरक्षण, न्यायदान, दंड वसूल करण्याचा अधिकार नगरपरिषदांना मिळाला. दुकानदारांनी दिलेले कर व जकात ही उत्पन्नाची साधने होती. परंतु नगरपरिषदांवर व्यापाऱ्यांचे वर्चस्व असल्यामुळे भ्रष्टाचार, उधळेपणा, वशिलेबाजी होऊ लागली. परिणामी सन १८३५ मध्ये 'म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट' ची स्थापना करून एकशे नऊ नगरपालिकांना मान्यता मिळाली.[१३]

भारतातील नगरपालिका प्रशासनाच्या उभारणीची सुरुवात ही प्रामुख्याने ब्रिटिशांनी केली. इ.स. १८४२ च्या कायद्यानंतर मद्रास आणि कलकत्ता ही अध्यक्षीय शहरे वगळता सर्वच शहरांना नगरपालिकेचा दर्जा देण्यात आला. लोकांच्या उत्स्फूर्त मागणी ऐवजी 'नगरपरिषद प्रशासन' त्यांच्यावर वरूनच लादले गेले. भारतामध्ये नगरपरिषदेच्या आगमनाने नागरिक आणि स्थानिक शहर प्रशासन या दोहोमधील दरी तशीच राहिली.[१४]

परिणामतः नगरपरिषद कार्यकारणीचा मागील सव्वाशे वर्षामधील प्रवास हा कष्टाचा आणि अधिकृत दुर्लक्षणाने ग्रासलेला दिसतो. लॉर्ड रिपनची उत्कट इच्छा आणि विकेंद्रीकरण आयोगाच्या शिफारशी नंतर ही नगरपरिषद प्रशासन सुधारणा कायद्याच्या पार्श्वभूमीने नगरपरिषद प्रशासन निर्णय स्वातंत्र्य मिळाले. जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यकक्षेतून मुक्त झाले. सुधारणांचा भाग म्हणून प्रसिध्द प्रतिनिधी स्थानिक प्रशासनाचा प्रमुख बनला आणि जिल्हाधिकाऱ्याचा नगरपालिका प्रशासनातील प्रत्यक्ष सहभाग कमी होवून तो अप्रत्यक्ष झाला. त्यानंतर स्वातंत्र्य चळवळ अधिकाधिक तीव्र बनली. स्थानिक प्रशासनाचा प्रभाव हळूहळू कमी होत गेला. भारतीय स्वातंत्र्याने नवीन आशा-आकांक्षा जागृत केल्या. इ.स.१९४० मध्ये भारतीय प्रशासनात स्थानिक प्रशासनास योग्य ते स्थान मिळवून देण्यासाठी राज्य स्थानिक स्वप्रशासन प्रतिनिधीची पहिली सभा आयोजित करण्यात आली. इ.स.१९५४ मध्ये माननीय राष्ट्रपतीच्या आदेशाद्वारे केंद्रीय स्थानिक स्वप्रशासन समिती प्रस्थापित करण्यात आली.[१५]

## ३.७ लॉर्ड मेयॉरः

लॉर्ड मेयॉर ठराव सुध्दा नमूद करतो की, या सर्वांच्या पलिकडे स्थानिक स्वप्रशासनास सर्वांगीण आणि अधिक व्यापक उद्देश आहे. जो निधी शिक्षण, सफाई यंत्रणा धर्मादाय संस्था,

आरोग्य आणि सार्वजनिक कामासाठी वापरला जातो. त्याच्या व्यवस्थापनामध्ये स्थानिक कक्ष पर्यवेक्षण आणि काळजी या गोष्टी गरजेच्या आणि महत्त्वाच्या आहेत. हा ठराव स्वप्रशासन नागरी संस्थांचे बळकटीकरण आणि स्थानिक व युरोपियन लोकांचे संघटन इत्यादीच्या विकासाच्या संधी प्रशासकीय कामकाजामध्ये उपलब्ध करेल.[१६]

## ३.८ लॉर्ड रिपनः

लॉर्ड रिपन खऱ्या अर्थाने आधुनिक स्वप्रशासनाचा प्रणेता मानला जातो. जेव्हा लॉर्ड रिपन व्हाईसरॉय बनला. तेव्हा लोकशाही आणि स्वातंत्र्याच्या आदर्शानी प्रेरीत झालेली भारताची शिक्षित पिढी जन्मास आली होती. त्यांनी देशाच्या प्रशासनात काही प्रमाणात आपल्या सहभागाची मागणी केली. आणि उदारमतवादी लॉर्ड रिपनसाठी ही मागणी दुर्लक्षित करणे शक्य नव्हते. त्याचबरोबर लॉर्ड रिपनला याचीही जाणीव होती की देशातील या शिक्षीत पिढीला केंद्रीय प्रशासनात सहभाग करण्याची ही योग्य वेळ नव्हती. त्याच्या मते स्थानिक लोकांनी स्थानिक प्रशासनात प्रशिक्षित झाले पाहिजे. जेव्हा स्थानिक कार्यकारणी किंवा लोक निवडून येतील आणि खरी सत्ता उपभोगतील. त्याचबरोबर जेव्हा स्थानिक कार्यकारणीवरील राज्याचे नियंत्रण बऱ्याच प्रमाणात शिथील होईल. तेव्हाच प्रशिक्षण शक्य होईल. इ.स.१८८२ मध्ये लॉर्ड रिपनच्या सरकारने जो ठराव मंजूर केला होता. त्यामध्ये या सर्व गोष्टींचा समावेश होतो. त्याचबरोबर हा ठराव त्या काळातील स्थानिक कार्यकारणीचे सत्ता विस्तारीकरण आणि त्याला दिल्या जाणाऱ्या लोकशाही स्वरूपासंबंधीत प्रशासकीय विरोधाचे खंडण करणे. हा ठराव खुपच व्यापक असून प्रशासकीय भंग, स्थानिक कार्यकारणीचे प्रस्थापिकीकरण, त्याचे कार्य आणि सत्ता इत्यादी सर्व गोष्टींचा समावेश होतो. पुढील काळातील सरकारने लॉर्ड रिपनच्या ठरावामध्ये नवीन गोष्टींचा समावेश न करता त्याच्या अंमलबजावणीवर लक्ष दिले अशारितीने लॉर्ड रिपनचा ठराव आधुनिक भारतातील स्थानिक स्वप्रशासनाच्या उत्क्रांतीमध्ये खरोखरच महत्त्वाचा आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरतो.[१७]

भारतात इंग्रजांच्या काळापासून नगरपालिकांचा आरंभ झाला. १८८० पूर्वी मुंबई व कलकत्ता महानगरात स्थानिक स्वराज्य संस्थेचे अस्तित्त्व होते. [१८] परंतु त्याचे नियंत्रण सरकारी

नोकरांच्या हाती होते. लॉर्ड रिपन या व्हाईसरॉयने १८ मे १८८२ रोजी स्थानिक स्वराज्यविषयक कायदा केला व त्या कायद्याप्रमाणे जनतेच्या प्रतिनिधीद्वारा नगरपालिकांचा कारभार चालण्याची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. त्यामागे जनतेला कारभाराचे शिक्षण मिळावे हा हेतू होता. परंतु १९९९ पर्यंत लॉर्ड रिपनने केलेल्या सुधारणा कागदावरच राहिल्या.[१९] अखेर १९१९ चा राज्यकारभाराचा सुधारणा कायदा झाला. या कायद्याने स्थानिक स्वराज्य संस्था प्रांतिक सरकारच्या नियंत्रणाखाली आली. 'जिल्हा लोकल बोर्ड' ही संस्था खऱ्या अर्थाने स्थानिक लोकांची प्रातिनिधिक संस्था बनली. नागरी क्षेत्रात नगरपालिकांच्या निवडणूका होवून लोकनियुक्त प्रतिनिधीद्वारा कारभार सूरू झाला. सन १९२५ मध्ये 'बॉम्बे म्युनिसिपल बरोज ॲक्ट' या नावाने कायदा करण्यात आला.[२०]

नगरपरिषद प्रशासनास खऱ्या अर्थाने महाराष्ट्रामध्ये सुरुवात झाली. विशेषतः इ.स.१९५० च्या दशकामधील बॉम्बे प्रेसिडेन्सी मध्ये तसेच नगरपरिषद प्रशासन मराठा साम्राज्यामध्येही अस्तित्त्वात होती. परंतु त्यामध्ये बऱ्याचशा नगरपरिषद प्रशासनासंबंधीत महत्त्वाच्या गोष्टींचा अभाव होता. मराठा साम्राज्यामधील नगरपरिषद प्रशासन ही स्वायत्त अशी यंत्रणा नव्हती. ज्या सेवा ही नगरपरिषद प्रशासन पुरवत असे त्या खूपच प्राथमिक स्वरूपाच्या होत्या. पोलिस यंत्रणा ही महत्त्वाची यंत्रणा मानली जात असे.[२१] परंतु प्रामुख्याने ही यंत्रणा केंद्रीय प्रशासनासाठी कार्यरत असे. नगरश्रेष्ठी पद फक्त प्रतिष्ठेचे आणि आदराचे प्रतिक मानले जायचे त्याला विशेष अधिकार नव्हते. त्याचबरोबर शहराची भौगोलिक रचनासंबंधी असलेली कार्येसुध्दा नगरपरिषद प्रशासनाच्या कार्य अंतर्गत नव्हती.[२२]

इ.स.१६८७ मध्ये ब्रिटिश सत्ताधिशांनी मद्रास येथे महानगरपालिकेची स्थापना केली. याचा मुख्य उद्देश वस्तुवरील जकात कर गोळा करणे हा होता आणि खऱ्या अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाला प्रारंभ झाला. इ.स.१७९३ च्या चार्टर कायद्यानुवसार भारतीयांना स्थानिक स्वराज्य संस्था देण्यात आल्या. या स्थानिक स्वराज्यसंस्थांचा कारभार पाहण्यासाठी जस्टीस ऑफ पीस यांची नियुक्ती करणेचे अधिकार गव्हर्नर जनरलला देण्यात आला. त्याप्रमाणे मुंबई, कलकत्ता, मद्रास या तीन शहरामध्ये गव्हर्नर जनरलाकडून तीन अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली. अधिकारी शहरातील घरावर व जागेवर कर बसवत असत. शहरात

शांतात रहावी यासाठी पोलिस यंत्रणा, शहरासाठी लागणाऱ्या इतर सोयीसुविधा देण्यात येत होत्या. १८४२ मध्ये बंगाल कायदा पास झाला. या कायद्यानुसार नगरपालिका प्रशासन जिल्हा स्तरापर्यंत पोहोचले.

शहरात नागरी सुखसोयी पुरविण्याचे काम करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेला नगरपालिका म्हणतात. भारतात नगरपालिका स्थापन करण्याचा अधिकार १८५० च्या कायद्याने केंद्र सरकारला मिळाला. एखाद्या शहरातील नागरिकांनी आपल्या शहरात नगरपालिका स्थापन करण्यात यावी त्यासंबंधीच्या कायद्याचे आम्ही पालन करू व रितसर कर भरू, असा अर्ज केल्यानंतर सरकार नगरपालिका स्थापन करण्याबाबत हालचाल करीत असे. १८५० नंतर काही वर्षांनी भारतातील अनेक शहरात नगरपालिका स्थापन करण्यात आल्या. पुणे, सातारा (१९५३), सोलापूर (१८५२), बार्शी (१८६५), पंढरपूर (१८५५), करमाळा (१८६७), सांगोला (१८५६), अक्कलकोट (१९०४), मैदर्गी (१८८९), दुधनी (१९१०), कुर्डूवाडी (१९५४), मंगळवेढा (१८७४) इत्यादी ठिकाणी नगरपालिका स्थापन झाल्या.[२३]

नगरपालिका स्थापन करण्याचा सरकारने निर्णय घेतला. गव्हर्नर ९ ते १५ सदस्यांची 'म्युनिसिपल कमिशनर' म्हणून नियुक्ती करत असे. वेगवेगळ्या जातीधर्मातील प्रतिष्ठित नागरिकांना प्रतिनिधीक पंच म्हणून नेमले जात होते. जिल्हाधिकारी हा नगरपालिकेचा अध्यक्ष असे.३३ कामकाज विषयक नियम प्रत्येक नगरपालिकेने बनवायचे आणि गव्हर्नररांनी मंजूर केल्यानंतर अंमलात आणायचे अशी प्रथा होती. घरपट्टी व जकात कर बसविण्याचा नगरपालिकेला अधिकार होता. रस्ते, सफाई, पाणीपुरवठा वगैरे कामे आवश्यक मानली जात होती. प्रतिष्ठित नागरिकांना नगरपालिकेच्या कामात लक्ष घालायला सवड कमी मिळत असल्याने काही सरकारी अधिकाऱ्यांची म्हणजे प्रिन्सिपल सदर, अमीन, डेप्युटी डिस्ट्रीक्ट मेजिस्ट्रेट इत्यादी अधिकारी नगरपरिषदेवर नेमणूक करण्यात येवू लागली. जिल्हाधिकाऱ्याऐवजी बिनसरकारी सभासदाला अध्यक्ष करण्याची प्रथा १८८५ सालापासून सुरु झाली. नगरपरिषदेसाठी स्वतंत्र सेवकवर्ग नेमण्यात येऊ लागले. लहान शहरातही नगरपरिषद स्थापन करण्यात यावे म्हणून आवश्यक ती तरतूद करणारा बॉंबे डिस्ट्रीक्ट म्युनिसिपॅलिटी ॲक्ट १९०१ साली करण्यात आला.[२४] नगरपालिका हा प्रांतिक सरकारचा विषय मानण्यात

आला. विविध प्रांतात आवश्यक ते कायदे झाले. १९१८-१९ च्या मॉन्टेग्यू-चेम्सफर्ड सुधारणेनुसार नगरपरिषदांत संपूर्णपणे निवडणूकीचे तत्त्व स्वीकारण्यात आले. मतदानाचा अधिकार विशिष्ट रकमेपेक्षा अधिक घरभाडे किंवा शेतसारा भरणाऱ्याला किंवा आयकर भरणाऱ्याला देण्यात आला. मोठ्या शहरातील नगरपरिषदांसाठी सुधारलेला कायदा १९२५ साली बॉम्बे म्युनिसिपल ॲक्ट या नावाने करण्यात आला.

नगरपरिषदेच्या वाढ आणि विकासासाठी नगरपरिषद प्रशासन ही एक महत्त्वाची गोष्ट मानली जाते. कारण कोणत्याही संस्थेचा विकास हा तिच्या कार्यक्षम व निर्दोष प्रशासन यंत्रणेमुळेच होत असतो. प्रशासन यंत्रणा जर योग्य असेल तर अनेक लोकोपयोगी कामे पार पाडली जातात. नगरपरिषद प्रशासन यंत्रणेचा तर थेट संबंध या गोष्टीशी असतो. कारण सार्वजनिक आरोग्य, शहर स्वच्छता, रस्ते, बांधकाम, पाणीपुरवठा, सांडपाण्याचा निचरा, दिवाबत्ती सोय ही प्राथमिक कामे नगरपरिषदेकडून केली जातात. त्याचप्रमाणे दुय्यम दर्जाची कामे ही प्रामुख्याने लोकप्रतिनिधींच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतात. नगरपरिषदेच्या प्रशासन यंत्रणा व्यवस्थित व सरळ चालविण्यासाठी वेगवेगळया विभागाची निर्मिती करण्यात आली. तसेच त्या त्या विभागाची कामे त्यांना देण्यात येवून ही कामे विभागाला व्यवस्थितपणे पार पाडावी लागतात. आरोग्य विभागाकडून सार्वजनिक आरोग्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा शोध घेऊन लोकांना चांगलया सेवा पुरवविल्या जातात. साथीच्या रोगाचा प्रसार थांबविला जातो. साथीचे आजार होऊ नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जाते. शहरातील केरकचरा गोळा करून शहर स्वच्छतेविषयी दक्षता घेतली जाते. बांधकाम विभागामार्फत रस्ते दुरुस्ती व बांधणी अनेक इमारतींचे बांधकाम केले जाते. याशिवाय रस्त्यावर दिवा बत्ती सोय, आपत्तीच्या वेळी लोकांची सुटका, नियमित व स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, शहरांतर्गत वाहतूक योजना, स्वस्त धान्य दुकानातून लोकांना अन्नधान्याचा पुरवठा करणे या गोष्टी भौतिक सुधारणांमध्ये येतात व त्या त्या विभागामार्फत पार पाडल्या जातात. तर सांस्कृतिक विकासामध्ये शहररचना, लोकांच्या मनोरंजनासाठी बागा, वस्तुसंग्रहालय, ग्रंथालय इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. नगरपालिकेची सेवा व कार्यक्रमांची परिणामकारकता ही ती कोणत्या पध्दतीने राबविली जाते यावर अवलंबून असते.

नगरपरिषद प्रशासन लोकांचे घटनात्मक जाणीव जागृत करणारे पहिले पाऊल होते. यामध्ये मंगळवेढा संस्थान कोठे ही मागे नव्हते. इ.स. १८७४ मध्ये मंगळवेढा नगरपरिषद स्थापन झाली. यामध्ये प्रामुख्याने १२ सदस्य होते. त्यामधील निम्मे सदस्य निवडून दिले जात असत. आणि निम्मे सदस्य संस्थान नियुक्त करीत असे. जरी प्रशासन प्रामुख्याने संस्थान नियुक्त दिसत असले तरी ही लोकशाहीची सुरुवात होती. संस्थान कारभारी पद अधिकृत पद मर्यादेतून नियुक्त केले जात होते. संस्थान कारभारी हा नगरपरिषदेचे प्रमुख मानला जात असे. इ.स. १९२९ मध्ये निवडक मतदार आधारित निवडणूक तत्त्व उदयास आले. यामध्ये निवडून दिलेली कार्यकारीणी निवडून आलेल्या सदस्यांपैकी एक प्रमुख निवडत असत. त्याचबरोबर ही कार्यकारणी नियामक मंडळाच्या अध्यक्षांची सुध्दा निवड करीत असे. दरबार पद विशेषतः प्रशासकीय कामकाजामध्ये पर्यवेक्षणाचे काम करीत असे.[२५]

शहरी लोकसंख्या ही विरळ असल्याने उत्पन्नाचे स्त्रोत अपुरे पडत असत. घरपट्टी, जमिनीवरील कर, पाणीपट्टी, वाहन कर, जकात कर आणि मालवाहतूक कर नगरपरिषदेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत होते.

नगरपालिकेला त्यांची काही नेहमीची कार्ये पार पाडावी लागत होती. त्यामध्ये २० पथ दिव्यांची नव्याने खरेदी सार्वजनिक शौचालयाकरीता २४ पत्रांची पाने खरेदी केली. सफाई आयुक्त डॉ.अंडरसन यांची शिफारस घेतली, चार नवीन रस्त्यांची कामे सुरु केली आणि वस्तुंची दुरुस्ती करणे, अग्निशामक खरेदी केला. शौचालयासाठी पाण्याची टाकी खरेदी करणे, गटारांची बांधणी करणे इत्यादी.[२६]

## ३.९ मंगळवेढा नगरपरिषदेची विविध खातीः

नगरपरिषदेच्या प्रशासकीय कारभार नगरपरिषदेत खालील समितींच्या मार्फत चालविला जातो. शहरातील विविध कामांची वर्गवारी करून खातेवार मंजुरीसाठी ती-ती कामे त्या-त्या समित्यांकडे जातात. त्यामुळे कामकाजामध्ये नियोजनबध्दता आलेली होती.

### ३.९.१ सामान्य प्रशासन विभागः

या विभागाकडे प्रमुख लिपीक - १, वरीष्ठ लिपीक-१, वॉचमन - ४ असे एकूण १५ कर्मचारी असतात. या विभागामार्फत कमिटीचा अजेंडा काढणे, मिटींगला हजर राहणे, ऑडिटची उत्तरे तयार करणे, ऑडिटचा पत्रव्यवहार पाहणे, सर्व कार्यालयाची रजिस्टर ठेवणे, सर्व ऑफीसच्या डायऱ्या तपासणे, सरकारी पत्रव्यवहार पाहणे, एखादा कर्मचारी दोषी आढळल्यास त्याच्यावर दंडात्मक करवाई करणे, त्याचा बदली आदेश काढणे, कार्यालयीन कामकाजावर नियंत्रण ठेवणे व कर्मचाऱ्यांच्या रजा मंजुर करणे, तसेच वेतन वाढ करणे, इत्यादी कामे या विभागाला पाहावी लागतात.

### ३.९.२ सार्वजनिक बांधकाम खातेः

या विभागामार्फत रस्ते बांधणी, धर्मशाळा, पाणीपुरवठा, मार्केट इत्यादी बांधकामे केली जातात. या विभागात काम करणारे कर्मचारी पुढील प्रमाणे असतात. इंजिनिअर, बिल्डींग इन्स्पेक्टर, वरीष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक, मिस्त्री, गवंडी, ड्रायव्हर, मुकादम, शिपाई, वायरमन, क्लिनर, माळी, बिगारी, ओव्हसियर व शहर विकास भाग इंस्पेक्टर इत्यादी कर्मचारी कार्यरत आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागात काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला आपणास नेमून दिलेले काम करावे लागत होते. यामध्ये नदी व बंधाऱ्यावरील पुलाचे बांधकाम व बांधकामाची पाहणी, याशिवाय त्याला रस्त्यांची पाहणी करणे, रस्ते, गटार, इमारत, संडास व मुताऱ्या व शासकीय योजना इत्यादीचे बांधकाम इंजिनिअर या खात्यास करावे लागत होते.

टाऊन प्लॅनिंग स्कीम व गावठाण मधील इमारतीची परवाना कामे पाहणे, बांधकामे चालू असताना ती नियमाप्रमाणे होतात की नाही ते पाहणे, जर ती कामे नियमानुसार होत नसतील तर त्यांना नोटीसा देणे, एखादे काम बिगर परवाना चालू असल्यास त्यास त्या बांधकामाचे पंचनामे करून या स्थायी समितीकडे पाठविणे, रस्त्यावरील अतिक्रमणे हटवणे, बिल्डींग ऑफिसरनी सांगितलेली कामे करणे, इत्यादी कामे बिल्डींग इन्स्पेक्टरला करावी लागतात.

ओव्हरसियर या अधिकाऱ्यास पुढील प्रकारची कामे करावी लागतात. बांधकाम प्लॅन्स, इस्टिमेट तयार करणे, कार्यालयाची देखभाल करणे, बांधकाम खात्यामार्फत होणारे कामांची मापे घेणे, ती नोंदवणे, रस्ते आखणे, बांधकाम विभागाकडून तयार केलेल्या यादी प्रमाणे कामाची तपासणी करणे, रस्ते रूंदीच्या ड्राफ्टनुसार तयार केलेल्या केसेस तपासणे.[२७]

## ३.९.३ बांधकाम विभागाने केलेली कामे:

### अ) गटारे बांधणी:

मंगळवेढा नगरपरिषदेने शहरात पक्की गटारे २१ कि.मी. लांबीची बांधली आहेत. तर कच्ची गटारे १० कि.मी. लांबीची बांधली आहेत. ही गटारे बांधण्यासाठी नगरपरिषदेस एकूण २१ लाख रुपये एवढा खर्च आला आहे.

### ब) सार्वजनिक संडास:

मंगळवेढा शहरात जी खाजगी शौचालये आहेत त्याची संख्या मर्यादीत आहे. लोकांची गैरसोयी होऊ नये म्हणून नगरपरिषदेने सार्वजनिक शौचालयाची निर्मिती केली आहे. त्याची संख्या ३८८ एवढी आहे. त्यातील स्त्रियांसाठी २०० तर पुरुषांसाठी १८८ असून नगरपालिकेने १३५८००००/- रुपये एवढा खर्च केला आहे. काही ठिकाणी मोबाईल संडासे ठेवलेली आहेत व वैयक्तीक शौचालये १६६१ एवढी आहेत.

### क) सार्वजनिक मुताऱ्या:

शहरात उघड्यावर लघवीला बसू नये व अरोग्याचे महत्त्व ओळखून मंगळवेढा शहरात एकूण १०३ मुताऱ्या बांधल्या आहेत. त्यापैकी १०० पुरूषांसाठी व ०३ स्त्रियांसाठी बांधकामे केल्या आहेत. या मुताऱ्या बांधण्यासाठी नगरपालिकेला एकूण २६०००० रुपये एवढा खर्च आला आहे.

### ड) समाज मंदिरे व धर्मशाळा:

मंगळवेढा शहरात नगरपालिकेने एकूण १४ समाज मंदिरांचे बांधकाम केले आहे. ही समाज मंदिरे महार, मांग, वडर, रामोशी, मुस्लिम अशा वेगवेगळ्या जातींसाठी बांधली आहेत. ही समाज मंदिरे बांधण्यासाठी नगरपालिकेस एकूण ७० लाख रुपये एवढा खर्च आलेला आहे. याशिवाय मंगळवेढा शहरात नगरपालिकेच्या एकूण ०६ धर्मशाळा आहेत.

**इ) मार्केट (मंडई):**

भाजीपाला मार्केट मंगळवेढा शहरामध्ये दररोज मंडई शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर भरते. त्यासाठी भाजी ठेवण्यासाठी नगरपालिकेने कट्टे बांधले आहेत. त्यास रूपये ४० हजार एवढा खर्च आला आहे. तसेच आठवडा बाजार दर सोमवारी भरतो. त्यासाठी पत्र्याचे शेड व कट्टे बांधले आहेत. त्यास ६० लाख रूपये खर्च आला आहे. शिवाय रस्त्याचे कोबा केला आहे. त्याचा रूपये ५ लाख खर्च आला आहे. त्यातून वर्षाला ७ लाख रूपये उत्पन्न मिळते.[२८]

**ई) नगरपालिकेचे गाळे:**

नगपालिकेने एकूण २६६ गाळे बांधले आहेत. बांधकाम खर्च ४ कोटी रुपये आला आहे. त्याचे वर्षाला भाडे ४४ लाख रुपये येत आहे.

**उ) फळफळावळ माकेट:**

संत दामाजी मंदिराच्या समोर व मारूतीच्या पटांगणाजवळ फळे विकण्याच गाडे आहेत.[२९]

## ३.९.४ पाणी पुरवठा समिती:

पेशवाई मध्ये सांगोला करार झाल्यानंतर सांगली संस्थानाचे प्रमुख पटवर्धन यांच्याकडे मंगळवेढा व सांगोला परगणे आले. त्यावेळी १) दामाजी विहिर २) किल्ल्यामधील नेणे विहिर ३) इंडिकर विहिर ४) पश्चिमेकडील विहिर यामधून गावाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असे. मंगळवेढ्याच्या पूर्व बाजूला काळ्यामातीत गोड्या पाण्याचे डोयरे पाडले होते. व तेथील पाणी पिण्यासाठी वापरले जात होते. त्याकालावधीमध्ये पिण्यासाठी व वापरण्यासाठी मंगळवेढ्यामध्ये अनुक्रमे नऊ विहिरी होत्या त्या म्हणजे १) विठ्ठल विहिर २) कान्होपात्रा (पायस्तरबाई) विहिर ३) सराफ गल्ली जवळलील विठ्ठल मंदिर विहिर ४) काझी गल्ली (लादडीची विहिर) ५) गोव्याच्या घरामागील विहिर ६) गणेश विहिर ७) गोपणबाईची विहिर ८) सांगोला रस्त्यावरील विहिर ९) महादेवाची (काशीविश्वेश्वराची विहिर) तसेच १) कृष्ण तलाव २) कुंभार तलाव ३) मठ तलाव या नऊ विहीरीतून व तीन तलावातून पिण्याच्या व वापरण्याच्या पाण्याचा पुरवठा होत होता. १९६८ ला मंगळवेढ्यापासून १५ कि.मी. अंतरावर

उचेटाण येथून भीमा नदीवरून पाणी पुरवठा पाईपलाईनद्वारे केला. त्याला एकूण ३२ लाख रुपये खर्च आला आहे. त्याकाळी ३०,००० रुपये खर्च करून ३ लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधली गेली. नंतर मित्रनगरमध्ये १९९३ साली पाण्याची दुसरी टाकी बांधली आहे. त्याला एकूण ६० लाख रुपये खर्च आला त्याची क्षमता ४ लाख लिटर इतकी आहे.[३०]

मंगळवेढ्यापासून ६ कि.मी. अंतरावर भिमानदीतून आणलेल्या पाण्याचे फिल्टर होते व ते पाणी मंगळवेढा नगरपालिकेमधील दोन टाक्यामध्ये सोडले जाते. ते पाणी नळांद्वारे नागरिकांना पुरविले जाते. मंगळवेढा नगरपालिकेत एकूण नळ संख्या २७१६ एवढी आहे. त्यापैकी घरगुती नळ संख्या २७०० एवढी आहे व व्यावसायिक नळसंख्या १६ एवढी आहे. मंगळवेढा नगरपालिकेत सार्वजनिक बोअरची संख्या २५ एवढी आहे. त्यातील २० बोअरवर लहान टाक्या बसवलेल्या आहेत व पाच बोअरवरती हापसे बसविले आहेत. अशा पध्दतीने मंगळवेढा नगरपालिकेत पाणी पुरवठ्याची व्यवस्था केली जाते.[३१]

नागरिकांसाठी भविष्यकाळातील पाणी पुरवठ्याचे नियोजन पुढील प्रमाणे केले आहे.

**अ) भविष्यकालीन पाणी पुरवठाः**

मंगळवेढा नगरपरिषदेमार्फत UIDSSMT अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या शहर पाणी पुरवठा योजनेच्या ठळक बाबी पुढील प्रमाणे आहेत.

१.) मंजुर आराखड्यानुसार सदर योजना सन २००१ च्या जनगणनेनुसार सन २०२५ नजिकच्या टप्प्यातील लोकसंख्या ३२८३२ व सन २०४० च्या अंतिम टप्प्यातील लोकसंख्या ३८१९७ यासाठी ७० लिटर्स प्रतिमाणसी प्रतिदिनी पाण्याची गरज विचारात घेऊन योजना आखण्यात आली आहे. त्यानुसार नजिकच्या टप्प्यची पाण्याची गरज ३.४२ द.ल.लि.दिन व अंतिम टप्प्याच्या पाण्याची गरज ४.४० द.ल.लि.दिन इतकी आहे.

२.) मंगळवेढा नळपाणी पुरवठा योजनेसाठी उचेठाण येथील भिमा नदीतून एकूण वार्षिक १.६९५ दल.घ.मी प्रतिवर्ष एवढया पाणी आरक्षणास मंजुरी पाटबंधारे विभागाने दिलेली आहे.

३.) सद्‌यस्थितीत मंगळवेढा शहरास अस्तित्त्वातील ३.७५ द.ल.लि.प्रतिदिन क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्रातून दररोज ३.०० द.ल.लि.प्रतिदिन इतका पाणी पुरवठा होत आहे. २५

बोअर आहेत. सुमारे २८७५५ लोकसंख्येस सरासरी ५० लिटर्स प्रतिमाणसी इतका पाणीपुरवठा होतो.

४.)अंतिम टप्प्याच्या सन २०४० च्या एकूण ४.४० द.ल.मि.प्रति दिन पाण्याच्या गरजेसाठी अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्रातून १.५ द.ल.लि.प्रतिदिन असे एकूण ५.२५ द.ल.लि.प्रतिदिन पाणी पुरवठा येणे शक्य आहे.

५.)रुपये ७.९६५ कोटी इतक्या रकमेच्या प्रकल्पास राज्यस्तरीय मंजूरी समितीची मान्यजा मिळाल्यानंतर नगरपरिषदेने निविदा प्रक्रिया पूर्ण करून पाणीपुरवठा करणे व उर्वरित स्थापत्य काम करणे यासाठी स्वतंत्र निविदा मागीवल्या होत्या. व त्यानुसार सध्या ९७ टक्के काम पूर्ण झाले आहे.[३२]

## आस्थापना विभाग

**तक्ता क्र.३.१**

**नवीन आकृतीबंधानुसार मंजूर पदे**

| मंजूर पदे | स्थायी | अस्थायी | एकूण |
|---|---|---|---|
| वर्ग ३ | २८ | १० | ३८ |
| वर्ग ४ | १० | ८ | १८ |
| सफाई कामगार | २२ | १४ | ३६ |
| एकूण | ६० | ३२ | ९२ |

स्त्रोतः नगरपालिका वार्षिक अहवाल -२०१०

नगरपरिषदेमध्ये आकृतीबंधानुसार मंजूर पदे स्थायी -५९, अस्थायी -३२ एकूण ९१, सध्या कार्यरत पदे -स्थायी-५३, अस्थायी-२२, एकूण -७५ रिक्तपदे १२ आहेत.

**तक्ता क्र.३.२**

**सध्या कार्यरत कर्मचारी**

| मंजूर पदे | स्थायी | अस्थायी | एकूण |
|---|---|---|---|
| वर्ग ३ | ०७ | -- | ०७ |
| वर्ग ४ | १७ | १७ | ३४ |
| सफाई कामगार | २२ | ०७ | २९ |
| एकूण | ४६ | २४ | ७० |

स्त्रोतः नगरपालिका वार्षिक अहवाल -२०१०


शासनाकडून मिळणारे सहाय्यक वेतन अनुदान रुपये १५,९२,००० आहे.

सेवानिवृत्त कर्मचारी संख्या : ६१ एवढी आहे.

तदर्थ पेन्शनधारक कर्मचारी संख्या : ०३ आहे.

**आकृती क्र.३.१**

**नवीन आकृतीबंधानुसार मंजूर पदे व कार्यरत कर्मचारी**




स्त्रोतः नगरपालिका वार्षिक अहवाल -२०१०

**ब) वेतन खर्च**

**तक्ता क्र.३.३**

**वेतन खर्च**

| अ.क्र. | तपशील | कर्मचारी संख्या | वेतन खर्च |
|---|---|---|---|
| १. | कायम कर्मचारी वेतन | ७५ | १४६०००३ |
| २. | सेवानिवृत्त कर्मचारी वेतन | ६१ | ४९९०६६ |
| ३. | तदर्थ वेतन | ०३ | १,१२५ |

स्त्रोतः नगरपालिका वार्षिक अहवाल -२०१०

**क) रिक्त पदांची माहितीः**


**तक्ता क्र.३.४**

**रिक्त पदांची माहिती**

| संवर्ग पदे | पदसंख्या |
|---|---|
| वरीष्ठ लिपीक | ३ |
| फायरमन | ४ |
| उद्यान पर्यवेक्षक | १ |
| गाळणी चालक | १ |
| प्रयोगशाळा सहाय्यक | १ |
| कनिष्ठ रचना सहाय्यक | १ |
| सहा.लेखा परिक्षक | १ |
| सहा.अग्निशामक स्थानक पर्यवेक्षक | १ |
| अस्थायी तोलार | १ |
| अस्थायी लाईनमन | १ |
| अस्थायी आरोग्य निरिक्षक | १ |
| अस्थायी लेखापाल | १ |

स्त्रोतः नगरपालिका वार्षिक अहवाल -२०१०

**आकृती क्र.३.२**
**रिक्त पदांची माहिती**




स्त्रोतः नगरपालिका वार्षिक अहवाल -२०१०

### क) शासकीय कर्मचारीः

शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये खालील पदांचा समावेश होतो. अभियंता, पर्यवेक्षक संख्या, पर्यवेक्षक, वरीष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक, फिटर ऑपरेटर, चौकीदार, पाटकरी, फिल्टर, अटेंडंट, बिगारी, शिपाई इत्यादींचा समावेश होतो.

यांच्याकडून खाजगी नळ कनेक्शन देणे, नवीन कनेक्शन देणे, जूने बंद करणे, पाईपचे लिकेज काढणे, गटार-घाणपाणी काढणे, बोअर दुरुस्ती कराणे, पाणी साठवणे, टाक्याची साफसफाई करणे इत्यादी कामे केली जातात.[३३]

## ३.९.५ आरोग्य समिती

शहरातील रस्ते, गटारे, यांची साफसफाई करणे, साथीचे रोग पसरू नयेत म्हणून प्रतिबंधक उपाययोजना करणे, इत्यादी कामे केली जातात. मंगळवेढा शहरात शासकीय नागरी रुग्णालयाची स्थापना केली. प्रारंभी मंगळवेढयाच्या नागरी रुग्णालयात मंगळवेढा शहरातील

जनतेच्या मोफत औषधोपचारासाठी स्वतंत्र विभाग, तसेच तालुका पोलिस कर्मचारी स्त्रीरुग्ण व बाह्यरुग्ण यासाठी स्वतंत्र विभाग आहे.

मंगळवेढा नगरपालिकेने सन १९४०-४१ मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागावर मोठ्या प्रमाणावर खर्च केला आहे. नगरपरिषदेने सन १९४०-४१ या वर्षी साथीच्या रोगांना टाळले केले होते. औषधांची मोफत सोय केली होती. मंगळवेढा शहरात प्लेगची साथ येऊ नये म्हणून उंदीर निमूर्लनाची योजना सर्वत्र राबवली होती. देवी, निमूर्लनासाठी मंगळवेढा शहरात मोठ्या प्रमाणावर खर्च केला आहे. त्यासाठी ठिकठिकाणी लसीकरण केंद्रे स्थापन केली आहेत. त्यामुळे मंगळवेढा शहरातून देवी रोगाचा नायनाट झाला आहे.

मंगळवेढा नगर परिषदेने देवी रोगाच्या निमूर्लनानंतर कॉलरा, रोगाचे निर्मूलन करण्यास प्रारंभ सन १९४७ साली केला. साथीच्या रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी नगरपालिकेने प्रत्येक वार्डात औषध फवारणी काम हाती घेतले होते. कॉलरा रोग शहरात स्वच्छता राखल्याने दूर होण्यास मदत झाली.

फ्ल्यु, मलेरिया यांचा प्रादुर्भाव शहरात होऊ नये म्हणून नगरपरिषदेने शहरातील पाणथळ, डबकी, पाणथळ जागा, शहरातील घरे मॅलिथियोनने व डी.डी.टी.ने दरारोज फवारण्यात आली आहेत.

मंगळवेढा शहरात स्वच्छता निर्माण करण्यासाठी सार्वजनिक व खाजगी शौचकुप साफ केली जात होती. या शौचकुपातून निघालेला मैला एका खड्यात साठवला जातो. शहरातील रस्ते झाडण्यासाठी स्त्री व पुरुष कामगार आहेत. रोज गोळा केलेला कचरा ठिकठिकाणी ठवेलेल्या एकूण १४० केराच्या डब्यात साठविला जातो. शहरातील गटारे स्वच्छ करण्यासाठी नगरपालिकेने काही पुरुष कामगार ठेवलेले आहेत. तो कचरा वाहनामार्फत शहराबाहेर नेला जातो.

आरोग्य विभागात मेडिकल ऑफिसर, सॅ.नि.इन्स्पेक्टर, सिनियर क्लर्क लिपीक, ड्रायव्हर, मुकादम, शिपाई, वॉचमन, क्लिनर, सफाई कामगार, ड्रेनेज कामगार इत्यादी कर्मचारी वर्ग आहेत. सबइन्स्पेक्टर शहराची रोज पाहणी करणे, रोग व उपद्रवण्याची शक्यता असल्यास रिपोर्ट देणे, आरोग्य खात्यावर देखरेख करणे, नियमांची अंमलबजावणी करणे, साथीचे रोग

उद्भवल्यास तातडीने चौकशी करणे, जन्म-मृत्यू रजिस्टर अद्ययावत करणे, मार्केट, टपरी यांची पाहणी करून तेथे नेहमी स्वच्छता राहील अशी व्यवस्था करणे, शहरातील स्वच्छतागृहाची व्यवस्था पाहणे इत्यादी कामे पहावी लागतात.

नागरीकांसाठी औषध-गोळ्या मागणीनुसार पुरविल्या जातात. रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून नगरपालिका ५ ते ६ लाखाची जंतूनाशके खरेदी करते व फवारते त्याच्या माध्यमातून रोगांच्या साथीचे प्रतिबंध होतात.[३४]

## ३.९.६ जकात विभागः

या विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या एक जकात अधिक्षक, तयासदार - १०, लिपीक -२०, शिपाई -२२ एवढी आहे. या विभागाकडून औषधे, स्टील, पत्रा, लाकूड, सिमेंट, फरशी, कापड, धान्य, कडधान्य, तेल, सोने, चांदी, साबण, साखर, गुळ, अर्थ, कपाट, काचा, टेबल, खुर्ची, कॉस्मेटीक्स, सिगारेट, गुटखा, तंबाखू, इत्यादी मालावर १ ते ४ टक्केपर्यंत जकात घेतली जात होती. जकात चुकविणाऱ्यास नियमानुसार होणारी जकात व १० पट दंड वसूल केला जात असे. मुक्कामी थांबल्यास अनामत रक्कम भरावी लागत होती. तर ती रक्कम जाताना परत मिळत होती. महाराष्ट्र सरकारने ३० एप्रिल १९९९ ला ही जकात बंद केली.[३५]

## ३.९.७ मंगळवेढा शहरातील जकात नाकेः

मंगळवेढा शहरात एकूण पाच जकात नाके होते. या सर्व नाक्याचे मुख्य ऑफीस मंगळवेढा नगरपालिकेजवळ होते. ही जकात नाकी पुढील प्रमाणे होती.

१. मंगळवेढा-पंढरपूर जकात नाका.

२. मंगळवेढा-बोराळे नाका जकात नाका मध्यवर्ती ठिकाणी होते.

३. मंगळवेढा-खोमनाळ जकात नाका.

४. मंगळवेढा-सांगोला जकात नाका.

५. सेंट्रल नाका-नगरपालिकेजवळ.

या प्रत्येक नाक्यावर ४ शिपाई, २क्लार्क एवढी कर्मचारी संख्या होती. तर फिरते पथक यामध्ये ५० अधिकारी व सेवक संख्या यामध्ये अधिक्षक तयासदाद, लिपिक व शिपाई यांचा समावेश होता.

## ३.९.८ नगदी खाते:

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियमानुसार व बॉम्बे म्युनिसिपल ॲक्ट मधील तरतुदीस अनुसरुन अकौंटंट याने नगरपालिकेच्या हिशोबाची सर्व ती जबाबदारी स्वीकारण्याची आहे त्यासाठी लागणारे रजिस्टर, फॉर्मस्, इतर साहित्य घेऊन ती पूर्ण करावयाची आहे. तसेच वार्षिक बजेट व दुरुस्त अंदाजपत्रक, वार्षिक रिपोर्ट, तिमाही, सहामाही नऊमाही, बारमाही हिशोब तयार करून देणे व ते प्रसिध्द करणे, हाताखालील नोकर वर्गाकडे कामाची वाटणी करून देणे व त्याप्रमाणे काम पूर्ण करून घेणे आहे.

या विभागातील कॅशियरला पुढील प्रकारची कामे करावी लागतात. रोजचा जमाखर्च लिहीणे, जमेचा भरणा बँकेत रोजच्या रोज करणे, डिपॉझिट ॲडव्हान्स वगैरे सर्व रजिस्टर्स अद्ययावत लिहिणे इत्यादी कामे त्यास पार पाडावी लागतात.[३६]

## ३.९.९ विद्युत विभाग:


नगरपरिषदेने रत्यावरील दिव्यांची सोय केली आहे. इलेक्ट्रीकद्वारे शहरात विद्युत सोय केली आहे. रस्त्यावरील मुख्य चौकात विजेचे मोठे दिवे लावले आहेत. शिवाय ठिकठिकाणी २५ वॅट्सचे, ४० वॅट्सचे, ६० वॅट्सचे, १०० वॅट्सचे असे एकूण  इलेक्ट्रीक दिवे लावण्यात आले आहेत. एकूण या दिव्यांचा वर्षाचा खर्च १२ लाख रुपये होतो.

**तक्ता क्र.३.५**
**नगरपरिषदेने लावलेले इलेक्ट्रिक दिवे**

| अ.क्र. | दिव्यांचे स्वरूप | दिव्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | रोडलाईट बॉक्स | २१ |
| २. | शहरातील पोल | ८८० |
| ३. | दिव्यांची संख्या (बल्ब) | २७५ |
| ४. | मर्क्युरी | ४० |
| ५. | सी.एफ.एल.बल्ब | ७४ |
| ६. | टयुब लाईट सेट | ५६७ |
| ७. | ईनरमिसेबींग स्ट्रीट लाईट | ९७ |
| ८. | एल.ई.डी.लॅम्प | ०४ |
| ९. | हायमास्टर पोल १२.११ | ०२ |
| १०. | नऊ मिटर पोल | ०४ |
| | एकुण संख्या | १९६४ |

स्त्रोतः नगरपालिका वार्षिक अहवाल -२०१०

**आकृती क्र.३.३**
**मंगळवेढा शहरातील बसवलेले दिव्यांचे प्रमाण**




स्त्रोतः नगरपालिका वार्षिक अहवाल -२०१०

नगरपालिकेला शहराचे एकूण लाईट बील प्रत्येक महिन्याला १,५०,००० रुपये एवढे द्यावे लागते. तर नगरपालिकेला जो पाणीपुरवठा केला जातो त्याचे महिन्याला लाईट बील ३,००,००० रुपये द्यावे लागतात.

एकूण नगरपालिकेला महिन्याचे लाईट बील शासनाला ४,५०,००० एवढे द्यावे लागते तर वर्षाचे एकूण लाईट बील ५४,००,००० रुपये एवढे द्यावे लागते. हा नगरपालिकेला लाईटबीलाचा मोठा तोटा सहन करावा लागत आहे. याकरीता लोकांनी ज्यास्त पाणीपट्टी भरली पाहिजे. तरच हा तोटा भरून काढता येईल.

नगरपरिषदेने रत्यावरील दिव्यांची सोय केली आहे. इलेक्ट्रीकद्वारे शहरात विद्युत सोय केली आहे. रस्त्यावरील मुख्य चौकात विजेचे मोठे दिवे लावले आहेत. शिवाय ठिकठिकाणी २५ वॅट्सचे, ४० वॅट्सचे, ६० वॅट्सचे, १०० वॅट्सचे असे इलेक्ट्रीक दिवे लावण्यात आले आहेत.[३७]

### ३.९.१० दप्तर खाना:

या विभागात सर्व विभागातील कोरी बुक्स, रजिस्टर्स, फॉर्म्स यांची छपाई करणे, पावती बुके सर्व खात्यास पुरविणे व सर्व कर्मचाऱ्यांना लागणारे साहित्य आणणे व पुरविणे सरकारने ठरविलेल्या पध्दतीप्रमाणे रेकॉर्ड लावणे व नाशवंत रेकॉर्ड नियमाप्रमाणे नाश करणे आहे.

### ३.९.११ कर विभाग:

यामध्ये कर वसूली प्रमुखास बिले, नोटीसा, पेडक्लार्क, नियमाप्रमाणे काढतात यावर देखरेख करणे, म्युनिसिपल मिळकती लिलावाने देणेची व्यवस्था करणे, वर्षा अखेरची डिमांड रजिस्टर्स जमाविण्यास पेठ लिपिकांना सहाय्य करणे, कोंडवाडा अटेंडंटचे कामावर देखरेख ठेवणे, जनरल कीर्द स्वतः रोजचे रोज लिहिणे खात्याचा पत्रव्यवहार पहाणे इत्यादी कामे पहावी लागतात. या विभागात कर वसूली प्रमुख, लिपीक, शिपाई असे कर्मचारी असतात. २ कोटी १५ लाख रुपये कर वसूली वर्षाला होते.[३८]

### ३.९.१२ अन्न निरीक्षक विभागः

भेसळ प्रतिबंध कायदा व त्या खालील नियमानुसार सदर कायद्याची शहरात तंतोतंत व कार्यक्षमतेने अंमलबजावणी करणे, गुन्हेगारांना उजेडात आणणे, त्यांच्यावर मुदतीत खटले भरणे, गुन्हेगारांना शोधून काढून भेसळ प्रतिबंधक खाद्यपेय, जिन्नस यात होणारी भेसळ शोधून काढणे व अशा प्रवृत्तीस आळा घालणे. या विभागात एकूण कर्मचारी संख्या तीन होती. यामध्ये एक अन्न निरीक्षक, एक लिपीक, एक शिपाई एवढी आहे. याचे काम म्हणजे अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा व त्याखालील नियमानुसार सदर कायद्याची शहरात अंमलबजावणी होती का नाही ते पाहणे, हॉटेल लायसन्स, हातगाडी लायसेन्स व तसकीर लायसन्स बाबत योग्य ती अंमलबजावणी करणे, भाजीमार्केट, मटणमार्केट, तपासणी करणे, शहरातील हॉटेल, दुकाने यामधील बनवलेल्या खाद्यपदार्थांचे नमुने घेणे ती योग्यअयोग्य लयब्रीटी पुणे यांचेकडे पाठविणे.

### ३.९.१३ वृक्ष विभागः

या विभागात वरिष्ठ लिपीक, एक वृक्ष निरीक्षक, अधिकारी, कनिष्ठ लिपीक, सहाय्यक माळी, वॉचमन, बिगारी, शिपाई इत्यादी कर्मचारी काम करीत असतात. या विभागास बागदेखभाल, अपात्कालीन कामे, वृक्षारोपण, झाडे कटींग करणे, वगैरे कामे करावी लागतात. मंगळवेढा शहरात एकच मोठे उद्यान आहे. या उद्यानात लहान मुलांची खेळाची साधने आहेत. मोठे कारंजे आहे. बागबगीच्या मोठ्या प्रमाणात आहे.

### ३.९.१४ आग प्रतिबंधक विभागः

या विभागाकडे शहरात लागलेली आग विझविण्याची जबाबदारी असते. यासाठी नगरपालिकेने चार बंब ठेवले आहेत. त्याद्वारे शहरात जर अचानक आग लागली तर या अग्निशमक दलातील आग प्रतिबंधक विभागाच्या सहाय्याने आग विझविण्याचे कार्य चालते.[३९]

## ३. १०. मंगळवेढा नगरपरिषदेचे शैक्षणिक विकासातील योगदान

शिक्षण हे ज्ञानाचे उगम स्थान आहे. समाज परिवर्तनाचे एक प्रभावी माध्यम आहे. शालेय शिक्षण म्हणजे शिक्षण, साक्षरता म्हणजे शिक्षण असा सर्वसाधारण समज प्रचलित आहे. परंतु शिक्षणाची व्याप्ती इतकी मर्यादित नाही. शिक्षण अनेक माध्यमातून समाजातील

प्रत्येक व्यक्ती घेत असतो. त्यातून औपचारीक व अनौपचारीक शिक्षण सुरु झाले. विविध कामासाठी तज्ञ व्यक्तीची गरज भासू लागली. त्यातूनच संख्यात्मक पध्दत अस्तित्वात आली.

प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत शिक्षण वेळेनुसार बदलत गेले. बदलत्या परिस्थितीनुसार त्या त्या अनुषंगाने त्यात बदल होत गेले. मंगळवेढा नगरपरिषदेने देखील नगरपरिषद स्थापनेपासून शिक्षणासाठी वेगवेगळ्या सोई - सुविधा निर्माण केल्या व ज्ञानदान देण्याचे अविरहित परंपरा चालू ठेवली. मंगळवेढा नगरपरिषदेने शिक्षणासाठी दिलेल्या योगदानाचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

मंगळवेढामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात प्राथमिक स्वरुपाच्या सोई होत्या. इ.स. १९३६ मध्ये भारतात प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास झाला. प्राथमिक शिक्षणांचे अधिकार मंगळवेढा स्कुल कमिटीकडे दिला गेला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्राथमिक शिक्षणांची जबाबदारी शासनावर पडली. त्यामुळे बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७ अन्वये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात येऊन ते डिस्ट्रिक्ट स्कुल बोर्डाकडे सोपविण्यात आले. मंगळवेढ्यामध्ये नगरपरिषदेची स्थापना १८७४ साली झाली व तेथून मंगळवेढा नगरपरिषदेने अंतर्गत विविध भागामध्ये प्राथमिक शाळेची सोय केली.[४०]

१)	शाळेचे नाव :- न. पा. कन्या शाळा नं. १, मंगळवेढा

शाळेची स्थापना : १३ मार्च १८९६

शाळेची सदयस्थितीची विदयार्थी संख्या :-

अ) मुले - ८४	ब) मुली - ६९	क) शिक्षक-१	ड)शिक्षीका- ३

२)	शाळेचे नाव :- न. पा. मुलांची शाळा नं. २, मंगळवेढा

शाळेची स्थापना:- १९४०

शाळेची सदयस्थितीची विदयार्थी संख्या :-

अ) मुले - ६३	ब) मुली -९३	क) शिक्षक-६	ड) शिक्षीका-१

३)	शाळेचे नाव :- न. पा. मुले शाळा नं. ३, मंगळवेढा

शाळेची स्थापना :- १९६७

शाळेची सदयस्थितीची विदयार्थी संख्या :-

अ) मुले - ५६	ब) मुली - ४५	क) शिक्षक - ४	ड) शिक्षीका- ०

४)	शाळेचे नाव :- कै. नानासाहेब नागणे प्रशाला, न. पा. मुला-मुलींची शाळा नं.४, नागणेवाडी मंगळवेढा

शाळेची स्थापना :- १५ फेब्रुवारी १९६२

शाळेची सदयस्थितीची विदयार्थी संख्या :-

अ) मुले - १६०	ब) मुली - ९७	क) शिक्षक - ६	ड) शिक्षीका-१

५)	शाळेचे नाव :- न. पा. मुलां-मुलींची शाळा नं. ५, मंगळवेढा

शाळेची स्थापना :- १९९५

शाळेची सदयस्थितीची विदयार्थी संख्या :-

अ) मुले - ६९	ब) मुली - ८२	क) शिक्षक - ४	ड) शिक्षीका-०

६)	शाळेचे नाव :- न. पा. कन्या शाळा नं. २, मंगळवेढा

शाळेची स्थापना :- १९७३

शाळेची सदयस्थितीची विदयार्थी संख्या :-

अ) मुले - ५५	ब) मुली - ९६	क) शिक्षक - १	ड) शिक्षीका-४

७) शाळेचे नाव :- न. पा. मुलांची शाळा नं. १ मंगळवेढा

शाळेची स्थापना :- १८६४

शाळेची सदयस्थितीची विदयार्थी संख्या :-

अ) मुले - ११४ ब) मुली - ७१ क) शिक्षक - ५ ड) शिक्षीका-१

८) शाळेचे नाव :- न. पा. उर्दू शाळा मंगळवेढा नं. ८

शाळेची स्थापना :- १८८४

शाळेची सदयस्थितीची विदयार्थी संख्या :-

अ) मुले - ६५ ब) मुली - १०७ क) शिक्षक - ४ ड) शिक्षीका-३

मंगळवेढा नगरपालिका प्रशासनामार्फत प्राथमिक शिक्षणाचे अधिकार मंगळवेढा स्कुल कमिटीकडे दिला होता. नगरपरिषद क्षेत्रामध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले. त्यानुसार मंगळवेढा नगरपरिषदेने अंतर्गत विविध भागामध्ये प्राथमिक शाळांची उपलब्धी करून दिली. त्यावेळचे प्रशासन अधिकारी व शिक्षण सभापती यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्या आली. ते अधिकारी व सभापती पुढील प्रमाणे,

**तक्ता क्र.३.६**

**मंगळवेढा नगरपरिषदेचे प्रशासकीय पदाधिकारी व सभापती यांची मुदत**

| अ.क्र. | प्रशासकीय अधिकारी | मुदत | सभापती/ उपसभापती | मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. एम.एन. शेख | ११-१०-७४ ते २३-६-७६ | श्री. दा. वि. सुरवसे श्री.ल.बा. चेळेकर | २-१-७६ ते ७-४-८७ |
| २. | श्री. एस.पी. पाखरे | ८-७-७६ ते २०-१०-७८ | श्री. रा. ए. जगताप श्री. आ. भि. चोपडे | ८-४-८७ ते ३-१-९५ |
| ३. | श्री. जी. के. कर्णेकर | ८-५-७९ ते ७-६-८० | श्री. द. मा. यादव- श्री. ए. श. काझी | ४-१-९५ ते ८-९-९७ |
| ४. | श्री. गं. बा. घोडके | १६-६-८० ते १४-६-८२ | श्री. सु.र. शहा/ श्री. म. गु. कांबळे | ९-९-९७ ते ३१-३-२००३ |
| ५. | श्री. पी. ए. बडवे | १५-६-८२ ते २३-६-८५ | कु.अनुराधा खानविलकर | १-४-०३ ते १३-७-०३ |
| ६. | श्री. डी. बी. आसबे | २४-६-८५ ते २-९-८९ | श्री.कापरे एस. एस. | १४-७-२००३ ते ९-३-२००४ |
| ७. | श्री. एस. एल. नागणे | ३-९-८९ ते ३०-५-९५ | कु. अमिता दगडे | १०-३-२००४ ते ३१-३-२००५ |
| ८. | श्री. एन. एन. जंगले | ३०-५-९५ ते १९-७-९७ | श्री.सु. र. शहा श्री.एच.एच.बागवान | १-४-२००५ ते १७-२-२०१२ |
| ९. | श्री. एस. एस. खंडागळे | १९-७-९७ ते ११-७-९९ | | |
| १०. | श्री. एस. ए. चाँदा | १९-७-९९ ते २४-७-२००१ | | |
| ११. | श्री. बी. ए. मिसाळ | २४-७-२००१ ते १०-६-२००८ | | |
| १२. | श्री. एम. बी. मोरे | १०-६-२००८ ते ६-६-२०११ | | |

स्त्रोतः नगरपालिका वार्षिक अहवाल -१९७४-२०१०

शासनामार्फत घेतल्या जाणाऱ्या स्कॉलर्शीप परीक्षेमध्ये चौथीच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले होते. उपलब्धमाहिती प्रमाणे त्यांची संख्या व वर्ष पुढीलप्रमाणे तक्तस क्र.३.७ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता क्र.३.७**

**स्कॉलरशीप मधील विदयार्थी (सन २००१-२०१०)**

| अ.क्र. | वर्ष | यशवंत विदयार्थी |
|---|---|---|
| १) | २००१ | १५ |
| २) | २००२ | १२ |
| ३) | २००३ | ११ |
| ४) | २००४ | १७ |
| ५) | २००५ | १४ |
| ६) | २००६ | ६० |
| ७) | २००७ | ३९ |
| ८) | २००८ | ४९ |
| ९) | २००९ | ३० |
| १०) | २०१० | ३४ |

स्त्रोतः नगरपालिका शिक्षण मंडळ अहवाल

**तक्ता क्र.३.८**

**नगरपालिका शिक्षण संस्थेतील विदयार्थी संख्या**

| **अ.क्र.** | **वर्ष** | **विदयार्थी संख्या** |
|---|---|---|
| १. | १९९५- १९९६ | १२५० |
| २. | १९९६- १९९७ | १३२० |
| ३. | १९९७- १९९८ | १३५० |
| ४. | १९९८- १९९९ | १४८० |
| ५. | १९९९- २००० | १५६० |
| ६. | २०००-२००१ | १५९० |
| ७. | २००१ - २००२ | १६२२ |
| ८. | २००१ - २००२ | १६२२ |
| ९. | २००१ - २००२ | १६२२ |
| १०. | २००१ - २००२ | १६२२ |
| ११. | २००२ - २००३ | १६५३ |
| १२. | २००३ - २००४ | १७१० |
| १३. | २००४ - २००५ | १५१० |
| १४. | २००६ - २००७ | १६०४ |
| १५. | २००७ - २००८ | १६२१ |
| १६. | २००८ - २००९ | १६१६ |
| १७. | २००९ - २०१० | १७५६ |
| १८. | २०१० - २०११ | १५५८ |

स्त्रोतः नगरपालिका शिक्षण मंडळ अहवाल

**तक्ता क्र.३.९**

**सद्यस्थितीतील नगरपालिका शालेय संख्या**

| एकुण विदयार्थी संख्या | एकुण शिक्षक संख्या | मराठी माध्यम शाळा | ऊर्दू माध्यम शाळा | एकुण शाळांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १६४० | ४६ | ७ | १ | ८ |

स्त्रोतः नगरपालिका शिक्षण मंडळ अहवाल

शिक्षण व्यवस्थेला गतिमान करणे काळाची गरज आहे. बदलत्या परिस्थितीनुसार शिक्षणातील वेगवेगळे प्रभाव बदलणे ही महत्वाचे आहे. मंगळवेढा नगरपरिषदेची स्थापना झाल्यापासून नगरपरिषदेने शिक्षण व्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल केले आहेत. आज आठ नगरपालिका शालेयतून विदयादान कार्य अविरईत चालू आहे. सध्याच्या युगात जिथे इंग्रजी माध्यम शाळेचे पेव फुटले आहे. तिथे नगरपालिकेने शाळांनी चांगला आदर्श शिक्षण व्यवस्थेत राखला आहे. [४१]

## ३.११ नगरपरिषदेची स्वच्छता, सोयीचे आजारासंबंधीत व बांधकामासंबंधीत उपाययोजनाः

खाली दिलेल्या उत्पन्न आणि खर्चासंबंधीची माहिती नगरपरिषदेच्या कामकाजाचे स्वरूप आणि परिणाम स्पष्ट करतात. दुष्काळ आणि प्लेग सारख्या संकटामुळे नगरपरिषदेच्या महसूलामध्ये घट झाली. त्यामुळे पाठीमागील वर्षाच्या तुलनेत खर्चामध्ये वाढ झाली आणि शिल्लक कमी राहिली.

शहर प्लेगाच्या सोयीमुळे ग्रासलेले असल्याने सफाई यंत्रणेवरती जास्त लक्ष देण्यात आले. त्यामुळे त्यासंबंधी खर्चात वाढ झाली. नगरपरिषदेने याबाबतीत केलेल्या कामकाजाची माहिती खालीलप्रमाणे, नगरपरिषदेची मालकीची बाजारपेठ असावी अशी खूप दिवसाची मागणी होती. त्यामुळे भाजीमंडईसाठी योग्य अशी जागा विकत घेण्यात आली. बांधकामाच्या कामाला अगोदरच सुरुवात करण्यात आली. ९० नवीन शौचालये बांधण्यात आली. ९ नवीन पथदिव्यांची भर टाकण्यात आली. भिमा नदीवर बेगमपूर येथे बंधारा बांधण्यात आला. [४२]

## ३.१२ समारोपः

आधुनिक काळात प्रशासन व्यवस्थेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना फार महत्त्व आहे. भारतात ब्रिटिश सरकारने स्थानिक स्वराज्य संस्था विषयक कायदा केल्याने मंगळवेढ्यामध्ये सन १८७४ मध्ये नगरपरिषदेची स्थापना केली. मंगळवेढा शहराचा सर्वांगीण विकास व्हावा हा त्यामागील हेतू होता. सांगली संस्थानामार्फत नगरपरिषदेला अनुदान दिले जात होते. सर्व नगराध्यक्ष शहराच्या विकासासाठी सतत प्रयत्नशील होते. १८७४ ते २०१० या कालावधीत मंगळवेढा नगरपरिषदेचा खूप विकास झाला.

मंगळवेढा नगरपरिषदेत अध्यक्ष म्हणून कारभारी काम पाहत होता. तेव्हा हा कारभारी सांगली संस्थानाच्या दरबारातून नियुक्त केला जात होता. मंगळवेढा संस्थानात म्युनिसिपालिटीच्या कारभारासाठी प्रशासक नेमले जात होते. नगरपरिषदेवर नेमणूक करण्यासाठी निवडणूका घेतल्या जात होत्या.

मंगळवेढा नगरपरिषदेची विविध खाती होती. त्यामध्ये सामान्य प्रशासन विभाग, सार्वजनिक बांधकाम खाते, बांधकाम विभागाने केलेली कामे, गटारे बांधणी, सार्वजनिक संडास, सार्वजनिक मुताऱ्या, समाज मंदिरे, धर्मशाळा, मार्केट, मंडई, भाजीपाला मार्केट, मासे मार्केट, फळफळावळ मार्केट, शाळा इमारती, पाणीपुरवठा समिती, आरोग्य समिती, जकात विभाग, नगदी खाते, विद्युत विभाग, दप्तर खाना, करविभाग, नगर वाचनालये, अन्ननिरीक्षक विभाग, वृक्ष विभाग, आग प्रतिबंधक विभाग, इत्यादी मंगळवेढा नगरपरिषदेची खाती चांगल्याप्रकारे कार्य करीत आहेत. नगरपालिका शिक्षण, नगरपरिषदेची स्वच्छता, साथीचे आजारासंबंधी, बांधकामासंबंधीच्या उपाययोजना नगरपरिषदेने केल्या आहेत.

## संदर्भ सूची


१) शर्मा एम.पी., लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन इंडिया, ओरियंट प्रकाशन, १९९४, पृ.९४

२) सचदेव डी.आर. स्टडीज इन इंडियन ॲडमिनिस्ट्रेशन, सिमला प्रकाशन, मुंबई, २००१, पृ.३२

३) कित्ता, पृ.३३.

४) उपरोक्त, शर्मा एम.पी., पृ.६८

५) छाबरा जी.एस., ॲडव्हान्सड स्टडी इन दी हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, खंड-२, ओमप्रकाशन, दिल्ली, १९६८, पृ.१४९.

6) Hart William, Introduction to the law of local government and Administration, Routledge and kegan paul L.t.d. Pub. London, 1921, page, 19.

७) कित्ता, पृ.२०

८) उपरोक्त, सचदेव डी.आर,पृ.४३.

९) कित्ता,पृ.४४.

10) Bhattacharya Mohit, State directorates of Municipal administration, the Indian Instutite of Public Pub. Delhi. 1969, Page.4.

११) कित्ता, ५.

१२) Avasti A, Municipal Administration in India, Lakshmi Maryan Press, Agra, १९७२, Page,२२४.

१३) उपरोक्त, Bhattachary Motit., पृ.8

१४) कित्ता, ९.

15) venkatarngaiya M, Local Government In India, Allied Pub. Londan, 1969, Page. 11.

१६) कित्ता, १३

१७) उपरोक्त, Hart William, पृ.20.

18) Sen S.N., Administrative system of India, CAlcutta Press, 1925, Page, 124

१९) कित्ता, १२५.

२०) उपरोक्त venkatarngaiya M, पृ.48.

21) Government of Maharashtra, REport of the Committee of Unification Pub. Delhi, 1974. page, 62.

२२) कित्ता, ६३.

23) उपरोक्त Sen S.N., पृ.168.

२४) रामचंद्र एस.सी., डिस्ट्री ऑफ इंडिया मॉडर्न इंडिया, ओरियंट प्रकाशन, १९८०, पृ. २२०.

२५) उपरोक्त, Sen S.H., page, 168.

२६) कित्ता, पृ.१६९.

२७) मंगळवेढा नगरपरिषद वार्षिक अहवाल, सन १९९०-९५, पृ.३०

२८) कित्ता, ३१.

२९) मंगळवेढा नगरपरिषद वार्षिक अहवाल, सन १९८५, पृ.९०.

३०) कित्ता, ४०.

३१) दि सोलापूर गॅझेट, १९३५, पृ.३४८

३२) कित्ता, ३४९.

३३) मंगळवेढा नगरपरिषद वार्षिक अंदाजपत्रक, १९९५, पृ.८८.

३४) कित्ता, ८९.

३५) मंगळवेढा नगरपरिषद वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन २०००-२००५, पृ.१९९.

३६) कित्ता, २००

३७) कित्ता, २०१

३८) मंगळवेढा नगरपरिषद रेकॉर्ड डयुटी फाईल, सन २००५-२०१०, पृ.१२८.

३९) कित्ता, १२९.

४०) मंगळवेढा नगरपरिषद शाळांचे दप्तर, सन १९६०-१९७५, पृ.३२८.

४१) मंगळवेढा नगरपरिषद शाळांचे दप्तर, सन २०००-२०१०, पृ.१३९.

४२) मंगळवेढा नगरपरिषद वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन २००५-२०१०, पृ.१७२.

# प्रकरण चौथे

## मंगळवेढा नगरपालिकेचा राजकीय व सामाजिक इतिहास

**४.१ प्रास्ताविक**

**४.२ मंगळवेढा नगरपालिकेचा राजकीय इतिहास**

**४.३ मंगळवेढा नगरपालिकेतील नगराध्यक्ष व त्यांची कार्ये**

- ४.३.१ श्रीमंत हरिहरराव बापूसाहेब पटवर्धन १९४५ ते १९५५
- ४.३.२ विठ्ठल यशवंत ताड (१९५५-१९५८)
- ४.३.३ अनंत नारायण कुलकर्णी (ढवळसकर) सन १९५९ ते १९६०
- ४.३.४ लक्ष्मणरावजी नागणे १९६०-१९६५
- ४.३.५ आप्पा मोडक, ज्ञानोबा नागणे, शिवदास चिंचकर (१९६५ ते १९७०)
- ४.३.६ मा.रतनचंद शिवलाल शहा (१९७१-१९९० व २००१-२००६)
  - ४.३.६.१ रतनचंद शहा यांचा मंगळवेढा शहरातील आर्थिक हातभार
  - ४.३.६.२ शैक्षणिक विकास
  - ४.३.६.३ राजकीय कार्य
  - ४.३.६.४ समाजकारण
  - ४.३.६.५ धार्मिक कार्य
- ४.३.७ मा.युवराज कलुबर्मे (१९९१-९५)
- ४.३.८ मा.प्रकाश गायकवाड (१९९६-१९९७)
- ४.३.९ मा.सौ.ललिता महादेव माळी (१९९७-१९९८)
- ४.३.१० मा.बाबू गैबीसाो मकारनदार १९९९-२०००
- ४.३.११ मा.पांडुरंग विठ्ठल ताड (२००६)
- ४.३.१२ मा.महादेव आबा माळी (२००७-२००९)
- ४.३.१३ मा.अशोक गुराप्पा माळी २००९
- ४.३.१४ मा. भारत दादा नागणे (२००९-१०)

**४.४ मंगळवेढा नगरपालिकेचा सामाजिक इतिहास**

- ४.४.१ समाजरचना
- ४.४.२ ख्रिश्चन समाज रचना
- ४.४.३ मुस्लिम समाज
- ४.४.४ बौध्द
- ४.४.५ जैन
- ४.४.६ मारवाडी

४.४.७ हिंदू समाज रचना

४.४.७.१ ब्राम्हण

४.४.७.२ मराठा

४.४.७.३ कुंभार

४.४.७.४ ओतारी

४.४.७.५ कातकरी

४.४.७.६ कासार

४.४.७.७ कोष्टी

४.४.७.८ कोल्हाटी

४.४.७.९ कोळी

४.४.७.१० गवळी

४.४.७.११ गुरव

४.४.७.१२ गोंधळी

४.४.७.१३ गोसावी

४.४.७.१४ घिसाडी

४.४.७.१५ चांभार

४.४.७.१६ जंगम

४.४.७.१६ ठाकूर

४.४.७.१७ ढोर

४.४.७.१८ तेली

४.४.७.१९ धनगर

४.४.७.२० परीट

४.४.७.२१ पाथरवट

४.४.७.२१ बुरुड

४.४.७.२२ भोई

४.४.७.२३ माळी

४.४.७.२४ मांग

४.४.७.२५ लोहार

४.४.७.२६ वाणी

४.४.७.२७ सुतार

४.४.७.२८ न्हावी

४.४.७.२९ सोनार

४.४.७.३० महार

**४.५ मंगळवेढा शहरातील सांस्कृतीक जीवन**

४.५.१ पोशाख

४.५.२ अलंकार

४.५.३ भाषा

४.५.४ घरांची रचना

४.५.५ आहार

४.५.६ उपनयन (मुंज)

४.५.७ विवाह

४.५.८ स्त्री जीवन

**४.६ धार्मिक श्रध्दा व चालीरिती**

४.६.१ मुहूर्त

४.६.२ सण व उत्सव

४.६.३ मंगळवेढा शहरातील जातीय समानता

**४.७ समारोप**

## प्रकरण चौथे

# मंगळवेढा नगरपालिकेचा राजकीय व सामाजिक इतिहास

## ४.१ प्रास्ताविक

"न सा सभा यत्र न सन्ति वृद्धा
वृद्धा न ते ये न वदान्ति धर्मम्...
धमः स नो यत्र न सत्यमस्ति
सत्यं न तद्यच्छलमभ्युपैति"

नगराध्यक्ष व नगरसेवक यांनी सभागृहात खरे बोलावे, खोटे बोलू नये. म्हणजेच प्रत्येक सभागृह लोकशाहीचे मंदिर समजले पाहिजे. आणि सभागृहात बोलताना देवासमोर आपण जसे बोलतो तसे अंतःकरणापासून प्रामाणिकपणे बोलले पाहिजे. नागरिकांना कामकाजामधून चांगले समाधान देणे नगराध्यक्षांचे व नगरसेवकांचे पहिले कर्तव्य ठरते. त्यांनी सभागृहात नागरिकांचे प्रश्न मांडून चांगल्या कामांना प्राधान्य दिले पाहिजे. मंगळवेढ्यातील लोकांनी शहरांचा विकास होण्यासाठी या प्रतिनिधींना निवडून दिलेले असते. या प्रतिनिधींनी नगरपालिकेच्या विकासासाठी मोठा हातभार लावला आहे. या नगरपालिकेमध्ये १८७४ ते २०१० पर्यंत श्रीमंत बापूसाहेब पटवर्धन, आप्पासाहेब मोडक, लक्ष्मण नागणे, आप्पासाहेब ताड, ज्ञानोबा नागणे, अनंत कुलकर्णी, रतनचंद शिवलाल शहा, शिवदास चिंचकर, युवराज कलुबर्मे, प्रकाश गायकवाड, बाबुभाई मकानदार, ललिता माळी, महादेव उर्फ आबा माळी, पांडूरंग ताड, अशोक माळी, भारत नागणे, इत्यादी सोळा नगराध्यक्ष होऊन गेले. त्यांनी मंगळवेढ्याच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. त्यांचा राजकीय इतिहास व त्यांनी शहराच्या विकासासाठी केलेली कामे यांचा आढावा या प्रकरणात घेतला गेला आहे.

## ४.२ मंगळवेढा नगरपालिकेचा राजकीय इतिहास

मंगळवेढा नगरपालिकेचा राजकीय इतिहास पाहत असताना प्रथमतः मंगळवेढ्यातील सर्व नगराध्यक्षांच्या कार्यकाल व त्यांनी आपल्या कार्यकाळात केलेल्या कामांचा आढावा अगोदर घेणे गरजेचे ठरते. संस्थाने संयुक्त भारतात विलीन झाल्यानंतर मंगळवेढा संस्थान

सांगलीच्या संस्थानाचा भाग होते. भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मंगळवेढ्यास स्वतंत्र नगरपालिकेचा दर्जा देण्यात आला व मंगळवेढ्यात भारतीय लोकशाही संविधानाप्रमाणे निवडणूका घेऊन नगराध्यक्ष व नगरसेवकांची निवड होऊ लागली. नगरपालिकेचा राजकीय प्रवास चालू झाला. या सर्व नगराध्यक्षांचा कार्यकाल व कार्याचा उहापोह या प्रकरणात केला आहे. मंगळवेढा तालुक्याच्या नगरपालिकेचे पहिले नगराध्यक्ष श्रीमंत हरिहरराव पटवर्धन होते. त्यांच्या कार्यकालाचा व कार्याचा आढावा पुढील प्रमाणे,

## ४.३ मंगळवेढा नगरपालिकेतील नगराध्यक्ष व त्यांची कार्ये

### ४.३.१ श्रीमंत हरिहरराव बापूसाहेब पटवर्धन १९४५ ते १९५५

१९४५ ते १९५५ सांगली संस्थान असेम्बलीची मेंबर व मंगळवेढा नगरपालिकेचे पहिले नगराध्यक्ष होते. १९४५ रोजी लोकांतून निवडून आलेले पहिले नगराध्यक्ष होते. त्यांच्याकाळात नगरसेवक होते.

मंगळवेढ्यातील मुलांना शिक्षण घेता यावे शिक्षणाची गंगोत्री सामान्यजनतेच्या घरापर्यंत पोहोचावी म्हणून मंगळवेढ्यात इंग्लिशस्कूलची स्थापना केली. त्या स्कूलचे ते पहिले अध्यक्ष होते.

मागासवर्गीय लोकांना शिक्षण घेता यावे व मंगळवेढ्यात त्यांना राहता यावे म्हणून त्यांनी काकासाहेब बर्वे मागासवर्गीय वसतीगृह काढले व त्या वस्तीगृहामध्ये मंगळवेढ्यातील मागासवर्गय विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची मोफत व्यवस्था केली.

घरपट्टी आकारणी पूर्वी नगरसेवक ठरवत होते. त्यांचे अनेक वाडे होते ते नगराध्यक्ष असताना त्यांच्या वाड्यांची घरपट्टी ठरवण्याचे अधिकार नगरसेवकांना देत असे. नगरसेवक त्यांच्या घरांची घरपट्टी ठरवत असे.

संत दामाजी पुतळ्यापासून येणाऱ्या रस्त्याची मान्यता त्यांच्याकाळात मिळाली. सांगली बँकेचे ते डायरेक्टर असताना मंगळवेढ्यातील शेतकऱ्यांना व व्यावसायिकांना आर्थिक सहाय्य केले. त्यांच्या काळात कुळकायदा लागू झाल. 'कसेल त्याची जमीन' या कायद्याप्रमाणे आयत्या संस्थानातील १०००० एकर जमीन मंगळवेढ्यातील कुळांच्या (लोकांच्या) नावावर केली, त्याचे

कुळातील काही लोक शिक्षण घेऊ लागले व त्यामुळे ते नोकरीला लागू लागले. उदा.त्र्यंबकराव कोंडूभैरी कूळाचा मुलगा त्यांच्या बापाच्या नावार कुळ कायद्याप्रमाणे जमीन केली. त्यामुळे त्यांना शिक्षण घेता आले व ते शिक्षक बनले.

पटवर्धन हे तत्वनिष्ठ होते. त्यांनी कधीही आपला शब्द बदलला नाही, त्यांनी मा.बर्क या इंग्रज अधिकाऱ्यामार्फत मंगळवेढ्यात मोठ्याप्रमाणात सुधारणा केल्या. त्यांनी शाळा व दवाखाना मंगळवढ्यात काढला. सिना आप्पा कुंभारे त्यांच्या काळात चिपऑफिसर होते. ते नगराध्यक्ष असताना मंगळवेढ्यात घोडागाडीतून फेरफटका मारीत असत. त्यांच्याकडे माणूसकीची जाणीव ही मोठ्याप्रमाणात होती. सामान्य नागरिकांच्या अडीअडचणी ते सोडवित असत. त्यांनी सदैव गोरगरीबांच्या अडीअडचणी सोडविल्या होत्या.[१]

## ४.३.२ विठ्ठल यशवंत ताड (१९५५-१९५८)

सन १९५५ साली नगरपालिकेची निवडणूक झाली. त्यामध्ये विठ्ठल यशवंत ताड, यादव फडतरे, अजिज आकुंजी व शिवगंगा होनराव यांना लोकप्रतिनिधी नगरसेवक म्हणून निवडून देण्यात आले. नगराध्यक्ष पदासाठी विठ्ठल यशवंत ताड व अनंत कुलकर्णी या दोघांमध्ये नगराध्यक्ष पदासाठी मतदान घेण्यात आले. त्या मतदानामध्ये दोघांनाही समान मते मिळाली. त्यामुळे योग्य निर्णय घेण्याच्या उद्देशाने नगराध्यक्षपदासाठी चिठ्ठी टाकण्याचा विचार पुढे आला. दोघांच्या नावाच्या चिट्टया तयार केल्या व लहान मुलगा ज्ञानेश्वर धोंडिबा जाधव याला उचलण्यास सांगितले. दोन पैकी एक चिठ्ठी उचलली. त्यामध्ये विठ्ठल यशवंत ताड यांचे नाव नगराध्यक्ष पदासाठी निघाले. ते मंगळवेढा नगरपालिकेचे दुसरे नगराध्यक्ष झाले.[२]

पदभार स्वीकारल्यानंतर नगराध्यक्ष म्हणून कार्य करताना त्यांच्या कार्याचा आढावा पुढील प्रमाणे होता.

### कार्य

१) मंगळवेढ्याचे प्रसिध्द संत 'संत चोखामेळा' यांची समाधी चौकात बांधण्यासाठी परवानगीचा ठराव करून मंजूर करून घेतला व संत चोखामेळाची समाधी चौकात बांधली.

२) गैबीपिरसाहेब येथे नगरपालिकेच्या वतीने ४/२/१९५७ रोजी विहिर खोदली त्यावेळी सार्वजनिक विहीरीचे उद्‌घाटन सोलापूर जिल्ह्याचे कलेक्टर मे.एस.एन.सप्रेसाहेब यांच्या हस्ते झाले. त्यावेळी या उद्‌घाटनाचे अध्यक्ष नगरपालिकेचे अध्यक्ष श्री विठ्ठल यशवंत ताड होते.

३) इंग्लिश स्कूल मंगळवेढा येथे पूर्वी ब्राम्हण समाजाची स्मशान भूमी होती व ही जागा त्यांनी इंग्लिश स्कूल मंगळवेढा या संस्थेला मिळवून दिली. तेथे त्यांनी व कदम गुरुजींनी इमारती बांधल्या नंतर ते इंग्लिशस्कूल मंगळवेढा या संस्थेचे उपाध्यक्ष होते.

४) मंगळवेढा शहरातील रस्त्यांचे खडीकरण केले.[२]

## ४.३.३ अनंत नारायण कुलकर्णी (ढवळसकर) सन १९५९ ते १९६०

मंगळवेढयाचे तिसरे नगराध्यक्ष म्हणून अनंत नारायण कुलकर्णी १९५९ ते १९६० पर्यंत काम पाहत होते. त्यांनी आपल्या अल्प कारकीर्दित बरीचशी कामे केली. त्यांच्या कार्याचा आढावा पुढील प्रमाणे,

### कार्य

१) छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर १५/८/१९५९ साली भाजीमंडईची स्थापना केली. या भाजीमंडईचे उद्‌घाटन समारंभाचे अध्यक्ष त्यावेळचे उपनगराध्यक्ष सोपान हरी दत्तू होते. प्रमुख पाहूणे नगराध्यक्ष श्री अनंत नारायण कुलकर्णी होते व याचे बांधकाम दा.श.करमरकर यांनी पूर्ण केले. ही मंगळवेढ्यातील पहिली भाजीमंडई होय.

२) त्यांच्या काळातच मंगळवेढ्याच्या पूर्वेला स्मशानभूमी होती. या स्मशानभूमी मध्ये दहन करण्यासाठी अनेक अडचणी येत होत्या. ऊन वारा पाऊस यासारख्या परिस्थितीमध्ये एक निवाऱ्याची आवश्यकता होती. म्हणून त्यांनी स्मशानभूमीमध्ये पत्राशेड बांधले.

३) शहरातील अनेक गल्लीबोळातील रस्ते रहदारीसाठी अत्यंत वाईट अवस्थेत होते. त्यांनी आपल्या कार्यकालात प्रत्येक रस्त्याचे खडीकरण केले. रस्त्यांसाठी लागणारी खडी टाकण्यासाठी बैलगाडीचा वापर करून खडी अंथरली. तसेच ती खडी दगडाच्या रोलरच्या सहाय्याने चोपून घेतले. त्यामुळे रस्ते सुसह्य झाले.

४) त्याकाळी मंगळवेढा नगरीमध्ये वीजेची सोय नव्हती. सूर्य मावळताच अंधाराचे साम्राज्य पसरत होते. नागरिकांना प्रकाशाची सोय व्हावी. यासाठी त्यांनी प्रत्येक चौकात बत्त्यांची सोय करून प्रकाशाची व्यवस्था केली.

५) निवडणूकीसाठी येणाऱ्या खर्चाचा विचार करता त्यांनी त्याकाळी निवडणूकीमध्ये ३ रुपये ५० पैसे चहापाण्यासाठी खर्च केला.

६) निवडणूकीचा प्रचार सायकलवरून ध्वनी प्रक्षेपक लावून केला जात असे.[३]

## ४.३.४ लक्ष्मणरावजी नागणे १९६०-१९६५

१९६० मध्ये मंगळवेढा नगरपालिकेच्या निवडणूकीमध्ये नगराध्यक्ष म्हणून लक्ष्मणरावजी नागणे यांची निवड झाली. त्यांची निवड झाल्यानंतर त्यांच्या कार्यकालामध्ये नगरसेवकांची खालील प्रमाणे वर्णी होती.

| नगराध्यक्ष | नगरसेवक |
|---|---|
| लक्ष्मणरावजी नागणे | सौ.शशिकला महादेव गोखले |
| | पांडुरंग होनमाने |
| | शांताराम किल्लेदार |
| | आप्पा मुढे |
| | किसन रामचंद्र मर्दा |
| | बाळकृष्ण गोपीलाल मर्दा |
| | मलकाप्पा खंडू शेळके |
| | आप्पा मोडक |
| | दिनानाथ डोंगरजी जोशी |
| | एकनाथ जगताप |
| | भगवान द्वारकाप्पा गवळी |
| | अंबादास नागणे |
| | अजीत काशी आकुंजी |
| | मनोहर बसलिंग स्वामी |
| | रतनचंद शिवलाल शहा |
| | प्रभावती रतनचंद शहा |

नगराध्यक्ष म्हणून १९६० पासून ते १९६५ पर्यंत त्यांनी नगराध्यक्ष पद सांभाळले. याकाळात त्यांनी शहरातील जनतेसाठी बरीचशी कामे केली. तसेच त्यांनी दूरगामी योजना राबविल्या. ज्या आजतागायत सुरु आहेत. त्या पुढील प्रमाणे-

**कार्य**

१) पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण केले

२) मंगळवेढा शहरातील मार्केट यार्डला १८ एकर जमीन दिली

३) शनिवारपेठ ते दामाजी पंत या रस्त्याचे डांबरीकरण केले

४) नगरपालिकेला मैला वाहण्यासाठी पहिल्यांदा ट्रॅक्टर खरेदी केला

५) शहरात हॅलोजन दिवे बसविले

६) पंढरपूर - मंगळवेढा रस्ता तयार केला

७) रामलिंग मुदगूल यांनी रस्त्याचे डांबरीकरण केले.[४]

## ४.३.५ आप्पा मोडक, ज्ञानोबा नागणे, शिवदास चिंचकर (१९६५ ते १९७०)

या पाच वर्षाच्या काळात नगरीस अनेक नगराध्यक्षांनी आपले योगदान दिले. त्यामध्ये आप्पा मोडक, ज्ञानोबा सत्याप्पा नागणे, शिवदास चिंचकर यांचा समावेश होता. नगरसेवकांच्या निवडीमध्ये फारसे बदल नव्हते. त्यांच्या कार्याची ती पोहोचच होती. १९६५ ते १९६७ या दोन वर्षाच्या काळासाठी आप्पासाहेब मोडक नगराध्यक्ष म्हणून कार्य करीत होते. तर १९६७ ते १९६८ या काळात ज्ञानोबा नागणे नगराध्यक्ष म्हणून काम करीत होते. तसेच १९६९ ते ७० या अल्प काळासाठी शिवदास चिंचकर यांची वर्णी लागली होती.

**नगरपालिका १९६५-१९७०**

| नगराध्यक्ष | नगरसेवक | मुख्याधिकारी |
|---|---|---|
| १९६५-६७ आप्पा मोडक | दशरथ सांवजी | श्री.विठ्ठल व्यंकटेश आवताडे |
| १९६७-६८ ज्ञानोबा सत्याप्पा नागणे | मनोहर कलुबर्मे | |
| १९६९-७० शिवादास चिंचकर | महादेव गाडे | |
| | बाळ मर्दा | |
| | पांडूरंग होनमाने | |
| | शिवदास चिंचकर | |
| | दिनानाथ जोशी | |
| | आप्पा मोडक | |
| | अंबादास तानगावडे | |
| | सौ.शालिनी किल्लेदार | |
| | संघाआप्पा | |
| | भगवान सांवजी | |
| | आबा मुढे | |
| | सौ.सांवजी | |
| | दगडू शिंदे | |

या सर्व नगराध्यक्ष व नगरसेवकांनी आपल्या शहराचा विकास करण्यासाठी विविध योजना व कामे पूर्ण केली. त्यामध्ये पाणीपुरवठ्याचा उल्लेख हा विशेषरित्या करावा लागेल.

## १) १९६५-६७ आप्पा मोडक

## कार्य:

१९६८ साली मंगळवेढयापासून १५ किमी अंतरावर उचेठाण येथे भीमानदीत विहिर खोदून पाईपलाईनद्वारे मंगळवेढ्याला पाणीपुरवठा योजना सुरु केली. या योजनेला रुपये ३२ लाख इतका खर्च आला. तसेच ३ लाख लिटर पाण्याची साठवण क्षमता असलेली मंगळवेढ्यातील पहिली पाण्याची टाकी बांधली. तिला बांधण्यासाठी ३०००० रुपये खर्च आला.[६]

१. १९७१ ला महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. मंगळवेढयातही हा दुष्काळ मोठ्या प्रमाणात होता.सर्व विहिरींचे पाणी जवळपास संपुष्टात आले. पाण्याची पातळी खाली गेली

होती. अशा वेळी त्यांनी मंगळवेढ्यातील सर्व विहिरींचा गाळ काढला. मंगळवेढा नगरपालिकेतील लोकांची तहान भागवली.

२. एवढेच नव्हे तर दुष्काळाच्या वेळी २५ पोती धान्य गोरगरीब लोकांना वाटले. लोकांची भूक भागविली.

३. काशिविश्वेश्वराच्या मंदिराचा जिर्णोध्दार केला.

४. त्याकाळी मंगळवेढ्यातील लोकांना टँकरने पाणीपुरवठा केला.

५. महाराष्ट्राचे चिफइंजिनिअर मा.लागूसाहेब यांनी उचेटाणपासून मंगळवेढ्यापर्यंत केलेल्या बिड धातूच्या पाईपलाईची पाहणी केली.

६. पूर्वी खाजगी जकातनाके होते. त्या जकात नाक्यावर कामगार व्यवस्थित काम करतात का? याची रात्री अपरात्री पाहणी करीत होते.

७. कामगारांना शिस्त लावली होती.

८. त्याकाळी महिलांचा आजार मोठ्या प्रमाणावर वाढला होता. या महिलांचा आजार बरा व्हावा यासाठी महिला आरोग्य शिबीर घेतले होते.

९. दुष्काळाच्या वेळी अनेक लोकांना कामे दिली.

तसेच मंगळवेढा नगरपालिकेस अनेक मान्यवरांनी आवर्जून भेटी दिल्या होत्या. त्या पुढील प्रमाणे,

**मान्यवरांच्या भेटी**

महाराष्ट्र शासनाचे चिफ इंजिनिअर मा. लागू साहेब, शिवाजी भोसले, मा.सुधाकरपंत परिचारक, गणपतरावजी देशमुख, पन्नालाल खुराणा, एस.एम पाटील(भैय्या).[५]

## २) ज्ञानोबा नागणे १९६७-६८ व १९७०-७१

## शिवदास चिंचकर (१९६८-६९)

नगरपालिकेची १९६७-६८ साली निवडणूक झाली. त्यामध्ये शिवदास चिंचकर उपनगराध्यक्ष म्हणून निवडले गेले. त्यानंतर १९६९-७० साली ते मंगळवेढ्याचे नगराध्यक्ष झाले. त्यांनी केलेले कार्य पुढील प्रमाणे,

१. उचेठाण येथे पाणीपुरवठा योजनेसाठी दोन एकर जागा खरेदी केली. त्याला १६ हजार रुपये खर्च आला. तेथे पाणीपुरवठा योजनेचे भूमीपुजन केले.
२. पाण्याची टाकी बांधण्यासाठी जागेची व प्राकृतीक घटकांची अडचण येत होती. तसेच त्यांच्या म्हणण्यानुसार पाण्याची टाकी इंग्लिश स्कूलच्या मैदानात व्हायला हवी होती. परंतू याला कदम गुरुजींनी विरोध दर्शविला होता. शेवटी पंचायत समितीचे सभापती भुजंगराव पाटील यांनी पंचायत समितीच्या कडेला पाण्याच्या टाकीसाठी जागा दिली. त्यामुळे त्या ठिकाणी पाण्याची टाकी उभी करण्यात आली.
३. मंगळवेढा शहरामध्ये रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण त्यांच्या काळातच झाले. या कामासाठी हरीभाई काझी अधिकारी नेमले. त्यांच्यामार्फत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करून घेतले.
४. मंगळवेढ्यामध्ये सांडपाण्याचा निचरा व्हावा या उद्देशाने त्यांनी श्री मारुती यादव यांच्या मार्फत गटारीचे काम करून घेतले.[८]

## ४.३.६ मा.रतनचंद शिवलाल शहा (१९७१-१९९० व २००१-२००६)

श्री संत दामाजीपंत, संत चोखामेळा, कान्होपात्रा, या संतांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या मंगळवेढ्याच्या मातीत अनेक कर्तृत्वसंपन्न व्यक्ती जन्माला आल्या व आपल्या व्यक्तीमत्वाचा आणि कर्तुत्वाचा ठसा लोकमनात उमटविला. अशा पवित्र मातीतच श्री रतनचंदशहा यांचा जन्म झाला. महाराष्ट्रातील अधिक काळ नगराध्यक्ष पद भूषविलेले नगराध्यक्ष म्हणून मान मिळविला. त्यांनी नगरपालिकेची मोठ्याप्रमाणात कामे केली.

**१) वीज**

मंगळवेढ्यात वीजेची सोय नव्हती. चौकाचौकात तेलाचे दिवे लवले जायचे. काही ठिकाणी बत्त्या होत्या. रतनचंद शहा यांनी त्यांच्या काळात ३० पॉवरहाऊसचे तीन इंजिन जनरेटर खरेदी करून नगरीमध्ये वीजेची व्यवस्था केली. मंगळवेढ्यात वीजेची सोय करणारे ते पहिले नगराध्यक्ष होते.

**२) भुयारी बंदीस्त गटार योजना**

मंगळवेढा शहर खोलगट भागी वसलेले आहे. तेथील गटारीमार्फत सांडपाणी वाहून नेण्यासाठी गटार योजना सुरु करुन प्रत्येक गल्लीमध्ये सांडपाणी वाहून नेण्यासाठी गटारी बांधल्या. बंदीस्त गटार योजना राबविली. आज मंगळवेढा नगरपालिकेमध्ये भुयारी गटारी आहेत. या गटारीचे सांडपाणी एकत्र आणून शेतकऱ्यांसाठी काही पैशाच्या स्वरुपात मोबदला घेऊन दिले जाते. सर्वात जास्त बंदिस्त भुयारी गटारी त्यांच्याच काळात झाल्या.

**३) गणेशबाग**

मंगळवेढा नगरीमध्ये पर्यावरणाचे संरक्षण व्हावे, हवा शुद्ध रहावी, लहान बालकांना व थोरा मोठ्यांना आपला वेळ मनोरंजनातून घालवता यावा यासाठी गणेश बाग बांधली. या बागेत अनेक वृक्षांची लागवड करण्यात आली. लॉन लावण्यात आले. कारंजे, खेळणी यासारख्या सोयी करण्यात आल्या. या बागेमध्ये वाढदिवस, धार्मिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होतात.

**४) नाट्यगृहः**

मंगळवेढा ही कलाकारांची नगरी आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायक मा.श्री.प्रल्हाद शिंदे, आनंद शिंदे, मिलींद शिंदे मंगळवेढा नगरीतूनच जन्माला आले. या महान गायकांनी मंगळवेढ्याचे नाव आपल्या गाण्यामार्फत संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध केले. अशा प्रकारचे गायक, कलाकार मंगळवेढा नगरीमध्ये तयार व्हावेत या उद्देशाने प्रेरीत होऊन रतनचंद शहा यांनी नाट्यगृहाची सोय केली.

**५) शॉपिंग सेंटरः**

अनेक शॉपिंग सेंटरची बांधकाम शहांच्या (शेटजींच्या) काळात पूर्ण झाली. मंगळवेढा नगरीतील लोकांना व्यवसाय सुव्यवस्थितरित्या करता यावा याकरीता संत चोखामेळा शॉपिंग सेंटर, संत कान्होपात्रा शॉपिंग सेंटर, संत दामाजी शॉपिंग सेंटर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर, महात्मा फुले शॉपिंग सेंटर, गैबीपीर शॉपिंग सेंटर, आण्णाभाऊ साठे शॉपिंग सेंटर, छत्रपती शिवाजी महाराज शॉपिंग सेंटर इत्यादी शॉपिंग सेंटरची बांधकामे केली.

**६) शुद्ध पाण्याची सोय**

भीमा नदीच्या पात्रात उचेठाण येथून आणलेले पाणी शुद्ध करण्यासाठी मंगळवेढयापासून ६ मैल अंतरावर शुद्धीकरण केंद्र तयार करून गावातील लोकांना पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय करून दिली. त्यामुळे आजाराचे प्रमाण कमी झाले.

**७) रस्त्यांची कामे**

मंगळवेढा नगरीमध्ये जेवढे प्रमुख उपरस्ते आहेत. पहिल्यांदा कच्चे रस्ते बांधले. त्यावर मुरुम टाकला व त्यानंतर त्या रस्त्यांचे डांबरीकरण केले. त्यांचे महत्त्वाचे कार्य आहे. आमदार फंडातून अनेक रस्त्यांची कामे पूर्ण केली. त्यांचे डांबरीकरण केले.

**८) शाळेसाठी जागा**

नागणेवाडी येथील जागेचे आरक्षण उठवून ती जागा प्राथमिक शाळेला दिली. तेथे नगरपालिके मार्फत इमारत बांधली. तिथे आता नगरपालिकेची चार नंबर शाळा भरते. तेथील बहुजन समाजाच्या व साठेनगरमधील मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय झाली आहे.

**९) पिण्याच्या पाण्याची सुविधा**

सुतारगल्ली येथील मुस्लिम बांधवांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून नागणेवाडीतील पिण्याच्या पाण्याच्या टाकीपासून तीन इंच पी.व्ही.सी. पाईपलाईन टाकून पाण्याची व्यवस्था केली.

**१०) बोअरवेल्स**

मंगळवेढा नगरपालिका हद्दीत पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात होत असे. उजनीतून शासनाने पाणी चंद्रभागेत सोडले तर ते बंधाऱ्यात येत असे. ते काही काळ टिकत असे. त्यामुळे पाणीटंचाई मंगळवेढ्यामध्ये मोठयाप्रमाणात निर्माण होत असे. शेठजींच्या काळात प्रत्येक गल्लीत बोअर घेऊन त्यावर सबमर्सीबल मोटर, हातपंप बसवून टाक्या बांधून घेतल्या. त्यामुळे पाण्याची व्यवस्था झाली.

**११) लोकसेवा केंद्र सुरु केले**

ग्रामीण भागातील विद्यार्थी पदवीधर झाल्यानंतर त्यांना MPSC व UPSC चा अभ्यास करता यावा यासाठी नगरपालिकेजवळ लोकसेवा केंद्र सुरु केले. त्यामुळे बहुजन समाजाची मुले प्रशासकीय अधिकारी झाली.

**१२) घनकचऱ्याची व्यवस्था**

मंगळवेढा नगरी स्वच्छ रहावी, केरकचरा, घनकचरा, कुठेही टाकू नये म्हणून चौकाचौकात कचरापेट्या ठेवण्यात आल्या. त्यातील कचरा उचलून मंगळवेढ्यापासून ६ मैलावर गावाच्याबाहेर घेतलेल्या जमीनीवर टाकला जाण्याची व्यवस्था केली. तो तेथे जाळून टाकला जात असे.

**१३) वृक्षारोपण**

मंगळवेढा गावामध्ये चांगली स्वच्छ हवा रहावी. म्हणून जिथे तिथे नगरपालिकेचे आरक्षण आहे त्या-त्या ठिकाणी वृक्षारोपण केले.

**१४) कृष्णतलाव**

कृष्णतलाव हा प्राचीन तलाव आहे. या तलावामध्ये उजनीचे कॅनलमार्फत पाणी सोडले तर मंगळवेढ्याच्या पाण्याचा प्रश्न मिटेल या विचाराने शासन दरबारी आपले कर्तृत्वबल वापरून उजनीचे पाणी कॅनलमध्ये सोडण्याची परवानगी मिळविली. त्यामुळे आज मंगळवेढ्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला असल्याचे दिसून येते.

तसेच कुंभार तळ्यामध्ये क्रीडासंकुल व्हावे यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला.

**१५) नवीन नगरपालिका इमारतीचे बांधकाम**

कोर्टासमोर भव्य दिव्य अशी इमारत रतनचंदशहा यांच्यामुळेच पूर्ण झाली. या इमारतीच्या उद्घाटनाला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा राजा व भारताचे कृषिमंत्री मा.शरदचंद्रजी पवार साहेब महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.आर.आर.पाटील, मा.विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.[७]

### ४.३.६.१ रतनचंद शहा यांचा मंगळवेढा शहरातील आर्थिक हातभार

**१) आडत व्यापारी**

सुरुवातीला मंगळवेढ्यामध्ये त्यांचा आडत व्यापार होता. मंगळवेढ्यात ज्वारी मोठ्या प्रमाणात पिकते. त्या ज्वारीला शहा यांच्या आडतीत चांगला भाव मिळत असे. गहू, ज्वारी, करडई, मका, सूर्यफूल इत्यादीचा व्यापार या अडतीवरून चालत असे. मंगळवेढ्यातील एक महत्त्वाचा आडत व्यापारी म्हणून त्यांचे नाव होते.

**२) मंगळवेढा अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना**

मंगळवेढ्यातील जनतेला आपल्या बरोबर घेऊन सन १९६२ साली या बँकेची स्थापना केली. या बँकेमार्फत शेटजींनी जे का रंजले गांजले अशा शेतकऱ्यांना शेतीमध्ये विहीर खोदण्यासाठी, पाईपलाईनसाठी, शेतीऔजारे घेण्यासाठी कर्जे दिली. तसेच बँकेमार्फत उद्योगधंद्यासाठीसुध्दा लोकांना त्यांनी मोठ्याप्रमाणात कर्ज वाटप केले. आज या बँकेच्या सांगोला, पंढरपूर, जवळा, नातेपुते, टेंभुर्णी, माळशिरस, इत्यादी ठिकाणी शाखा आहेत. हिच पश्चिम महाराष्ट्रातील एक महत्त्वाची बँक म्हणून गौरवली गेली आहे. शिखर बँकेच्यावतीने पश्चिम महाराष्ट्रातील उत्कृष्ठ बँक म्हणून पुरस्कृत केले आहे. आज या बँकेच्या ठेवी २५० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहेत.

**३) संत दामाजी सहकारी साखर कारखान्याची उभारणी**

उजनी धरण सोलापूर जिल्ह्याच्या आर्थिक कायापालट करणारे ठरले आहे. त्याचे पाणी भीमानदीपासून व कॅनलमार्फत मंगळवेढ्याच्या शेतीला मिळू लागले. ऊसाची शेती फुलू लागली. त्यांनी मंगळवेढ्यात मा.पवार साहेबांकडून साखर कारखाना मंजूर करून घेतला. त्या कारखान्याचे व्हाईस चेअरमन पद घेतले. कारखान्यातून साखर निर्मिती सुरु होईपर्यंत त्यांनी कोणत्याही प्रकारचा सत्कार स्वीकारला नाही.[८]

**४) शाहू, फुले, आंबेडकर मागासवर्गीय महिला सुतगिरणीचे चेअरमन**

या सुत गिरणीचे चेअरमन शेठजी असताना गरीबांच्या घरामध्ये चुली कशा पेटतील याचा विचार त्यांनी केला. मंगळवेढ्यातील अनेक महिलांना त्यांनी सुतगीरणीमध्ये रोजगार मिळवून दिल्या. मंगळवेढ्याचे राजकारण पाहत असताना अर्थकारण मोठ्याप्रमाणात पाहिले.

## ४.३.६.२ शैक्षणिक विकास

मंगळवेढा तालुका आर्थिकदृष्ट्या मागास आहे. मंगळवेढ्यातील बहूजनांची व अस्पृश्यांची मुले व मुली शिकल्या पाहिजेत. कर्मवीर भाऊराव पाटील म्हणतात, "शिक्षणाची ज्ञानगंगा बहूजन समाजाच्या घरापर्यंत पोहचली पाहिजे." ही ज्ञानगंगा बहूजनांपर्यंत पोहचविण्याचे कार्य शहांनी केले. 'मंगळवेढा एज्युकेशन संस्थेची' स्थापना केली. पण या संस्थेचे महाविद्यालय बंद पडले म्हणून त्यांनी 'श्री विद्या विकास मंडळ' या संस्थेची स्थापना केली.

### १) श्री विद्या विकास मंडळ

या संस्थेची सन १९७८ मध्ये स्थापना केली. या संस्थेमार्फत बहूजन समाजातील मुलामुलींना उच्चशिक्षण घेता यावे म्हणून श्री संत दामाजी महाविद्यालयाची स्थापना केली. तालुक्यातील उच्च शिक्षण देणारे हे एकमेव महाविद्यालय आहे. या महाविद्यालयामार्फत कनिष्ठ, कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात कला व वाणिज्य या शाखा चालविण्यात येतात. गरीब घरातील मुला-मुलींनाही शिक्षण घेता येऊ लागले. ही मुलेसुद्धा डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, वकिल, प्रशासकिय अधिकारी बनू लागली. प्रथमतः महाविद्यालय नगरपालिकेच्या इमारतीत चालत होते. पण नगरपालिका विरोधीगटाकडे गेल्यानंतर महाविद्यालय तेथून बाहेर काढण्यात आले. नंतर सरकारकडे विनंती करून त्यांनी सात एकर सरकारी जागा मिळविली व त्या जागेवर ५० लाख रुपयांची इमारत रतनचंदशहा यांनी बांधली. या महाविद्यालयात गुणवंत व हुशार शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली.

### २) जवाहरलाल शेती हायस्कूलची स्थापना

मंगळवेढ्यातील मुलांना प्राथमिक शिक्षणानंतर ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण घेता यावे म्हणून या हायस्कूलची स्थापना करण्यात आली.

### ३) दामाजी हायस्कूलची स्थापना

प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलामुलींचे प्रमाण वाढले म्हणून त्यांनी दामाजी हायस्कूलची स्थापना केली व एस.टी.स्टँडच्या पाठीमागे पाच एकराच्या परिसरात सध्या हे हायस्कुल भरत आहे.[१]

### ४.३.६.३ राजकीय कार्य

राजकारण व समाजकारण या दोन्ही गोष्टीमध्ये ते पारंगत होते. परंतु आमदार खासदार होणे त्यांना जमले नाही. परंतु मंगळवेढ्याचे राजकारण त्यांच्या घरातून चालत होते. त्यांनी आपल्या पक्षाचे सर्व नगरसेवक निवडून आणले. ते मते मागण्यासाठी कोणाच्याही घरी जात नव्हते. उलट त्यांच्याकडे लोकांची वर्णी मोठ्या प्रमाणात लागत होती. मंगळवेढ्यातील आजपर्यंत जे आमदार, खासदार, मंत्री झाले त्या सर्वांना मा.शहांचा पाठींबा होता. मा.प्रा.लक्ष्मणराव ढोबळे शहांच्या पाठींब्यामुळेच २० वर्षे मंगळवेढ्याचे आमदार होऊन त्यांनी शिक्षणमंत्री, पालक मंत्री ही पदे भुषवली. पण जेव्हा प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांचा विरोध वाढू लागला तेव्हा त्यांना आपले आमदार पद गमवावे लागले. मा.सुशिलकुमार शिंदे, मा.प्रतापसिंह मोहिते, मा.लिंगराज वल्याळ, मा.सुभाष देशमुख रतनचंद शहांमुळेच खासदार झाले. मा.डॉ.साळे शहा यांच्या पाठींब्यामुळेच मंगळवेढ्याचे आमदार होऊ शकले.

राजकारणात त्यांनी मा.पवारसाहेब यांची साथ कधी सोडली नाही. मंगळवेढ्यातील त्यांचा वाडा म्हणजे राजकारणी लोकांचे माहेरघर होते. या वाड्याला मा.याशवंतराव चव्हाण, मा.वसंतदादा, मा.शरदचंद्रजी पवार, सुशिलकुमार शिंदे, विजयसिंह मोहिते-पाटील, मा.प्रतापसिंह मोहिते-पाटील, मा.आरआर.पाटील, मा.छगनराव भूजबळ, मा.रामदास आठवले इत्यादींनी भेटी दिल्या. शहा यांच्यामध्ये आमदारांचे नामदार बनवण्याची किमया होती. राजकारणात स्वत:साठी त्यांनी काहीही मागितले नाही. म्हणून त्यांच्याकार्याचा गौरव करताना महाराष्ट्राचा प्रतिष्ठीत 'जैन सहयोग' पुरस्कार, राज्याचे तत्कालीन कृषीमंत्री मा.हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने त्यांना 'दलित मित्र' पुरस्कार देवून गौरविले होते. तर विद्या विकास मंडळाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार देऊन गौरविले आहे. त्याच बरोबर शारदा प्रतिष्ठान सोलापूर यांनीही शदरनिष्ठ पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. नगरपालिका शिक्षण मंडळानेही रौप्यमहोत्सवी वर्षात सन्मानचिन्ह देऊन गौरविले आहे. शेठजींनी उभ्या केलेल्या अर्बन बँकेलाही शिखर बँकेच्यावतीने 'पश्चिम महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट बँक' म्हणून पुरस्कारीत केले आहे. ही त्यांच्या विविध कार्याची पोहच म्हणावी लागेल.[१०]

### ४.३.६.४ समाजकारण

मा.शहांनी राजकारण करण्यापेक्षा मंगळवेढ्यामध्ये समाजाच्या हिताचे कार्य मोठ्या प्रमाणात केले. गरीब लोकांच्या घरात चुली कशा पेटतील त्यांना सुखाचे चार घास खाता यावेत यासाठी प्रयत्न केले. ओक लोकांना आर्थिक मदत करून स्वावलंबी बनवीले. शेतकऱ्यांना शेतीसाठी बँकेमार्फत आर्थिक मदत केली. गरीबांच्या मुलामुलींच्या विवाहात ते भाग घेत होते. विधवा स्त्रीयांना बँकेमध्ये नोकरी देऊन त्यांच्या चरितार्थाचे साधन निर्माण केले. त्यांना स्वतःच्या पायावर उभे केले.

### ४.३.६.५ धार्मिक कार्य

मा.शहा जैनधर्मीय होते. जैनधर्माचे ते उपासक होते. त्यांच्या घराशेजारीच त्यांनी जैन धर्माचे मंदिर बांधले. जे उपासक येत असत, त्यांच्या सर्व राहण्या, जेवणाची व्यवस्था करून सेवा करीत असे. ते नगराध्यक्ष असताना त्यांनी नगरपालिकेमार्फत दामाजी महाराजांचा पुतळा उभारला.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा नगराध्यक्ष असतानाच उभारला. तहसीलकार्यालयासमोर शहा नगराध्यक्ष असतानाच राष्ट्रपिता महात्मा गांधी व घटना समितीचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर या थोर राष्ट्रपुरुषांचे पुतळे उभा केले. गैबीपीर व नवरात्र उत्सव या कार्यक्रमात हिरिरीने ते भाग घेत असत.[११]

## ४.३.७ युवराज कलुबर्मे (१९९१-९५)

| **नगराध्यक्ष** | **उपनगराध्यक्ष** | **नगरसेवक** | **मुख्याधिकारी** |
|---|---|---|---|
| युवराज कलुबर्मे | मुरलीधर दत्तु | मुरलीधर दत्तू | भामूरे मनोज शहा |
| | अभय बंडोपंत हजारे | सौ.माधुरी भरत भारकडे | |
| | बाबू गुलाब इनामदार | सौ.आबा घुले | |
| | आबा माळी | मनोहर शामराव सांवजी | |
| | | बापू गुलाम इनामदार | |
| | | तुकाराम गोविंद पवार | |
| | | मच्छिंद्र भिमराव कोंडूभैरी | |
| | | सौ.सतिश गाडे | |
| | | सुभाष कदम | |
| | | विजय सोमा खवतोडे | |
| | | दामोदर विठ्ठल सुरवसे | |
| | | सौ.सुरवसे | |
| | | सौ.लक्ष्मण हेंबाडे | |
| | | माळी | |
| | | बबन बाबुराव आवताडे | |
| | | आप्पासाहेब चोपडे | |

१) व्यापारी लोकांच्या अडचणी सोडविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळचे शॉपिंग सेंटर बांधले.

२) मंगळवेढ्यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी पहिल्यांदा बोअर पाडले व पाण्याची व्यवस्था केली.

३) मंगळवेढ्यामध्ये लोकसंख्या वाढल्यामुळे मित्रनगर येथे दुसरी पाण्याची टाकी बांधली. ही पाण्याची टाकी बांधण्यासाठी ५०,००० रुपये खर्च आला. ही पाण्याची टाकी ४० लाख लिटर क्षमतेची आहे.

४) साठेनगरमध्ये मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून प्राथमिक शाळेचे बांधकाम केले.

५) आठवडा बाजार भरविण्यासाठी तहसीलदार कचेरी जागा अपूरी पडत असल्याने शासनाकडून नवीन जागेवर आरक्षण मंजूर करून घेतले.[१२]

## ४.३.८ मा.प्रकाश गायकवाड (१९९६-१९९७)

श्री प्रकाश गायकवाड शेटजींच्या काळात नगराध्यक्ष होते. त्यांच्याकाळात मंगळवेढ्याच्या नगरपालिकेची कामे झाली आहेत.

१) दामाजी पंतांच्या पुतळ्यापासून शनिवारपेठेतील वडर गल्ली आणि बँक ऑफ इंडिया ते शिवप्रेमी चौका पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण त्यांच्या काळात झाले.

२) मा.शाहीर आण्णाभाऊ साठे शॉपींग सेंटर त्यांच्या काळात बांधले गेले.

३) कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी मंगळवेढ्यामध्ये कामगार कल्याण मंडळ आहे. त्या मंडळाला त्यांनीच ९९ वर्षाच्या कराराने जागा मिळवून दिली व तिचे कामगार कल्याण मंडळाची इमारत बांधली. आज त्याठिकाणी ग्रंथालय आहे. शिलाई मिशनसारखे महिलांना कुटीर उद्योग आहेत. या मंडळामार्फत कामगारांच्या गुणवंत विद्यार्थ्यांमार्फत सत्कार केला जातो व सांस्कृतीक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात केले जातात. राष्ट्रपुरुषांच्या जयंत्या व पुणतिथी त्या ठिकाणी साजऱ्या केल्या जातात. आजी व माजी कामगारानां एकत्र येण्याचे एकमेक ठिकाण कामगार कल्याण मंडळ आहे.

४) नगरपालिका शाळा नंबर ५ चे बांधकाम त्यांच्याकाळात पूर्ण झाले.

५) जलशुद्धिकरण प्रकल्प त्यांच्या काळातच पूर्ण झाला.

६) शनिवार पेठेतील स्त्री-पुरुष उघड्यावरती शौचालयाला बसू नयेत म्हणून त्याठिकाणी शौचालयांचे बांधकाम पूर्ण करून घेतले.

७) आठवडा बाजार पूर्वी तहसिल कार्यालयासमोर लहानशा जागेत भरत असे. तेथे व्यापाऱ्यांची व गिऱ्हाइकांची मोठी अडचण होत असे. म्हणून ते नगराध्यक्ष असताना आज ज्या दोन एकरात आठवडा बाजार भरतो ती जागा त्यांच्या काळात त्यांनी मिळवून दिली.[१३]

## ४.३.९ सौ.ललिता महादेव माळी (१९९७-१९९८)

१) मंगळवेढा नगरपालिकेमध्ये पहिला महिला नगराध्यक्ष होण्याचा बहुमान त्यांना मिळाला.

२) सहाव्या पे कमिशनचा फरक नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना दिला.

३) सनगर गल्लीमध्ये आमदार जावडेकर यांच्या फंडातून पाच लाखाची अभ्यासिका बांधली.

४) खासदार लिंगराज वल्याळ यांच्या खाजदार निधीतून संत दामाजी ते चोखामेळा रस्त्याचे डांबरीकरण केले. त्याला पाच लाख रुपये खर्च आला.

५) म.फुले शॉपिंग सेंटरचे बांधकाम व उद्‌घाटन त्यांनीच केले. त्यात व्यावसायिकांसाठी १० गाळे बांधले.

६) तिर्थक्षेत्राचा नवीन प्रस्ताव शासनदरबारी दाखल केला.

७) नगरपालिकेतील पाच रोजनदारी कामगारांना कायम केले. त्यांना १ जानेवारी १९९८ रोजी कायमस्वरूपी कामगार म्हणून मान्यता दिली.

कायम झालेल्या कामगारांची नावे

१) रमेश रामचंद्र वस्त्रे

२) सुरेश रामा जावळे

३) गणपत शिवाजी माळी

४) दत्तात्रय शंकर भगरे

५) शंकर रामचंद्र वस्त्रे

८) मंगळवेढा नगरीमध्ये २५०० फुट ओपन गटारी बांधल्या.

९) बाबू शिंदे यांची आठवडा बाजारासाठी आरक्षीत केलेल्या जागेचे रुपये ७ लाख रुपये दिले.

१०) नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचे पगार ०१ तारखेला नियमित करण्याचा पायंडा पाडला.

११) श्री संत दामाजी महाविद्यालयास शासनाने दिलेल्या जागेतील दोन एकर जागा सफाई कामगारांसाठी आरक्षीत होती. ते आरक्षण काढून महाविद्यालयास मिळवून दिली.

१२) मित्रनगरमधील पाणीपुरवठा, टाकी, पाईपलाईन त्यांच्या कार्यकालातच पूर्ण झाली.[१४]

### ४.३.१० बाबू गैबीसाो मकारनदार १९९९-२०००

१९९९-२००० या काळात बाबू गैबीसाो मकानदार नगराध्यक्ष झाले. त्यांच्या काळातील नगरसेवक व नगराध्यक्ष-उपनगराध्यक्ष यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| **नगराध्यक्ष** | **उपनगराध्यक्ष** | **नगरसेवक** |
| --- | --- | --- |
| बाबू गैबीसाो मकारनदार | किसन गुंडाप्पा नागणे | रामकृष्ण मारुती नागणे |
| | | सतिश महादेव गाडे |
| | | प्रकाश कृष्णा गायकवाड |
| | | सुनिता बापू अवघडे |
| | | महादेव सत्याप्पा माळी |
| | | सुहास गोपाळ पंडित |
| | | सुनिता सूर्यकांत पवार |
| | | मिरा शंकर चेळेकर |
| | | ललिता महादेव माळी |
| | | छबाबाई शिवाजी माने |
| | | दिगंबर दत्तात्रय गाडवे |
| | | वसंत हणमंत मुदगूल |
| | | धर्मण्णा शिवबाळा चौगुले |
| | | विजय सोमा खवतोडे |

बाबू गैबीसो मकानदार यांनी काही महत्त्वपूर्ण कार्ये त्यांनी केली ती पुढीलप्रमाणे-

१. शनिवारपेठ, बेरडगल्ली अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले.

२. शनिवार पेठ ते सांगोला नाका, अंबाबाई मंदिर, विठ्ठल मंदिरापुढे शिवाजी तालीम रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले.

३. मंगळवेढा शहरात विविध ठिकाणी मुख्य व प्रमुख चौकाच्या ठिकाणी सोडियम व्हेपरचे दिवे बसविण्यात आले.

४. विकास आराखड्याप्रमाणे रस्त्याखालील रुंदीकरणाची जागा वगळून उर्वरित भागात पार्किंगचे आरक्षण ठेवण्यात आले.

५. भाजी मंडईतील नवीन बांधलेल्या शॉपिंगसेंटरमधील गाळे दुकानासाठी व व्यवसायिकांना भाडेपट्टीतत्त्वावर देण्यात आले.

६. मंगळवेढ्याच्या पश्चिम बाजूकडील स्मशानभूमी आहे त्या स्मशानभूमीत मारवाडी समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी व पत्राशेड उभा केला.

७. भीमनगरमध्ये पुरुषांकरीता विस युनिटचे शौचालयाचे बांधकाम केले.

८. मा.आमदार सुरेश पाटील यांच्या आमदार फंडातून आलेलया निधीतून न्यू इंग्लिश स्कूल मंगळवेढा येथे बांधण्यात आलेल्या त्याच शाळेत व्यायामशाळा बांधण्यात आली.

९. बोराळे वेशीजवळ लिंगायत व मुस्लिम समाजाच्या स्मशानभूमीतील कंपौंडमध्ये अंधार, अस्वच्छता होती तेथे प्रकाशाची सोय व स्वच्छता केली.[१५]

## ४.३.११ पांडुरंग विठ्ठल ताड (२००६)

२००६ या काळात पांडूरंग विठ्ठल ताड नगराध्यक्ष होते. त्यांच्या काळातील नगरसेवक व नगराध्यक्ष-उपनगराध्यक्ष यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| **नगराध्यक्ष** | **उपनगराध्यक्ष** | **नगरसेवक** |
|---|---|---|
| पांडूरंग विठ्ठल ताड | मुझफर वल्लीसाो काझी | सौ.जयमाला पूर्वानंद म्हेत्रे |
| | | शरीफ महंमद सुतार |
| | | मकसूद बागवान |
| | | सौ. द्रोपदी मल्हारी कांबळे |
| | | सौ.आशा रामचंद्र जगताप |
| | | धनंजय आप्पासाो माळी |
| | | विजय सोमा खवतोडे |
| | | भगवती जोतिराम माने |
| | | छबाबाई शिवाजी माने |
| | | बाळू गैबीसाो मकानदार |
| | | आण्णा दामोदर राऊत |
| | | चंद्रशेखर जयनारायण कोंडूभैरी |
| | | इंद्राबाई बापू मेटकरी |
| | | अरूण बाळासाहेब किल्लेदार |
| | | सुभाष रतनचंद शहा |

पांडुरंग विठ्ठल ताड यांनी काही महत्त्वपूर्ण कार्ये त्यांनी केली ती पुढीलप्रमाणे-

१. मंगळवेढ्यातील उपरस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करण्यात आले.

२. १० शौचालये बांधण्यात आली.

३. मुताऱ्यांची कामे केली.

४. आठवडा बाजारातील नगरपालिकेचे बापूसाहेब पटवर्धन शॉपिंग सेंटर मधील गाळे व्यवसायिकांना भाड्याने देण्यात आले.

५. कुंभार तलाव येथे क्रीडासंकुलन होण्यासाठी ठराव करण्यात आला.

६. महाराष्ट्राचे महान गायक कै.प्रल्हाद शिंदे यांचे स्मारक उभा करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.[१६]

## ४.३.१२ महादेव आबा माळी (२००७-२००९)

सन २००७ ला मंगळवेढा नगरपालिकेची अत्यंत चुरशीची निवडणूक झाली त्यात महादेव माळी निवडून आले. व २००७ ला ते मंगळवेढ्याचे नगराध्यक्ष झाले. २००७ ते २००९ असे एकुण तीन वर्षे मंगळवेढ्याच्या नगराध्यक्ष पदी ते कार्यरत होते. त्यानी केलेल्या कार्याचा आढावा पुढील प्रमाणे,

१) अर्बन बँकेसमोरील नारायण महाराज शॉपिंग सेंटर त्यांच्या काळात पूर्ण झाले.

२) सराफगल्लीमधील विठ्ठल मंदिराचे काम त्यांच्या काळातच पूर्ण झाले.

३) शासन दरबारी आपली कैफियत मांडून २७ कोटी रूपयांची पाणीपुरवठा योजना त्यांनी मंजूर करून घेतली. त्यांनी मंगळवेढा नगरपरिषद मध्यील लोकांना मागेल त्याला नळकनेक्शन जोडून दिले. जे लोक नगरपालिकेकडून होण्याऱ्या पाणीपुरवठ्यापासून वंचीत होते त्यांना या योजनेमुळे पाणी पुरवठा होऊ लागला.

४) जिजाऊ शॉपिंग सेंटर त्याच्याकाळात मंजूर झाले.

५) मंगळवेढा शहराला तिर्थक्षेत्राचा दर्जा त्यांच्याकाळात मिळाला. त्या अंतर्गत मंगळवेढा शहरात रस्ते व गटारी झाल्या.

६) पूर्वी मंगळवेढ्यात मारुतीचे मंदिर होते, पण ते पडक्या अवस्थेत होते. तेथे भटक्या जनावरांचा वावर मोठ्या प्रमाणात होता. महादेव माळी यांनी मारुती मंदिर अतिशय चांगल्या पध्दतीने बांधले व सभा मंडपही बांधून घेतला.

७) मंगळवेढ्यात मास्टरप्लॅन त्यांच्या काळातच मंजूर झाला. शिवप्रेमी चौक ते मुरलीधर चौक रस्त्याची कामे त्यांच्या काळात झाली.

८) सराफ गल्लीची अंडरग्राऊंड गटार त्याच्या काळात बांधली गेली.

९) मारवाडी गल्लीची गटारही त्यांच्या काळातच बांधली गेली.

१०) दत्त चौक ते बोराळे नाका पर्यंतचा रस्त्याचे डांबरीकरण त्यांच्या काळात केले गेले. [१७]

## ४.३.१३ अशोक गुराप्पा माळी २००९

हे फक्त सहा महिने मंगळवेढ्याचे नगराध्यक्ष होते. त्यांच्या काळात २७ कोटीची पाणीपुरवठा योजना पूर्ण झाली.

१. पाईपलाईन योजनेची कामे पूर्ण झाली.

२. शनिवारपेठतील गटार योजना व रस्त्याचे डांबरीकरण त्यांच्या काळात झाले. [१८]

## ४.३.१४ भारत दादा नागणे (२००९-१०)

२००९-१० या काळात भारत दादा नागणे नगराध्यक्ष होते. त्यांच्या काळातील नगरसेवक व नगराध्यक्ष-उपनगराध्यक्ष यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| **नगराध्यक्ष** | **उपनगराध्यक्ष** | **नगरसेवक** |
|---|---|---|
| भारत दादा नागणे | सौ.अनिता सुनिल भगरे | अजित रामचंद्र जगताप |
| | | पांडुरंग विठ्ठल ताड |
| | | सौ. लक्ष्मी हणमंत गुरव |
| | | विक्रम अर्जून अवघडे |
| | | भिमराव तुळजाराम उगाडे |
| | | सौ.माधवी अरूण किल्लेदार |
| | | सौ.कमल वसंत मुदगुल |
| | | सौ.अरूणा सोमनाथ माळी |
| | | महादेव सत्याप्पा माळी |
| | | शंकर मारुती माळी |
| | | ज्ञानेश्वर विठ्ठल भगरे |
| | | मुझफर वल्लीसाो काझी |
| | | अशोक गुराप्पा माळी |
| | | अरुणा विजय खवतोडे |
| | | धनंजयअंबादास हजारे |

भारत दादा नागणे यांनी काही महत्त्वपूर्ण कार्ये त्यांनी केली  ती पुढीलप्रमाणे-

१. दामाजीरोड मार्गावरील आठवडा बाजारामधील बांधकाम केलेल्या नवीन व्यापारी संकुलाचे राजमाता जिजाबाई कॉम्प्लेक्सचे उद्‌घाटन समारंभ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.अजित पवार साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.

२. साठेनगर पंढरपूर विजापूर रिंगरोड साईडने बोराळे नाक्यापर्यंत मेनलाईन आर.सी.सी.गटार बांधण्यात आली.

३. बोराळे नाक्यावरील रस्ता क्रॉस गटार बांधण्यात आले.

४. मंगळवेढा नगरामध्ये अनेक गल्लीमध्ये आरसीसी गटारे बांधण्यात आली.

५. तहसीलकार्यालयासमोरील, कोर्टासमोरील चोखामेळा चौकावरुन मारवाडी गल्ली इत्यादी ठिकाणी मुख्य पाईपलाईन आरसीसी गटारी बांधण्यात आल्या.

६. नगरपालिका हद्दीतील कल्याणप्रभू ते नागणेवाडी रोडच्या दोन्ही बाजूनी रस्त्यालगतच्या भागाचे खडीकरण व डांबरीकरण तसेच गटारीचे बांधकाम करण्यात आले.

७. शहरातील रस्ते खडीकरण, डांबरीकरण करण्यात आले.

८. एस.एस.एस.टी योजने अंतर्गत मंगळवेढा शहरवाढीसाठी पाणीपुरवठा योजनेतील वाढीव कामासाठी पाईप लाईन पुरवठा करण्यात आला.

९. नैसर्गिक जलस्त्रोतांचे संवर्धन व विकास करणे या योजने अंतर्गत कृष्ण तलावाचे सुशोभीकरण करण्यात आले.

१०. तलावातील झाडे-झुडपे तोडण्यात आली. तलावाचा गाळ काढण्यात आला.

११. नर्मदापार्क ते शनिवारपेठ असा रस्ता तयार करण्यात आला.[१९]

## ४.४ मंगळवेढा नगरपालिकेचा सामाजिक इतिहास

मंगळवेढा शहरास अतिप्राचीनकाळापासून सामाजिक इतिहास आहे. सामाजिक इतिहास पाहत असताना तेथील समाजाची रचना व समाजाची परिस्थिती कशी होती समाजाचे व्यवसाय, पोशाख, उद्योग, राहणीमान, लोकसख्या, समाजातील रूढी, प्रथा, परंपरा, लोकांची भाषा इत्यादी विषयाची माहिती या प्रकरणात घेणार आहे. या काळात समाजात सुधारणा होण्यासाठी जे नगरपालिकेने प्रयत्न केले त्याचीही माहिती होते.

### ४.४.१ समाजरचना

प्राचीनकाळापासून भारतीय समाज रचना जातीभेदावर आधारलेली आहे. भारतातील हिंदू समाज हा चातुर्वर्ण्य पध्दतीवर आधारलेली दिसून येते. त्यामुळे एका वर्णाने दुसऱ्या वर्णाबरोबर वैवाहिक व व्यावसायिक संबंध ठेवायचे नाहीत. असे चातुर्वर्ण्याचे वैशिष्ट होते. या चातुर्वर्ण्यपध्दतीतून पुढील काळात जातीसंस्था निर्माण झाल्या.

हिंदू समाजावर वैदिक व अवैदिक असे अनेक संस्कार दृढ झाले होते. त्यामुळे भारतीय समाज रचना जातीपध्दतीवर आधारलेली होती. जाती संस्था ही वेद पुराणावर आधारीत होती. एखाद्या व्यवसायाची संक्रमण एका पीढीकडून दुसऱ्या पीढीत होऊ लागली यावरून व्यक्तीची ओळख जातीवरून ठरू लागली.

भारतीय समाजात अनेक व्यवसाय केले जात होते. या व्यवसायावरुन जाती-जातीचे वेगवेगळे गट निर्माण झाले आहेत. त्यामुळे एक जात दुसऱ्या जातीपासून स्वतंत्र राहू लागली. विशिष्ट जातीच्या, विशिष्ट रूढी, परंपरा आचारपध्दती निर्माण झाल्या. उच्च जातीने अधिकार-हक्क उपभोगावेत व कनिष्ठ जातींनी त्यांची सेवा करावी अशी समाजरचना प्राचीन काळापासून असलेली दिसून येते.

जातीव्यवस्थेवर अनेक प्रकारची बंधने होती. धर्मशास्त्रानुसार मनुष्य ज्या जातीत जन्मला त्या जातीत मरणे आवश्यक होते. त्याला इतर जातीचा व्यवसाय करणेही जातीसंस्थेविरूध्द मानले जात होते. त्यामुळे धर्म, जाती, रूढी, परंपरा यांच्या मर्यादा कोणीही ओलांडत नसत. शक्यतो धर्म, जातीच्या मर्यादेत जीवन जगण्याचा प्रत्यक व्यक्ती प्रयत्न करीत

असे. समाज व्यवस्थेत जन्मावरून माणसची जातवार विभागणी झाली. पण त्याशिवाय त्या-त्या जातीच व माणसाचा सामाजिक दर्जा ठरलेला होता. त्यामुळे प्रत्येक जातीच्या वस्त्या वेगळ्या, पाणवठे वेगळे, सभागृहे व स्मशान वेगळी असलेली दिसत.

मंगळवेढा नगरपालिकेत समाजरचना वरील पध्दतीने असल्याचे दिसून येते. मंगळवेढा नगरपालिकेत हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, बौध्द, जैन इत्यादी धर्माचे लोक होते व आहेत.[२०]


**तक्ता क्र. ४.१**

**मंगळवेढा नगरपालिकेतील धर्म व जातीनिहाय लोकसंख्या**

| अ. क्र. | धर्म/जात | लोकसंख्या | अ. क्र. | लोकसंख्या | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | ख्रिश्चन समाज रचना | ९० | १. | चांभार | २२०० |
| २. | मुस्लिम समाज | २१०० | २. | जंगम | २५५ |
| ३. | बौध्द | ६०० | ३. | ठाकूर | २२० |
| ४. | जैन | ३०० | ४. | ढोर | १५० |
| ५. | ब्राम्हण | १२०० | ५. | तेली | ४५० |
| ६. | मराठा | १०,००० | ६. | धनगर | ५५० |
| ७. | कुंभार | ४०० | ७. | परीट | ४०० |
| ८. | ओतारी | १८० | ८. | पाथरवट | ७८० |
| ९. | कातकरी | २१० | ९. | बुरुड | ४०० |
| १०. | कासार | २२० | १०. | भोई | २२० |
| ११. | कोष्टी | २८० | ११. | माळी | ७१० |
| १२. | कोल्हाटी | १७० | १२. | मांग | ९०० |
| १३. | कोळी | २५० | १३. | लोहार | २५० |
| १४. | गवळी | २४० | १४. | वाणी | १००० |
| १५. | गुरव | १४० | १५. | सुतार | ५०० |
| १६. | गोंधळी | ३४० | १६. | न्हावी | ८०० |
| १७. | गोसावी | ३०० | १७. | सोनार | ७०० |
| १८. | घिसाडी | ४१० | १८. | महार | ८४० |
| १९. | मारवाडी | ३०० | १९. | इतर धर्मीय | १०० |
| पुरुषः १४,७४५, | स्त्रियाः १४,०१० | | | एकूण | २८७५५ |

स्त्रोतः सोलापूर गॅझेटियर २०१०

**आकृती क्र.४.१**
**मंगळवेढा नगरपालिकेतील धर्म व जातीनिहाय लोकसंख्या**



स्त्रोतः सोलापूर गॅझेटियर २०१०

### ४.४.२ ख्रिश्चन समाज रचना

सोलापूर जिल्ह्यात अमेरिकन मराठी मिशनचे काम इ.स. १८६८ मध्ये सुरु झाले. मंगळवेढा नगरपालिकेत मिशनचे काम १८७० रोजी सुरु झाले. मिस्टर मिसेस डिन जोडपे मिशनचे काम करीत होते. ते शिक्षणाचे महत्त्व सांगत असत. जतीभेद पाळत नसत. गोरगरीबांना आर्थिक मदत करीत असे. रोग्यांची मोठ्याप्रमणात सेवा करीत असत. दुष्काळच्यावेळी आर्थिक मदत करीत असे. अशाप्रकारे मंगळवेढ्यात मिशनऱ्यांनी चिकाटीने कार्य केले. त्यांना याकामाबद्दल विरोध होत होता. तरीही त्यांनी आपले कार्य चालू ठेवले. ख्रिश्चनांची मंगळवेढ्यात ९० एवढी लोकसंख्या आहे. त्यांचे राहणीमान साधे असून त्यांचा पोशाख चोळा व झगा असा होता. त्यांचे राहणीमान साधे होते.

### ४.४.३ मुस्लिम समाज

मंगळवेढा नगरपालिकेत मुस्लिम समाजाची वस्ती आदिलशाहीच्या आगोदरपासून आहे. मुस्लिम समाजात अवलीयांची संख्या मोठी आहे. त्यांनी समाजसेवेची व अध्यात्मिक जीवनाची कामे केली. रमजान महिन्यामध्ये मशिदीमध्ये उत्सव होतो. याशिवाय मंगळवेढा नगरपालिकेत ०६ मशिदी व ०३ दरगाह आहेत.

मुसलमान व्यवसायानुसार तीस पोटभेद आहेत. त्यामध्ये मुगल, पठाण, शेख, सय्यद, आतार, कलार्रगार, महावत, मणियार, नालबंद तसेच गुजरात, कच्छमधून आलेले बोहरा आणि मेहमान, म्हैसूरमधून आलेले भुभरी व गायकसाब, बागवान, तांबोळी, धावड, लोहार, धोंडफोडे विटांचे बांधकाम करणारे (गवंडी), झारस (राख गाळणारे), पटवेगार (रेशीमकाम करणारे), पिंजारी (कापूस पिंजणारे), रंगारी (रंगकाम करणारे), शिकलगार (हत्यारांना धार लावणारे), धोबी, हजाम, पखाली नोकरी करणारे तर नगारजी आणि गारूडी लोकही होते. वरील जातींपैकी शेख, तांबोळी, काझी, बागवान, यांची संख्या जास्त आहे. लोक घरात उर्दू, हिंदी व बाहेर मराठी भाषा बोलतात. मुसलमान लोकांचा पोशाख हा शेरवनी, पायजमा, चुडीदार, सलवार, लुंगी, शर्ट आणि डोक्यावर गोल टोपी असा आहे. मुसलमान स्त्रियांचा

पोशाख हा गोलसाडी त्या डोक्यावर सडीचा पदर घेऊन त्यावर बुरखा असा आहे. काही स्त्रिया मात्र घागरा, चोळी किंवा ब्लाऊज, ओढणी घालतात.

मुसलमान लोक ईद-ए-मिलाद, रमजान, मोहरम, बकरी ईद इत्यादी सण साजरे करतात. सणामध्ये अन्न, वस्त्र व पैशांचा दानधर्म करण्याची प्रथा आहे. दिवसातून नेमून दिलेल्या वेळी नमाज पडतात. श्रीमंत मुलमान हज यात्रा करतात. जीवनातील एक पवित्र कर्तव्य समजले जाते. मंगळवेढा नगरपालकेत मुस्लिम लोकांची संख्या ३२०० एवढी आहे.[२२]

## ४.४.४ बौध्द

बौध्द धर्मात महार, मुरकी महार, गावकी महार आणि जोगती महार अशा पोटजाती आढळतात. या सर्व पोटजातीचे लोक रोटी व्यवहार करतात. परंतु आपआपसात बेटी व्यवहार करीत नाहीत. महार दिसण्यास काळेसावळे, धडधाकट आणि कष्टाळू व प्रामाणिक होते. ते गावसेवक म्हणून गाकीची कामे करीत. गावकी महार स्थानिक ब्राम्हणांसारखे देवदेवतांची पूजा करीत. हिंदू धर्मातील महार लोकांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला आहे. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धर्माची दिक्षा घेतल्यावर हजारोंनी त्यांचे अनुकरण केले आहे. यास 'धम्मचक्र परिवर्तन' म्हणतात. तेव्हापासून महारांना बौध्द समजले जाते. धर्मांतरामुळे महार लोकांच्या जीवनात बदल घडून आला आहे २०१० पर्यंत मंगळवेढा नगरपालिकेत १४८० बौध्द लोक होते. धम्मचक्र परिवर्तनानंतर बौध्दांचे धार्मिक व सामाजिक विधी बौध्द भिक्षुद्वारे होतो.[२३]

## ४.४.५ जैन

मंगळवेढा नगरपरिषदेत जैन समाजाची लोकसंख्या कमी होती. जैन लोक घरात कानडी व मराठी बोलतात. जैन लोक 'महावीर' यास मानणारे आहेत. जैन लोक शेती व्यवसाय, व्यापार, दुकानदारी व नोकरी करतात. २०१० च्या जनगणनेनुसार जैन लोकांची संख्या ३०० एवढी आहे.[२४]

## ४.४.६ मारवाडी

मंगळवेढा नगरपरिषदेत मारवाडी समाजाची लोकसंख्या कमी होती. मारवाडी लोक मारवाडीभाषा बोलतात. लोक व्यापार, दुकानदारी करतात. त्याचबरोबर लोक राजकारणातही भाग घेत असल्याचे दिसून येते. २०१० च्या जनगणनेनुसार मारवाडी लोकांची संख्या १०० एवढी आहे.

## ४.४.७ हिंदू समाज रचना

हिंदू समाजात जातीवर आधारलेला असल्याने व्यक्तींचा दर्जा तो कोणत्या जातीत जन्मला आला यावरून ठरत असे. समाजरचनेत खालील जातींचा समावेश होतो. हिंदू लोकांच्या वेगवेगळ्या जाती आहेत. या जातीत पोशाख, विवाहाच्या चालिरिती व खाणे-पिणे या बाबतीत भेद दिसतो. हिंदू धर्मातील लोक शेती, नोकरी, व्यापार व परंपरेने चालत आलेले व्यवसाय करीत होते.

### ४.४.७.१ ब्राम्हण

ब्राह्मण लोकांना परंपरेने व धर्मशास्त्रीय पूजा-अर्चा करण्याचा अधिकार होता. धार्मिक विधी करणारे पौरातित्य करणारे, भजन, पुजन, वेदशास्त्र, अध्ययन, अध्यापन करणारे ब्राम्हण होते. हिंदू समाजात ब्राह्मण समाजाला उच्चमान दिला जातो. मंगळवेढा शहरात कोकणस्थ व देशस्थ ब्राह्मणांची संख्या आहे. ते कष्टाळू व प्रामाणिक आहेत. देशस्थ ब्राह्मणात ऋग्वेदी व यजुर्वेदी असे दोन भेद आहेत. देशस्थ ब्राम्हण कोकणस्थ, कऱ्हाडे व देवसखे ब्राह्मणांबरोबर विवाह करीत नाहीत. ब्राम्हण पूर्वी जमीनदार, सावकार, पुरोहित, भिक्षूक, लेखक इत्यादी व्यवसाय करीत असत. हिंदू धर्मातील सोळा नित्यसंस्कार व चोवीस नैमित्तीक संस्कार कटाक्षाने पाळतात. त्यांची संख्या १६०० एवढी आहे.[२५]

### ४.४.७.२ मराठा

मराठा स्वतः क्षत्रिय वंशाचे मानत होते. तरीही त्यांच्यात क्षत्रिय मराठे, कुणबी मराठे, इतर मराठे असे वर्ग आहेत. क्षत्रिय मराठ्यांचे कुलीन, कुलीन मराठा व अकरामाशी मराठा असे पोटभेद आहेत. राजघराण्यांचा त्यांचा रक्तसंबंध आहे. ते स्वतःला क्षत्रिय मराठा समजतात.

क्षत्रिय मराठे कुणबी मराठयांपेक्षा वर्णाने उजळ, देखणे व सदृढ आहेत. पूर्वी त्यांच्यात पडदापध्दत रूढ होती. सामान्य मराठे शेती करतात. मराठ्यात भोसले, मोहिते, घाडगे, चव्हाण, घोरपडे, सरनाईक, गावडे, नलावडे, फडतरे, शिंदे, फुगारे, वाकडे, जाधव, सावंजी, सुरवसे, हजारे, औताडे, नागणे, गोयल इत्यादी आडनावे आहेत.

मध्ययुगीन काळात देशमुख, इनामदार व पाटील दोन मझली किंवा बहुमजली अशा चांगल्या घरात राहत असत. त्यांना वाडे म्हटले जात होते. त्यातील काही वाडे अजूनही अस्तित्वात आहेत. बहुसंख्य मराठे साध्या घरात राहत होते. श्रीमंत घरातील स्त्रिया पडद्यात राहत असत. मुलांना विवाहामध्ये जानवे घालावे लागत. मराठी स्त्रियांना सार्वजनिक ठिकाणी वावर करण्यास प्रतिबंध होता.

मराठे सध्या शेती व्यवसाय, सहकार क्षेत्र, नोकरी व राजकारण इत्यादी क्षेत्रात आढळतात. मंगळवेढा नगरपालिका परिसरातील बरेच लोक संरक्षण दलात असून बहूसंख्य लोक पुणे मुंबई येथे नोकरी व व्यवसायानिमित्त स्थलांतरीत झाले आहेत. मध्ययुगीन काळात मराठे डोक्याला पागोटे किंवा पटका, अंगात बाराबंदी सदरा व कमरेला धोतर आणि अंगाला उपरणे असा पोशाख करीत असत. तर स्त्रिया लुगडी व चोळी घालीत. सध्या मराठे आधुनिक पोशाख परिधन करीत असले तरी काही लोक डोक्याला टोपी व पागोटेही वापरताना दिसतात. स्त्रिया सहावारी साडी व झंपर घालतात. मराठे लोक सर्व सण साजरे करतात. एकादशी, शिवरात्री, चतुर्थी, सोमवार व शनिवार सह उपवास करतात. २०१० पर्यंत मराठ्यांची लोकसंख्या ११,००० एवढी होती.[२६]

### ४.४.७.३ कुंभार

कुंभार बारा बलुतेदारांपैकी एक घटक असून ते दैनंदिन जीवनात लागणारी मातीची भांडी व वस्तू बनवत असत. त्यांना धान्याच्या व रोख स्वरूपात मोबदला मिळत असे. परंतु बलुतेदारी पध्दत आता बंद झाली आहे. ते विटा, मडके व घागरी, मुर्ती तयार करून विकतात. त्यांची लोकसंख्या ५०० एवढी आहे.

### ४.४.७.४ ओतारी

ओतारी मराठ्यांसारखे दिसत असून ते कष्टाळू आहेत. त्याचा मुख्य व्यवसाय पितळी भांडी, देवदेवता व प्राण्यांच्या मुर्त्या तयार करून विकणे आहे. या जातीचा समावेश भटक्या जमातीत होतो. पुरुष व स्त्रिया मराठ्याप्रमाणे वेशभूषा करतात. ते महाराष्ट्रात असून भूतप्रेत, जादूटोणा, मंत्रतंत्र, कौल लावणे यावर विश्वास ठेवत होते. यांची लोकसंख्या १८० एवढी आहे.[२७]

### ४.४.७.५ कातकरी

कातकरी जमातीचे दोन पोट प्रकार पडतात. ते म्हणजे ढोर कातकरी व सोन कातकरी आहेत. त्याच्यात रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत. सोन कातकरी स्वतःला ढोर कातकरीपक्षा उच्च समजतात. कातकऱ्यांमध्ये पवार, निकम, कोकाटे, वाघमारे, गवळी इत्यादी आडनावे आहेत.

कातकरी लोक रंगाने काळे, ठेंगणे, काटक व चपळ आहेत. स्त्रिया मध्यम उंचीच्या सडपातळ व काळसर आहेत. कातकरी पुरुष लंगोटी नेसतात व कमरेभोवती लहान फडके गुंडाळतात व अंगात आखूड सदरा घालतात. स्त्रिया गुडघ्यापर्यंत घट्ट लुगडे घालतात. त्यांचे एक टोक पायामधून मागे खोवतात. अंगात चोळी घालतात. कातकरी लोक जंगलातील मध, कंदमुळे, फळे, गवत व जळाऊ लाकडांच्या मोळ्या विकतात. त्यांच्या जमातीचा एक पुढारी असतो तो वंशपरंपरेने निवडला जातो. तो त्यांच्या पंचायतीचा पुरुष असतो. तो त्यांच्या धार्मिक व सामाजिक प्रश्नांचा निवाडा करतो. आणि अपराध्याला दंडही करतो.

कातकरी लोक आहारात रानउंदीर, खार, ससे, मासे इत्यादी प्राण्यांचे मांस व बाजरीची, ज्वारीची भाकर व भात या अन्नाचा वापर करतात. त्यांच्यात दारू पिण्याचे प्रमाण फार आढळते. ते लोक म्हसोबा, वेताळ देवदेवतांची पूजा करतात. ते पितरांना फार मानतात. आणि भुताखेतांना फार भितात. भगताकडून अंगारा लावतात. त्यांची लोकसंख्या २१० एवढी आहे.[२८]

### ४.४.७.६ कासार

कासाराच्या कासार व बांगड या दोन पोटजाती आहेत. ते आपआपसात रोटी-बेटी व्यवहार करतात ते तांब्या पितळेची भांडी तयार करून विकतात. स्त्रियांच्या हातात बांगड्या

भरतात. काही जण सूया, धागे व किरकोळ वस्तूंची विक्री करतात. काही कासार शेती करतात. या कासार लोकांची मंगळवेढ्यातील लोकसंख्या २२० एवढी आहे.

### ४.४.७.७ कोष्टी

कोष्टी यांच्यात मराठा कोष्टी व लिंगायत कोष्टी असे दोन पोट भेद आहेत. ते एकमेकांशी रोटी-बेटी व्यवहार करत नाहीत. ते वर्णाने काळे मध्यम बांध्याचे असून मराठी बोलतात. लिंगायत कोष्टी शाकाहारी असून मराठा कोष्टी मांसाहारी आहेत. लिंगायत कोष्टी लिंगधारण करतात. ते विवेकी, कष्टाळू व काटकसरी आहेत. ते शेती, शेतमजूरी करत असल्याचे दिसतात. लिंगायत कोष्टी फक्त शिवाची पूजा करतो. तर मराठा कोष्टी ब्राम्हणाप्रमाणे सर्व देवदेवतांची पूजा करतात. त्यांची लोकसंख्या २८० एवढी आहे.

### ४.४.७.८ कोल्हाटी

हे बाहेरचे लोग आहेत. ते वेगवेगळ्या ठिकाणी स्थायिक झाल्यामुळे तसेच इतर जातींशी संपर्कात असल्यामुळे त्यांच्यात अनेक पोटजाती निर्माण झाल्या आहेत. त्यांची जावळीकर, लाखे, कुडाळकर, निलकंठ, म्होरकर, दांडेकर, घुमरे, औंधकर, पाटकर, तायवडकर आणि पडकर अशी कुळे आढळतात. त्यांच्यात विभक्त कुटुंब पध्दती आढळते. मुलाचा विवाह झाल्यानंतर ते वेगळे पाल करून वेगळा प्रपंच मांडतात. त्याची पक्की घरे नसतात. ते लोक टोळीने गावोगाव भटकतात. त्यांच्या टोळी प्रमुखास नाईक असे म्हणतात. भटकताना सोबत चटयांची झोपडी अथवा कपड्याचे पाल व एक खाट आणि इतर साहित्य घोड्याच्या किंवा गाढवाच्या पाठीवर लादून प्रवास करतात. पावसाळ्यात ते कमी पावसाच्या प्रदेशात मुक्काम करतात. ते कोणत्याही प्राण्यांचे मांस खातात. व दारू पितात. पुरुषांच्या अंगावर इतर वस्त्राप्रमाणे चादर पांघरलेली असते. पुरुष कानात भीकबाळ्या, हातात कडे घालतात. बायकांचा पोशाख व दागिने मराठ्याप्रमाणेच आहेत.

कोल्हाटी मिश्रबोली बोलतात. त्यामध्ये गुजराती व हिंदी शब्द आढळतात ती भटकी जमात आहे. दसरा हा त्यांचा प्रमुख सण आहे. यादिवशी बाहेरगावी गेलेले सर्व लोक आपआपल्या घरी परतात. देवतांना पुसून बकरा, कोंबडा, किंवा डुकरांचा बळी देतात. त्यांची दैवते म्हणजे मरीआई, म्हसोबा, काळूबाई व महिषासूर इत्यादी आहेत. कोल्हाट्यांच्यात प्रमुख

बारा पोट जाती असून त्यांचा एक प्रमुख पंच जातपंचायती असतो. हुशार, सामाजिक कार्याची आवड असलेल्या व्यक्ती पंच म्हणून नेमतात. त्यांची लोकसंख्या १७० एवढी आहे.[३४]

### ४.४.७.९ कोळी

कोळी लोक पूर्वी नागरिकांना पखाली मार्फत पाणी पुरवण्याचा व्यवसाय करीत होते. त्या मोबदल्यात गावकरी त्यांना धान्य देत असे. मासेमारीशिवाय ते भीमानदीवर नावा चालवत असत. पुरातून वाहत येणाऱ्या वस्तू मोठ्या हिंमतीने पुरातून काढीत. नदीपात्रात कलिंगडाची लागवड करीत असत. ते झोपडीत राहत असून मासे, मांस सेवन करतात. पूर्वी त्यांची घरे दगडमातीची, छप्पराची असत. घरास एकच खोली व समोर ओरी, ओरीसमोर अंगण असे. त्यंच्या घरातील रोजच्या आहारात नाचणीची भाकर, मासळी, सुकेबोंबील असत. स्त्रिया पुतळ्या, वज्रटीका, साखळ्या, गोट, कंबरपट्टा इत्यादी दागीने वापरतात. त्यांची लोकसंख्या २५० एवढी आहे.[३०]

### ४.४.७.१० गवळी

गवळी ही जात शेकऱ्यापेक्षा श्रेष्ठ असून स्वच्छताप्रिय, नीटनेटके, प्रामाणिक, चपळ असून गाय व म्हैस पाळतात. ते हुशार व उद्योगी आहेत. याजातीतील लोक दुधाचा व्यवसाय करतात. २०१० पर्यंत मंगळवेढा नगरपालिकेत यांची लोकसंख्या २४० एवढी आहे.

### ४.४.७.११ गुरव

गुरव गावातील मंदिराचे वंशपरंपरागत पुजारी आहेत. मंदिराची साफसफाई करणे, पूजा अर्चा करणे, इत्यादी कामे करतात. ग्रामस्थांना देवपुजेसाठी दररोज बेल, तुळशीची पाने व फुले पुरवितात शिवाय पत्रावळी व द्रोण तयार करून विकतात. विवाह व इतर समारंभात शहरात गुरव जातीच्या शेव, निलकंठ, मराठा, लिंगायत अशा चार पोटजाती आहेत. लिंगायत गुरव गळयात लिंग बांधतात. तर शैव निलकंठ गळयात जान्हवे बांधतात. परंपरानुसार त्यांच्या पोटजातीत बेटी व्यवहार होत नव्हते. परंतु सध्या शिक्षणाच्या प्रभावामुळे विवाह होऊ लागले आहेत. त्यांनी केलेल्या कामाच्या मोबदल्यात त्यांना देवस्थानच्या इनामी जमिनी आहेत. त्यास गुरवकी म्हणतात. त्यांना सुगीच्या दिवसात धान्य दिले जाते व देवापुढे ठेवलेली दक्षिणाही मिळते. मंगळवेढ्यातील त्यांची लोकसंख्या १४० एवढी आहे.[३१]

### ४.४.७.१२ गोंधळी

गोंधळी जातीचे लोग स्वतःला भवानी देवीचे पूत्र किंवा भक्त समजतात. आणि गळयात कवड्याची माळ घालतात. अंबाबाई व भवानी देवीचे भक्त असल्याने पोवाडे गातात व नाचगाणी करतात. हिंदू लोक जन्म, विवाह व इतर शुभप्रसंगी त्यांच्याकडून आपल्या घरी कुलदेवतांच्या नावाने गोंधळ घालतात. त्यांच्या रेणुकाराई, कदमराई आणि आकरामाशी अशा पोटजाती आढळतात. यांची शिंदे, रेणके, इंगळे, वडगे, शिमणार, मोरे, काळे, गोरे, चव्हाण, माने इत्यादी कुळे आढळतात. गोंधळी जगदंबा, अंबाबाई, भवानी, यल्लम्मा, रेणूका इत्यादी देवतांची आराधना करतात. त्यांच्या नावाने गोंधळ घालतात. त्यांचा पोशाख हा डोक्यावर कुगणीदार पगड्या, शोभिवंत दागिने, कानात भिकबाळया घालतात. याशिवाय सध्या लेंगा व टोपी, शर्ट परिधान करतात. गोंधळासाठी संबळ, तुणतुणे, दिमडी व कवड्याची माळ ही साधने वापतात. गोंधळात देवीची स्तुतीपर गाणी, गोंधळी, कृष्णकथा, असे अनेक प्रकार असतात. त्यांची लोकसंख्या ३४० एवढी आहे.[३८]

### ४.४.७.१३ गोसावी

गोसावी स्वतःला कपील ऋषीचे वंशज समजतात. हे लोक शिवभक्त असून शिवाची अखंड पूजा करणारे आहेत. प्राचीन काळापासून गोसावी मंत्र, तंत्र, औषधी व चमत्कार इत्यादी गोष्टीसाठी प्रसिध्द आहेत. त्यांच्यात काही बाबा गिरी गोसावी, गोवावी भारती व वैराणी या पोटजाती आहेत. त्यांच्या पोटजातीत रोटी-बेटी व्यवहार होतात.

गोसावी जातीत पुरुषांचा पोशाख भगवी वस्त्रे, काखेत झोळी, डोक्याला मुंडाळी, हातात काठी असा असून ते अनवाणी चालतात. भस्म लावून रूद्राक्षांची माळ घालतात व भिक्षा मागतात. काही गोसावी लोक मजूरी व शेती करतात. त्यांची २०१० पर्यंत लोकसंख्या ३०० होती.[३९]

### ४.४.७.१४ घिसाडी

घिसाडी लोक लोखंडापासून लहान मोठ्या वस्तू तयार करण्याचा व्यवसाय करत असलेले दिसतात. यांच्यात चव्हाण, पडवळ, साळूंखे, सुर्यवंशी, लोहार अशी आडनावे आहेत. घिसाडी जातीतील स्त्रिया साड्या, चांदिचे दागिने घालतात. चुडा, पायात चांदीचे कडे,

कपाळाला चंद्रकोर, कुंकू लावतात. तर पुरुष राजस्थानी जोडा असा पेहराव करतात. तर काहीजण मराठ्यांप्रमाणे पोशाख करतात. त्यांची लोकसंख्या ४१० एवढी आहे.

### ४.४.७.१५ चांभार

मंगळवेढा नगरपालिकेत चांभार लोक श्रीमंत आहेत. त्यांच्यात स्थानिक कुणबी, ढोर, मोची, असे पोटजाती असून त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत स्थानिक चांभार स्वतःला उच्च समजतात. जोड, चपला, मोर इत्यादी वस्तू तयार करतात. त्या मोबदल्यात धान्य किंवा रोख पैसे घेतात. चांभार चामड्याच्य वस्तू मोठ्याप्रमाणात विकतात. चांभार जातीत साळूंखे, कांबळे, शिंदे, साबळे इत्यादी आडनावे आहेत. त्याी लोकसंख्या ३४०० एवढी आहे.[३२]

### ४.४.७.१६ जंगम

जंगम ही पौराहित्याचे काम करीत आहेत. जंगम जातीतील लोक धातूचे असलेले शिवलिंग गळयात घालतात. त्यांची लोकसंख्या २५५ एवढी आहे.

### ४.४.७.१६ ठाकूर

ठाकून जातीतील लोक वर्णाने काळसर आहेत. त्यांची घरे, अन्न व पोशाख मराठ्याप्रमाणे आहेत ते कष्टाळू, काटकसरी, शेतकरी व मजूर आहेत. या जातीत चव्हाण, गायकवाड, मोरे, पवार, शिंदे अशी आडनावे आहेत. यांची लोकसंख्या २२० आहे.

### ४.४.७.१७ ढोर

मंगळवेढा नगरपालिकेत ढोर लोक कातडी कमविण्याचा व्यवसाय करतात. त्याचबरोबर ते शेतात मजूर म्हणूनही काम करतात. चांभार जातीपासून ती जात स्वतंत्र होती. मंगळवेढ्यात ढोर जातीत खंदारे, शिंदे, कदम, व्हटकर इत्यादी आडनावे आहेत. त्यांची २०१० पर्यंत लोकसंख्या १५० एवढी आहे.[४१]

### ४.४.७.१८ तेली

याजातीत लिंगायत तेली व मराठा तेली अशा दोन जाती आहेत. या दोन्ही पोटजातीचा व्यवसाय, वेशभूषा, रूढी व परंपरा समान आढळतात. लोक धडधाकट व मजबूत बाध्याचे आहेत. तेली, तीळ, खोबरे व एरंडी तेल पेंडीची ढेप विकण्याचा परंपरागत वयवसाय करतात. लिंगायत तेली महादेवाची पूजा करतात. त्यांची लोकसंख्या ५४० एवढी आहे.[३३]

### ४.४.७.१९ धनगर

धनगर म्हणजे गुरे व मेंढरे पाळणारी जमात होय. डंगे व मेंढे उपजाती छोट्या गाईपाळणारे डंगेधनगर, मेंढरे पाळणारे मेंढे धनगर यांच्यात लहानपणी लग्न करण्याची चाल होती. ते एका ठिकाणाहून दुसऱ्याठिकाणी फिरत होते. त्यांचा पोशाख तांबडे फेटे, खांद्यावर घोंगडी,  अंगात जाड कपड्याचा कुडता, पायात वाजणाऱ्या जाड वाहणा, हातात जाड काठी असते. स्त्रिया गुडघ्यापर्यंत लुगडे नेसतात. त्यांना चांदीच्या दागिन्यांची आवड आहे. त्या पुतळ्या, गजरे, आंगठ्या, मासोळ्या, चांदीच्या सरी इत्यादी दागीने घालतात. त्यांची मंगळवेढ्यात २०१० साली १००० लोकसंख्या होती.[३४]

### ४.४.७.२० परीट

परीट कपडे धुण्याचे व इस्त्री करण्याचे काम करतात. या कामाच्या मोबदल्यात त्यांना बलुते मिळत. परटाला कामात त्यांच्या बायका मदत करीत असतात. परीट हा समाज आर्थिदृष्ट्या मागास होता. त्यांची लोकसंख्या ९०० एवढी आहे.

### ४.४.७.२१ पाथरवट

पाथरवट ही जमत दगड फोडण्याचे काम करीत. देव, मानव व प्राणी यांच्या दगडाच्या मूर्ती तयार करतात. त्यांच्या बायका त्यांना कामत मदत करीत. ही विमुक्त जातीमध्ये मोडणारी जात आहे. २०१० पर्यंत त्यांची लोकसंख्या १२४० एवढी आहे.

### ४.४.७.२१ बुरुड

बांबू काम करणारे लोक म्हणजे बुरड. बांबूच्या टोपल्या, पंखे, चदीघरे, मुलांचे पाळणे, आणि इतर घरगुती वापराच्या बांबूच्या वस्तू तयार करतात. शेतकऱ्यांच्या हात्यारांना बांबूचे दांडे बसवतात. २०१० पर्यंत त्यांची लोकसंख्या ७०० एवढी आहे.

### ४.४.७.२२ भोई

भोई लोक मासेमारी करून उपजिवीका करतात. ते रंगाने काळे असतात. पूर्वी लोक पालख्या वाहून नेण्याचे काम करीत असत. ते मासेमारी शिवाय शेती व मजूरीही करतात. यांची २०१० पर्यंत त्यांची लोकसंख्या २२० एवढी आहे.

### ४.४.७.२३ माळी

हे लोक फळे व भाजीपाल्यांची बागायत शेती करून उदरनिर्वाह करतात. काही माळी बागायतदार तर काही नोकरीत असून त्यांच्या बायका शेती भाजी, फळे, फुले व भाजीपाला विकण्यासाठी मदत करतात. ही जात इतर मागासवर्गात समाविष्ट करण्यात आली आहे. यांच्यात लिंगायत माळी व फुलमाळी अशा पारंपरिक जाती आहेत. २०१० पर्यंत त्यांची लोकसंख्या ७१० एवढी आहे.[३५]

### ४.४.७.२४ मांग

अंबाडी, वाखाचे दोर वळून विकणे हा या जातींचा परंपरागत व्यवसाय आहे. त्याशिवाय, केरसुण्या, टोपल्या, सूप, दोरखंड वगैरे तयार करतात. विवाह व धार्मिक उत्सवा प्रसंगी वाजंत्र्याची कामे करतात. या जातीतील लोक तमाशात गायक व कलावंत म्हणून काम करतात. आता ते शासकीय नोकरीत काम करतात. राजकरणात भाग घेतात. यांची लोकसंख्या १६०० एवढी आहे.

### ४.४.७.२५ लोहार

पूर्वीच्या बारा बलुतेदारीपैकी एक होते. शेतकऱ्यांना शेतीसाठी लोखंडी औजारे तयार करून विकणे हा त्यांचा व्यवसाय होता. त्यांच्या जाधव, निकम, पोवार, माने, थोरात, चव्हाण ही आडनावे आहेत. यांची लोकसंख्या २५० एवढी आहे.

### ४.४.७.२६ वाणी

या जातीमध्ये मराठावाणी, मारवाड वाणी लिंगायत वाणी, इत्यादी प्रकार आहेत. दूकानदारी ते शेती, कापड, धान्य, तूरी व किराणामालाचा व्यापार करतात. तेल विकतात, पेंड विकतात. यांची लोकसंख्या १००० एवढी आहे.

### ४.४.७.२७ सुतार

सुतारकाम हा सुतारांचा पारंपरिक व्यवसाय होता. त्यांची कामे बैलगाड्या, नांगर, शेतीची औजारे तयार करणे, नादुरुस्त अवजारे दुरुस्त करणे अशी होती. हा व्यवसाय मोठ्याप्रमाणात चालत असे. सुतार लाकडी वस्तूसह, लागडी खेळणी तयार करीत असत. त्यांना बाजारपेठेत मोठी मागणी होती. त्यांची लोकसंख्या १००० एवढी होती.

### ४.४.७.२८ न्हावी

मंगळवेढा नगरपालिकेत न्हावी लोक केस कापण्याचा व्यवसाय करीत. पूर्वी काम मिळविण्यासाठी रस्त्याच्या चौकात बसत. आता त्यांची दूकाने झाली आहेत. २०१० पर्यंत त्यांची लोकसंख्या ११०० एवढी होती.[३६]

### ४.४.७.२९ सोनार

सोन्याचांदीचे दागिने बनविणे सोनाराचे काम मुख्य काम होते. मंगळवेढ्यात सोनारकाम मोठ्याप्रमाणात आहेत. स्त्री व पूरूष यांचे अलंकार बनविण्याचे काम ते करीत. त्यांची दूकाने मोठ्या प्रमाणात आहेत. २०१० पर्यंत त्यांची लोकसंख्या ७०० एवढी होती.

### ४.४.७.३० महार

महार ही जमात १२ बलुतेदारपैकी एक होय. यांच्यात दोन उपप्रकार होते. महारांची वस्ती शहराच्या बाहेर होती. त्याला भीमनगर असे म्हणत. त्यांची राहणी साधी होती. ते गावचे सेवेकरी असल्याने गावजमिनीची राखण त्यांच्याकडे असे. तसेच गावपाटलाला मदत करणे, त्याचा निरोप पोहचविणे, गावच्या सीमांवर लक्ष ठेवणे इत्यादी कामे त्यांना करावी लागत असत. आता लोक नोकरी करू लागले आहेत. निवडणूकीला उभे राहू लागले आहेत. नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. त्यांची लोकसंख्या २००० एवढी आहे.

वरील जातीशिवाय मंगळवेढा नगरपालिकेत शिंपी, सनगर, वंजारी, रामोशी, लोणारी या जाती असलेल्या दिसून येतात.[३७]

## ४.५ मंगळवेढा शहरातील सांस्कृतीक जीवन

### ४.५.१ पोशाख

मंगळवेढा नगरपालिकेतील लोक आर्थिक परिस्थितीनुसार कपडे वापरताना दिसतात. श्रीमंत लोक घरात सदरा व उपरणे वापरत असत. तर घराबाहेर जाताना सदरा, कोट व पागोटे असा पेहेराव करत असत. स्त्रिया घरात व घराबाहेर रंगीत साडी, पोलके व कपाळावर कुंकू लावीत असत. पुरुष २१ व्या शतकात लंगोटी, लेंगा, चड्डी, पंचा, धोतर, चोळणा, पायजमा, सलवार, उपरणे, सदरा, बंडी, कुडते, कोयरी, अंगरखा, डगला, शेरवानी, पँट, शर्ट, वापरीत

असत. शेतकरी व मजूरवर्गाचे कपडे जाडेभरडे आहेत. स्त्रिया जास्त साड्या, लुगडी, वापरतात. सद्या पाश्चात्य पोशाख जास्त रूढ झाला आहे. पँट व शर्ट पुरुष मोठ्या प्रमाणात घालतात तर स्त्रिया नऊ व सहावारी साड्या वापरतात.[३८]

## ४.५.२ अलंकार

अलंकारांच्या बाबतीत मंगळवेढा नगरपालिकेतील लोक मोठ्या प्रमाणात हौसी आहेत. पुरुष, स्त्रिया, मुले, मुली यांचे अलंकार वेगळेवेगळे आहेत. स्त्रिया सोने, चांदी, हिरे, माणके यांचे अलंकार वापरतात. स्त्रिया पायात तोडे, व साखळ्या चांदीच्या वापरतात. कानात फुले व रिंगा सोन्याच्या वापरतात. विवाहीत स्त्रिया गळयात मंगळसूत्रे वापरतात. मंगळसूत्र सौभाग्याचे लेणे मानले जाते. त्याशिवाय पोत व वज्रटीक, मोहनमाळ, बोरमाळ, पुतळ्यांची माळ, गंठण इत्यादी दागीने वापरतात. हातात अंगठ्या, पाटल्या व सोन्याच्या बांगड्या घालतात. मोती व हिरे यांनी तयार केलेल्या बांगड्या वापरतात. नथ, मुरणी, फुली नाकात घालण्याचे दागिने आहेत. लहान मुलांना बिंदल्या, मनगट्या, कडीतोडे, वाळे, मोरड्या, साखळ्या, चाळ व करदोडा घालतात. पुरुष गळ्यात चैन, हातात अंगठ्या व कडी वापरतात.[३८]

## ४.५.३ भाषा

मंगळवेढा नगरपालिकेत बहुतांशी लोक मराठी भाषा बोलतात. मंगळवेढ्यात अनेक भाषा बोलल्या जातात. परंतु मराठीभाषेचा सर्वात जास्त वापर केला जातो. दैनंदिन व्यवहार व इतर गोष्टी मराठी भाषेतूनच होतात. काही जमाती व धर्माच्या लोकांकडून विविध भाषा बोलल्या जातात त्यापैकी जैन व लिंगायत लोक घरात कानडी भाषा बोलतात. मुसलमान लोक उर्दू व हिंदी भाषा बोलतात. तसेच इतर बोली भाषाही बोलल्या जातात. उदा. वडर लोक वडरी भाषा बोलतात. मंगळवेढा कनार्टक शेजारी असल्याने कानडी भाषाही बोलली जाते. काही लोक इंग्रजी भाषा बोलतात.[४०]

## ४.५.४ घरांची रचना

इ.स. २०१० पर्यंत मंगळवेढा शहरात घरांची संख्या १५०० होती. एकूण लोकसंख्येपैकी ५० टक्के लोक संपन्नतेचे जीवन जगत होते. आणि ५० टक्के लोक गरीब व दारिद्रतेचे जीवन

जगत होते श्रीमंत लोकांची घरे ही एक किंवा दोन मजली आहेत. दगड, माती, विटा, सिमेंट, स्टील यांनी बनविलेली असतात. जुन्या वाड्यांची संरचना पाहिली तर चारी बाजूंनी मजबूत भिंती असत. त्यामध्ये राहण्यासाठी खोल्या व बसण्याउठण्यासाठी बैठक असे त्यास ओसरी असे म्हटले जात असे. गुरांकरीता घराच्या मागील बाजूस गोठा असे. त्याचबरोबर परसात फुल झाडे असत. घरासमोर तुळसीवृंदावन असे. मोठा दिंडी दरवाजा व देवडी अशी रचना असे. सध्या अशा वाड्यातही सुधारणा झालेल्या आहेत.

मंगळवेढा शहरात नवीन घरे मुख्यतः सिमेंट-काँक्रीटची बंगलावजा आणि बहुमजली आढळतात. त्यात लाकूड किंवा लोखंडाचा वापर केलेला दिसून येतो. ही घरे सर्वसोयींनी युक्त अशी आहेत. नगररचना कायद्यातील नियमांना अनुसरून घरे बांधलेली आहेत. या घरात अनेक खोल्या आहेत. त्यात चौक, ओटा, भोजनगृह, स्वयंपाकगृह, स्नानगृह, कोटीघर, शयनगृह, अतिथीगृह अशा सर्व सोयी आहेत.

मंगळवेढा शहरात मध्यमवर्गीय लोकांची घरे विटा, दगड किंवा मातीच्या भिंती व घरावरती पत्रे टाकलेले असलेली आहेत. शहरातील गरीब व भटक्या लोकांची घरे जाड्याभरड्या कपड्याचे लहान तंबू अथवा पाल आणि बांबूच्या कामट्यांपासून अथवा पावसापासून बचावासाठी गवत व काड्यांचा आडोसा बांधून तयार केलेली घरे आहेत.[४१]

### ४.५.५ आहार

मंगळवेढा शहरात विविध धर्मिय लोक राहतात. विविध जाती, धर्म, पोटजाती, राहतात. प्रत्येकांचा आहार हा धर्मनियम व रूढीपरंपरानुसार असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने काही धर्म मांसाहाराच्या पूर्ण विरोधात असल्याचे दिसून येतात तर काही लोक मांसाहार करतात शिवाय मिश्र आहार असल्याचे दिसून येते. आहार हा आर्थिक परिस्थितीचा आरसा आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. मुख्यत्वेकरून मंगळवेढा शहरात ब्राह्मण, जैन, लिंगायत व मारवाडी लोक शाकाहारी भोजन करतात. इतर जातीजमातीचे लोक मांसाहारी असले तरी त्यांच्या रोजच्या जीवनात मांसाहार नसतो. कारण आपापल्या कुवतीनुसार ते मांसाहार करीत असल्याचे दिसून येते. शेतकरी, कारागीर व इतर धनिक वर्ग दिवसातून तीनदा भोजन करतात. दररोजच्या जीवनात ज्वारी, बाजरी, गहू व भात याचा वापर केला जातो. सण-उत्सवाच्या वेळी

पुरणपोळी करतात. भाकरी बरोबर भाज्या, कांदे, ठेचा, डाळ, रोजच्या आहारात घेतात. सकाळी न्याहरीला पोहे, उपमा/शिरा, दूध व चहा घेतात. उच्चवर्णीयांमध्ये आहारात गव्हाची चपाती, वरण, भात, तूप, भाजी, लोणचे, पापड इत्यादी पदार्थ घेतात. मध्यमवर्गीया लोक भाकरी, भात व आमटीचा समावेश असतो. लोक आठवड्यातून एकदा मांसाहार घेतात. मात्र गरीब लोक सणासुदीला मांसाहार करतात. विवाह, वास्तूशांती वगैरे धार्मिक प्रसंगी मेजवाणीत कुवतीनुसार पुरणपोळी, शिरा, जिलेबी, लाडू, जामन, भात इत्यादी मिष्टान्न करतात. देवीला नवस म्हणून बकऱ्यांचा, कोंबड्यांचा बळी दिल्यावर त्याचे मांस प्रसाद म्हणून आप्तेष्टांना वाटण्याची प्रथा आहे.[४२]

## ४.५.६ उपनयन (मुंज)

प्राचीनकाळापासून ब्रह्मचर्य आश्रमाला प्रारंभ करण्याचा संस्कार असे याचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते. मुलाने आठव्या वर्षी गुरुगृही जाऊन बारा वर्षे ज्ञानार्जन करावे ही त्यामागील कल्पना आहे. सध्या या संस्काराला आशय केवळ प्रतिकात्मक उरला आहे. मंगळवेढा येथे उच्चवर्णीय लोक हा संस्कार खास मुहूर्तसाधून समारंभपूर्वक साजरा करतात. कौटुंबिक संमेलन व इष्टमित्रांच्या गाठीभेटी होण्याचे स्वरूप या समारंभाला आले आहे.

समारंभासाठी घरासमोर मंडप घालतात. पहाटे सुवासिनी स्त्रिया घाणा भरण्याचा विधी करतात. नंतर गणपती पूजन करून पुण्याहवन होते. नंदीश्राध्द, मंडपप्रतिष्ठा व देवक प्रतिष्ठा होते. मूंज लागण्यापूर्वी मातृभोजन होते. त्यानंतर बटूच्या डोक्यावरचे केस काढतात. फक्त शेंडी ठेवतात. नंतर बटू व त्याच्यापित्याला समोरासमोर उभा करून मध्ये आंतरपाट धरतात. त्यावेळी उपाध्याय मंगलाष्टके म्हणून मंगलअक्षता टाकतात. नंतर आंतरपाट काढून घेतला जातो. नंतर पिता मुलाला आपल्या उजव्या मांडीवर बसवितो. जमलेल्या लोकांना अत्तर, गुलाब, पानसुपारी व नारळ देण्यात येतो.

उपनयन विधी वरील कार्यक्रमानंतर सुरु होतो. या विधीसाठी मुलाला लंगोटी व पंचा असा पोशाख घालतात. गळ्यात हरणाचे कातडे एका सुतळीत गुंफून अडकवितात. धृत व समिधा होमात टाकतात. मुलगा होमाभोवती फिरतो. त्यावेळी ब्राह्मण मंत्रोच्चार करतो. मुलगा उपाध्यायाला नमस्कार करून विनंती करतो की मला ब्रह्मचर्याश्रमाची दिक्षा द्यावी. आचार्य

त्याची विनंती मान्य करतो. त्याला यज्ञोपवित व दंडा देतो आणि विद्या संपादन करण्यासाठी काय केले पाहिजे ते सांगतो. त्याला सुदर्शन करवितात व गायत्री मंत्र शिकवितात. शेवटी ब्राह्मण त्याला आशीर्वाद देऊन हा धार्मिक विधी संपवितात.

गुरुग्रही बारावर्षे राहून विद्याभ्यास संपवून गृहस्थाश्रमाची दिक्षा घेण्यासाठी करण्याचा विधी असतो. त्यास समावर्तन किंवा सोडमुंड असे म्हणतात. परंतु सध्या उपनयनानंतर दोन चार दिवसाचा विधी उरकून घेतात बटूला नंदा पोशाख, छत्री व पादत्राणे देतात. व काशी यात्रेला जाण्याचा तो बहाणा करतो. परंतु त्याचा मामा त्याला अडवितो. गृहस्थाश्रम स्वीकारण्यास विनंती करतो.[४३]

## ४.५.७ विवाह

विवाह हा अत्यंत महत्त्वाचा सामाजिक धार्मिक समारंभ आहे. विवाह संस्थेला प्राचीन काळापासून धार्मिक महत्त्व आहे. स्त्री-पुरुष, पती-पत्नी या नात्याने एकत्र येण्याचा कार्यक्रम म्हणजे विवाहसोहळा होय. हा विवाह सोहळा पूर्वी चार-पाच दिवस चालत असे. सध्या मात्र आटोपशीर व अल्पकालीन झाला आहे. त्यात फक्त आवश्यक धार्मिक संस्कारच करतात. नुसताच नोंदणी पध्दतीने विवाह करणे अजून फार रूढ झाला नाही. अजूनही मंगळवेढा शहरात डामडौलात विवाहविधी करण्याची प्रवृत्ती आढळते. पूर्वी आंतरजातीय विवाह होत नव्हते तथापी आता जातीभेदाची तीव्रता कमी झाल्यामुळे आंतरजातीय विवाह होऊ लागले आहेत.

हिंदू धर्मातील सर्व जातीमधील महत्त्वाचा विवाहविधी जवळपास सारखाच आहे. हा विधी वैदिक, पौराणीक पध्दतीने करतात. विवाहप्रसंगी वधू पक्षाकडून वर पक्षाला हुंडा देण्याची प्रथा होती. या समारंभात दागदागिने भेट देण्याची प्रथा होती. विवाहप्रसंगी पुरोहित धार्मिक विधी करून मंगलाष्टके म्हणत असत.[४४]

## ४.५.८ स्त्री जीवन

मंगळवेढ्यात स्त्रीला पुरुषापेक्षा कमी महत्त्व आहे. स्त्रिया या अबला, दुबळ्या व सर्व बाबतीत कमी दर्जाच्या मानल्या जात होत्या. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. मात्र उच्चकुलीन स्त्रियांना शिक्षण दिले जात असे. तसेच या स्त्रिया राजकारणातही भाग घेत असत.

सर्वसामान्य समाजातील स्त्रियांना शिक्षण दिले जात नव्हते. या स्त्रिया कुटुंबाचा चरितार्थ चालावा म्हणून कुटूंबातील पुरुषांबरोबर कष्टाची कामे करीत असत. स्वातंत्र्यपूर्वकाळात स्त्रिया फक्त चूल आणि मुल एवढाच अधिकार असलेला दिसून येतो. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने केलेल्या विविध कायद्याने स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळून त्यांना शासकीय नोकऱ्याची करण्याचा अधिकार आहे. पुढे स्त्रिया नोकरीत व निवडणूक, राजकारणात भाग घेऊ लागल्या. [४५]

## ४.६ धार्मिक श्रध्दा व चालीरिती

मंगळवेढा शहरातील लोकांवर धर्माचा मोठा पगडा होता. दैनंदिन आचारविचारावर धर्माचे खूपच प्राबल्य होते. शहरातील हिंदू, जैन, वाणी, लिंगायत, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी लोक होते. बहुतेक घरात जातीधर्माप्रमाणे देव असत. ख्रिश्चन लोक चर्चमध्ये प्रार्थना करीत. वाणी लोक शिवरात्र, विठोबा, देवाची पूजा करीत. हिंदू लोक विठ्ठल, मारुती, गणपती, मुरलीधर, दत्त, वेताळ, शंकर, संत दामाजी, संत चोखामेळा यांची पूजा करीत असत. तर मुस्लिम लोक मशिदीत नमाज पडत असत.

### ४.६.१ मुहूर्त

मंगळवेढा शहरात शुभ मुहूर्त हा एखाद्या कार्यासाठी महत्त्वाचा मानला जाई. विवाह करण्यासाठी, नाव ठेवण्यासाठी, दत्तक घेण्यासाठी, गृहप्रवेशासाठी मुहूर्त पाहिला जात असे. लोकांचा ज्योतिषावर विश्वास होता.

### ४.६.२ सण व उत्सव

मंगळवेढा शहरात लोक दरवर्षी अनेक सणसाजरे करीत असत. हिंदू लोक गुढीपाडवा, रामनवमी, दसरा, दिवाळी, मकरसंक्रांत, होळी, शिवरात्री, गोकुळाष्टमी, नारळीपौर्णिमा व गणेशचतुर्थी इत्यादी सण साजरे करीत असत. प्रत्येक महिन्यात पुढील प्रमाणे सण व उत्सव साजरे केले जातात.

**अ) चैत्र**

चैत्र महिन्यात गुढीपाडवा हा सण साजरा केला जातो. या दिवशी घराच्या दाराशी वेळूच्या काठीवर फुलपात्र व फुलांची माळ, साखर, खोबऱ्याचा हार घालुन गुढी उभारतात. या शुभदिवशी नवीन कामाचा प्रारंभ करतात. वर्षातील साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभमुहूर्त मानला जातो. या दिवशी घरोघरी पुरणपोळीचे जेवण करतात. याशिवाय या महिन्यात रामनवमी व गौरीपूजा हेही सण साजरे केले जातात.

**ब) वैशाख**

या महिन्यात लिंगायत लोक बसवेश्वर जयंती साजरी करतात. तर हिंदू लोक अक्षयतृतीया हा सण साजरा करतात. हा सण वैशाख शुध्द तृतीयेला येत असून साडेतीन मुहूर्तापैकी अर्धामुहूर्त समजतात. या दिवशी पितरांची पूजा करून कलश दान केले जाते. शेतकरी कामाचा शुभारंभ यादिवशी करतात.

**क) जेष्ठ**

या महिन्यात हिंदू लोक वटपौर्णिमा हा सण साजरा करतात. यादिवशी हिंदू स्त्रिया उपवास करून वडाची पूजा करतात व आपल्या पतीला दिर्घायुष्य मागतात.

**ड) आषाढ**

या महिन्यात आषाढ शुध्द एकादशीला वारकरी पंथाचे लोक उपवास करतात. पंढरपूरला विठ्ठलाच्या वारीला जातात. याशिवाय याच महिन्यात बेंदूर हा सण साजरा केला जातो. यादिवशी बैलांना सजवून त्यांची मिरवणूक काढून पूजा करतात.

**इ) श्रावण**

या महिन्यात हिंदू लोक अनेक उपवास, व्रत व उत्सव करता. या महिन्यातील सोमवारी शिवभक्त उपवास करतात. नववधू शिव शंकरांच्या पिंडीवर बेल वाहतात. या महिन्यात मांस खाणारे लोक केवळ शाकाहार करतात. श्रावण शुध्दपौर्णिमेला नारळीपौर्णिमा साजरी करतात. याच महिन्यात गोकुळाष्टमी सण साजरा करतात. या दिवशी श्रीकृष्णाची पूजा करतात. याच महिन्यात रामायण, महाभारत, नवनाथ या ग्रंथांचे वाचन केले जाते.

**ई) भाद्रपद**

या महिन्यात शुध्द चतुर्थीपासून ते अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशोत्सव साजरा करतात. गणपती विसर्जन महादेवाच्या विहरीत व कृष्णतलावात केले जाते. गणेशचतुर्थीनंतर तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी गौरीची स्थापना करतात. ऋषीपंचमी हा सणसुध्दा शुध्दपंचमीला साजरा करतात.

**उ) अश्विन**

मंगळवेढा नगरीमध्ये नवरात्रोत्सव सण मोठया दिमाखात धामधूमीत साजरा केला जातो. तुळजापूर येथून ज्योत आणून देवीची प्रतिष्ठापना केली जाते. मंगळवेढ्याच्या प्रत्येक घरामध्ये शेतातून आणलेल्या मातीमध्ये धान्याचे बियाणे टाकून घट बसविले जातात. प्रत्येक गल्लीमध्ये देवीची प्रतिष्ठापना केली जाते. या उत्सवामध्ये सर्व जाती-जमातीचे लोक सहभागी होतात. देवींना नवस बोलतात. देवीची साडीचोळीने ओटी भरतात. मंगळवेढा शहरातील बाजारचौकातील मारुतीच्या पटांगणातील देवीच्या ट्रस्टचे अध्यक्ष अहमद मुलाणी मुस्लिम आहेत. शांततेत हा सण मोठ्या धार्मिक भावनेने साजरा केला जातो. अनेक ठिकाणचे, अनेक गावचे लोक हा उत्सव पाहण्यासाठी मंगळवेढ्यात येतात. उत्सवाची सांगता करताना नऊ दिवस संपल्यानंतर देवीची मिरवणूक काढली जाते व विसर्जन केले जाते. विजयादशमी (दसरा) सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. घरोघरी बसविलेले घट उठविले जातात. व नागरिकांना पानसुपारी दिली जाते. याच महिन्यात दिपावली हा सण साजरा केला जातो. या पाच दिवसात घरोघरी आकाशकंदील, मातीच्या पणत्या लावतात. फराळाचे पदार्थ करतात. नरकचतुर्दशीला घरातील सर्व माणसे अभ्यंग स्नान करतात. अमावश्येला लक्ष्मीपूजन केले जाते. कार्तिकशुध्द प्रतिपदेला बलिप्रतिपदा असे म्हणतात. नंतर भाऊबिज हा दिवाळीचा शेवटचा दिवस मानतात. यादिवशी बहिण भावाला ओवाळते.

**ऊ) कार्तिक**

कार्तिक शुध्द द्वादशीला तुळशीचे विष्णू बरोबर लग्न लावतात. तुळशीचा लग्नानंतर लग्नकार्याचा प्रारंभ होतो.

**ए) पौष**

मकरसंक्रांत हा सण या महिन्यात येतो. यादिवशी कुंभाराकडून आणलेल्या मातीच्या सुगडांची सुवासिनी पूजा करतात. सुवासिनी सुगड कडेवर घेऊन दामाजीच्या मंदिरात जातात व एकमेकांना भेटवस्तू देतात. पुरुष लोक एकमेकांना तिळगुळ देऊन आपआपसातील द्वेष गोडबोलण्याच्या वचनाने संपवतात.

**ऐ) माघ**

माघ वद्य चतुर्दशीला शिवोपासक उपवास करतात. काशिविश्वेश्वराच्या मंदिरात जाऊन त्याची पूजा करतात.

**फ) फाल्गुन**

फाल्गुन महिन्यात पौर्णिमेला रात्रीची होळीची पूजा केल्यानंतर ती पेटवितात या दिवशी पुरणपोळी मिष्टान्न करतात. दुसऱ्यादिवशी धुलीवंदन सण असतो.त्यावेळी मांसाहारी लोक मांसाहार करतात व पाचव्यादिवशी  रंगपंचमीचा सण साजरा करतात. यात एकमेकांवर रंग उधळतात. ख्रिश्चन लोक नाताळ, गुडफ्रायडे, इस्टर डे सण साजरा करतात. यामध्ये २५ डिसेंबर या दिवशी नाताळ (ख्रिसमस) मोठ्या आनंदाने साजरा करतात. मुस्लिमलोक मोहरम, बकरीईद, ईद-ए-मिलाद सण साजरे करतात. मंगळवेढ्यातील सर्व जातीधर्माचे लोक या सणामध्ये सहभागी होतात. डोला हिंदू मुस्लिम मोठ्या उत्साहाने साजरा करतात. याचे मंगळवेढ्याचे एक वैशिष्टय म्हणजे गैबिपीर या पंचकमीटीचे अध्यक्ष विष्णूपंत औताडे आहेत.[४६]

## ४.६.३ मंगळवेढा शहरातील जातीय समानता

पूर्वी जातीभेद पाळला जात होता. आता समाज सुशिक्षित झाला आहे. समाजपरिवर्तन झालेले आहे. त्या जातीभेदाची बंधने तुटली व मंगळवेढ्यातील सर्वसमाज एकसंग झाला आहे. कोणत्याही समाजातील महापुरुषाच्या जयंत्या असो अथवा मिरवणूका असो. त्यामध्ये सर्व समाज सहभागी होतो. कोणत्याही जातीवर अन्याय कला जात नाही. सर्वसमाजाला मंगळवेढा नगरीमध्ये समान वागणूक दिली जाते.[४७]

**तक्ता क्र.४.२**


**मंगळवेढा नगरपालिकेतील धर्मनिहाय लोकसंख्या**

| हिंदू | ख्रिश्चन | मुस्लिम | बौध्द | जैन/मारवाडी | इतर धर्म | धर्म न सांगितलेले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २५४६५ | ९० | २१०० | ६०० | ४०० | १०० | ० | २८७५५ |

स्त्रोत: मंगळवेढा नगरपालिका वार्षिक अहवाल-२०१०

**आकृती क्र.४.२**

**मंगळवेढा नगरपालिकेतील धर्मनिहाय लोकसंख्या**




स्त्रोत: मंगळवेढा नगरपालिका वार्षिक अहवाल-२०१०

## ४.७ समारोप

मंगळवेढा नगरपरिषदेचा राजकीय व सामाजिक इतिहास हा मंगळवेढ्याच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचा आहे. राजकीय विकासाबाबत १८७४ ते २०१० पर्यंत लाभलेले

नगराध्यक्ष व नगरसेवक कार्याच्या दूरदृष्टीने महत्त्वाचे होते. या नगराध्यक्षांनी राबविलेल्या योजनांचा फायदा आज मंगळवेढा नगरपालिकेमधील तमाम नागरिकांना मिळत आहे.

मंगळवेढा नगरपालिका समाज संवर्धनासाठी १८७४ पासून महत्त्वाची भूमीका बजावत आहे. या नगरपालिका हद्दीत सर्व जातीधर्माचे लोक मिळून मिसळून राहतात. तसेच मंगळवेढा परिसरातील लोकांचे आर्थिक दरडोई उत्पन्न सर्वसाधारण असले तरी सर्व स्तरावर सर्व प्रकारचे व्यवसाय या हद्दीत चालतात. मंगळवेढा नगरपालिकेत धर्मनिहाय लोकसंख्या कमी जास्त असली तरी या सर्व जाती-जमातीत कमालीचा एकोपा, बंधुभाव दिसून येतो.

# संदर्भ सूची


१. मंगळवेढा संस्थान पटवर्धन घराण्यातील ऐतिहासीक कागदपत्रे, १९३० ते १९६०, मंगळवेढा

२. मंगळवेढा नगरपालिका प्रशासकीय अहवाल, सन १९५५-६०, पृ.१९८.

३. मंगळवेढा नगरपालिका वार्षिक अहवाल, सन १९६०-६१, पृ.४८.

४. प्रत्यक्ष मुलाखत, नागणे कुटुंब, मंगळवेढा, दि.१५-१-२०१३.

५. मंगळवेढा नगरपालिका प्रशासकीय अहवाल, सन १९६५-६७, पृ.२१०.

६. मंगळवेढा नगरपालिका वार्षिक अहवाल, सन १९६७-६८, पृ.१४४.

७. मंगळवेढा अर्बन बँक गौरव अंक, १९८५, पृ.७.

८. प्रत्यक्ष मुलाखत, राहूल शहा, दि.२०-२-२०१३

९. दैनिक मंगळवेढा, सन १९९५, पृ.१०.

१०. जैन सहयोग, जैन समाज पुरस्कृत मासिक, सन २०१०, पृ.२१

११. कित्ता, २२.

१२. प्रत्यक्ष मुलाखत, युवराज कलुबर्मे, दि.१०-३-२०१३.

१३. मंगळवेढा नगरपालिका वार्षिक अहवाल, सन १९९६-९७, पृ.१८०.

१४. प्रत्यक्ष मुलाखत, ललिता माळी, दि.१८-३-२०१३.

१५. मंगळवेढा नगरपालिका प्रशासकीय अहवाल, सन १९९९-२०००, पृ.७२.

१६. मंगळवेढा नगरपालिका वार्षिक अहवाल, सन २००६, पृ.८४.

१७. प्रत्यक्ष मुलाखत, महादेव माळी, दि.२०-४-२०१३.

१८. मंगळवेढा नगरपालिका वार्षिक अहवाल, सन २००८, पृ.९-१०.

१९. कित्ता, १२८.

२०. प्रभाकर देव, प्राचीन भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९५-पृ.४८

२१. सोलापूर गॅझेट, १८८५, पृ.२२४.

२२. कित्ता, पृ.२२६.

२३. कित्ता, पृ.२२८.

२४. मंगळवेढा लोकसंख्या सर्वे अहवाल, सन २०१०, पृ.३३८.

२५. कित्ता, ३३९.

२६. उपरोक्त, सोलापूर गॅझेट, पृ..२६८.

२७. कित्ता, पृ.२६९.

२८. मंगळवेढा सार्वजनिक सर्वे अहवाल, सन १९९५, पृ.३०६.

२९. कित्ता, पृ.३०८.

३०. उपरोक्त, मंगळवेढा लोकसंख्या अहवाल, सन २००५-१०. पृ.१६७.

३१. कित्ता, १६८.

३२. सोलापूर गॅझेट, भारत सरकारद्वारा प्रकाशन, १८८५, पृ.३२९.

३३. कित्ता, पृ.३३०.

३४. उपरोक्त, मंगळवेढा लोकसंख्या अहवाल, सन २००५-२०१०, पृ.३०.

३५. कित्ता, पृ.३३५.

३६. उपरोक्त, सोलापूर गॅझेट, २२०.

३७. कित्ता, पृ.२२१.

३८. समीर इंगळे, सोलापूर जिल्ह्यातील जमाती, कल्पना प्रकाशन, १९८०. सोलापूर, पृ.३८.

३९. कित्ता, ३९.

४०. मंगळवेढा सर्वे, सन १९८५-९०, पृ.२२१

४१. मंगळवेढा नगरपरिषद घरपट्टी अहवाल, सन १९९०-९५, पृ.१३८.

४२. उपरोक्त, समीर इंगळे, पृ.४९.

४३. एल.पी.शर्मा, प्राचीन भारत, लक्ष्मी नारायण अग्रवाल प्रकाशन, आग्रा, पृ.४९.

४४. कित्ता, पृ.४९.

४५. मंगळवेढा सामाजिक सर्वेक्षण, २०१०, पृ.१२

४६. कित्ता, पृ.१३

४७. कित्ता, पृ.१४.

# प्रकरण पाचवे

# मंगळवेढा नगरपालिकेतील प्रशासन संरचना

**५.१ प्रस्तावनाः**

**५.२ नगरसेवक आणि शहर विकासः**

**५.३ नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या**

**५.४ नगराध्यक्षांचे किंवा सभाध्यक्षांचे सभेसंबंधी अधिकार व कर्तव्ये**

**५.५ मुख्याधिकाऱ्यांच्या सभेसंबंधी जबाबदाऱ्या व कर्तव्ये**

**५.६ सभेची नोटीस व विषयपत्रिकाः**

५.६.१ सभेची नोटीसः

५.६.२ विषयांची यादीः

५.६.३ सभेची सूचना नगरसेवकांना रूजू करण्याची पध्दतः

५.६.४ पोस्टाने सभेची नोटीस पाठविणेः

५.६.५ सूचना फलकावर सभेची नोटीस प्रसिध्द करणेः

५.६.६ तहकूब सभेसाठी नोटीसः

५.६.७ सभेची नोटीस वेळेवर मिळाली नाही म्हणून हरकत घेतली तर सभेत झालेले काम कायदेशीर ठरते का?

५.६.८ सभेच्या अगोदर काही दिवस नोटीस देण्यामागचा उद्देशः

५.६.९ विषय पत्रिकेमधील विषयांची भाषा सुटसुटीत सोपी असावीः

**५.७ गणपूर्तीः**

**५.८ सभेचे इतिवृत्तः**

**५.९ नगरपालिका सभा आणि अर्थसंकल्पः**

**५.१० समारोप**

# प्रकरण पाचवे
# मंगळवेढा नगरपालिकेतील प्रशासन संरचना

## ५.१ प्रस्तावना:

नगरपालिकेच्या वाढ आणि विकासासाठी नगरपालिका प्रशासन ही एक महत्त्वाची गोष्ट मानली जाते. कारण कोणत्याही संस्थेचा विकास हा तिच्या कार्यक्षम व निर्दोष प्रशासन यंत्रणेमुळेच होत असतो. प्रशासन यंत्रणा जर योग्य असेल तर अनेक लोकोपयोगी कामे पार पाडली जातात. नगरपालिका प्रशासन यंत्रणेचा तर थेट संबंध या गोष्टीशी असतो. कारण सार्वजनिक आरोग्य, शहर स्वच्छता, रस्ते बांधकाम, पाणी पुरवठा, सांडपाण्याचा निचरा, रस्ते, दिवा बत्ती, ही प्राथमिक कामे नगरपालिकेकडून केली जातात. त्याचप्रमाणे दुय्यम दर्जाची कामे लोकप्रतिनिधींच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतात. थोडक्यात स्थानिक लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक, शारीरिक, मानसीक विकासाची गुरुकिल्ली म्हणजेच स्थानिक स्वराज्य संस्था होय.

नगरपालिकांची सेवा कार्यक्रमांची परिणाम कारकता ही ती कोणत्या पध्दतीने राबविली जाते यावर अवलंबून असते. नगरपालिकेकडील लोकानियुक्त प्रतिनिधींनी एखादा कायदा पास केला व एखादे धोरण ठरविले त्यानंतर कायद्याची किंवा धोरणांची अंमलबजावणी करण्याचा महत्त्वाचा प्रश्न नगरपालिका प्रशासनावर येवून पडतो. टेड ऑर्डवे या तज्ञाच्या मतानुसार प्रशासन नैतिक कायदा आहे. आणि प्रशासन म्हणजे नैतिकतेचा प्रतिनिधी आहे.[१]

नागरी सेवेचे महत्त्व विषद करताना हेरमन फिनार म्हणतात, पुरेसे संघटन ही राजकरणाची एक बाजू झाली तरी आपले राजकीय तत्वज्ञान आणि प्रतीचे नेतृत्व कर्मचारी वर्गानी केलेल्या पोहोच पावतीशिवाय आणि परिणामकारक अंमलबजावणी शिवाय कुचकामी ठरते आणि म्हणूनच नेतृत्वाबरोबर कर्मचाऱ्यांना सुद्धा तेवढेच महत्त्वाचे स्थान आहे.[२]

मंगळवेढा नगरपालिका प्रशासन व त्यांनी केलेल्या कामगीरीचा सन १८७४ ते २०१० पर्यंतचा आढावा पुढील प्रमाणे, सन १८७४ साली मंगळवेढा नगरपालिकेची स्थापना झाली तेव्हा नगरपालिकेची प्रशासन यंत्रणा ही लोकनियुक्त नव्हती तर ती यंत्रणा सरकारकडून चालविली जात असे. सरकारकडून लोकप्रतिनिधींची निवड केली जात असे. नगरपालिका

अध्यक्ष म्हणून सरकारी अधिकाऱ्यांची नेमणूक सरकारच करत असे. सरकारी अधिकारी वेळोवेळी भेटी देवून नगरपालिका कर्मचाऱ्यांना सूचना देत असे. त्यानुसार सूचनांची अंमलबजावणी नगरपालिका कर्मचारी करत असतो. नगरपालिका कारभारात अध्यक्षांच्या अधिकारतेस पात्र राहून नगरपालिकेच्या कार्याची प्रशासकीय अंमलबजावणी करणारा मुख्य कार्यकारी अधिकारी आहे. त्याचा दर्जा साधारणतः मामलेदार प्रकारचा असून योग्य पगारावर त्यांची नेमणूक केली जात असे. नगरपालिका ठरावाची अंमलबजावणी करणारा तो मुख्य प्रशासकीय अधिकारी आहे. त्याच्या हाताखाली इतर नगरपालिका कर्मचाऱ्यांनी कामे करावयाची असतात.[३]

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम ॲक्ट १९६५ कलम ७५ मध्ये मुख्याधिकारी पात्रतेचे नियम शासनाने केले आहेत. नगरपालिकेच्या आर्थिक, दैनंदिन, प्रशासकीय कामावर देखरेख ठेवणे, अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणे. ते स्थायी समितीस सादर करणे, नगरपालिका पैसा, मालमत्ता, संबंधात लबाडी, अपहार, चोरी, भ्रष्टाचार सर्व प्रकरणे अध्यक्ष व संबंधित समितीस कळविणे. नगरपालिका कर्मचाऱ्यांनी हलगर्जीपणा, दुर्लक्ष, गैरवर्तन इत्यादी केल्यास त्यांना शिक्षा करण्याचा अधिकार आहे.[४]

मुख्याधिकाऱ्यांची बदली एका नगरपालिकेतून दुसऱ्या नगरपालिकेत केली जाते. त्या वर्गाच्या नगरपालिकेनुसार पगाराची श्रेणी ठरविण्याची या कायद्याच्या तरतूदीनुसार मुख्याधिकारी नगरपालिकेचा नोकर म्हणून नोकरीस लागल्यापासून त्या नगरपालिकेत सेवानिवृत्ती होईपर्यंत राहत असे.[५]

सन १९४७ ते २०१० पर्यंत पुढील मुख्याधिकारी मंगळवेढा नगरपालिकेत होऊन गेले.

श्री.सिना आप्पा कुंभारे, श्री.द.म.करमरकर, श्री.विठ्ठल व्यंकटेश आवताडे, श्री.वासुदेव ज्ञानोबा भामूरे, श्री.मनोज शहा, श्री.महालिंग आंबूशी मुंडासी, सौ.उषा खानविलकर, सौ.अमिता दगडे, श्री.निशिकांत परयडराव, श्री.शिवाजीराव गवळी, श्री.सतिश पाटील, सौ.अमृता खानविलकर.

मुख्याधिकारी हा नगरपालिकेचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी असल्याने त्याच्या कार्यक्षमतेवर नगरपालिकेचा विकास अवलंबून असतो. लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या निर्णयाची

अंमलबजावणी करणेचे काम त्यांचे असते. त्यामुळे लोकप्रतिनिधी व मुख्याधिकारी यांचे संबंध सलोख्याचे असतील तर त्यांनी घेतलेल्या निर्णयाची योग्य अंमलबजावणी होऊन लोकांना नगरपालिका अधिक चांगली सेवा देवू शकते. पर एखादा अधिकारी भ्रष्ट निघाला व लोकप्रतिनिधी व मुख्याधिकारी यांच्यात बेबनाव निर्माण झाला तर त्याची फळे जनतेला भोगावी लागतात. म्हणून नगरपालिकेचा मुख्याधिकारी कार्यक्षम व दक्ष असला पाहिजे. तरच नगरपालिका प्रशासन सुनियंत्रीत चालते. नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना कोणकोणती कामे करावी लागतात याचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.[६]

नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवणूका दर पाच वर्षांनी पार पाडल्या जातात. निवणूकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर पहिल्या काही दिवसात विजयी उमेदवारांचे सत्कार समारंभ सोहळे आयोजित केले जातात. निवडणूकीच्या वेळी विजयी उमेदवाराने मतदारांना जी आश्वासने दिलेली असतात, मतदारांशी जो संपर्क ठेवलेला असतो, प्रभागासाठी जे काम केलेले असते ते पाहून मतदारांनी कौल दिलेला असतो. मतदारांनी आपले काम केलेले असते. विजयी उमेदवारांना संधी दिलेली असते. मतदारांचे म्हणणे असते. आम्ही आमचे काम केले, आता तुम्ही कामाला लागा.

निवडून आल्यामुळे नगरसेवक पद मिळाले. त्या पदामुळे प्रतिष्ठा मिळाली. परंतु ज्या पदामुळे प्रतिष्ठा मिळाली त्या पदाच्या कर्तव्यांचा व जबाबदाऱ्यांचा त्यांना विसर पडता कामा नये. नगरपालिकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या नमूद केल्या आहेत. कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी नगरसेवकांना प्रशासकीय यंत्रणा व निधीची उपलब्धता करून दिली आहे. या यंत्रणेचा व निधीचा सुयोग्य वापर करून शहरवासियांचे जीवन सुसह्य करण्यासाठी नगरसेवकांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. शहरांतील नागरिकांशी, मतदारांशी आपली बांधिलकी आहे याचे भान ठेवले पाहिजे. नागरिकांना मुलभूत सुविधा पुरविताना शहराचा सर्वांगिण विकास कसा घडवून आणता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे.[७]

नगरपालिका अधिनियम १९६५ मधील कलम ४९ मध्ये नगरपरिषदेची आवश्यकता व ऐच्छिक कर्तव्ये नमूद केलेली आहेत. ह्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये पार पाडण्यासाठीच नगरपालिका आहे. याशिवाय महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६, वृक्ष संरक्षण

(नागरी क्षेत्र) अधिनियम १९७५, विविध कामगार कायदे यामध्ये नमूद असलेली कर्तव्ये व जबाबदाऱ्या नगरपालिकेवर सोपविलेल्या आहेत. केंद्र शासनाची सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेची अंमलबजावणी करावयाची आहे. याशिवाय राज्य शासन वेळोवेळी अधिनियमाखाली अथवा नगरपालिकेस लागू असलेल्या अन्य अधिनियमाखाली जे नियम केलेले असता त्यांचे पालन नगरपालिकेस करावे लागते.

नगरपालिकेकडे जी विविध कामे, जबाबदाऱ्या व कर्तव्ये सोपविलेली आहेत. त्याबाबतचे निर्णय घेण्याची अधिकार नगरपालिका अधिनियमातील कलम ७ अन्वये नगरपालिका सभा, नगराध्यक्ष, स्थायी समिती, विषय समित्या व मुख्याधिकाऱ्यांना आहेत. नगराध्यक्ष प्रशासनाचे कार्यकारी प्रमुख आहेत. त्यांना मुख्याधिकाऱ्यांसह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामावर व वित्तीय कारभारावर देखरेख करण्याचा व नियंत्रण ठेवण्याचा अधिकार आहे. निकडीच्या परिस्थितीत नागरिकांना सेवा पुरविण्यासाठी किंवा त्यांच्या सुरक्षिततेसाठी ज्या तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या उपाययोजना करण्यासाठी व त्यासाठी जरूर तो खर्च करण्याचा अधिकार कलम ५८ (२) अन्वये नगराध्यक्षांना दिलेला आहे. मुख्याधिकाऱ्यांची कर्तव्ये व अधिकार अधिनियमाच्या कलम ७७ मध्ये नमूद केले आहेत. यात प्रामुख्याने नगरपरिषदेचा वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे, नगरपालिका सभा, स्थायी समिती, विषय समित्यांनी पारित केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करणे, नगरपालिकेचे लेख व नोंदणी पुस्तके नियमानुसार ठेवण्याची व्यवस्था करणे, त्यावर देखरेख ठेवणे, नगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांना नेमून दिलेल्या कामावर व कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण ठेवणे यांचा समावेश आहे. नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना दिलेला अधिकार सोडून इतर सर्व अधिकार नगरपालिका स्थायी समिती व विषय समित्यांना आहेत. नगरसेवकांना, समिती सभापतींना वैयक्तिक अधिकार नाहीत. उपनगराध्यक्ष यांना नगराध्यक्षांनी त्यांच्याकडील काही अधिकार सोपविले असतील तर ते अधिकार वापरता येतात. नगराध्यक्षांना निकडीच्या वेळी नगरपालिकेच्या निधीतून खर्च करण्याचा अधिकार आहे. तथापि मुख्याधिकारी यांना स्वतःच्या अधिकारात नगरपालिका निधीतून खर्च करण्याचा अधिकार नाही. नगरपालिका सभेच्या मान्यतेने अधिनियमाच्या कलम ९३ अन्वये ठराविक

रक्कमेपर्यंतच्या कामांचे करार करण्याचे अधिकार मुख्याधिकाऱ्यांना आहेत. नगरपालिका अधिनियमातील कलम ४९ मध्ये नमूद केलेली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी 'अ' व 'ब' नगरपालिकांनी अधिनियमातील कलम ७२ अन्वये विषय समित्यांची स्थापना करणे बंधनकारक केले आहे. 'क' वर्ग नगरपालिकेस स्थायी समिती स्थापन करण्यचाचे बंधन असून त्यांना आवश्यक वाटले तर विषय समित्यांच्या स्थापना करता येतात. स्थायी समितीची स्थापना करणे सर्व वर्गातील नगरपालिकांना बंधकनकारक आहे. अधिनियमाच्या कलम ७० अन्वये स्थायी समिती व विषय समितीकडे कोणते विषय सोपवावयाचे यासाठी नगरपरिषदेस उपविधी करता येतात. आणि सोपवलेल्या विषयासंबंधी अधिनियमातील कलम ७२ मध्ये नमूद असलेल्या आर्थिक मर्यादेस आधिन राहून स्थायी समिती व विषय समित्यांना निर्णय घेता येतात.[८]

नगरपालिका, स्थायी समिती व विषय समित्यांना त्यांच्याकडे नगरपालिका अधिनियम, अधिनियमाखाली शासनाने केलेले नियम व उपविधी याद्वारे जे विषय सोपविलेले असतात. त्या विषयासंबंधीचे निर्णय नगरपालिका, स्थायी समिती व विषय समित्यांच्या सभेत घ्यावयाचे असतात. नगरपालिकेच्या सभासंबंधी अधिनियमाच्या कलम ८१ या कलमाखाली शासनाने केलेल्या महाराष्ट्र नगरपालिका (सभा कामकाज) नियम १९६६ मध्ये सभा कामकाजासंबंधी कार्यप्रणाली ठरवून दिली आहे. नगराध्यक्षांनी नगरपालिकेची सर्वसाधारण सभा दोन महिन्यातून एकदा बोलविली पाहिजे असे बंधन आहे. नगराध्यक्षांना वाटल्यास आवश्यक तेवढ्या कितीही विशेष सभा बोलवण्याचा अधिकार आहे. तसेच नगरपरिषदेच्या एकूण सदस्य संख्येच्या एक चतुर्थांश सदस्यांनी विशेष सभेची मागणी केली तर नगराध्यक्षांना मागणीपत्र मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत विशेष सभा बोलविण्याचे बंधन आहे. विशेष सभेचे मागणीपत्र देऊनही नगराध्यक्षांनी सभा बोलविली नाही तर जिल्हाधिकारी यांचेकडे ज्या नगरसेवकांनी मागणीपत्र अध्यक्षांना दिलेले होते त्याच सदस्यांना नगरपालिकेची विशेष सभा बोलवावी अशी मागणी करता येते. असे मागणीपत्र जिल्हाधिकाऱ्यांना मिळाल्यापासून १५ दिवसांत नगरपालिकेची विशेष सभा बोलवण्याचे त्यांच्यावर बंधन आहे. तसेच नगराध्यक्षांनी दोन महिन्यातून किमान एकदा नगरपालिकेची सर्वसाधारण सभा बोलविली नाही तर त्याबाबतचा अहवाल

मुख्याधिकाऱ्याने जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करावा लागतो. मुख्याधिकारी यांचा अहवाल प्राप्त झाल्यापासून सात दिवसाचे आत नगरपालिकेची सर्वसाधारण सभा जिल्हाधिकाऱ्यांना बोलवावी लागते. वरील दोन्ही परिस्थितीत जिल्हाधिकारी ज्या-ज्या वेळी सभा बोलवितात त्या-त्या वेळी सभेचे अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी किंवा त्यांनी अधिकृत केलेले अधिकारी भूषवितात.[९]

स्थायी समिती व विषय समित्यांच्या सभेसंबंधी अधिनियमाच्या कलम ८२ मध्ये तरतूद आहे. या समित्यांच्या महिन्यातून किमान एकदा सभा बोलविण्याचे बंधन त्या त्या समित्यांच्या सभापतींवर आहे. सभापतींनी अधिनियमातील तरतुदीनुसार सभा बोलविली नाही तर नगराध्यक्षांना समितीची सभा बोलविता येते. तसेच समितीच्या एकूण सदस्य संख्येच्या एक चतुर्थांश कमी नाही इतक्या सदस्यंनी समित्यांच्या विशेष सभेची मागणी केल्यास विषय समितीच्या सभापतींना समितीचे विशेष सभा बोलवावी लागते. समिती सभापतींना गरजेनुसार विशेष सभा बोलविता येते.[१०]

नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा व विशेष सभांना मुख्याधिकाऱ्यांनी उपस्थित राहिले पाहिजे अशी अधिनियमातील कलम ८१ मध्ये तरतूद आहे. तसेच विषय समितीच्या सभापतीने मुख्याधिकाऱ्यांना विषय समितीच्या सभेस उपस्थित रहा असे कळविल्यास त्यांना समितीच्या सभेस उपस्थित रहावे लागते. नगराध्यक्ष अथवा विषय समितीच्या सभापतींना नगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यांना सभेस उपस्थिस राहण्याबद्दल आदेश देता येतो. मुख्याधिकारी व अन्य अधिकाऱ्यांना विचारलेली माहिती सभेत द्यावी लागते. नगराध्यक्ष व विषय समितीच्या सभापतींना मुख्याधिकाऱ्यांस त्यांच्या ताब्यात असलेली कागदपत्रे सभेत सादर करण्यासंबंधी आदेश देता येतो व अशा आदेशांची पूर्तता मुख्याधिकाऱ्यांनी केली पाहिजे. काही दस्तऐवज गोपनीय स्वरूपाचा असल्यास तो सभेस सादर करणे योग्य होणार नाही. असे मुख्याधिकाऱ्यांचे मत असेल तर अशी कागदपत्रे सभेस सादर करावयाची किंवा नाही याबात अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार नगराध्यक्षांना आहे.[११]

नगरपालिकेच्या सभासंबंधी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांची कोणती कर्तव्ये व जबाबदाऱ्या आहेत यासंबंधी शासनाच्या नगरविकास विभागाने व नगरपालिका प्रशासन

संचालनालयाने वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत, त्यांचे पालन नगराध्यक्षव मुख्याधिकाऱ्यांनी केले पाहिजे. आदेश परिशिष्टात दिलेले आहेत.

नगरपालिका आधिनियमातील नगरपालिकेस लागू असलेल्या अधिनियमातील कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासंबंधीचे निर्णय नगरपालिका, स्थायी समिती अथवा विषय समिती अथवा विषय समित्यांच्या सभेत घेतले जातात. त्यामुळे नगरसेवकांनी प्रथम नगरपालिका अधिनियमातील महत्त्वाच्या तरतुदी व नगरपालिकेशी संबंधीत असलेल्या अन्य अधिनियमातील तरतुदींचा अभ्यास केला पाहिजे. तसेच शासनाच्या नगर विकास विभाग व नगरपालिका प्रशासन संचालनालयाने केलेल्या नियमांचा व निर्गमित केलेल्या आदेशांचाही अभ्यास केला पाहिजे. नगरपालिका सभा नियमांचा नगरसेवकांना सखोल अभ्यास असला पाहिजे. नगरपालिका सभा ज्या विषयावर निर्णय घेण्यासाठी बोलाविली असेल त्या विषयांचा अभ्यास, सभा सुरु होण्यापूर्वी करणे आवश्यक आहे. विषयांचा अभ्यास केला तरच नगरसेवकांना आपले मत, विचार चांगल्या पध्दतीने मांडता येतील व आपले मत इतर नगरसेवकांना पटवून देता येईल. वर उल्लेखलेल्या विषयावरील अभ्यासामुळे त्या त्या विषयाचे ज्ञान मिळते. ज्ञानामुळे सभागृहात आपली प्रतिमा उंचावते. अभ्यासपूर्ण विचार व्यक्त केल्यास त्यास महत्त्व प्राप्त होते. विषयपत्रिकेवरील विषयांचा अभ्यास केला नाही, अधिनियमातील तरतूदी व सभा नियमांची माहिती नसेल तर एखाद्या नगसेवकंकडे वक्तृत्वाची कला असूनही सभा कामकाजात भाग घेणे अडचणीचे होते. सभा कामकाजात भाग घेतला नाही तर नागरिकांच्या व प्रभागाच्या समस्या सभागृहाला कशा समजणार? आपल्या प्रभागातील समस्या इतर सदस्यांशी मांडण्याची अपेक्षा करणे योग्य ठरत नाही. विषयांच्या अभ्यासाबरोबर आपले विचार अनुरुप भाषेत व ठरवून दिलेल्या वेळेत मांडण्याची कला अवगत केली पाहिजे. श्रोत्यांना कळावे आणि कळेल असे बोलावे. आपल्याच नादात बोलत राहू नये. ही कला जन्मजात असते असे नाही. सरावाने बोलण्याची कला विकसित करता येते, स्थायी समिती व विषय समित्यांच्या सभांमध्ये शक्यतोवर नगरपालिका सभांप्रमाणे नगरसेवकांना भाषणे करावी लागत नाहीत. तेथे सर्वसाधारणपणे चर्चा करून समोपचाराने निर्णय घेतले जातात. सूचनेला उपसूचना देणे, प्रश्न विचारणे, हरकतीचे मुद्दे उपस्थित करणे, मतदान घेणे असे प्रकार समित्या

सभांमध्ये सभेच्या तुलनेत समिती सभांमध्ये नगरसेवकांना भाग घेणे सोपे असते. समिती सभांमध्ये सदस्यांची संख्या कमी असते. तथापि नगरपालिका सभेला जे नियम लागू आहेत तेच नियम स्थायी समिती व विषय समित्या सभांना लागू आहेत लक्षात ठेवावे. स्थायी व विषय समित्यांच्या विशेष व तातडीच्या सभा बोलाविता येतात.[१२]

लोकशाहीचा शहरी भागातील सर्व सामान्यांचा पहिला आवाज उठविण्याचे साधन कोणते असेल? तर ते नगरपालिकेचे सभागृह. नगरपालिकेचे सभागृह म्हणजे शहराचे व्यासपीठ. मात्र सभागृहात शहरातील नागरिकांना मुलभूत सेवा सुविधा पुरवून त्यांचे जीवन सुसह्य करण्याचे, शहराचे सौंदर्य व वैभव वाढविण्याचे निर्णय होत असतात. लोकप्रतिनिधींना घेतलेल्या निर्णयांची प्रशासनाने वेळेवर अंमलबजावणी केली नाही तर प्रशासनाला जाब विचारण्याचे ठिकाणही नगरपालिकेचे सभागृहच असते. अशा महत्त्वपूर्ण नियमांचे पालन करून झाले पाहिजे. कायद्याचे, सभा नियमांचे व सभा सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी पिठासीन अधिकाऱ्यांची म्हणजेच नगराध्यक्षांची असते. त्याचबरोबर पिठासीन अधिकाऱ्यांना सहकार्य करण्याची व विषयपत्रिकेवरील सर्व विषयांचा निर्णय लागेल हे पाहण्याची जबाबदारी नगरसेवकांचीही असते. सभागृहात निर्णय घेताना समाजहित डोळ्यासमोर असावे. प्रत्येक विषयावर नगरसेवकांना विचार व्यक्त करण्याचा हक्क आहे. विचारा विचारांमध्ये मतभेद असू शकतात. परंतु वैचारिक मतभेदांचे रूपांतर वैयक्तिक द्वेषामध्ये होऊ नये. सतत आरडाओरड करणे, फायली फेकणे, कागदपत्रे, बाके वाजविणे, घोषणा देणे, अध्यक्षांच्या आसनाकडे धाव घेणे किंवा त्यांच्या आसनासमोर बैठक मारणे असे प्रकार होऊ लागले तर अध्यक्षांना कामकाज चालविणे अशक्य होते. अशा प्रकारच्या वेळी जर नागरिक प्रेक्षक म्हणून सभागृहात हजर असतील तर त्यांना वाटेल की, असले दर्शन घडविण्यासाठीच आम्ही त्यांना निवडून दिले आहे काय? असले दर्शन घडण्याचा प्रसंग नागरिकांच्या नशिबी येऊ नये याची दक्षता नगरसेवकांनी घेतली पाहिजे. तसेच अशा वातावरणाच्या वेळी अध्यक्षांनी हताश होऊन कसे चालेल? ज्या कारणामुळे सभागृहाचे वातावरण बिघडले ते कारण विचारात घेऊन निपक्षपाती निर्णय दिले, प्रामाणिकपणे सहाकार्याचे आवाहन केले, रास्त मागण्या केल्या तर वातावरण थंड व्हायला मदत होते. प्रसंगी थोडा वेळ सभा तहकूब करणेही रास्त ठरते. त्यामुळे पुन्हा सभा भरल्यानंतर

कामकाज सुरळीतपणे पार पडू शकते. नगरसेवकांच्या वागण्यामुळे अध्यक्षांनी चिडून जाऊ नये, मनावर संयम राखणे आवश्यक असते. अशावेळी माणसे हाताळण्याची कला अवगत असेल तर नगरसेवकांना शांत करता येते. अध्यक्षांना आपल्या वागण्यामुळे, सुयोग्य निर्णयामुळे त्यांच्याबद्दल नगरसेवकांमध्ये आदरभाव निर्माण करता येतो. प्रसंगानुसार ज्यावेळी अधिकाराचा वापर करणे अनिवार्य ठरते अशावेळी अध्यक्षांनी अधिकाराचाही वापर केल्यास त्याबद्दल त्यांना कोणी दोष देणार नाही.[१३]

अध्यक्ष प्रशासनाचे कार्यकारी प्रमुख, शहराचे प्रथम नागरिक, सभागृहाचे नेते. त्यांनी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनालाही बरोबर घेऊन काम करावयाचे असते. असे धोरण ठवेले तर सर्वांची साथ मिळते व उद्दिष्ट साध्य करणे सोपे होते. काही प्रसंगी सभागृहात प्रशासनावर आरोप होतात, बोचरी टिकाही होते. प्रशासनाकडून जर सभागृहाने घेतलेल्या निर्णयांची वेळोवेळी अंमलबजावणी होत नसेल किंवा लोकप्रतिनिधींच्या कामात जाणूनबुजून अडथळे आणत असेल तर संबंधीत अधिकाऱ्यांच्या कामाबाबत टिका करणे रास्त ठरते. परंतु आम्ही सांगेन ते काम होत नाही म्हणून जर टिका होत असेल तर प्रशासनाचे मनोबल खचते. नगराध्यक्ष व नगरसेवकांनी प्रशासनातील जे अधिकारी व कर्मचारी चांगले काम करतात त्यांचे कौतुक केले पाहिजे. प्रशासनावर जर अकारण टिका होत असेल तर त्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. असे घडल्यास प्रशासनामध्ये उत्साह निर्माण होऊन त्यांची कार्यक्षमता वाढू शकते. लोकप्रतिनिधींनी निर्णय घेताना प्रशासनातील अनुभवी अधिकाऱ्यांच्या अनुभवाचा उपयोग करून घेतला पाहिजे. प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी व यांनी लोकप्रतिनिधींचा योग्य तो मान राखला पाहिजे. लोकप्रतिनिधी व प्रशासन यांनी एकमेकाला समाजावून घेऊन काम केल्यास नागरिकांच्या नगरपालिकेकडून असणाऱ्या अपेक्षा पूर्ण होण्यास मदत होऊ शकते. जनतेशी बांधिलकी ठेवणाऱ्या व शहराच्या विकासासाठी सचोटीने प्रयत्न करणाऱ्या लोकप्रतिनिधींना व प्रशासनाला जनतेची साथ मिळते. लोकप्रतिनिधींनी सर्वसामान्य नागरिकांशी आपला संपर्क तुटणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. नगराध्यक्ष, नगरसेवक व प्रशासन यांनी आपण जनतेचे मालक नसून सेवक आहोत या भावनेने सचोटीने काम केले तर शहराची उत्कर्षाकडे गतीने वाटचाल होऊ शकते.[१४]

## ५.२ नगरसेवक आणि शहर विकासः

ज्या शहरात आपण जन्मलो, लहानाचे मोठे झालो, ज्या शहराने आपणास बरेच काही दिले, त्या शहराचा पांग फेडण्याची संधी नगरसेवक झाल्यामुळे मिळालेली असते. ही संधी दवडू नये. नगरसेवक होणे हा सुध्दा सन्मान असतो. निवडून आलात, यशवंत झालात, चांगले काम करून किर्तीवंत व्हावे हीच मतदारांची अपेक्षा असते. महात्मा गांधीनी 'यंग इंडिया' मधील एका लेखात म्हटले होते, "I consider myself a lover of muncipal life. I think it is a rare privilage for a person to find himself in the position of a municipal councillor. It is a sacred task to be approached in a spirit of service."[१५] आपणास मिळालेल्या संधीचा वापर करून नागरिकांचे जीवन सुसह्य करण्याचे, आव्हान झेलण्याचे काम आपणास करावयाचे असते. मतदारांनी विश्वास टाकून शहराचा कारभार आपणाकडे सोपविलेला असतो. त्याला ठिगळ लावून कसे चालेल? निवडणूकीच्या वेळी दिलेल्या आश्वासनाच्या पूर्ततेसाठी पुढील पाच वर्षे अथक परिश्रम करावे लागतात. मतदारांच्या माफक अपेक्षा पूर्ण केल्या नाहीत तर पुढील निवडणूकीच्या वेळी कोणाला घरी बसवायचे आणि कोणाला संधी द्यायची हे मतदार ठरवित असतात. "आले मतदारांच्या मना तेथे कोणाचे चालेना" असा अनुभव अनेकांना येतो.

नगरपालिकेत अनेक राजकीय पक्षांचे, संघटनांचे नगरसेवक असणार, त्यांच्यामध्ये मतभेद असणार हे कार्यपद्धतीचे असावेत. राजकारण करावे पण ते समर्पित भावनेने केलेले सेवाकारण असावे. निव्वळ राजकारण नसावे. नगरसेवकांनी सेवाभाव मनात रुजविला पाहिजे. मनात जनहिताची तळमळ पाहिजे. जनतेला काम करणारे व करवून घेणारे नगरसेवक आवडतात. शहराचा विकास सर्वांनाच हवा असतो. त्यासाठी सर्व नगरसेवकांनी एकत्र बसावे. आपल्याला कुठे जायचे आहे आणि कोणती उद्दिष्टे साधावयाची आहेत ठरविले पाहिजे. उद्दिष्टांचा क्रम ठरविला पाहिजे. ठरविलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कामाला लागावे लागते. उद्दिष्टे ठरविताना नगरसेवकांच्या राजकीय पक्षाचा विचार होवू नये. नैसर्गिक न्याय मिळाला पाहिजे असे आपण म्हणतो. याचा अर्थ असा की निसर्ग कोणाचाही भेदभाव करीत नाही. गरीब,

श्रीमंत, सत्तारूढ, विरोधक यांना थंडी, उन, पाऊस, वादळ यांच्यासारखाच न्याय. जे विरोधी पक्षाचे नगरसेवक निवडून आलेले आहेत त्यांना सत्तारूढ पक्षातील नगरसेवकासारखाच न्याय मिळायला नको का? विविध कामासंबंधी सत्तारूढ व विरोधक असा भेदभाव ठेवला नाही तर सभागृहातील काम सुरळीतपणे पार पाडण्यास व जनहिताची कामे मार्गी लावण्यास मदत होते. विरोधी पक्षातील नगरसेवक प्रतिस्पर्धी नसून शत्रू आहेत किंवा सत्तारूढ पक्ष म्हणजे पांडवांचा पक्ष व विरोधी पक्ष कौरवांचा पक्ष अशी भावना सत्तारूढ पक्षाची असू नये.[१६]

नगरपालिकेच्या कारभाराचा पसारा मोठा असतो. नगरसेवक हा त्या पसाऱ्याचा एक छोटा भाग असतो. नगरसेवक म्हणून काम करताना स्वतःचे व्यक्तिमत्त्व विकसित करायला नगरपालिकेचा फार मोठा हातभार लागतो. नगरपालिकेच्या सभागृहात आपण जर अभ्यासपूर्ण विचार मांडले, प्रश्न विचारले, कामकाजातील प्रशासनातील, त्रुटी निदर्शनास आणल्यस शहर विकासाच्या तसेच पायाभूत व अत्यावश्यक सोयी सुविधा पुरविण्यासाठी चांगल्या योजना सभागृहापुढे मांडल्या तर त्यास प्रसार माध्यमांत चांगली प्रसिध्दी मिळते. अशा नगरसेवकांबद्दल जनतेत आदर निर्माण होतो. नगरपालिका प्रशासनामध्येही त्यांचा दबदबा निर्माण होतो. ज्या नगरसेवकाबद्दल असा आदरभाव निर्माण होतो. त्यास पुन्हा जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळते. जनतेच्या हितासाठी तळमळीने, जोमाने काम केलयाने मोठ्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळते. थोडक्यात 'जे जे कैसे करिती ते ते पावती तैसिची'. उपनिषदात एक वाक्य आहे, "स्थितस्य गतिः चिंतनीय" याचा अर्थ निष्क्रिय माणसाचे भवितव्य चिंताजनक असते. याउलट 'चाराति चरतो चर:' जो चालतो त्याचे भाग्य उजळते. आपण जर समाजसेवेचे बीज पेरले नाही तर समाजाला आपल्याबद्दल आस्था का वाटावी? सभागृहात एखाद्या नगरसेवकाने चांगले विचार उत्कृष्ट वक्तृत्व शैलीत मांडले तर प्रसारमाध्यमात चांगली प्रसिध्दी मिळते. तेच विचार नगरसेवक नसताना सभागृहाबाहेर मांडले तर पहिल्यासारखी प्रसिध्दी मिळते का? म्हणून नगरसेवकांनी लक्षात ठेवावे की नगरपालिकेच्या माध्यमातून त्यांना व्यक्तिमत्त्व विकासाची संधी मिळते. आपल्याला व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणावयाचा आहे तर त्यासाठी चांगले काम केले पाहिजे.[१७]

नागरी लोकसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. लोकांच्या अपेक्षा वाढत आहेत. अपेक्षा पूर्ण करण्यासाठी नगरपालिकांची साधनसामुग्री अपुरी पडत आहे. वाढत्या अपेक्षा पूर्ण कण्यासाठी उपलब्ध साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर करणे ही एक कसरत असते. त्यासाठी दरवर्षी अर्थसंकल्प तयार केला जातो. अर्थसंकल्प म्हणजे नव्या वर्षाचे नवे संकल्प. मतदारासाठी नव्या आशा, नव्या अपेक्षा, पुढील वर्षासाठी ठरविलेल्या विकासाच्य नव्य दिशा. पुढील वर्षाच्या भवितव्याचा आराखडा. पुढील आर्थिक वर्षात उपलब्ध असलेली साधनसामुग्री जनतेच्या हिताच्या दृष्टीने उत्तमरित्या वापरणे. जमाखर्चाचा चांगला मेळ घलून जास्तीत जास्त उपयुक्तता साधणे. अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट. पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पासोबत चालू वर्षाचा सुधारीत अर्थसंकल्प सादर होतो. पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पावरील चर्चेच्यावेळी चालू वर्षाच्या अर्थसंकल्पावरही चर्चा करता येते. चालू आर्थिक वर्षातील गेल्या ९-१० महिन्यात काय केले, काय कमावले, काय केले नाही, का केले नाही याचा ताळमेळ पाहता येतो. एक प्रकारचे सिंहावलोकन असते. डौलदार चालीने संथ गतिने चालणारा सिंह काही अंतर चालून गेल्यावर क्षणभर थांबून मागे वळून बघतो. याला आपण सिंहावलोकन म्हणतो. असे सिंहावलोकन जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आवश्यक असते. अर्थसंकल्पावर किंवा तिमाही जमाखर्चाच्या ताळेबंदपत्रकावर चर्चा चालू असताना नगरसेवकांनी चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात जमा व खर्चाच्या बाजूला ज्या तरतूदी केल्या होत्या त्यावर प्रथम विचारविनिमय करावा. पुष्कळ वेळा असे दिसून येते की, तरतुदी खूप चांगल्या असतात. विकासांच्या कामांची चित्रे चांगली रंगविलेली असतात. परंतु तरतुद व अंमलबजावणी यात खूप तफावत असते ही तफावत का? कशामुळे? याची चर्चा झाली पाहिजे. मिमांसा केली पाहिजे. केवळ चर्चा करून भागत नाही. उपाययोजनाही सुचविल्या पाहिजेत. अर्थसंकल्पावरील चर्चा म्हणजे नगरपालिकेतील विविध खात्यांच्या प्रगती पुस्तकांची तपासणी. अशा चर्चेमुळे प्रशासनात जागरूकता निर्माण होते.[१८]

मतदार खूष व्हावेत अशा प्रकारचा अर्थसंकल्प सत्तारूढ पक्षाकडून मांडला जातो. अर्थसंकल्पात नागरिकांना चांगल्या सोयीसुविधा पुरविण्यासाठी व विकास कामासाठी भरीव तरतूद असतील अशा तरतूदीमुळे नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण होणार असतील तर नागरिकांचे मन सत्तारूढ पक्षाच्या बाजूने वळविणे सोपे होते. सत्तारुढ पक्ष अर्थसंकल्पाचा वापर एखाद्या

आयुधासारखा करतो. संसदीय लोकशाहीत असे चालणार विरोधी पक्षाने समजून घेतले पाहिजे. चांगली स्वप्ने दाखविणारा अर्थसंकल्प मांडला तर त्याप्रमाणे कामे झाली नाहीत तर सत्तारूढ पक्ष नापास झाला असे म्हणायला किंवा विरोधी पक्षाला प्रचार करायला वाव मिळतो. जनतेने पाहिलेल्या चांगल्या स्वप्नांचा तर चुराडा झालेला असतो. विरोधी पक्षाला अर्थसंकल्पातील चर्चेच्या वेळी पै पै खर्चाचा हिशोब मागण्याचा आणि विश्लेषण करण्याचा अधिकार असतो. यासाठी प्रथम अर्थसंकल्प वाचायला शिकले पाहिजे. विरोधी पक्ष नगरसेवक सभा नियमांचे तंतोतंत पालन करून सत्तारूढ पक्षाला उघडे पाडू शकतो. परंतु सभेला जाण्यापूर्वी गृहपाठ केला पाहिजे. सत्तारूढ पक्षाच्या चुका निदर्शनास आणून चुकीचे काम करण्यापासून रोखणे विरोधी पक्षाचे काम आहे. तथापि कामकाजात सहभाग घेण्याऐवजी गोंधळ घालणे, गदारोळ करणे, कामकाजावर बहिष्कार घालणे, अडथळे आणणे, घोषणाबाजी करणे, दुसऱ्याला बोलू न देणे, दुसऱ्याचे ऐकून न घेणे, आरोप प्रत्यारोप करणे आणि परस्परांवर चिखलफेक करणे एवढेच विरोधी पक्षाचे काम ही भावना असू नये. सभेसाठी जातो ते कामकाजात भाग घेण्यासाठी मग सभा कामकाज बंद पाडून आपण काय साधतो याचा विचार व्हायला हवा. सभागृहाचे कामकाज झाले नाही तर शहराचे प्रश्न सुटणार कसे? गोंधळ घालन सभागृह डोक्यावर घेतले की सभा गाजवली असा समज करून घेऊ नये. जनतेला कार्यक्षम व सुनियोजितपणे काम करणारे सभागृह हवे असते. शहरवासियांचे हित साधण्यासाठी आपण सभागृहात बसलो आहोत याची जाणीव ठेवणे आवश्यक असते.[१९]

सत्तारूढ पक्ष जोपर्यंत चांगले काम कायद्याच्या, नियमांच्या चौकटीत राहून करतो, विरोधी पक्षांच्या चांगल्या सूचना स्वीकारतो तोपर्यंत विरोधी पक्षाने त्यांना सहकार्य केले पाहिजे. चुकत असेल तर संसदीय आयुधांचा वापर करून त्यास रोखले पाहिजे. सत्तारूढ पक्षाने विरोधी नगरसेवकांच्या चांगल्या सूचनांचा सन्मान राखून सहकार्य घेण्याची तयारी दाखविली, पक्षपातीपणा केला नाही तर त्याचा परिणाम नागरिकांना समाधानकारक सोयीसुविधा मिळण्यांस होईल आणि चांगल्या लोकप्रतिनिधीकडे कारभार सोपवल्याचे समाधान मिळेल.[२०]

सार्वत्रिक निवडणूकीच्यावेळी आपण मतदारांकडे जाताना त्यांना मते देवून सेवा करण्याची संधी द्या अशी विनंती करता, एरव्ही सामान्य जनासी नाव घेवून बोलत होता. त्यांना

काका, मामा, ताई, आक्का म्हणू लागला. कारण निवडणूकीच्यावेळी सामान्य जणांना बोलबाला असतो. त्यांनी दिलेल्या मतांमुळे आपणास नगरसेवक होण्याचा सन्मान मिळाला. नंतर चित्र पालटते. निवडणूकीनंतर जेव्हा मतदार आपल्याकडे गाऱ्हाणी घेऊन येतात तेव्हा त्यांना साधी भेट मिळण्यासाठी ताटकळत बसावे लागते. त्यांच्या मनाला किती वेदना होतील असा कोणताही प्रकार करू नये. किरकोळ कामांसाठी मतदारांना अनेक खेटे घालण्याची पाळी येणार नाही यासाठी नगरसेवकांनी दक्ष राहिले पाहिजे.[२१]

नगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांनी सामान्यजनांना समाधानकारक व वक्तशीर सेवा दिली पाहिजे. ते त्यांचे कर्तव्य आहे. प्रशासनाचा दृष्टीकोन सकारात्मक असायला हवा. याप्रमाणे घडते का नाही पाहण्याची जबाबदारी नगरसेवकांची आहे. अधिकारी व कर्मचारी आपली जबाबदारी, कर्तव्ये योग्यरीतीने पार पाडीत नसतील तर त्यांना जाब विचारण्याचा आधिकार नगरपालिका सभेला असतो. नागरिकांना नगरपालिका कार्यालयात गेल्यावर घृणास्पद, तुच्छतेची वागणूक न मिळता चांगली वागणूक मिळेल याकडे नगरसेवकांनी लक्ष दिले पाहिजे.[२२]

नागरिकांची रितसर कामे रितसर मार्गाने अडसर न येता प्रशासनाकडून दिरंगाई होणार नाही, त्यांची सतावणूक होणार नाही याकडे नगरसेवकांनी लक्ष दिले पाजि. नगरपालिका सामान्यजनांचे जीवन सुसह्य करण्यासाठी असते. त्यांच्या अखत्यारित असलेले कायदेशीर काम करवून घेण्याचा हक्क प्रत्येक नगरवासियांचा आहे. मेहरबानी करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. प्रशासनातील बेफिकीर कर्मचारी असतील तर त्यांच्या कार्यपध्दतीत बदल घडवून आणण्याकरीता नगरसेवकांनी अधिकाराचा वापर केला पाहिजे.[२३]

सभा कामकाजामध्ये नगरसेवकांचा सहभाग वाढावा, त्यांच्यात नगरपालिका कायदा, सभा नियम, शासनाची नगरपालिकेबाबतची धोरणे, शासनाच्या विविध योजना यासंबंधी अभ्यास करण्याची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यातील वक्तृत्व, कला विकसीत व्हावी आणि कामकाज सुरळीत पार पाडावे या उद्देशाने दरवर्षी एका किंवा दोघा नगरसेवकांची आदर्श नगरसेवक म्हणून निवड करण्याबाबत व त्यांना योग्य तो पुरस्कार देऊन गौरव करण्याबाबत जरूर विचार झाला पाहिजे. निवडीसाठी जरूर ते निकष ठरविले जावेत. महाराष्ट्र विधिमंडळाने

विधी मंडळ सदस्यातून उत्कृष्ट सांसद, उत्कृष्ट भाषण पुरस्कार देण्यासाठी जे निकष ठरविले आहेत तशाच प्रकारचे निकष आवश्यकतेनुसार हवे ते बदल करून स्वतःचे निकष ठरविण्याबाबत विचार करणे योग्य ठरेल. आदर्श नगरसेवक पुरस्कार दण्याची योजना सरु केल्यास नगरसेवकांना सभा कामकाजात भाग घेण्यास प्रेरणा मिळेल व सभाकामकाज सुरळीत पार पाडण्यास मदत होईल. प्रत्येकाला आपला सन्मान व्हावा असे वाटते. मानवी मनाची ती प्रवृत्ती आहे. पुरस्कार मिळण्यास पात्र होण्यासाठी जी काही पथ्ये पाळावी लागतात, ती पाळण्यसाठी नगरसेवक कसोशीने प्रयत्न करतील. नगरसेवक जर आदर्श नगरसेवक झाले तर नगरपालिकाही आदर्श नगरपालिका होण्याकडे वाटचाल करू लागेल.[२४]

## ५.३ नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियमाच्या कलम ५८ मध्ये नगराध्यक्षांची व कलम ७७ मध्ये मुख्याधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या नमूद आहेत. नगरपरिषद अधिनियमाचे कलम ८१ व महाराष्ट्र नगरपरिषद सभा कामकाज नियम १९६६ मध्ये सभेचे कामकाज चालविण्यासंबंधी तरतुदी आहेत. यानुसार दर दोन महिन्यांनी नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा कलम ८१(१) अन्वये बोलाविले पाहिजे असे बंधन आहे. गरजेनुसार अध्यक्षांना अधिक सर्वसाधारण सभा किंवा विशेष सभा बोलाविता येतात. मात्र सर्वसाधारण सभा बोलविणेचा जो क्रम आहे त्यानुसार दर दोन महिन्यांनी क्रम येतो तो क्रम मोडणार नाही हे पाहणे आवश्यक आहे. दोन महिन्याच्या कालावधीत जर अध्यक्षांनी सभा बोलवली नाही तर मुख्याधिकाऱ्याने कलम ८१(१अ) नुसार जिल्हाधिकाऱ्यांना अध्यक्षांनी मुदतीमध्ये सभा बोलाविली नाही असा अहवाल सादर करावा लागतो. असा अहवाल प्राप्त झाल्यानंतर किंवा स्वतःला माहिती कळाल्यानंतर सात दिवसाचे आत जिल्हाधिकाऱ्यांना नगरपरिषदेची सभा बोलवावी लागते. मात्र सभेची विषयपत्रिका मुख्याधिकाऱ्यांशी विचारविनीमय करून ठरवावी लागते. येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, मुख्याधिकाऱ्याने दोन महिन्यांची मुदत संपताच अहवाल सादर करण्याची घाई करणे योग्य होणार नाही. नगराध्यक्षांना दोन महिन्यांची मुदत संपलेली आहे, त्यामुळे सभा बोलाविणे आवश्यक आहे असे समजावून सांगावे लागते असा प्रयत्न

केल्यानंतरही सभा बोलाविली नाही तर अधिनियमान्वये सोपविलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर केला पाहिजे. त्याचप्रमाणे सभा बोलाविण्यासाठी विषय असणे आवश्यक आहे. विषयच नसतील तर सभा कशासाठी बोलावयाची?[२५]

परभणी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षांनी डिसेंबर १९९१ ते जुन १९९३ या १८ महिन्याच्या कालावधीत फक्त ३ सर्वसाधारण सभा बोलाविल्या. महाराष्ट्र शासनाने नगरपरिषद अधिनियमाच्या कलम ५५ अ अन्वये नगराध्यक्षांनी आपल्या कर्तव्यात कसूर व दुर्लक्ष केले म्हणून रितसर चौकशी करून नगराध्यक्षांना पदावरून काढून टाकले. कर्तव्यात कसूर व दुर्लक्ष केल्याप्रकरणी जी कारणे नमूद होती, त्यापैकी एक कारण असे होते की, कलम ८१ (१) नुसार दर दोन महिन्यानी सर्वसाधारण सभा बोलविण्यात कसूर केली एक कारण होते. याबाबत परभणी नगराध्यक्षांनी जे अपील केले होते त्याची सुनावणी  मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात झाली. (मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, बाबूराव विश्वनाथ मठपती पिटीशनर विरूध्द महाराष्ट्र शासनातर्फे नगरविकास खात्याचे सचिव व इतर, रिट पिटीशन क्र..२९२८ व ३३३९/१९९४) या प्रकरणी झालेल्या निकालात असे नमूद आहे की, मुख्याधिकाऱ्याने नगराध्यक्षांनी २ महिन्याच्या मुदतीनंतरही सभा बोलाविली नाही असा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेला नाही. नगरसेवकानीही सभेची मागणीअध्यक्षांकडे केली नाही. मुख्याधिकाऱ्याने सभेच्या अभावी अनेक विषयावर निर्णय होणे प्रलंबीत आहेत असा अहवालही अध्यक्षांना दिला नाही. त्यामुळे विषयच नसतील तर सभा कशासाठी बोलाववयाची? म्हणून मा. न्यायालयाने नगराध्यक्षांनी वर उल्लेखलेल्या कारणासाठी दुर्लक्ष केले अथवा कर्तव्यात कसून केली असे होत नाही असे निकालपत्रात नमूद केले आहे. वरील परिस्थिती पाहता दोन महिन्यात जर अध्यक्षस्थानी सभा बोलाविली नाही तर मुख्याधिकाऱ्याने अध्यक्षांना लेखी अथवा अहवाल सादर करावा. त्यात सभेसाठी कोणते विषय आहेत व या विषयावर निर्णय घेण्यासाठी सभा बोलाविणे आवश्यक आहे, मागील सर्वसाधारण सभा होवून दोन महिन्यांचा कालावधी संपला आहे असे मुद्दे असावेत. याउपरही सभा बोलाविली नाही तर मुख्याधिकाऱ्याने जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर केला पाहिजे.[२६]

नगरपरिषदेच्या एकूण नगरसेवकांचे संख्येच्या १/४ हून कमी नाहीत इतक्या सदस्यांनी लेखी मागणी केली तर नगराध्यक्षांना मागणी पत्र पोहोचल्यापासून १५ दिवसाचे आत सभा बोलवावी लागते. या मुदतीत जर अध्यक्षांनी सभा बोलावली नाही तर ज्या नगरसेवकांनी पहिले मागणीपत्र अध्यक्षांकडे दिले त्याच नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे विशेषसभेची मागणी केली तर मागणीपत्र पोहोचल्यापासून जिल्हाधिकाऱ्यांना १५ दिवसांचे आत नगरपरिषदेची विशेष सभा बोलवावी लागते.[२७]

अध्यक्षांनी नगरपरिषदेची बोलाविलेली सभा कायदेशीर व्हावी यासाठी सभेची सूचना (नोटीस) परिपूर्ण असली पाहिजे. या सूचनेत सभा कोणत्या ठिकाणी बोलाविली आहे याचा उल्लेख पाहिजे. सूचनेच्या खाली अध्यक्षांची सही पाहिजे. अध्यक्ष जर रजेवर असतील व त्यांनी उपाध्यक्षांचा कार्यरभार सोपविला असेल तर ते अध्यक्ष म्हणून सभेच्या नोटीसीवर सही करतील. सभेच्या सूचनेचा नमुना अ नियमाच्या सोबत दिलेला आहे. सभेच्या सूचनेसोबत ज्या कारणासाठी सभा बोलाविलेली आहे त्याची विषय पत्रिका जोडली पाहिजे. विषयांचा क्रम सभा नियमाच्या नियम पाच अनुसार असला पाहिजे. विषय पत्रिकेतील विषय अधिनियमाच्या कलम ४९ मध्ये नमूद असलेल्या अत्यावश्यक व ऐच्छिक कर्तव्ये तसेच नगरपरिषदेस जे अन्य कायदे लागू केलेले आहेत त्यातील कर्तव्ये किंवा शासनाने अन्य कायदे अगर आदेशानुसार सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे यासंबंधी असले पाहिजेत. याला अपवाद म्हणजे विषय पत्रिकेवर अभिनंदनाचा अगर शोक व्यक्त करण्यासंबंधी विषय घेता येतो. विषयांचा क्रम नियमानुसार ठेवताना काही वेळा असे घडले की तो विषय ठेवून काही हेतू साध्य होत नाही. उदा. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे हा विषय क्रमांक दोन ला ठेवणे आवश्यक आहे. पण उत्तर देण्यासाठी एक ही प्रश्न शिल्लक नसेल किंवा नवीन प्रश्न आला नसेल तर विषय कशासाठी विषय पत्रिकेवर घ्यायचा? दुसरे उदाहरण म्हणजे शासन किंवा शासनाच्या निरनिराळ्या विभागाकडून आलेल्या पत्र व्यवहाराची माहिती देणे, येथे महत्त्वाचा व धोरणात्मक असा पत्रव्यवहार नियम, परिपत्रके, शासननिर्णय नगरपरिषदेकडे मागील सभेपासून सभेची सूचना निर्गमित करेपर्यंत आले असतील तर विषय पत्रिकेवर विषय होईल. नगरपरिषदेने करवसुलीची मासिक पत्रक अद्याप का पाठविले नाही अशा आशयाचे पत्र

जिल्हाधिकाऱ्याने पाठविले असेल तर ही नियमित कामासंबंधीची बाब आहे. अशा पत्रव्यवहाराची माहिती सभागृहाला देणे अपेक्षित आहे. नियमानुसार विषयांचा क्रम दर्शविताना सभासदांचे प्रश्न शासकीय पत्रव्यवहार निवडणूका व नेमणूका यासंबंधी काही कामकाज नसेल तर विषय नमूद करून पुढे निरंक हा शब्द लिहावा. असे केल्यास सभा नियमांचा भंग होणार नाही.[२८]

सभाध्यक्षांनी सभेचे कामकाज चालविताना अधिनियमातील व सभा नियमातील तरतुदींचे तसेच शासन अगर संचालक, नगरपरिषद, प्रशासन संचालनालयाने दिलेल्या आदेशांचे पालन केले पाहिजे. सभेचे अध्यक्ष स्वतः नगराध्यक्ष असतील तर त्यांच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारतात व दोघेही गैरहजर असतील तर सभेचे सदस्यांनी ठराव मंजूर करून निवडलेले नगरसेवक सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारतात. मात्र नामनिर्देशित नगरसेवकांची निवड करता येत नाही. सभाध्यक्ष म्हणून स्थानापन्न झाल्यानंतर सभाध्यक्षांना पुढील प्रमाणे अधिकार प्राप्त होतात व कर्तव्ये पार पाडावी लागतात.

## ५.४ नगराध्यक्षांचे किंवा सभाध्यक्षांचे सभेसंबंधी अधिकार व कर्तव्ये

१) सभा सुरु करण्यापूर्वी सभागृहात पुरेशी गणसंख्या आहे किंवा नाही याची खात्री करावी. गणपूर्ती झाल्याशिवाय सभेला सुरुवात करता येत नाही. पुष्कळ नगरपरिषदांत नगराध्यक्ष गणपूर्ती झाल्यानंतर सभागृहात येतात. काही नगरपरिषदामध्ये सभेची वेळ झाली की बेल वाजविली जाते. अशामुळे नगरसेवक सभागृहात येवून बसतात. सभेची जी वेळ ठरलेली असते त्यावेळी जर गणपूर्ती नसेल व अशी बाब एखाद्या नगरसेवकाने निदर्शनास आणली व तशी नोंद इतिवृत्तांत घ्या असे सांगितले तर ते सभागृहातून बाहेर गेले तर ठरलेल्या वेळी गणपूर्ती झाली नसल्याने सभा रद्द होते. सभेची सूचना रद्द होते. विषयपत्रिका रद्द होते आणि पुन्हा सभेची सूचना काढावी लागते. या ठिकाणी एक प्रश्न येतो, समजा, सभा आकरा वाजता बोलाविली आहे. गणपूर्ती सात सदस्याने होते. गणपूर्ती झाल्यानंतर नगराध्यक्षांना सभाध्यक्ष किंवा पीठासीन अधिकाऱ्याचे अधिकार प्राप्त होतात. जर गणपूर्ती नसेल तर सभा होत नाही व नगराध्यक्ष सभाध्यक्ष होवू शकत नाहीत आणि अशा परिस्थितीत सभा रद्द

झाली असे जाहीर करण्याचा अधिकार कोणाला असा प्रश्न निर्माण होतो. याबाबत अधिनियमात किंवा नियमात स्पष्टता नाही. सभेच्या ठरलेल्या वेळी मुख्याधिकारी व सभेचे कार्यवृत्तांत लिहीणारा अधिकारी सभागृहात हजर असणार. त्यांनी कार्यवृत्तांत गणपूर्ती नसल्याने सभा रद्द झाली असा शेरा लिहून तसे सभागृहात उपस्थित असलेल्या सभासदांना सांगावयाचे. नगराध्यक्ष जर हजर असतील तर तेही सांगू शकतील परंतु कायद्याचा किंवा नियमांचा कीस काढावयाचा म्हणून एखाद्या सदस्य नगराध्यक्षांना विचारू शकेल की, आता यावेळी आपण सभाध्यक्ष नाही. त्यामुळे सभा रद्द झाल्याचे सांगण्याचा अधिकार आपणांस नाही. अशा परिस्थितीत मुख्याधिकारी किंवा सभेच्या काम पाहणाऱ्या अधिकाऱ्यांनी अधिनियम व नियमानुसार काय झाले सांगावे अर्थात इतक्या खोलावर जाऊन सहसा असे प्रश्न कोणी विचारत नाहीत.

महानगरपालिका सभेमध्ये वर उल्लेखलेली परिस्थिती निर्माण झाली तर नगरसचिव सभा रद्द झाल्याचे सांगतात.

२) सभेपुढील कामकाज विषयपत्रिकेवरील क्रमाने घेतले जाईल हे पाहणे सभाध्यक्षांची जबाबदारी आहे. विषयांचा क्रम बदलण्याचा अधिकार त्यांना आहे. तसेच सभागृहाला जर विषयाचा क्रम बदलावयाचा असेल तर तशा आशयाची सूचना आणली व मंजूर झाली तर सभागृहाच्या निर्णयानुसार क्रम बदलणे सभाध्यक्षांवर बंधनकारक आहे.

३) सदस्यांकडून सूचक व अनुमोदकाची सही असलेली सूचना अधिनियम व नियमातील तरतूदीनुसार असली तर सभाध्यक्षांनी स्वीकारली पाहिजे. परंतु विधी बाह्य नियम बाह्य असेल, ती उपरोधीक, आरोप, चेष्टा करणारी बदनामीकारक असेल तर सूचना नाकारणेचा अधिकार सभाध्यक्षांना आहे. ज्याला सूचक व अनुमोदक म्हणून सूचनेवर सही करण्याचा अधिकार आहे, त्यांच्या सह्या सूचनेवर नसतील तर ती नाकारणेचा अधिकार सभाध्यक्षांना आहे. तसेच दुरुस्त सूचना, उपसूचना या विधीबाह्य असतील तर त्याही नाकारणेचा सभाध्यक्षांना अधिकार आहे.

४) सूचना, दुरुस्त सूचना, उपसूचनेवर कोणाला व किती वेळ बोलण्यास परवानगी द्यावयाची हा अधिकार सभाध्यक्षांचा आहे. ज्या नगरपरिषेत सदस्यांची संख्या जास्त आहे व विषय

पत्रिकेवर विषयांची संख्याही जास्त आहे. अशावेळी बोलण्यास परवानगी मागणाऱ्यांची संख्या जास्त असली तरी सर्वांनाच परवानगी देणे शक्य होत नाही. अशावेळी त्या त्या पक्षाच्या गटाच्या नेत्याना बोलण्यास, मते व्यक्त करण्यास परवानगी देणे सोयीस्कर ठरते. कारण त्यांची मते त्यांच्या पक्षातील अथवा गटातील नगरसेवकांची मते असतात असे गृहीत धरले जाते. असे केल्याने विषयपत्रिकेवरील विषयाबाबत एकाच सभेत निर्णय घेणे शक्य होते.

५) सभेपुढील प्रस्तावाबाबत बोलण्यास परवानगी देताना निःपक्षपातीपणे वागून कोणावरही अन्याय होणार नाही याची खबरदारी सभाध्यक्षांनी घेतली पाहिजे.

६) सभेपुढील विषय सोडून दुसरेच काहीतरी सदस्य बोलू लागल्यास त्यास विषयाला धरून बोलला नाही, तर भाषण बंद करून खाली बसा असा सांगणेचा अधिकार सभाध्यक्षांना आहे.

७) सन्माननीय सदस्यांचे जे प्रश्न उत्तर देण्यासाठी पटलावर आहेत, त्याप्रश्नांना सभाध्यक्ष स्वतः उत्तरे देवू शकतील किंवा मुख्याधिकाऱ्यास उत्तरे देण्यास सांगतील. एखाद्या विषय समितीच्या संदर्भात प्रश्न असतील त्या प्रश्नांचे उत्तर त्या समितीचे सभापतीही देवू शकतात. पण ते उत्तर देणार नसतील तर सभाध्यक्ष किंवा मुख्याधीकारी उत्तर देवू शकतात. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सभागृहात तोंडी देता येतील किंवा लेखी स्वरूपात देता येतील.

प्रश्नांना उत्तर दिल्यानंतर त्यावर उपप्रश्न विचारल्यास तो सभानियम १५(५) मधील तरतुदीचा भंग करणारा असेल तर तो नाकारण्याचा किंवा त्याला उत्तर न देण्याचा अधिकार सभाध्यक्षांना आहे.

८) सदस्यांकडून आलेले प्रश्न स्वीकारताना सभा नियमातील नियम १५ मधील तरतूदीचे भंग करणारे प्रश्न स्वीकारू नयेत.

९) विषय पत्रिकेवरील विषय पुकारल्यानंतर जर विषय तहकूब ठेवावा अशी सूचना आली तर ती प्राधान्याने स्वीकारली पाहिजे व अशा सूचनावर सभागृहास प्रथम निर्णय घेण्यास संधी देणे आवश्यक आहे. विषय पत्रिकेवरील विषयासंबंधी सूचना आली व काही उपसूचना

आल्या व त्यावर चर्चा सूरू आहेत परंतु मतदान घेतलेले नाही, अशा परिस्थितीत त्याचे भाषण चालू होते ते संपताच विषय तहकूबीची सूचना आली तर या सूचनेस प्राधान्य देवून त्यावर सभागृहाचा निर्णय घ्यावा लागतो. विषय तहकूबीची सूचना सभागृहाने मान्य केली तर ही सूचना मांडण्यापूर्वी जी सूचना व उपसूचना आल्या होत्या त्या रद्द होतात.

१०) एखाद्या विषयावर चर्चा चालू असताना सदस्याने चर्चा बंद करून सूचना मताला टाकावी अशी सूचना केल्यास ती स्वीकारायची किंवा नाही हा अधिकार सभध्यक्षांचा आहे. परंतु सभागृहात मूळ सूचनेवर बोलण्यास परवानगी मागणारे अनेक सदस्य आहेत, सूचनेवर पुरेशी झालेली नसताना चर्चा बंदीची सूचना सभाध्यक्षांनी स्वीकारणे श्रेयस्कर नाही. तसे झाल्यास अल्पमतवाल्यांची मुस्कटदाबी केल्यासारखे होईल. तथापि सूचनेवर पुरेशी चर्चा झाली नसतानासुध्दा चर्चाबंदीची सूचना स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार सभाध्यक्षांना आहे.

११) एखाद्या सदस्य सभागृहात जाणीपूर्वक कामकाजात अडथळा आणत असेल, सभाध्यक्षांचा सूचनांचे पालन करीत नसेल व सभानियमांचे पालन करीत नसेल तर अशा सदस्यास सभेचे कामकाज संपेपर्यंत सभागृहातून बाहेर घालविण्याचा अधिकार सभाध्यक्षांना आहेत. तथापि संबंधित सदस्याने माफी मागितल्यास माफी देवून परत सभागृहातत बसण्यास परवानगी सभाध्यक्ष देवू शकतात. एखाद्या सभासदास सभागृहातून बाहेर काढल्यामुळे कटुता निर्माण होण्याचा संभव जास्त असल्याने सभाध्यक्षांनी परिस्थिती कौशल्याने हाताळून असे प्रसंग शक्यतो टाळणे श्रयेस्कर आहे. पण एखादा सदस्य सौजन्यपूर्ण वागणूक देऊन सुध्दा कामकाजात अडथळा आणित असेल व सभागृहाच्या कामाचा खोळंबा करीत असेल तर अशा सदस्याला बाहेर काढण्याशिवाय पर्याय उरत नाही.

१२) सभेचे कामकाज चालू असताना एखाद्याने हरकतीचे मुद्दे प्रश्न उपस्थित केला तर त्यावर निर्णय देण्याचा अधिकार फक्त सभाध्यक्षांचा आहे. लगेच निर्णय देता येत नसेल तर प्रश्न/विषय स्थगित ठेवावा. निर्णय न देता व विषय तहकूब न ठेवता सभेचे कामकाज चालू ठेवता येत नाही. हरकतीचा मुद्दा प्रश्न उपस्थित केल्यावर तो प्रश्न हरकतीचा मुद्दा आहे किंवा नाही याबबात सभाध्यक्षांना निर्णय देता येतो.

१३) सभा कामकाज चालू असताना कामकाजात हस्तक्षेप करण्याचा, सभागृहात केव्हाही भाषण करण्याचा अधिकार अध्यक्षांना आहे. असे करताना सभाध्यक्षांनी उभे राहून सूचना अथवा भाषण करावे. प्रकृती अस्वास्थ्य असेल तर बसूनही सूचना करता येतील अथवा भाषण करता येईल. अशावेळी एखादा सदस्य भाषण करीत असेल तर त्यास ताबडतोब खाली बसावे लागते.

१४) एखादा सदस्य भाषण करीत असताना दुसरा सदस्य भाषणात अडथळा आणित असेल तर त्यास तसे न करण्यास सभाध्यक्षांना सांगता येते.

१५) सभाध्यक्ष सभागृहातील कामकाजाचे संरक्षक आहेत. सभेतील काम अधिनियम व नियमानुसार होईल पाहण्याची व सभेत शांतता सुव्यवस्था राखणे ही जबाबदारी सभाध्यक्षांची आहे.

१६) सूचक व अनुमोदक यांना त्यांनी दिलेली सूचना परत घ्यावयाची असल्यास सभागृहाच्या मान्यतेने सूचना परत घ्यावी. सभागृहाची मान्यता नसेल तर सूचना परत घेण्यास परवानगी देता येत नाही.

१७) सूचना, उपसूचना दुरुस्त सूचना यावर मतदान घेताना सर्वात शेवटी आलेल्या उपसूचनेवर मतदान घ्यावे व त्यानंतर उलट्या क्रमाने उपसूचना मतास टाकाव्यात व सर्वात शेवटी सूचना किंवा दुरुस्त सूचना मतास टाकावी.

१८) एखाद्या सूचनेवर किंवा उपसूचनेवर समसमान मते पडल्यास, निर्णय होण्यासाठी सभाध्यक्षांना निर्णायक मत (कास्टिंग वोट) देण्याचा अधिकार आहे. परंतु निर्णायक मत दिलेच पाहिजे असे त्यांच्यावर बंधन नाही.

१९) सभा सूरू झाल्यापासून ते सभा संपेपर्यंत सभेत जे जे घडले ते सर्व इतिवृत्तांत लिहून ठेवण्याची व्यवस्था करणे ही जबाबदारी सभाध्यक्षाची आहे.

२०) विषयपत्रिकेवरील विषय संपल्यानंतर आयत्यावेळी विषय घ्यावयाचे किंवा नाहीत याचा अधिकार सभाध्यक्षांना आहे. सभागृहाने अगदी एकमताने आयत्यावेळचे विषय घ्यावेत असे ठरविले तरी सभाध्यक्षांना निर्णय अंतिम असतो. आर्थिक व धोरणात्मक विषय आयत्यावेळच्या विषयात घेता येत नाहीत.

२१) एखादा सदस्य भाषणांत असभ्य, असंसदीय शब्दांचा वापर करीत असेल तर असे शब्द मागे घ्यावेत असे सांगण्याचा आणि तसे शब्द इतिवृत्तातून काढून टाकावेत असे सांगण्याचा अधिकार सभाध्यक्षांना आहे. सदस्य जर असंसदीय शब्द मागे घेत नसेल तर त्यांना खाली बसा असे सांगून भाषण बंद करता येते. तसेच दिवसभराच्या कामासाठी सभागृहातून निलंबित करता येते.

२२) एखादा सदस्य आपल्या भाषणात त्याच त्याच मुद्दयांची पुनरावृत्ती करीत असेल व कारण नसताना लांबलचक भाषण करीत असल्यास त्यास तसे न करण्यास सांगता येते.

२३) सभागृहात जेव्हा बेशिस्त निर्माण होते. गोंधळ होतो आणि सदस्यांना शांत राहण्याचे वारंवार आवाहन करून बेशिस्त व गोंधळ चालू राहिला व त्यामुळे सभेचे कामकाज चालविणे अशक्य झाले तर सभा तहकूब करण्याचा अधिकार सभाध्यक्षांना आहे. एरव्ही त्यांना स्वतःच्या अधिकारात सभा तहकूब करण्याचा अधिकार नाही.

लोकसभा कामकाजातील नियम ३७३, ३७४, ३७५, ३७६ व महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ५२, ५३ व ७० अन्वये लोकसभा व विधानसभा अध्यक्षांना बेशिस्त सभासदांना सभागृहाबाहेर काढणे, सदस्यांचे प्रश्न स्वीकारणे, नाकारणे व गोंधळाचे परिस्थितीत सभागृहाचे कामकाज तहकूब करण्याचे जे अधिकार आहेत, सर्वसाधारणपणे तशाच स्वरूपाचे अधिकार महानगरपालिका, नगरपरिषद व जिल्हा परिषदांच्या सभेतील सभाध्यक्षांना आहेत.

आत्तापर्यंत नगराध्यक्षांचे किंवा सभाध्यक्षांचे सभेसंबंधी कोणते अधिकार व कर्तव्ये पाहिली. मुख्याधिकाऱ्यांच्या सभेसंबंधी जबाबदाऱ्या व कर्तव्ये कोणती याचा विचार करू.[२९]

## ५.५ मुख्याधिकाऱ्यांच्या सभेसंबंधी जबाबदाऱ्या व कर्तव्ये

१) सभेची सूचना व विषयपत्रिका तयार करण्यासाठी नगराध्यक्षांना मदत करणे, नगराध्यक्षांना अधिनियम नियम, शासन निर्णय, शासकीय आदेश यासंबंधी सखोल माहिती असणे अपेक्षित नाही. मुख्याधिकारी प्रशासनाचे प्रमुख अधिकारी असतात. त्यांना नगरपालिका सभेची कोणकोणत्या कामासाठी मंजुरी पाहिजे ते माहित असते. त्यासाठी त्यांना

नगराध्यक्षांकडे अहवाल सादर करावे लागतात. सभेची विषयपत्रिका तयार करताना विषयपत्रिकेवर घ्यावयाच्या विषयासंबंधी माहिती देणे आवश्यक असते.

२) सभेची सूचना सर्व सदस्यांना वेळेवर पोहोच हाईल याची दक्षता मुख्याधिकाऱ्याने घ्यावयाची असते. एखाद्या सभासदास जर अधिनियमातील तरतुदीनुसार सूचना मिळाली नाही तर त्याने सभा सुरु होण्यापूर्वी हरकत घेतली तर सभा होवू शकत नाही, त्यामुळे सभेची सूचना वेळेवर पोहोच व्हावी यासाठी सभेची सूचना काढल्याचा दिनांक व सभेचा दिनांक यात नियमानुसार पुरेशा दिवसाचे अंतर सोडावे. पोस्टाचा दाखला घेऊन सदस्याच्या माहिती असलेल्या पत्त्यावर सूचना पाठविणे सोयीस्कर होते.

३) विषय पत्रिकेतील विषयांची शब्दरचना सुलभ असली पाहिजे. मोघम शब्द रचना असू नये. उदा. नगरपरिषदेच्या हद्दीतील निरनिराळ्या ठिकाणी केलेल्या रस्त्यांच्या खडीकरणाची अंतिम देयक मंजूर करणे, अशा शब्द रचनेतून कोणत्या रस्त्यांची, कोणती मक्तेदारी देयके मंजूर करावयाची याचा बोध होत नाही. विषय वाचल्यानंतर नगरसेवकांना निश्चित कशास मंजुरी द्यावयाची अगर नाही कळले पाहिजे.

४) नगरपरिषद प्रशासन संचालनायलयाने दिलेल्या निर्देशानुसार सभेच्या सूचनेसोबत विषयपत्रिकेतील विषयावर मुख्याधिकाऱ्याचे काय मत आहे त्याबाबतची टिप्पणी पाठविणे आवश्यक आहे. त्यामुळे नगरसेवकांना सभेमध्ये आपली मते मांडताना मदत होते. तसेच मुख्याधिकाऱ्याने अधिनियम, नियम, शासन आदेश विचारांत घेवून जर टिप्पणीमध्ये अभिप्राय दिले असतील तर त्याविरूध्द निर्णय झाल्यास सूचनेवर अनुकूल मतदान करणारे परिणामास जबाबदार राहतील. हे समजणे सुलभ होते. टिप्पणीतील अभिप्राय मोघम स्वरूपाचे असू नयेत.

५) नगरपरिषदेने ठरविले असेल तर सभेच्या सूचनेबरोबर मागील सभेच्या कार्यवृत्ताची प्रत पाठविणे मुख्याधिकाऱ्यावर बंधनकारक आहे. कार्यवृत्ताची प्रत पाठविल्यामुळे सभेत कार्यवृत्त वाचावे लागत नाही. व सभेचा वेळ वाचतो.

६) सभेच्या वेळी संदर्भ पाहण्यासाठी म्हणून जरूर ती अधिनियम, नियम व उपविधींची पुस्तके सभागृहात उपलब्ध ठेवावीत.

७) सभेचे कामकाज चालू झाल्यापासून सभा संपेपर्यंत सभेत जे काही घडले त्याबाबतचा वृत्तांत कार्यवृत्तांत लिहून ठेवण्याची तजवीज मुख्याधिकाऱ्यांनी करावयाची असते.

८) नगरसेवकाला नगरपरिषदेच्या सभेत नियमांतील तरतुदींचे पालन करून प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. आलेल्या प्रश्नांची उत्तरे नगरपरिषदेच्या विविध खात्यातील अधिकाऱ्यांची मदत घेऊन प्रश्नांची उत्तरे तयार करावीत. ती अध्यक्षांना दाखवावीत. सभेमध्ये सभाध्यक्षांनी त्यांच्या वतीने उत्तरे देण्यास सांगितले तर मुख्याधिकाऱ्यांना प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात. नगरसेवकाकडून प्रश्न केव्हा आला, प्रश्नाचे स्वरूप, उत्तर केव्हा दिले, प्रश्न प्रलंबित ठेवला काय? यासंबंधीचे एक नोंद वही संचालक नगरपरिषद संचालनालय यांनी दिलेल्या आदेशानुसार अद्यावत ठेवावी. आलेल्या प्रश्नांपैकी कोणते प्रश्न स्वीकार्य आहेत व कोणते नाहीत याची माहिती अध्यक्षांनी द्यावी.

९) सभेचे कामकाज चालू असताना सभेतील वक्त्यांची भाषणे व निर्णय कायद्याला सोडून होत असतील तर सभाध्यक्षांच्या परवानगीने अशी बाब सभागृहाच्या निदर्शनास आणावी. तसेच सभेत सभाध्यक्षांनी मार्गदर्शन मागितल्यास ते देणे त्यांचे कर्तव्य ठरते.

१०) सभा कामकाज चालू असताना सदस्यांनी काही मुद्दयावर मुख्याधिकाऱ्यांनी खुलासा करावा अशी मागणी होते अशावेळी सभाध्यक्षांनी सांगितले तर त्यांच्या वतीने खुलासा करावा. परवानगी दिली तर खुलासा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

११) अध्यक्षांनी जर कार्यालयीन कागदपत्रांची, नस्तीची, नकाशे, अंदाजपत्रके इत्यादी सभागृहापुढे सादर करावी असा आदेश दिला तर अधिनियमातील कलम ८४ अन्वये संबंधित कागदपत्रे सादर केली पाहिजेत. एखादा दस्तऐवज गोपनीय स्वरूपाचा असेल व तो सभागृहास सादर करणे योग्य होणार नाही असे मुख्याधिकाऱ्याचे मत असेल तर त्यावरील अध्यक्षांचा निर्णय अंतिम राहतो.

१२) नगरपालिका सभेस वेळेवर उपस्थित रहावे. अन्य कोणत्याही कामापेक्षा सभेचे काम महत्त्वाचे असल्याने व सभेच्या दिवशी इतर ठिकाणी कार्यालयीन कामासाठी बैठक असतील तरी सभेच्या कामकाजास प्राधान्य देणे आगत्याचे आहे. मात्र याला अपवाद म्हणजे न्यायालयात त्याच दिवशी उपस्थित राहावे लागत असेल तर सभेला उपस्थित

राहण्यातून सूट मिळू शकते. आजारीपण किंवा काही अघटीत घडल्यास अध्यक्षांच्या परवानगीने अनुपस्थित राहता येते. सभेत मुख्याधिकाऱ्याची उपस्थिती महत्त्वाची असते, कारण सभेला त्यांच्या मार्गदर्शनाची गरज असते, त्यांना खुलासा करावा लागतो, प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतात.

नगरपरिषदेमध्ये मुख्याधिकारी, महापालिकेमध्ये आयुक्त किंवा त्यांनी प्रधिकृत केले अधिकारी, जिल्हापरिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सभाध्यक्षांच्या परवानगीने खुलासा करावा लागतो किंवा माहिती द्यावी लागते. मात्र अशी परिस्थिती संसदेत अथवा विधिमंडळात नाही. तेथे अधिकाऱ्यांना खुलासा करावा लागत नाही. प्रश्नांची उत्तरे द्यावी लागत नाहीत किंवा लोकप्रतिनिधी त्यांना सभागृहात प्रश्न विचारत नाहीत किंवा खुलासा मागत नाहीत. तेथे प्रश्नांना उत्तरे देण्याची, खुलासा करण्याची जबाबदारी मंत्री अथवा राज्यमंत्री पार पाडतात.

१३) सभेपुढील विषयावर सदस्य सूचना, उपसूचना मांडतात. सूचना, उपसूचनेतील शब्दरचना, अधिनियम व नियमातील तरतूदींना अनुसरून असली पाहिजे. त्यात स्पष्टता असली पाहिजे. त्यासाठी सूचनांचे मसुदे तयर करून द्यावेत असे अध्यक्षांनी सांगितले तर त्याची पूर्तता मुख्याधिकाऱ्यांना करावी लागते.

१४) काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये असा प्रश्न येतो की, सभाध्यक्षांना कोणत्यातरी कारणामुळे सभा तहकुब करावयाची असते आणि सभेतील सदस्यांना सभेचे कामकाज पुढे चालवावयाचे असते. सभाध्यक्ष सभेत गोंधळ होत आहे, सभेत बेशिस्तीचे वातावरण आहे, त्यामुळे सभा अमुक एक दिवसापर्यंत तहकूब करीत आहे असे सांगून सभागृहातून बाहेर निघून जातात. प्रत्यक्षात तशी परिस्थिती उद्‌भवलेली नसते. त्याच्यामागून काही सदस्यही निघून जातात, मात्र सभागृहात गणपूर्ती असते. अशावेळी उपस्थिती असलेले सभाध्यक्ष निघून गेले म्हणून मुख्याधिकाऱ्याने सभागृह सोडून जाणे योग्य ठरणार नाही. सभागृहात गणपूर्ती असेल व उपाध्यक्षही सभागृहात नसतील तर उपस्थित नगरसेवक एखाद्या नगरसेवकाची सभाध्यक्ष म्हणून निवड करून सभेचे कामकाज पुढे चालू ठेवू शकतात व अशावेळी मुख्याधिकाऱ्यांनी सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे.

१५) सभेत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी वेळेवर करण्याची जबाबदारी मुख्याधिकाऱ्याची आहे. निधीची उपलब्धता असेल, निर्णय कायदेशीर असतील व अंदाजपत्रकात तरतूद असेल तर अंमलबजावणी वेळेवर झाली पाहिजे. अर्थात अशावेळी अधिकारी व कर्मचारी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहर्निमाण विभागाकडील दिनांक १८ ऑक्टोबर १९७० च्या परिपत्रकाप्रमाणे नगरपालिकेला निर्णयांची अंमलबजावणी संबंधात नोंदवही ठेवण्यासाठी जे निर्देश दिले आहेत, त्यानुसार मुख्याधिकाऱ्याने कार्यवाही करावी.

१६) नगरपरिषद अगर विषय समित्यांच्या सभेमध्ये निर्णय जर अधिनियमातील व नियमातील किंवा शासन आदेशांचे उल्लंघन करून झाले आहेत असे मुख्याधिकाऱ्याचे मत असेल तर ते त्यांनी अधिनियमाच्या कलम ३०८ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांकडे अंमलबजावणीस स्थगिती मिळविण्यासाठी पाठविले पाहिजेत. अशा प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश व त्यावर अपील झाले असल्यास, संचालक नगरपालिका प्रशासन यांचा जसा निर्णय होईल त्याप्रमाणे मुख्याधिकाऱ्याने अंमलबजावणी करावयाची असते.

१७) सभेत असे काही निर्णय होतात की त्यांची अंमलबजावणी त्वरीत करावी अशी अध्यक्षांची व सदस्यांची अपेक्षा असते. शक्यतो सभेचे कार्यवृत्त काम केल्यानंतर निर्णयांची अंमलबजावणी होते. मुख्याधिकाऱ्यांना अशावेळी अडचण होऊ नये म्हणून सूचना मंडणी करतानाच हा ठराव कायम करण्यात येत असून त्याची अंमलबजावणी प्रशासनाने करावी अशी वाक्ये लिहिल्यास कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करता येईल. कार्यवृत्त कायम केल्याशिवाय सभेतील निर्णयांची अंमलबजावणी करता येत नाही असे अधिनियमात किंवा सभा नियमांत नमूद नाही. केवळ दक्षता म्हणून उपाय सूचविला आहे. जिल्हा परिषद सभा नियमातील नियम ४६ मध्ये अशी तरतूद आहे की, सभेच्या शेवटी सभेमध्ये झालेल्या कामकाजाचे इतिवृत्त वाचून त्याच सभेत कायम केले जाते.[३०]

नगरपरिषदेच्या सभेत लोकप्रतिनिधींनी मुख्याधिकारी आपले मार्गदर्शक, सल्लागार आहेत, ते जबाबदार अधिकारी आहेत, ही भावना ठेवणे उचित ठरते. केवळ आपल्या मनाप्रमाणे काम होत नाही म्हणून मुख्याधिकाऱ्यांना दोष देणे योग्य नाही. मुख्याधिकारी अध्यक्षांना, सभागृहाला जसे जबाबदार आहेत तसेच शासनालाही आहेत. कायद्याचे नियमांचे पालन त्यांना करावे लागते. हेही नगरसेवकांनी विचारात घ्यायला हवे. मुख्याधिकाऱ्यानेही नगरसेवक लोकप्रतिनिधी असल्याने त्यांचा योग्य मान राखला पाहिजे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी एकमेकांच्या अडचणी विचारात घेऊन समोपचाराने काम केल्यास प्रशासनात उत्साह निर्माण होऊन प्रशासन अधिक कार्यक्षमतेने काम करू शकेल.

## ५.६ सभेची नोटीस व विषयपत्रिकाः

नगरपरिषद अधिनियमातील कलम ८१ अन्वये नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा दोन महिन्यातून एकदा तरी बोलाविली पाहिजे. नगराध्यक्षांच्या निवडणूकीसाठी जिल्हाधिकारी ज्या तारखेला सभा बोलावितात त्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत एक सर्वसाधारण सभा झाली पाहिजे. सभा बोलाविण्याचा क्रम तसाच पुढे चालू ठेवावयाचाअसतो. अधिनियमाचे कलम ६२, विषय समित्यांच्या सभा बोलाविण्यासंबंधी आहे. स्थायी समिती व विषय समित्यांच्या सभा महिन्यातून एकदा तरी झाली पाहिजे. नगरपालिकेच्या अगर विषय समित्यांच्या विशेष सभा किती बोलवाव्यात यावर बंधन नाही. आवश्यकतेनुसार विशेष सभा बोलाविता येतात. नगरपरिषदेची सभा व विषय समित्यांच्या सभा, थोडाफार फरक सोडला तर महाराष्ट्र शासनाने नगरपरिषदेच्या सभेसंबंधी जे नियम (महाराष्ट्र नगरपालिका सभा कामकाज नियम १९६६) केले आहेत. ते बहुतांश विषय समित्यांच्या सभानाही लागू आहेत. [३१]

### ५.६.१ सभेची नोटीसः

सभेच्या नोटीसीमध्ये कोणकोणया बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे यासंबंधीच्या तरतूदी अधिनियमाच्या कलम ८१ व सभा नियमामध्ये विशद केल्या आहेत. त्या तरतूदी पुढील प्रमाणेः

१) कोणत्या तारखेला सभेची नोटीस पाठविली ती तारीख.

२) सभेचा दिनांक, वेळ व ठिकाण

३) सभा कोणत्या प्रकारची आहे, सर्वसाधारण, विशेष सर्वसाधारण की तातडीची विशेष सभा.

४) सभा कशासाठी बोलावली आहे त्याबाबतचा उल्लेख

५) ज्यांना सभा बोलाविण्याचा अधिकार अशाच व्यक्तींची नोटीसीवर सही

वरील पैकी कोणत्याही एका बाबीचा उल्लेख नोटीसीमध्ये नसेल तर नोटीस कायदेशीर ठरत नाही.[३२]

## ५.६.२ विषयांची यादी:

सभा बोलाविली जाते ती कोणत्या तरी विषयावर निर्णय देण्यासाठी. विषयांचा क्रम कसा असावा याची माहिती सभा नियमातील नियम ५ मध्ये दिलेली आहे त्यानुसार.

१) सर्वसाधारण सभेच्या यादीमध्ये (परिशिष्टामध्ये) पहिला विषय असतो मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. विशेष सभेच्या बाबतीत हा विषय सभेच्या विषय पत्रिकेवर असत नाही. विशेष सभा ही सर्वसाधारणपणे महत्त्वाच्या विषयावर निर्णय देण्यासाठी बोलाविलेली असते.

२) सन्माननीय सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे. परंतु जर नगरसेवकांनी प्रश्नच विचारले नसतील हा विषय पत्रिकेवर येणार नाही. केवळ नियमात आहे म्हणून तसा विषय विषयपत्रिकेवर घेण्याचे प्रयोजन राहत नाही. अशावेळी प्रश्नोत्तरे या विषयाच्यापुढे 'निरंक' असे लिहावे.

३) निवडणूका व नगरपरिषदेने करावयाच्या नेमणूका हा विषयसुध्दा जर निवडणूका किंवा नेमणूकीची प्रकरणे असतील तर येईल अन्यथा नाही. परंतु विषय नमूद करून पुढे 'निरंक' लिहावे.

४) स्थायी समिती व अन्य समितीने मंजूर केलेले निर्णय पाहून कायम करणे.[३३]

स्थायी समितीने घेतलेले निर्णय माहितीसाठी शक्यतो लवकर सर्वसाधारण सभेकडे पाठविले पाहिजेत. किती दिवसात असे निर्णय पाठवावेत यासंबंधी सभानियमामध्ये तरतूद

नाही. त्यामुळे जर स्थायी समितीने सर्वसाधारण सभेची व विषय समित्यांनी स्थायी समितीकडे वेळेवर निर्णय पाठविले नाहीत तर नगरपरिषदेच्या किंवा यथास्थिती स्थायी समितीच्या विषयपत्रिकेवर हा विषय येणार नाही. तेथे 'निरंक' असे लिहावे. हा विषय ठेवण्याचा उद्देश असा की, सर्व नगरसेवक स्थायी समिती किंवा विषय समित्यांमध्ये असत नाहीत. स्थायी समिती व विषय समित्यांच्या निर्णयाची सर्वांना माहिती असावी हा एक उद्देश व दुसरा म्हणजे जर स्थायी समिती व उपविधीतील तरतूदींचे उल्लंघन करून निर्णय घेतले असतील तर त्याबाबत योग्य तो निर्णय घेता यावा.

नगरपरिषदेने जर अधिनियमाच्या कलम ७० अन्वये उपविधी करून स्थायी समितीला व विषय समित्यांना अधिकार प्रदान केले असतील व त्यांनी आपल्या अधिकारक्षेत्रात कायद्याला, नियमाला व उपविधींना अनुसरून निर्णय घेतले असतील तर त्यांच्याकडून आलेले निर्णय पाहून कायम करणे एवढचे सर्वसाधारण सभेचे काम राहते. कारण असे निर्णय बदलण्याचा नगरपालिका सभेला अधिकार नाही. मात्र स्थायी समिती किंवा विषय समित्यांनी बेकायदेशीर निर्णय घेतले असतील तर ते बदलण्याचा अधिकार नगरपालिका सभेला आहे. काही वेळा नगरपरिषद ठराव करून आपल्याकडील काही अधिकार तात्पुरत्या स्वरूपात व कामाच्या सोयीसाठी म्हणून स्थायी समिती अथवा विषय समित्यांकडे सुपूर्त करावे अशा सुपूर्द केलेल्या अधिकारासंबंधी स्थायी समिती अगर विषय समितीने निर्णय घेतले असतील तर ते बदलण्याचा अधिकार नगरपालिका सभेला आहे.

विषय पत्रिकेवर पाचव्या क्रमांकाचा विषय असतो शासनाकडून अगर शासनाच्या अधिकाऱ्याकडून आलेल्या पत्रव्यवहाराची माहिती देणे. नगरपरिषदेकडे जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन, संचलनालय शासनाचा नगरविकास विभाग तसेच शासनाच्या अन्य विभाकडून किंवा अधिकाऱ्याकडून पत्रव्यवहार येत असतो. आलेल्या सर्व पत्रव्यवहारांची माहिती सभेला दिली पाहिजे असा याचा अर्थ होत नाही. हा विषय ठेवण्यामागचा उद्देश हा असतो की नगरपालिकेच्या दृष्टीने जी महत्तवाची पत्रे आली असतील किंवा शासनाने घेतलेले निर्णय, शासकीय परिपत्रके, अधिनियमातील दुरुस्त्या याबाबतची माहिती नगरपरिषद सभेला असली पाहिजे. अशी माहिती मिळाली तर

नगरपालिकेला आवश्यक असल्यास पुढील कार्यवाही करता येईल. नगरपरिषदरिषदेकडे दररोज येणाऱ्या शासकीय पत्रांची माहिती नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना असते परंतु इतर नगरसेवकांना नसते. नगरसेवकांनाही शासनाकडून आलेल्या महत्त्वाच्या पत्रव्यवहाराची माहिती होणे आवश्यक आहे. अशी माहिती वर उल्लेखलेला विषय विषयपत्रिकेवर ठेवल्यामुळे नगरसेवकांना मिळते.[३४]

नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा दोन महिन्यातून एकदा होते. समजा या दोन महिन्याच्या कालावधीत शासन अथवा शासनाच्या अधिकाऱ्याकडून धोरणात्मक महत्त्वाचा असा पत्रव्यवहार आला नाही तर त्या प्रश्नाला महत्वाचा पत्रव्यवहारामागील सभेपासून आजच्या सभेपर्यंत आला नसल्याचे विषय ठेवला नाही असे उत्तर द्यावे लागेल. तथापी विषय नमूद करून त्यापुढे 'निरंक' असे लिहणे योग्य ठरते.[३५]

वरील विषय झाल्यानंतर सहाव्या विषयाच्या क्रमांकापासून नगरपरिषदेच्या प्रशासनाकडून व नगरसेवकांकडून आलेल्या प्रस्तावांच्या विषयाला सुरुवात होते. विषयपत्रिकेवरील शेवटचा विषय असतो. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी उपस्थित होणाऱ्या विषयावर विचारविनिमय करून निर्णय घेणे. विशेष सभेच्या विषयपत्रिकेवर हा विषय घेतला जात नाही. अध्यक्षांनी आयत्यावेळेचे विषय घेण्यास परवानगी दिली नाही तर आयत्या वेळेचे विषय चर्चेला घेता येत नाहीत. आयत्या वेळच्या विषयाबाबत अधिनियमातील तरतूद व शासनाने दिलेल्या आदेशांचे पालन करणे आवश्यक आहे.

जरूर त्या मुदतीची सभेची नोटीस नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेसाठी पूर्ण सात दिवसाची, विशेष सर्वसाधारण सभेसाठी तीन दिवसांची व तातडीच्या विशेष सभेसाठी पूर्ण एक दिवसाची मुदतीची नोटीस (सूचना) नगरसेवकांना देणे बंधनकारक आहे. विषय समित्यांच्या सभेसाठी पूर्ण तीन दिवसाची व निकडीची परिस्थितीत पूर्ण एक दिवसाची नोटीस देणे बंधनकारक आहे. पूर्ण दिवसाची नोटीस म्हणजे नगरसेवकाला जास्तीत जास्त उशीरा नोटीस मिळण्याचा दिनांक व सभेचा दिनांक यातील दिवस. उदा. सर्वसाधारण सभा एखाद्या महिन्याच्या नऊ तारखेला बोलाविली असेल तर सभेची नोटीस त्या महिन्याच्या एक तारखेला नगरसेवकाला नोटीस मिळाली पाहिजे. निकडीच्या विशेष सभा एखाद्या महिन्याच्या दोन

तारखेला असेल तर त्या महिन्याच्या एक तारखेला सभेची नोटीस नगरसेवकाला मिळाली पाहिजे.[३६]

पूर्ण दिवस मोजताना मध्ये सार्वजनिक अथवा कार्यालयीन सुट्टीचे दिवस येत असेल तरी ते दिवस विचारात घ्यावयाचे. पूर्ण दिवस मोजताना दिवसाचे भाग करता येत नाहीत. समजा ९ ऑगस्टला सकाळी ११ वाजता सभा बोलाविली आहे आणि एखाद्या नगरसेवकाला १ ऑगस्टला सायंकाळी सहा वाजता सभेची नोटीस पोहच केली तर अशा नगरसेवकाला एक ऑगस्टला सकाळी ११ वाजल्यानंतर नोटीस मिळाली म्हणून तक्रार करता येत नाही. एक ऑगस्टला कितीही वाजता नोटीस पोहच केली तरी तो संपूर्ण दिवस धरावयाचा असतो.

### ५.६.३ सभेची सूचना नगरसेवकांना रूजू करण्याची पध्दतः

नगरपरिषद सभेची नोटीस नगरसेवकांना रूजू करण्याचे प्रकार प्रामुख्याने तीन आहेत. नगरसेवकांना समक्ष देणे, पोस्टाचा दाखला घेऊन पोस्टाने नोटीस पाठविणे, नगरसेवक भेटत नसतील त्यांच्या कुटुंबातील सज्ञान व्यक्तीला नोटीसीची प्रत देवून स्थळप्रतीवर त्यांच्या सह्या घेतात. येथे कुटुंब या व्याख्येत नगरसेवकांचे आईवडील, पत्नी व सज्ञान मुले यांचाच समावेश होतो हे लक्षात ठेवावे. घरातल्या नोकरास, अथवा घरात पाहुणे आले असल्यास किंवा घरातील आठरा वर्षाच्या खालील मुला-मुलींकडे नोटीस देता येत नाही. तथापी नगरसेवकाने अमुक व्यक्तीकडे नाटीस दिल्यास हरकत नाही असे लेखी कळविले असेल तर त्याप्रमाणे संबंधीत व्यक्तीस नोटीस देता येईल. पुष्कळ वेळा असा प्रसंग येण्याची शक्यता असते की, नगरसेवक घरात भेटत नाहीत. घरातील अन्य व्यक्ती नोटीस स्वीकारत नाहीत किंवा घरातील सर्व व्यक्ती बाहेरगावी गेलेल्या असतात. नोटीस तर वेळेवर पोहचवावयाची असते अशावेळी राहत्या घराच्या दर्शनी बाजूस योग्य ठिकाणी पंचासमक्ष नोटीस चिटकवावी. घराच्या मागील बाजूस, बाजूच्या भिंतीवर किंवा घराच्या अगदी वरच्या बाजूला नोटीस चिटकविणे योग्य नाही. घरात शिरताना सहजासहजी दिसेल या दृष्टीने नोटीस चिटकवावी.[३७]

## ५.६.४ पोस्टाने सभेची नोटीस पाठविणे:

सभेची नोटीस प्रत्यक्ष जावून नगरसेवकांना देण्यापेक्षा पोस्टाचा दाखला घेवून पाठविणे केव्हाही सोईस्कर ठरते. सभानियमामध्येही तशी तरतूद आहे. मात्र पाकीटावरचा पत्ता योग्य तोच लिहावा. येथे योग्य म्हणजे नगरसेवकाने निवडणूकीसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करताना जो पत्ता दिलेला किंवा बदलला असल्यामुळे जो पत्ता त्यांनी नगरपरिषदरिषदेस कळविला असेल तो पत्ता, सभेच्या नोटीसीच्या पाकीटावर लिहावा. पोस्टाने नोटीस पाठविताना एक दक्षता घेतली पाहिजे ती म्हणजे सभेच्या प्रकाराप्रमाणे सभेच्या दिवसापूर्वी सात दिवस, तीन दिवस व नऊ दिवस अगोदर मिळेत या दृष्टीने पाठवावीत. इंडियन पोस्टल ॲक्टप्रमाणे गावातल्या गावात देण्यासाठी पत्र पोस्टात टाकले तर ते २४ तासात पोहचते असे समजले जाते. येथे एक गोष्ट विचारात घेणे आवश्यक आहे, समजा ९ ऑगस्टला सर्व साधारण सभा आहे. म्हणजे एक ऑगस्टला सभेची नोटीस नगरसेवकाला मिळाली पाहिजे. त्यासाठी ३१ जुलैला पोस्टात नोटीसीचे पाकिट दिले पाहिजे. जर एक ऑगस्टला रविवार असेल तर त्या दिवशी पोस्टाला सुट्टी असणार. त्यामुळे नगरसेवकाला दोन ऑगसटला नोटीस मिळणार. अशावेळी एखाद्याने तक्रार करण्याचेच ठरविले तर सात दिवस अगोदर नोटीस मिळाली नाही म्हणून तक्रार करू शकेल. असे होवू नये म्हणून सभेचा दिवस नोटीस पाठविण्याचा दिवस यामध्ये पुरेसा कालावधी ठेवावा.

काही वेळा प्रशासनाने जरूर ती दक्षता घेवून पोस्टाचा दाखला घेवून योग्य दिवशी नोटीस पाठविली पण काही कारणामुळे पोस्टमनने नोटीसीचे पाकिट त्या नगरसेवकास पुरेशा मुदतीत मिळाली नाही म्हणून त्यास हरकत घेता येणार नाही. फार तर पोस्टखात्याकडे तक्रार करता येईल.[३८]

## ५.६.५ सूचना फलकावर सभेची नोटीस प्रसिध्द करणे:

नगरसेवक नागरिकांचे नगरपालिकेतील प्रतिनिधी. शहरातील नागरिकांच्या वतीने ते नगरपरिषद सभेत निर्णय घेतात. नगरपरिषद ही त्या शहरातील नागरिकांची आहे. त्यामुळे त्यांनी निवडून दिलेले प्रतिनिधी नगरपरिषदरिषद सभेत कसे काम करतात ते पाहण्याचा त्यांना

हक्क आहे. नगरसेवकांना सभेच्या नोटीसा मिळतात व त्यावरून त्यांना सभा केव्हा, कोठे व कशासाठी आहे समजते. पण नागरिकांना कसे समजणार? ते समजणार नगरपरिषदेच्या सूचना फलकावरून. ज्या नागरिकांना नगरपरिषदरिषदेचे काम पहावयाचे असल्यास त्यांनी नगरपालिकेत जावून सूचना फलक पाहावा. नागरिकांना नगरपरिषदरिषदेच्या सभेच्या आयोजनासंबंधी माहिती व्हावी याच उद्देशाने सभेची सूचना, सूचना फलकावर प्रसिध्द केली पाहिजे अशी तरतूद अधिनियमात केली असावी.[३९]

## ५.६.६ तहकूब सभेसाठी नोटीसः

नगरपरिषदेची सभा कोणत्याही कारणामुळे तहकूब केली असेल, तहकूब केलेली सभा कोणत्या तारखेला, किती वाजता व कोठे भरेल याबाबतची नोटीस नगरपालिकेच्या सूचना फलकावर प्रसिध्द करावी लागते, नगरसेवकांना वैयक्तिक नोटीस देण्याची आवश्यकता नाही. तहकूब सभेत विषय पत्रिकेवरील फक्त अनिर्णित विषयावरच निर्णय घेता येतात. आयत्यावेळेचे विषय तहकूब सभेत घेत येत नाहीत. अशी तरतूद करण्यामागेही उद्देश आहे. सभेची नोटीस नगरसेवकांना मिळाल्यानंतर ते विषय पाहून सभेला उपस्थित रहावयाचे किंवा नाही तो ठरवितो. जर सभेच्या नियोजित दिवशी काही कारणामुळे सभा तहकूब केली तर तहकूब सभा कोणत्या दिवसापर्यंत तहकूब केली आहे याबाबत वैयक्तिक नोटीस नगरसेवकांना दिली जात नाही आणि ज्या विषयासंबंधी नगरसेवकांना वैयक्तिक नोटीस दिली नाही असे विषय सभेपुढे घेता येणार नाहीत. सभेपुढे कोणते विषय चर्चेसाठी निर्णयासाठी घेतले जाणार आहेत. त्याबाबतची माहिती मिळण्याचा नगरसेवकांचा अधिकार आहे.[४०]

## ५.६.७ सभेची नोटीस वेळेवर मिळाली नाही म्हणून हरकत घेतली तर सभेत झालेले काम कायदेशीर ठरते का?

अधिनियमातील तरतुदीनुसार नगरसेवकांना सभेची नोटीस सभेच्या अगोदर ठराविक दिवस मिळण्याचा हक्क अधिकार आहे. नोटीस जर वेळेत मिळाली नाही तर संबंधीत नगरसेवकाने सभा होण्यापूर्वी हरकत घेतली तर नगराध्यक्षांना सभा घेता येणार नाही. अशा परिस्थितीत सभेची नोटीस रद्द करून पुन्हा नोटीस काढावी. तसे न करता हरकत असूनही सभा घेतली तर अशा सभेला घेतलेले निर्णय कायदेशीर ठरत नाहीत. नोटीस वेळेवर मिळाली नाही,

सभा नियोजित दिवशी पार पडली, तरी कोणत्याही नगरसेवकानी हरकत घेतली नाही तर सभेचे कामकाज कायदेशीर ठरेल. तसेच नोटीस वेळेवर मिळाली नाही पण संबंधीत नगरसेवक सभेस उपस्थित राहिला व कामकाजात भाग घेतला तर नंतर सभेची नोटीस मिळाली नाही म्हणून तक्रार केली तर अशा तक्रारीला अर्थ उतर नाही. एकदा सभेच्या हजेरी पुस्तकावर सदस्याने सही केली की, नोटीस वेळेवर मिळाली नाही म्हणून तक्रार करता येत नाही. सर्व नगरसेवकांना वेळेवर सभेची नोटीस मिळाली पाहिजे. आणि एखाद्यास ती योग्य वेळी मिळाली नाही व तरीही सभा झाली तर सभेचे काम कायदेशीर होत नाही. यामागचे कारण असे की ज्या सभासदास नोटीस मिळाली नाही म्हणून तो सभेस गैरहजर राहिला. नोटीस मिळाली असती तर उपस्थित राहला असता व त्याने एखाद्या विषयावर केलेल्या भाषणामुळे उपस्थित सदस्यांच मत परिवर्तन होवून त्याच्या अनुपस्थितीमुळे जो निर्णय झाला असता त्यापेक्षा वेगळा निर्णय होवू शकला असता या उद्देशाने सर्व सभासदांना वेळेवर नोटीस देण्यासंबंधीची तरतूद असली पाहिजे.

### ५.६.८ सभेच्या अगोदर काही दिवस नोटीस देण्यामागचा उद्देशः

सभेपुढे जे विषय असतात त्या विषयासंबंधीची कागदपत्रे पाहून त्याचा अभ्यास करून सदस्यांना आपले विचार मांडण्यास मदत व्हावी यासाठी काही मुदत असणे आवश्यक आहे. तसेच सदस्य आपल्या पुढील काही दिवसातील कामांचे नियोजन करतो. ज्यावेळी सभेची नोटीस त्याला मिळते तेव्हा विषय पत्रिकेतील विषय पाहून कोणत्या कामाला प्राधान्य द्यावयाचे ते ठरवितो व त्याचप्रमाणे कामाचे नियोजन करतो. विषय पत्रिकेतील विषय महत्त्वाचे असतील तर तो अन्य कामे बाजूला ठेवून सभेला उपस्थित राहील. विषय महत्त्वाचे वाटले नाहीत तर सभेला गैरहजर राहून इतर महत्त्वाच्या कामाला प्राधान्य देईल. सभेची नोटीस सभेच्या अगोदर काही ठराविक दिवस देण्यामागचे प्रमुख उद्देश. जर महत्त्वाच्या विषयावर तातडीने निर्णय घेणे आवश्यक असेल तर कमी मुदतीची नोटीस दिली जाते अशावेळी सदस्यांनी त्यांच्या इतर कामापेक्षा नगरपालिका सभेपुढे असलेले विषयांना अधिक प्राधान्य द्यावे अशी अपेक्षा असते.

सभेची नोटीस दिल्यानंतर नगराध्यक्षांना ती मागे घेण्याचा अधिकार नाही. जर नगरसेवकाने चुकीची नोटीस काढली आहे अगर नोटीस वेळेवर मिळाली नाही म्हणून तक्रार केल्यास नगराध्यक्षांना दिलेली नोटीस रद्द करून पुन्हा नोटीस काढता येते.

सभेच्या विषय पत्रिकेवर विषयांचा क्रम लावताना शक्यतो जे विषय फारसे चर्चा न होता मंजूर होण्यासारखे ते प्रथम घ्यावेत. असे केल्याने बऱ्याचशा विषयावर कमी वेळेत निर्णय होवू शकतात. जर महत्त्वाचे विषय अगोदर घेतले गेले तर एका एका विषयावर अर्धा किंवा एकएक तास चर्चा होण्याची शक्यता असते. वादग्रस्त विषय असल्यास सदस्यांच्या भाषणामुळे वातावरण तापण्याची शक्यताही नाकारता येत नाही. काही वेळेस सभात्यागासारखे प्रसंग उद्‌भवतात. अशा वातावरणात विषयपत्रिकेवर जर बरेच विषय असले तर दोन-चार विषयावर चर्चा किंवा निर्णय होतात व बाकीचे विषय तसेच राहतात. राहिलेल्या विषयावर निर्णय घेण्यासाठी सभा तहकूब करावी लागते.[४१]

## ५.६.९ विषय पत्रिकेमधील विषयांची भाषा सुटसुटीत सोपी असावी:

विषयपत्रिका वाचल्यानंतर सदस्यांना निश्‍चित विषय काय आहे समजले पाहिजे. काही वेळा विषयपत्रिकेवर निरनिराळ्या कामासाठी आलेल्या निविदामधील दर पाहून निवीदा मंजूर करण्याबाबत विचार करणे, मंजूर शहर विकास आराखड्यातून बागेसाठी आरक्षित केलेली जागा वगळण्याबाबत आलेलया अर्जावर विचार करून निर्णय घेणे. 'वरील विषय पाहिले तर कोणत्या कामासाठी निविदा मागविल्या आहेत, त्यातील कमी दराची निविदा कोणाची आहे समजत नाही, दुसरा विषय जागा वगळण्याचा कोणती जगा वगळणेचा, त्या जागेचा आरक्षण क्रमांक, जागा वगळावी म्हणून कोणाचा अर्ज आला आहे समजून येत नाही. आणखी एक विषय, देयके मंजूर करण्याचा, कोणती कामे झाली, ती काणी केली, किती खर्चाची देयके आहेत याबाबत काही माहिती मिळत नाही. माहिती मिळविण्यासाठी सदस्याला संबंधित अधिकाऱ्याशी संपर्क करावा लागतो. वरील प्रमाणे विषयांची भाषा असू नये. विषय वाचताच अर्थबोध झाला पाहिजे.

विषयपत्रिकेवर जे विषय असतात त्याबाबत मुख्याधिकाऱ्यांची अधिनियम, नियम उपविधी शासन आदेशानुसर कोणता निर्णय सभेने घेणे अपेक्षित याबाबत टिप्पणी सभेच्या सूचनेबरोबर असली पाहिजे. अशा टिपणीमुळे सदस्यांना मार्गदर्शन होते. टिपणीतील मत स्पष्ट पाहिजे. मोघम मत प्रदर्शन असू नये. मुख्याधिकाऱ्याच्या मताप्रमाणे निर्णय घेणे केव्हाही श्रेयस्कर ठरते. तथापि मुख्याधिकाऱ्यांच्या टिपणीला अनुसरून निर्णय घेतला पाहिजे. असे

बंधन नगरपालिका सभेवर नाही. पण झालेल्या निर्णयाबद्दल ठरावाला अनुकूल मत देणारे सदस्य जबाबदार राहतात. सभेच्या नोटीसीबरोबर जोडलेली मुख्याधिकाऱ्यांची त्या-त्या विषयावरील टिपणी थोडक्यात किंवा सारांश रूपाने लिहीलेली असते. सविस्तर अहवाल फक्त संबंधित विषयासोबत असतो. ज्यावेळी सभेची नोटीस सदस्यांना दिली जाते त्यावेळी संबंधित विषयाचे कागदपत्र अहवाल नगरपरिषदरिषदेच्या संबंधित अधिकाऱ्याकडे सदस्यांना पाहण्यासाठी उपलब्ध करण्याची जबाबदारी प्रशासनाची असते. कागदपत्रे, अहवाल पाहून सदस्यांना सभेत कोणते विचार मांडावयाचे आहेत त्याबाबत आपले मत तार करण्यास मदत होते. जिल्हा परिषद सभा नियमामध्ये सभेपुढे असलेल्या विषयासंबंधीची कागदपत्रे व विषयावरील कार्यालयाची संक्षिप्त टिपणी सभेच्या वेळेपूर्वी २४ तास अगोदर सदस्यांना पाहण्यासाठी उपलबध केली पाहिजेत अशी तरतूद आहे.[४२]

## ५.७ गणपूर्ती:

नगरपरिषद सभेच्या अथवा स्थायी समिती व विषय समित्यांच्या सभेतील निर्णय विधीवत होण्यासाठी नगरपरिषद अधिनियमातील कलम ८१ पोटकलम ९ व कलम ८२ पोटकलम ६ मधील तरतुदीप्रमाणे नगरपरिषदरिषदेच्या व विषय समित्यांच्या सभेत किमान सदस्यांची उपस्थिती आवश्यक असते. त्याशिवाय सभेचे कामकाज चालू होऊ शकत नाही. या किमान उपस्थितीला गणपूर्ती म्हणतात.[४३]

नगरपरिषदेच्या सभा प्रामुख्याने दोन प्रकारच्या, सर्वसाधारण सभा व विशेष सभा. विशेष सभेमध्ये आणखी एक प्रकार विशेष तातडीची सभा. सर्वसाधारण सभेसाठी निवडून आलेल्या एकूण सदस्य संख्येच्या एक तृतीयांश सदस्य असले म्हणजे गणपूर्ती होते. एक तृतीयांश संख्या ठरविताना अपूर्णांक विचारात घ्यावयाचा नाही. उदा. एखाद्या नगरपरिषदरिषदेत २२ सदस्य निवडून आले असतील तर गणपूर्ती होण्यासाठी निवडून आलेले सात सदस्य उपस्थित असणे आवश्यक आहे. एक तृतीयांश संख्या ठरविताना अपूर्णांकाचा विचार करावयाचा नाही बऱ्याच नगरपरिषदरिषदांमध्ये एक तृतीयांश संख्या ठरविताना अपूर्णांक आल्यास खबरदारी म्हणून पुढील संख्या धरली जाते. अशी गणपूर्ती संख्या ठरविणे चुकीचे

आहे. गणपूर्तीसाठी संख्या ठरविताना अपूर्णांक आल्यास अपूर्णांक सोडून द्यावयाचा. अपूर्णांक सोडल्यानंतर जी संख्या राहते ती संख्या म्हणजे गणपूर्ती संख्या होय. समजा एका नगरपरिषदेत २९ निवडून आलेले सदस्य आहेत. २९ चा एकतृतीयांश म्हणजे ९.२२ ही संख्या येते. अपूर्णांक सोडल्यास ९ ही संख्या सदस्य सभेस उपस्थित असल्यास गणपूर्ती होते. जिल्हा परिषद सभा नियमामध्ये मात्र अपूर्णांक आला तर तो पूर्ण आकडा करावा अशी तरतूद आहे. [४४]

नगरपरिषदेच्या विशेष सभेसाठी निवडून आलेलया सदस्यांपैकी निम्मे म्हणजे १/२ सदस्य सभेस उपस्थित पाहिजेत. येथेही गणपूर्ती ठरविताना अपूर्णांक विचारात घ्यावयाचा नाही. समजा एका नगरपरिषदेत निवडून आलेले ५१ सदस्य आहेत. ५१ च्या १/२ संख्या येते. २५.५ येथे ०.५ संख्या सोडल्यानंतर संख्या राहते २५ त्यामुळे २५ सदस्य उपस्थित असतील तर गणपूर्ती होते.

नगरपरिषद अधिनियमातील कलम २ पोटकलम ४९ अनुसार सदस्यांची एकूण संख्या म्हणजे निवडून आलेले सदस्य व नामनिर्देशीत सदस्य. परंतु नगरपरिषदेच्या सभेसाठी गणपूर्ती ठरविताना नामनिर्देशित सदस्यांच्य उपस्थितीचा विचार करावयाचा नसतो. कारण नामनिदद्रैशित सदस्यांना सभेत मत देण्याचा अधिकार नाही. नगरपरिषद अधिनियमाच्या कलम ८१(९) मध्ये गणपूर्ती पूर्ण होण्यासाठी सर्वसाधारणपणे सभेकरीता एकूण नगरसेवकांच्या संख्येच्या १/३ व विशेष सभेसाठी एकूण नगरसेवकांच्या संख्येच्या १/२ इतके सदस्य उपस्थित असणे आवश्यक आहे अशी तरतूद आहे. तथापि गणपूर्तीसाठी नामनिर्देशित सदस्याच्या उपस्थितीचा विचार करावयाचा नाही.[४५]

स्थायी समिती व विषय समित्यांच्या त्या-त्या समितीच्या सभांसाठी एकूण सदस्य संख्येच्या १/२ सदस्य सभेत उपस्थित असतील तर गणपूर्ती होते असे अधिनियमाच्या कलम ८२(६) मध्ये नमूद आहे. विषय समित्याच्या सभेसाठी गणपूर्ती होण्यासाठी समितीच्या एकूण सभासदांपैकी ठराविक सदस्य उपस्थित असले पाहिजेत असे नमूद आहे. या शब्दरचनेमुळे विषय समित्यांच्या सभेसाठी नामनिर्देशित सदस्यांची उपस्थिती गणपूर्तीसाठी विचारात घ्यावयाची असते.

स्थायी समिती व विषय समितीच्या सभेसठी त्या-त्या समितीच्या एकूण सदस्यांपैकी १/२ सदस्य उपस्थित असले पाहिजेत. एक द्वितीयांश संख्या ठरविताना अपूर्णांक येत असेल तर अपूर्णांक सोडून द्यावयाचा असतो. उदा. सार्वजनिक बांधकाम समितीत ९ सदस्य असतील तर ९ च्या १/२ म्हणजे ४.५ ही संख्या येते. अपूर्णांक सोडल्यानंतर ४ ही संख्या राहते म्हणजे ४ सदस्य उपस्थित असतील तर गणपूर्ती होणार.[४६]

## ५.८ सभेचे इतिवृत्तः

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सभा काही विषयावर विचार विनीमय करून निर्णय घेण्यासाठी आयोजित केल्या जातात. अधिनियमातील तरतुदीस अनुसरून सभा कामकाज कसे चालवावे याबाबतचे नियम केलेले असतात. सभा चालू झाल्यापासून संपेपर्यंत सभेमध्ये कोणते विषय चर्चेस आले, चर्चेत कोणी भाग घेतला व सभेत कोणते निर्णय झाले याबाबतच्या नोंदी करणे आवश्यक असते. या नोंदी, नोंदवहीच्या दोन भागामध्ये केल्या जातात. पहिल्या भागात सभा कोणत्या प्रकारची होती, सभा किती वाजता भरली, सभेस कोणकोण हजर होते, सभेत कोणते विषय चर्चेस आले, चर्चेत भाग घेणाऱ्या सदस्यांची नावे, त्यांनी मांडलेले मुद्दे, विषयावर मतदान झाले असल्यास अनुकुल व प्रतिकुल मत देणाऱ्यांची नावे, इत्यादी नोंदवहीच्या दुसऱ्या भागात सभेत घेतलेल्या निर्णयांची नोंदी केलीजाते. या नोंदवहीला 'कार्यवृत्त नोंदवही (प्रोसिडिंग बुक)' असे म्हटले जाते. नोंदवहीच्या पहिल्या भगाला इतिवृत्त म्हटले जाते.

इतिवृत्त (मिनिट्स) म्हणजे सभेच्या सुरुवातीपासून  सभेचा शेवट होईपर्यंत सभागृहात जे काही घडले त्याबाबतचे थोडक्यात संपादित केलेले टिपण. मिनिट्स या शब्दाचा अर्थचआठवणीसाठी ठेवलेले टिपण असा आहे. इतिवृत्त जसे थोडक्यात, मोजके लिहावयाचे असले तरी महत्त्वाचे सर्व मुद्दे त्यामध्ये आले पाहिजेत, काही नगरपरिषदा व महानगरपालिकांनी इतिवृत्त सभेत जे काही घडले जी चर्चा, भाषणे झाली ते सर्व जसेच्या तसेच लिहिणे याला इंग्रजीत 'व्हरब्याटिम मिनिट्स' असे म्हटले जाते. या प्रकारचे इतिवृत्त लिहिण्यासाठी टेपरेकॉर्डर, लघुलेखक अशी यंत्रणा लागते. परंतु महानगरपालिकासारख्या मोठ्या स्थानिक स्वराज्य संस्था

सोडल्या तर बहुतांश नगरपरिषदांमध्ये संपादित स्वरूपात इतिवृत्त लिहिण्याची पध्दती अवलंबीली जाते.[४७]

सभा चालू झाल्यापासून ते सभा संपेपर्यंत झालेल्या कामकाजाचे टिपण सभा सचिव घेतो. सभा संपल्यानंतर ते टिपण संपत नसेल तर त्यात सभाध्यक्ष काही दुरुस्त्या सुचवितात व टिपण मान्य झाल्यानंतर कार्यवृत्त नोंदवहीच्या भाग एक मध्ये इतिवृत्त लिहिले जाते व त्यावर सभाध्यक्ष सही करतात. इतिवृत्त म्हणजे सभेचा इतिहास, इतिवृत्त कायम झाल्यानंतर त्याला अभिलेखाचे स्वरूप प्राप्त होते. सभेत नक्की काय घडले त्याचा पुरावा होतो. इतिवृत्त पाहिल्यानंतर सभेस उपस्थित असलेल्या व उपस्थित नसलेल्या सदस्यांना सभेत नक्की काय घडले त्याची माहिती मिळू शकते. ही पध्दती नसती तर सभेत काय घडले, कोण काय बोलले, निर्णय कसे झाले इत्यादी बाबत केवळ आठवणीने सांगता येणे शक्य झाले नसते व प्रशासनाला सभेचे निर्णय अंमलात आणणे कठीण झाले असते.

नगरपरिषदेच्या सभांना नगरसेवक येतात, विषयपत्रीकेवरील विषयावर चर्चा करून निर्णय घेतात. सभेला जो काही विचारविनीमय झाला, मते व्यक्त झाली, निर्णय झाले त्याच्या लिखित स्वरूपात नोंदी झाल्या पाहिजेत. सभेतील निर्णयांची मुख्याधिकाऱ्यांना अंमलबजावणी करावी लागते. जर लिखित नोंदी ठेवल्या नाहीत तर सभेत कोणते निर्णय झाले त्याबाबत मुख्याधिकाऱ्यांना सभाध्यक्षांकडे विचारणा करावी लागेल. सभाध्यक्षांना सभेत जेजे घडले ते सर्व काही स्मरणात ठेवणे शक्य होईल असे नाही. त्यामुळे निर्णयांची अंमलबजावणी करण्यात अडचणी निर्माण होणार यासाठी ज्यावर अवलंबून राहून कार्यवाही करता येईल अशा लिखित नोंदी ठेवणे अनिवार्य ठरते. इतिवृत्त कायम झाल्यानंतर ते अभिप्रमाणित अभिलेख होते. लोकसभेपासून ते ग्रामपंचायतीपर्यंत सभेच्या कामकाजांच्या लिखित नोंदी करण्याची तरतूद त्या-त्या सस्थांना लागू असणाऱ्या अधिनियम व अधिनियमाखाली केलेल्या नियमामध्ये केली आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियत्म १९६५ च्या कलम ८१ (१२) व सभ नियमातील नियम ३९ सभेचा इतिवृत्तांत नमुन्यातील नोंदवहीच्या भाग एक मध्ये लिहीला जातो. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या प्रकरण २ मधील नियम (न) अन्वये व

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील कलम १११ (१३) नुसार सभेचे कार्यवृत्त ठेवावे लागते. संसद व राज्यविधी मंडळाच्या सभागृहात जे-जे घडले ते-ते जसेच्या तसे नोंद करून ठेवण्याची पध्दती आहे.[४८]

नगरपालिका सभेच्या बाबतीत खालील बाबींचा इतिवृत्तांत उल्लेख असणे अत्यावश्यक असते.

१. सभा कोणत्या प्रकारची होती, सर्वसाधारण, विशेष सभा की, तहकूब सभा.
२. सभा कोठे भरली व किती वाजता सुरु झाली.
३. सभेस कोणते सदस्य हजर होते, सभेस उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांची नावे.
४. सभेचे कामकाज चालू असताना सभागृहात कोणते सदस्य कोणता विषय चालू असताना सभागृहात आले किंवा सभागृहातून बाहेर गेले.
५. सभा चालू झाल्यानंतर काही सदस्य सभागृहातून बाहेर गेल्यामुळे गणपुर्ती अभावी सभा तहकूब झाली काय?
६. इतिवृत्त कायम करताना काही दुरुस्त्या सुचविल्या असल्यास दुरुस्त्यासह इतिवृत्त कायम केल्याबद्दलची नोंद.
७. प्रश्न कोणते विचारले, प्रश्नांना उत्तरे कोणी दिली, प्रश्न प्रलंबित ठेवला असल्यास त्याबाबत नोंदी.
८. स्थायी समितीकडून मंजूर होवून आलेला ठराव कायम केल्याबाबतची नोंद.
९. शासन व शासनाच्या अधिकाऱ्यांकडून आलेल्या पत्रव्यवहारांची माहिती सभागृहास दिली असल्यास त्याबाबतची नोंद.
१०. संबंधित विषयावर सूचना कोणी दिली त्यांचे नाव, अनुमोदकाचे नाव, विषय क्रम बदलला असल्यास त्याबाबतची नोंद.
११. सूचनेवरील चर्चेत ज्या सदस्यांनी भाग घेतला त्यांची नावे व त्यांच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे संक्षिप्त स्वरूपात.
१२. उपसूचना दिली असल्यास उपसूचना देणाऱ्याचे अनुमोदन करणाऱ्या सदस्याचे नाव

१३. सूचना, उपसूचना सर्वानुमते मंजूर झाली की, बहुमताने, अनुकूल व प्रतिकूल मत देणाऱ्या सदस्यांच्या नावांची नोंद.

१४. एखाद्या सदस्याने हरकतीचा मुद्दा उपस्थित केला असल्यास तो उपस्थित करणाऱ्याचे नाव, मुद्दयाचे स्वरूप, सभाध्यक्षांनी हरकतीचा मुद्दा स्वीकारला किंवा नाही, हरकतीच्या मुद्दयावर निर्णय दिला अथवा निर्णय राखून ठेवला याबाबतची नोंद.

१५. विषय तहकूबी किंवा सभा तहकूबीबाबत सूचना आली असल्यास त्याबाबतच्या नोंदी.

१६. चर्चा बंदीची सूचना दिली असल्यास ती देणाऱ्या सूचक व अनुमोदकांची नावे, चर्चाबंदीची सूचना सभाध्यक्षांनी स्वीकारली अगर नाकारली, तसेच चर्चाबंदीची सूचना सभागृहाने स्वीकारली अथवा नाकारली याबाबतच्या नोंदी.

१७. सभागृहात एखाद्या प्रश्नावरून गोंधळ झाला काय? गोंधळाच्या परिस्थितीमुळे सभाध्यक्षांनी सभा तहकूब केली असल्यास त्याबाबतच्या नोंदी.

१८. एखाद्या सदस्याने असभ्य शब्द भाषणात उच्चारले तर अशा प्रसंगी सभाध्यक्षांनी दिलेल्या निर्णयाची, सूचनांची नोंदी.

१९. बेशिस्त वागणाऱ्या सदस्याला सभाध्यक्षांनी सभागृहाबाहेर जाण्याचा आदेश दिला असल्यास किंवा असा दिलेला आदेश मागे घेतला असल्यास त्याबाबतची नोंदी.

२०. सभा चालू असताना मुख्याधिकाऱ्यांनी त्यांचे मत प्रदर्शित करण्यासंबंधी सभाध्यक्षंकडे परवानगी मागीतली असल्यास परवानगी दिली अथवा नाही, दिली असल्यास मुख्याधिकाऱ्याने केलेल्या मतप्रदर्शनाची नोंद.

२१. विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर आयत्या वेळेचे विषय घेतले असल्यास त्याबाबतच्या नोंदी.

२२. एखाद्या सदस्याने स्पष्टीकरण केले असेल तर त्याची नोंद.

सभेच्या इतिवृत्तांतात कोणते मुद्दे आले पाहिजेत यासंबंधी वर विवेचन केले आहे. तथापि इतिवृत्त लिहिताना घटना ज्या क्रमाने घडत गेल्या त्याक्रमाने लिहिल्या पाहिजेत. कार्यवृत्ताच्या भाग दोन मध्ये सभेने घेतलेल्या निर्णयांची म्हणजेच ठरावांची नोंद घेतली जाते. ठरावाचा मजकूर सभेने जसा मंजूर केला आहे तसाच लिहावा लागतो. ठरावाचा संपादित

मजकूर लिहावयाचा नसतो. सभेमध्ये सूचना मांडल्यानतर त्या सूचनेवर काही दुरुस्त्या सूचना मांडल्या जातात. दुरुस्त सूचना किंवा उपसूचना जस्याच्या तस्या भाग दोन मध्ये लिहावयाच्या असतात. सूचना, दुरुस्त सूचना मंजूर झाली किंवा नामंजूर झाली, अनुकूल व प्रतिकूल मत देणाऱ्या सदस्यांची नावे लिहिणे आवश्यक असते. इतिवृत्त लिहून झाल्यावर सभाध्यक्षंनी त्यावर सही करावयाची असते. सभासचिव सभेच्या वेळी टिप्पणी लिहून त्याआधारे इतिवृत्त लिहीतात. इतिवृत्त लिहीण्यापूर्वी सभाध्यक्षांना त्यामध्ये काही दोष दिलेलल्या सूचनेनुसार जरूर त्या दुरुस्त्या करून सभासचिवांना इतिवृत्त लिहावयाचे असते. सभा सचिवाने एक बाब लक्षात ठेवली पाहिजे की भाग एक मधील मजकूर लिहिताना सभाध्यक्षांनी सांगतील त्याप्रमाणे दुरुस्त्या कराव्या लागत असल्या तरी भाग दोन मध्ये जे सभेने मंजूर केलेले निर्णय लिहीले जातात त्या निर्णयात दुरुस्त्या सूचविण्याचा अधिकार सभाध्यक्षांना नाही. सभेने ज्या मजकूराचा निर्णय घेतला असेल तो मजकूर तसाच लिहीला पाहिजे. अधिनियमातील तरतूदीनुसार सभेच्या निर्णयात दुरुस्ती करण्याचा किंवा न करण्याचा अधिकार फक्त सभेलाच आहे.[४९]

## ५.९ नगरपालिका सभा आणि अर्थसंकल्पः

नोव्हेंबर संपला व डिसेंबर महिना उजाडला की नगरपालिकेतील लोकप्रतिनिधींना अर्थसंकल्पाचे वेध लागतात. मुख्याधिकारी लेखापाल व खातेप्रमुखाशी चर्चा करतात. नगराध्यक्ष अर्थसंकल्पात कोणकोणत्या कामांचा समावेश असावा यासंबंधी मुख्याधिकाऱ्यांना सूचना करतात. नगरसेवक, नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना त्यांच्या प्रभागातील कामांचा समावेश होण्यासाठी आग्रह धरतात. नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या सूचना व पुढील वर्षात होणारी संभाव्य जमा आणि अत्यावश्यक म्हणून करावा लागणारा खर्च विचारात घेऊन मुख्याधिकारी अर्थसंकल्प तयार करण्याच्या कामास लागतात.[५०]

अर्थसंकल्प म्हणजे आर्थिक व्यवस्थापन, पुढील वर्षी किती पैसा येणार, तो कुठून येणार, येणाऱ्या पैशातून कोणकोणती कामे करता येतील, वर्षअखेर किती शिल्लक राहील याबाबतची आकडेवारी दर्शवणारी पत्रके. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम (नगरपालिका अधिनियम) १९६५ मधील कलम १०१ व महाराष्ट्र नगरपालिका

लेखा संहिता १९७१ मधील नियम २५, २६ व २७ मधील तरतुदीचे व  शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करून मुख्याधिकाऱ्यांना नगराध्यक्षांच्या निर्देशानुसार अर्थसंकल्प तयार करावा लागतो. तथापि नगराध्यक्ष प्रामुख्याने अर्थसंकल्पात कोणकोणत्या कामासाठी खर्चाची तरतूद करावी सुचवितात किंवा राज्य शासनाकडून एखाद्या प्रकल्पासाठी कर्ज अथवा अनुदान प्राप्त होईल. ते जमा बाजूला दाखवा अशा सूचना करतात. अनुदान व कर्ज मिळण्यासाठी बरेच नगराध्यक्ष प्रयत्नशील असतात. वरील बाबी सोडल्या तर गेल्या तीन वर्षात नगरपालिकेला विविध बाबींपासून मिळालेल्या उत्पन्न व निरनिराळ्या कारणासाठी झालोल खर्च याचा विचार अर्थसंकल्प तयार करताना केला जातो. अस्तित्त्वात असलेले कर व शुल्क यांचे दर, कर व शुल्क यांच्या दरात वाढ सुचविली असल्यास वाढ केल्यामुळे मिळणारे उत्पन्न, भाड्याने दिलेल्या मिळकतीपासूनचे उत्पन्न, शासनाकडून मिळणारी विविध अनुदाने, कर्ज मिळणार असेल, कर्जाची रक्कम, गुतवणूकीवरील व्याज, साहित्य विक्री, देणग्या इत्यादीपासून मिळणारे उत्पन्न विचारात घेतले जाते. शासकीय अनुदानाचे आकडे जमेस दाखविताना अगदी अलिकडे अनुदान देणेसंबंधी शासनाने घेतलेल्या निर्णयांची माहिती घेवून आकडे दाखविले जातात. कधी महागाई भत्ता, करमणूक कर अनुदानांच्या दरात वाढ होते. तर कधी एखादे नवीन अनुदान जाहीर केले जाते. केंद्र व राज्य सरकारच्या वित्त आयोगाच्या शिफारशीमुळे केंद्र व राज्य सरकारच्या कर उत्पन्नातील हिस्सा नगरपालिकांना दिला जातो. काही नवीन योजना जाहीर होऊन त्यासाठी शंभर टक्के अनुदान दिले जाते. या सर्व बाबींचा अभ्यास करून जमा बाजूच्या संबंधित शीर्षकाखाली अनुदानापासूनचे उत्पन्न दाखविले जाते. करापासून व भाड्यापासून ढोबळमानाने दहा टक्केच वाढ दाखविणे वाजवी होत नाही. नगरपालिका पाणी पट्टी कर किंवा भाड्यामध्ये वाढ करणार असेल तर अशी बाब विचारात घ्यावी लागते. एखादे वेळेस नगरपालिकेस शुल्क आकारून नवीन सेवा पुरविणार असेल त्यापासून उत्पन्न विचारात घ्यावे लागते. शहराचा व्याप वाढला असेल, नव्या इमारती होत असतील तर मालमत्ता कर, पाणीपट्टी, विकास शुल्क यापासून उत्पन्नात वाढ होते. मालमत्ता कराच्या चतु:वार्षिक फेर कर आकारणी करण्याचे काम चालू असेल तर मालमत्ता करापासूनच्या उत्पन्नात भरीव वाढ होण्याची शक्यता असते. नगरपालिका सभेत अर्थसंकल्पावर चर्चा चालू असताना सदस्य

अनेक प्रश्न विचारणार परंतु प्रत्येक शीर्षकाखाली दर्शविलेली रक्कम कशी जमा होणार यासंबंधी सविस्तर अहवाल सादर केला तर अनेक शंकांचे निरसन अहवाल वाचल्यानंतर होवू शकेल. मुख्याधिकाऱ्यांनी लेखापाल यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकावर सही करून स्थायी समितीकडे सादर करणे अपेक्षित नाही. त्यांचे उत्पन्न वाढीसाठीचे स्वतःचे विचार असतील काही कल्पना असतील त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी काय उपाययोजना केली जाणार आहे अर्थसंकल्पासोबतच्या अहवालावरून दिसून आले पाहिजे. विशेषतः विकास आराखड्यातील कोणत्या आरक्षित जागेचा विकास करता येईल, शासनाच्या कोणत्या योजनांचा फायदा घेवून अनुदान मिळविता येईल, नगरपालिकेला कायमचे उत्पन्न मिळेल, या दृष्टीने कोणते काम हाती घ्यावे, कोणत्या कराचे, शुल्काचे कर वाढविण्यास वाव आहे. मात्र लोकप्रतिनिधींनी व नगराध्यक्षंनी सांगितलेल्या कामांचा समावेश जमा कमी पडते म्हणून जमा फुगवून दाखविणे म्हणजे स्वतःची व लोकप्रतिनिधींची दिशाभूल केल्यासारखे होते. कारण या दिशाभूलीमुळे कामे होणर नाहीत. काम न झाल्यामुळे लोकप्रतिनिधींचा रोष वाढतो. त्यापेक्षा सुविधा पुरविण्यासाठी व विकासकामासाठी जेवढा निधी उपलब्ध होणार आहे तेवढ्याच कामांची तरतुद केली जावी.

अर्थसंकल्पातील खर्चाच्या बाजूकडील विविध कामांसाठी तरतूद केली जाते. आस्थापन खर्च, स्टेशनरी, जंतुनाशके, इंधन, इमारती व वाहन दुरुस्ती, पोस्टेज,दूरध्वनी, वीज बीले, कर्जाचे हप्ते, निवृत्तीवेतन निधी, भविषय निर्वाह निधी, वेतन राखीव निधी, पाणी बीले, वीजेची उपकरणे, पाणीपुरवठा योजनेसाठी लागणारे साहित्य, सभा भत्ते यासारख्या आवश्यक बाबींसाठी करावा लागणारा खर्च व वर्षअखेर ठेवावी लागणारी शिल्लक रक्कम वजा जाता जी रक्कम शिल्लक राहते त्या रकमेतून निरनिराळ्या विकास कामासाठी तरतूद करावयाची असते. मुख्याधिकारी सर्व खाते प्रमुखांना पुढील वर्षी त्यांना कोणकोणत्या कामासाठी किती निधी लागणार आहे याची माहिती घेत असतात. तथापि त्यांनी नगरपालिका हद्दीतील रस्ते, गटारी, फूटपाथ, प्रकाश योजना, उद्याने, क्रीडांगणे, वाचनालये, दवाखाने, सार्वजनिक शौचालये, स्मशान व दफन भूमी यांची पाहणी करावी. नगरपालिकेच्या खुया जागा असतील तर त्याची माहिती घ्यावी. खातेप्रमुखांनी त्यात्या कामासाठी केलेली निधीची मागणी व मुख्याधिकाऱ्यांना

स्वतःस काही कामे करावीशी वाटत असतील तर किती रक्कम लागते पहावे. नगराध्यक्षांच्याबरोबर चर्चा करावी व त्यानंतर अर्थसंकल्पातील खर्चाची बाजू पूर्ण करावी.

पुढील अर्थसंकल्प सादर करताना गेली तीन वर्षातील त्या त्या खात्यावर जमा झालेली व खर्च झालेली रक्कम याची माहिती नमुन्यातील पत्रकामध्ये घ्यावी. चालू वर्षाच्या अर्थसंकल्पानुसार नोव्हेंबर अखेर प्रत्यक्ष जमा झालेली रक्कम व प्रत्यक्ष होणारा संभाव्य खर्च याची माहिती घ्यावी. मुख्याधिकाऱ्यांनी अर्थसंकल्प सादर करताना जमा व खर्चासंबंधी सविस्तर अहवाल द्यावा. तरतूदीची कारणे व त्या पूर्णत्वास येत आहेत का याची माहिती घ्यावी. अनुदानातून कोणती कामे करण्याचे योजले आहे त्यासंबंधी माहिती घ्यावी. उत्पन्न वाढीसाठी कोणते निर्णय नगरपरिषदेने घ्यावेत, खर्चामधले कशी काटकरसर करता येईल यासंबंधी नगरपरिषदेला मार्गदर्शन करावे.[५१]

३१ डिसेंबर पूर्वी स्थायी समितीला अर्थसंकल्प सादर करावा लागतो व स्थायी समितीने तिच्या शिफारशीसह ३१ जानेवारीपूर्वी सभेला सादर करावयाचा असतो. स्थायी समितीला अर्थसंकल्प सादर होईपर्यंत अध्यक्षांच्या शिवाय सर्वसाधारणपणे इतर नगरसेवकांना अर्थसंकल्पातील तरतुदीसंबंधी माहिती नसते. अर्थसंकल्प मंजुर करण्यासाठी नगरपालिकेची सभा बोलाविल्यानंतर सर्व नगरसेवकांना आर्थिक तरतुदीची माहिती होते.

नगरसेवक प्रथम आपल्या प्रभागातील कामासाठी किती तरतूद केली आहे शोधून काढतो. आपल्या कामाचा समावेश झाला की अर्थसंकल्पातील इतर तरतुदी संबंधी माहिती घेण्याचे प्रयोजन नाही असे काहीना वाटते. अर्थसंकल्पासोबत लेखा संहितेतील नियम २५ अन्वये प्रपत्रक ६ मध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार कामासाठी केलेली तदतूद समजू शकते. या पत्रकामध्ये पुढील वर्षी जी कामे करावयाची योजले आहेत त्याचे नाव अंदाजे खर्च याची माहिती असते. असे प्रपत्रक नसेल तर नगरसेवकांनी मागणी केली पाहिजे. प्रपत्रकामधील कामाच्या आर्थिक तरतूदीत बदल करण्याचे अधिकार नगरपालिका सभेचा आहे. नगरपालिका सभेपुढे अर्थसंकल्प मांडला की नगरसेवकांची भूमिका सूरू होते. अर्थसंकल्पास मंजुरी देत असताना नगरसेवकांनी खालील बाबींकडे लक्ष देणे गरजेचे असते.[५२]

चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाचा प्रथम आढावा घ्यावा. जमा बाजूस ज्या रकमा दाखविल्या आहेत त्याप्रमाणे रकमा जमा होत आहेत का? नसल्यास त्याची कारणे, उर्वरीत ४ महिन्यात अपेक्षित जमा होण्यासाठी प्रशासन कोणती कार्यवाही करणार आहे? कर वसुलीचेप्रमाण कमी असल्यास त्याची कारणे, शासनाकडून मिळणारी अनुदाने वेळेवर मिळाली आहेत का? नसल्यास ती मिळण्यासाठी काय प्रयत्न केले आहेत? परवाने फी, मालमत्ता भाडे, निवास शुल्क इतर शुल्क यांची वसुली पुरेशी झाली आहे काय? मोठ्या थकबाकीदाराकडून कर वसुलीसाठी काय कार्यवाही केली आहे? दिलेली तसलमात (ॲडव्हान्स) लेखा परीक्षण अहवालात दर्शविलेली रक्कम वसुलीसाठी काय कार्यवाही केली, याबाबत प्रश्न उपस्थित करून माहिती घेता येईल. तसेच एखाद्या बाबीपासून तरतुदीपेक्षा जास्त जमा झाली असल्यास त्याची कारणे काय याचीही माहिती विचारात येईल. असे प्रश्न विचारल्यामुळे प्रशासनावर नगरसेवकांचा दबदबा निर्माण होतो व पुढील चार महिन्यात जमेचे लक्ष गाठण्यासाठी प्रशासन कार्यरत होते.

त्याचप्रमाणे चालू आर्थिक वर्षात निरनिराळ्या कामासाठी खर्चाची जी तरतूद केली आहे त्यापैकी एखाद्या कामावर काहीच खर्च झाला नसेल, एखाद्या कामावर अल्प खर्च झाला असेल तर अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे खर्च का झाला नाही, त्याला जबाबदार कोण आहे आणि पुढील चार महिन्यात खर्च होण्याची प्रशासन काय कार्यवाही ठेवणा याबद्दल प्रश्न उपस्थित करता येतील.

नगराध्यक्ष अगर मुख्याधिकारी यांना नगरसेवकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतात. प्रशासनातील दिरंगाईमुळे तरतूद खर्च होत नसेल तर वर उल्लेखिलेल्या प्रश्नामुळे प्रशासनात जागरूकता येऊन बरीच कामे मार्गी लागू शकतात.

चालू वर्षाच्या अर्थसंकल्पातील पहिल्या आठ महिन्यात झालेली जमा व खर्च व पुढील चार महिन्यातील होणारी संभाव्य जमा व खर्च यावर प्रथम चर्चा होणे अपेक्षित असते. त्यानंतर पुढील वर्षासाठी जो अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे त्यातील प्रथम जमेच्या बाजूची चर्चा व्हावी.

जमेच्या बाजूकडील विविध शीर्षकाखाली ज्या रक्कमा दाखविल्या आहेत, त्या रकमांमध्ये पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पात घट आहे की वाढ दाखवली आहे. नगरपालिका कोणत्या वर्गातील असली तरी शहराची लोकसंख्या वाढत असते. इमारती व पाण्याच्या नळजोडणीमध्ये वाढ होत असते, नवीन जाहिरातीचे फलक लावले जातात. व्यवसायात वाढ होत असते या सर्वांचा विचार करता अर्थसंकल्पात जमेच्या बाजूस वाढ दिसून आली पाहिजे. मालमत्ता करात पुरेशी वाढ झाली नाही तर नवीन इमारतींवर कर न आकरला जाण्याची शक्यता असते. भाड्याने दिलेल्या मिळकतींची भाडे मुदत संपल्यानंतरही भाडयात वाढ न केल्यामुळे भाड्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ दिसत नाही. कर वसूलीचे प्रमाण कमी असेल तर महागाई भत्ता अनुदान कमी मिळणार. नगरसेवकांची वरील बाबी बाकाईने पाहून अर्थसंकल्पाचे चर्चेच्या वेळी प्रश्न उपस्थित करून खुलासा विचारला पाहिजे. जमेच्या बाजूचा अभ्यास न करता केवळ खर्चाच्या बाजूचा विचार करणे बरोबर होत नाही. अलिकडच्या काळात ७४च्या घटना दुरुस्तीमुळे केंद्र सरकार राज्यसरकारच्या माध्यमातून अनेक कामासाठी अनुदान देत आहे. राज्यसरकारही वेगवेगळ्या योजनासाठी कामासाठी निधी देत आहे. असा निधी मिळविण्यासाठी शासनाला प्रस्ताव सादर करावे लागतात. अन्यथा निधी मिळण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. जमेची बाजू पाहताना शासनाकडून कोणकोणत्या कामासाठी निधी प्राप्त होणार आहे याकडे लक्ष द्यावे. जर असा निधी दाखविला नसेल तर त्याची कारणे काय आहेत याबाबत चर्चेच्या वेळी विचारणा करता येईल.[५३]

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जमेच्या बाजूस मिळणाऱ्या शीर्षकाखाली जे उत्पन्नाचे आकडे दाखविले आहेत ते वास्तव आहेत का? केवळ नगरसेवकांच्या मागणीनुसार व त्याना नाराज करावयाचे नाही म्हणून त्यांनी सुचविलेल्या कामाची तरतूद अर्थसंकल्पात करायची व त्यासाठी उत्पन्न अपुरे पडत असल्यामुळे उत्पन्न वाढवून दाखवायचे असे होते. त्यासाठी मालमत्ता कर, पाणीपट्टी, शासकीय अनुदाने यापासूनच्या उत्पन्नात वाढ दाखवायची. पूर्वी ज्यावेळी जकात कर होता त्यावेळी खर्चासाठी रक्कम कमी पडायला लागली की जकातीचे उत्पन्न वाढवून दाखवायचे. प्रत्यक्षात तेवढे उत्पन्न कधीच मिळायचे नाही. परिणाम असा होतो की वाढीव उत्पन्न गृहीत धरून ज्या कामांचा अर्थसंकल्पात समावेश केलेला असतो ती कामे

होत नाहीत. अंदाजपत्रकात तरतूद असूनही मुख्याधिकारी आमची कामे करीत नाहीत, अशा तक्रारी होतात. मुख्याधिकाऱ्यांना अशा परिस्थितीत दोषी कसे धरता येईल.

सर्व नगरसेवकांना अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी अर्थकारणावर चर्चा करावी, राजकारण टाळावे, शहर सर्वांचेच असते. विरोधी नगरसेवकांचे प्रभाग शहराच्या बाहेरचे नसतात हे नगरसेवकांनी लक्षात ठेवले पाहिजे. प्रभागातील रस्ते, गटारी, दिवाबत्ती, पाणीपुरवठा यासंबंधीचा कामासाठी जरूर आग्रह धरला पाहिजे. प्रभागातील कामे एकाच वर्षात होणे शक्य नाही. अग्रक्रम कशाला द्यावयाचा ते त्या प्रभागतील नगरसेवकांनी ठरवून त्याप्रमाणे अर्थसंकल्पात तरतूद होण्यासाठी मागणी करावी.

प्रत्येक नगरसेवकाची प्रभागातील जशी कामे असतात तशी शहराची म्हणून काही कामे असतात. शहराचा सर्वांगीण विकास व्हावा, शहर स्वच्छ व सुंदर दिसावे, तेथे जाऊन राहावे असे वाटावे यासाठी काही कामे नगरपालिकेने करणे गरजेचे असते. उदा. मुख्य रस्ते, मिक्स पध्दतीने डांबरीकरण, मुख्य रस्त्यांच्या कडेला फुटपाथ, भाजीमार्केट, मटणमार्केट, दुकान, गाळे, व्यापारी संकुले, नाट्यगृह, प्रसुतीगृह, बालोद्याने, क्रीडांगणे, संस्कार मंदिर, वाचनालय, दवाखाने, अग्निशामक केंद्र, प्रमुख चौकात व रस्त्यावर आकर्षक प्रकाश योजना, मोक्याच्या जागेत कारंजी, प्राथमिक शाळा, बालवाडी, यासाठी इमारती बांधणे ही सर्व कामे एखाद्या प्रभागात येत असतील तर ही शहराची कामे म्हणणे योग्य होईल. अशा कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी लागतो. त्यासाठी सर्वांनी एकत्र बसून किमान पुढील पाच वर्षात कोणती कामे करावयाची ते ठरविले पाहिजे. यासाठी विकास आराखड्याचा अभ्यास करावा. निधीची उपलब्धता व्हावी यासाठी करांचा बोजा फारसा न वाढविता उत्पन्न कसे वाढविता येईल याचा विचार करावा. अनावश्यक खर्च टाळणे, काटकसर करणे हा सुध्दा उत्पन्नवाढीचा मार्ग ठरू शकतो. त्यादृष्टीने अर्थसंकल्पात काही कामांचा समावेश करावा. वर्षाकाठी तीनचार मोठ्या खर्चाची कामे केली तरी पाच वर्षाच्या काळात बरीच कामे होवू शकतात.

अर्थसंकल्पात कामांच्या खर्चाची तरतूद केली व अर्थसंकल्प मंजूर केला की जबाबदारी संपत नाही. अर्थसंकल्पाची अंमलबजावणी होते की नाही पाहण्याची जबाबदारी नगरसेवकांची आहे. त्यासाठी नगरपालिकांच्या सभेत वेळोवेळी प्रश्न उपस्थित केले पाहिजेत. दर तीन

महिन्यांनी जमाखर्चाचे ताळेबंदपत्रक नगरपालिका सभेपुढे ठेवले जाते. ताळेबंद पत्रक पाहिल्यावर अर्थसंकल्पाची अंमलबजावणी कशी होते ते समजून येते. मंजूर केलेल्या अर्थसंकल्पातील संबंधीत शिर्षकाखालील जी आर्थिक तरतूद केली आहे त्यात परिस्थितीनुसार अधिनियमाच्या कलम १०१ (६) मधील तरतुदीस अधिन राहून बदल करण्याचा अधिकार विषय समिती, स्थायी समिती व नगरपालिका सभेला आहे.[५४]

अर्थसंकल्पाची अंमलबजावणी करण्यामध्ये प्रशासनाच्या काही अडचणी असतील तर त्या सोडविण्यासाठी मदत केली पाहिजे. प्रशासनालाही लोकप्रतिनिधींच्या सहकार्याची गरज असते. लोकप्रतिनिधी व प्रशासन यांनी एकमेकांच्या सहकार्याने, जिद्दीने व उत्साहाने काम केले तर पाच वर्षाच्या कालावधीत शहराचा कायापालट होवू शकतो आणि त्याचसाठी मतदारांनी आपणाला नगरपालिकेत त्यांचे प्रतिनिधी पाठविले आहे याची आठवण सदैव ठेवावी. नगरसेवक झाल्यामुळे आपल्याला अधिकार मिळालेला आहे. या अधिकारांचा वापर शहरातील नागरिकांचे समाजजीवन सुसह्य व्हावे यासाठी केला तर आदर्श नगरसेवक होवू शकता.

## ५.१० समारोपः

शहरातील लोकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी शहराचा विकास होण्यासाठी, शहराचा कायापालट होण्यासाठी नगरपालिकेची स्थापना झाली. ज्या-ज्या नगरपालिकेला नगराध्यक्ष व मुख्याधिकारी कार्यक्षम व चांगले मिळाले त्या-त्या शहराचा विकास उत्कृष्ट दर्जाचा झाला. या प्रकरणात नगरसेवक, नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांची कामे काय असतात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. प्रशासनाचा मुख्य गाभा म्हणजे नगरपालिकेचा मुख्याधिकारी हा असतो. मंगळवेढ्याच्यादृष्टीने झालेल्या नगरपालिकेचे मुख्याधिकारी कर्तव्यदक्ष लाभले व त्यांनी शहराचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला.

# तळटीपा

१. निखील पुंजाळ, महाराष्ट्र स्टेट नगरपालिका, भारत सरकारद्वारा प्रकाशित, नई मुंबई, १९८८, पृ.११२.

२. कित्ता, ११३.

३. रणजित चव्हाण, नगरपालिका सभाशास्त्र, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था प्रकाशित, २०१०, पृ.८४.

४. कित्ता, ८५.

५. मंगळवेढा नगरपालिका प्रशासकीय अहवाल, सन १८७४-२०१० पर्यंत.

६. कित्ता, पृ.१२०.

७. सोलापूर जिल्हा गॅझेट, १९८४, पृ.३३८

८. कित्ता, पृ.३३९.

९. उपरोक्त, रणजित चव्हाण, पृ.९०.

१०. कित्ता, पृ.९१.

११. उपरोक्त, निखील पुंजाळ, पृ.११६.

१२. कित्ता, पृ.११७.

१३. राजेश चौधरी, मुंबई प्रांतिक नगरपालिका अधिनियम, १९४९, चौधरी लॉ.पब्लिशर्स, २०१०, पृ.३४८.

१४. कित्ता, पृ.३४९.

१५. विराट शर्मा, भारत में शास्त्रीय राजनीति, शर्मा पब्लिकेशन, नई दिल्ली, १९९०, पृ.३४९.

१६. कित्ता, पृ.१२२.

१७. कित्ता, पृ.१२३.

१८. कित्ता, पृ.१२४.

१९. शर्मा आर.एस., भारत में सरकार और राजनीति, दिल्ली प्रकाशन, दिल्ली, २०१५, पृ.१४८.

२०. कित्ता, पृ.१४९.

२१. कित्ता, पृ.१५०.

२२. उपरोक्त, विराट शर्मा, पृ.१८९.

२३. कित्ता, पृ.१९०.

२४. कित्ता, पृ.१९१.

२५. Hirja Jayal, Politics in India, Oxford Pub. New Delhi, १९८०, page २६२.

२६. कित्ता, पृ.२६३.

२७. कित्ता, पृ.२६४.

२८. उपरोक्त, शर्मा आर.एस., पृ.१६२.

२९. कित्ता, पृ.१६३.

३०. कित्ता, पृ.१६४.

३१. मंगळवेढा नगरपालिका प्रशासकीय सरकारी अहवाल, १९८०, पृ.२२४.

३२. कित्ता, पृ.२२५.

३३. कित्ता, पृ.२२६.

३४. उपरोक्त, निखील पुंजाक, पृ.२६९.

३५. कित्ता, पृ.२७०.

३६. कित्ता, पृ.२७१.

३७. उपरोक्त, रणजित चव्हाण, पृ.१२८.

३८. कित्ता, पृ.१२९.

३९. कित्ता, पृ.१३०.

४०. उपरोक्त सोलापूर गॅझेट पृ.३६०.

४१. कित्ता, पृ.३६१.

४२. कित्ता, पृ.३६२.

४३. राकेश देशपांडे, नगरपालिका अधिनियम, वृत्तविद्या प्रकाशन, औरंगाबाद, २००१, पृ.६९.

४४. कित्ता, पृ.७०.

४५. कित्ता, पृ.७१.

४६. उपरोक्त, निखील पुंजाक, पृ.३२१.

४७. मंगळवेढा नगरपालिका सभेचे इतिवृत्त व गणपूर्ती प्रशासकीय अहवाल, सन १९९०, पृ.१२९.

४८. कित्ता, पृ.१३०.

४९. कित्ता, पृ.१३१.

५०. मंगळवेढा नगरपालिका अर्थसंकल्प अहवाल, सन २००१-२००५, पृ.३३.

५१. कित्ता, पृ.३४.

५२. कित्ता, पृ.३५.

५३. कित्ता, पृ.३६.

५४. कित्ता, पृ.३७.

## प्रकरण सहावे

# उपसंहार

मंगळवेढा शहर महाराष्ट्रातील ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर होते. सोलापूर जिल्हा सीमेवर त्याचप्रमाणे कर्नाटक सीमेवर मंगळवेढा शहर वसल्याने महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्यादृष्टीनेही महत्त्वाचे आहे. सन १८७४ रोजी मंगळवेढा नगरपालिकेची स्थापना होण्याअगोदर मंगळवेढा शहर सांगली संस्थानात विलीन होते. प्राचीन भारताच्या इतिहासात मंगळवेढा शहराचा उल्लेख 'मंगळवेष्ठित' असा आहे. त्याचप्रमाणे या भूमीत 'मंगल' नावाचा राजा होता त्याच्याही नावावरून मंगळवेढा नाव पडले असावे असे म्हटले जाते. या शहराला ज्याप्रमाणे प्राचीन समृद्ध वारसा आहे त्याचप्रमाणे मंगळवेढा भूमी संतांच्या पदस्पर्शाने पावन झाली आहे. दामाजी पंत, चोखामेळा, कान्होपत्रा यासारखे संत या भूमीतच झाले. मंगळवेढ्यामध्ये विविध राजघराण्यांनी राज्य केले. त्यामध्ये कलचुरी, चालुक्य, देवगिरीचे यादव, बहामनी, आदिलशाही, मराठे, पेशवे इत्यादी यामुळे मंगळवेढा शहराचा व संस्थानाचा प्राचीन इतिहास वैभवशाली होता.

मंगळवेढा परिसरात भीमा नदी, माण नदी यासारख्या नद्यांमुळे मंगळवेढा शहराला व तालुका अंतर्गत भागाला त्याचा फायदा होतो. मंगळवेढा शहर समुद्रसपाटीपासून ४५८ मीटर उंचीवर आहे. त्यामुळे मंगळवेढा शहर दुष्काळी भागात मोडते. मंगळवेढ्याची जमीन कसदार आहे. त्यामुळे ज्वारीचे उत्पन्न मोठ्या प्रमणावर होते. महाराष्ट्रातील 'ज्वारीचे कोठार' असा नाव लौकिक मंगळवेढ्याचा आहे.

मध्ययुगीन कालखंडात उत्तरखंडात ब्रिटीश साम्राज्य भारतावर स्थापन झाल्यानंतर ब्रिटीशांनी त्यांच्या प्रशासन रचना भारतीय संस्थानांवर लादल्या. ब्रिटिश भारतातून जात असताना त्यांची प्रशासकीय रचना, पद्धती या भारतीयांच्या मनात खोलवर रुजल्या होत्या. त्यामुळे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संस्थानातून काही प्रदेश, गावे, शहरे बाजुला झाली व त्या स्वतंत्र नगरपालिका बनल्या. यापैकीच मंगळवेढा एक शहर होते. मंगळवेढा नगरपालिकेची

स्थापना ही एक महत्त्वपूर्ण घटना होती. यामुळे मंगळवेढा शहराचा कायापालट झाला. मंगळवेढा शहरास इतर शहराप्रमाणे चांगला दर्जा प्राप्त झाला आहे. जनतेस अनेक सोयी-सुविधा प्राप्त झाल्याने लोकांची प्रगती होऊन शहराची प्रगती अल्पकाळातच झाली. शहराच्या विकासामध्ये या नगरपालिकेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. नगरपालिकेस लाभलेले अध्यक्ष व पदाधिकारी यांनी लवकरच नगरपालिका नावारूपास आणली. त्यामुळे नगरपरिषदेच्या विकासाबरोबरच शहराचाही विकास होण्यास मदत झाली.

नगरपालिका प्रशासनानेही चांगल्या प्रकारे आपले कार्य सांभाळले. त्यामुळे लोकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी दूर होण्यास मदत झाली. लोकांच्या अन्न-वस्त्र-निवारा या गरजा भागविण्यासाठी नगरपालिकेने विशेष प्रयत्न केले.

सतराव्या शतकात ब्रिटिशांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचा आढावा घेवून नगरपालिका बाबतीत टप्प्याटप्प्याने विकासास प्रारंभ केला. सन १९८० मधील कायद्यानुसार देशांतर्गत म्युनिसिपल बोर्डची स्थापना करण्यात आली. सन १८५० ते १८५५ या काळात भारतात अनेक शहरातून नगरपालिकेची स्थापना करण्यात आली. यामुळे भारतातील ग्रामीण व शहरीभागात विकासाबाबत पूर्नविचार झाल्याचे दिसते. सन १८०८ मध्ये विकेंद्रिकरणासाठी एक रॉयल कमिशन नियुक्त झाल्यामुहे म्युनिसिपालटींना त्यांचा सभापती सभासदाकडून निवडावा असे सांगितले गेले. सन १९१९ मध्ये मॉंटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा कायद्याने प्रांताना द्यावयाची जबाबदार शासनपध्दती निर्माण केल्यामुळे विविध खाती निर्माण झाल्याचे दिसते. सन १९३५ मध्ये कायद्याने प्रांतिक सरकारला पूर्ण स्वायत्तता मिळाली. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेस बरेच अधिकार मिळाले.

भारतात खऱ्या अर्थाने नगरपरिषद प्रशासनांची सुरुवात महाराष्ट्रात झाल्याचे दिसते. शहरात नागरी सुखसुविधा पुरविण्याचे काम स्थानिक स्वराज्य संस्थेला म्हणजे नगरपालिकेला करावा लागला. सोलापूर जिल्ह्यात सन १८५२ मध्ये तर मंगळवेढा १८७४ या कालावधीत मंगळवेढा नगरपालिकेची स्थापना झालेली दिसते. नगरपरिषदेची वाढ आणि विकासासाठी नगरपरिषद प्रशासन ही एक महत्त्वाची गोष्ट मानली गेली. नगरपरिषदेचा थेट संबंध लोककल्याणासाठी असतो कारण सार्वजनिक आरोग्य, शहर स्वच्छता, रस्ते बांधकाम,

पाणीपुरवठा, सांडपाण्याचा निचरा, दिवाबत्ती सोय ही सर्व कामे जी लोककल्याणासाठी आवश्यक आहेत ती नगरपरिषदेकडे दिसून आली.

नगरपरिषद प्रशासन लोकांचे घटनात्मक जाणीव जागृत करणारे पहिले पाऊल होते. यामध्ये मंगळवेढा संस्थान कोठे ही मागे नव्हते. इ.स. १८७४ मध्ये मंगळवेढा नगरपरिषद व्यापक झाली. यामध्ये प्रामुख्याने १४ सदस्य होते. त्यामधील निम्मे सदस्य निवडून दिले जात असत. आणि निम्मे सदस्य संस्थान नियुक्त करीत असे. जरी प्रशासन प्रामुख्याने संस्थान नियुक्त दिसत असले तरी ही लोकशाहीची सुरुवात होती. संस्थान कारभारी पद अधिकृत पद मर्यादेतून नियुक्त केले जात होते. संस्थान कारभारी हा नगरपरिषदेचे प्रमुख मानला जात असे. इ.स. १९२९ मध्ये निवडक मतदार आधारित निवडणूक तत्त्व उदयास आले. यामध्ये निवडून दिलेली कार्यकारीणी निवडून आलेलया सदस्यांपैकी एक प्रमुख निवडत असत. त्याचबरोबर ही कार्यकारणी नियामक मंडळाच्या अध्यक्षांची सुध्दा निवड करीत असल्याचे दिसून आले. दरबार पद विशेषतः प्रशासकीय कामकाजामध्ये पर्यवेक्षणाचे काम करीत असे. सांगली संस्थानामार्फत नगरपरिषदेला अनुदान दिले जात होते. सर्व नगराध्यक्ष शहराच्या विकासासाठी सतत प्रयत्नशील होते. १८७४ ते २०१० या कालावधीत मंगळवेढा नगरपरिषदेचा खूप विकास झाला.

शहरी लोकसंख्या ही विरळ असल्याने उत्पन्नाचे स्त्रोत अपुरे पडत असत. घरपट्टी, जमिनीवरील कर, पाणीपट्टी, वाहन कर, जकात कर आणि मालवाहतूक कर नगरपरिषदेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत होते.

या विभागामार्फत रस्ते बांधणी, धर्मशाळा, पाणीपुरवठा, मार्केट इत्यादी बांधकामे केली गेली होती. या विभागात काम करणारे कर्मचारी पुढील प्रमाणे होते. इंजिनिअर, बिल्डींग इन्स्पेक्टर, वरीष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक, मिस्त्री, गवंडी, ड्रायव्हर, मुकादम, शिपाई, वायरमन, क्लिनर, माळी, बिगारी, ओव्हसियर व शहर विकास भाग इंस्पेक्टर इत्यादी कर्मचारी कार्यरत आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागात काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला आपणास नेमून दिलेली कामे करावी लागतात. यामध्ये नदी व बंधाऱ्यावरील पुलाचे बांधकाम व बांधकामाची

पाहणी, याशिवाय त्याला रस्त्यांची पाहणी करणे, रस्ते, गटार, इमारत, संडास व मुताऱ्या व शासकीय योजना इत्यादीचे बांधकाम इंजिनिअर या खात्यास करावे लागते.

टाऊन प्लॅनिंग स्कीम व गावठाण मधील इमारतीची परवाना कामे पाहणे, बांधकामे चालू असताना ती नियमाप्रमाणे होतात की नाही ते पाहणे, जर ती कामे नियमानुसार होत नसतील तर त्यांना नोटीसा देणे, एखादे काम बिगर परवाना चालू असल्यास त्यास त्या बांधकामाचे पंचनामे करून या स्थायी समितीकडे पाठविणे, रस्त्यावरील अतिक्रमणे हटवणे, बिल्डींग ऑफिसरनी सांगितलेली कामे करणे, इत्यादी कामे बिल्डींग इन्स्पेक्टर करतो.

ओव्हरसियर या अधिकाऱ्यास पुढील प्रकारची कामे असतात. बांधकाम प्लॅन्स, इस्टिमेट तयार करणे, कार्यालयाची देखभाल करणे, बांधकाम प्लॅन्स एस्टिमेट तयार करणे, बांधकाम खात्यामार्फत होणारे कामांची मापे घेणे, ती नोंदवणे, रस्ते आखणे, बांधकाम विभागाकडून तयार केलेल्या यादी प्रमाणे कामाची तपासणी करणे, रस्ते रूंदीच्या ड्राफ्टनुसार तयार केलेल्या केसेस तपासणे.

मंगळवेढ्यातील संतांच्या कार्यांचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले की, मंगळवेढ्यास अनेक संतांनी वास्तव्य केल्याचे दिसून येते. या भूमीस हजारो वर्षांची प्राचीन ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. या सर्व संतांनी समाजामध्ये एक सुधारणावादी दृष्टीकोन निर्माण केला. या संतांचे उपलब्ध असणारे कार्य साहित्याद्वारे त्यांनी मांडले. त्यामुळे या मंगळवेढा नगरीतील संतांचे कार्य महाराष्ट्रभर पसरले. अशा या थोर संतांच्या नगरीस भेट देण्यासाठी आजही महाराष्ट्रातून लोक येत असतात.

मंगळवेढा नगरीतील संतांनी समाजातील अनिष्ट प्रथांना विरोध केला. अन्याय व अत्याचाराविरूद्ध त्यांनी समाज प्रबोधन केले त्याचाच आजही आदर्श घेवून मंगळवेढ्यातील जनता अगदी गुण्यागोविंदाने राहत असल्याचे दिसते. भारतीय संस्कृतीत पूर्वीपासून चालत आलेल्या परंपरा, चालीरिती, आजही तेवढ्याच निष्ठेने जपल्या जातात. मंगळवेढ्याचा इतिहास फक्त ठरावीक कक्षेपर्यंत मर्यादित नसून तो भारतभर पसरला आहे. संतांच्या कार्यामुळे मंगळवेढा भूमी ही भक्ती मार्गाची बनली. यामुळे आजही या भूमीतील लोक सामाजिक एकोप्याने राहतात. मंगळवेढा भूमीतील संतांमुळे आज मंगळवेढा नगरपालिकेस भरघोस उत्पन्न

मिळते. कारण महाराष्ट्र व कर्नाटक सीमेवर हे शहर असल्याने मोठ्या प्रमाणात भक्तगण व शाळेच्या सहली या नगरीला भेट देतात. यामुळे शहरातील विविध दुकाने, हॉटेल्स, व इतर व्यवसायीकांचे चांगले उत्पन्न होते, शिवाय मंगळवेढ्यातील सामाजिक आचार-विचार त्यांच्या माध्यमातून सर्वदूर पसरतात.

मंगळवेढा नगरपालिकेच्या प्रशासन संरचना पाहिली असता नगरपालिका ॲक्ट प्रमाणे झालेल्या कामाची माहिती व प्रशासन संरचना नेमक्या कोणत्या प्रकारे कार्यवाही करते, ते दिसून आले. नगरपालिका वाढ व विकासासाठी 'नगरपालिका प्रशासन' ही एक महत्त्वाची बाब आहे. प्रशासन यंत्रणेच्या योग्य कारभारामुळेच नगरपालिकेचा विकास झाल्याचे दिसून आले.

नगरपालिकेच्या विकासामध्ये पुरेसे संघटन जरी राजकारणाची बाजू असली तरी कर्मचारी वर्गाची बाजू प्रशासन यंत्रणेमध्ये महत्त्वाची असते. प्रशासनामध्ये नैतिकता महत्त्वाची आहे. सन १८७४ मध्ये नगरपालिका स्थापन झाल्यानंतर प्रशासनाचे मुख्याधिकारी नगरपालिकेत रुजू झाले तेव्हापासून २०१० पर्यंत विविध मुख्याधिकारी योग्य पद्धतीने प्रशासकीय कार्यवाही केल्याने नगरपालिकेचा विकास होवू शकला. लोकप्रतिनिधी व मुख्याधिकारी यांचे संबंध सलोख्याचे असतील तर त्यांनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होवून लोकांना अधिक चांगली सेवा मिळते. ती मिळवून देण्यासाठी मुख्याधिकारी कर्तव्यदक्ष असल्याचे दिसून आले.

नगरपालिका अधिनियमातील कलम सात अन्वये नगरपालिका सभा, नगराध्यक्ष, स्थायी समिती, विषय समित्या व मुख्याधिकाऱ्यांना विशेष अधिकार असल्याचे निदर्शनास आले. सन १९७४ पासून मंगळवेढा नगरपालिकेत झालेले विविध नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी त्यांच्या पदाचा व कर्तव्यांचा पूर्ण वापर करून नगरपालिका विकासात योगदान दिल्याचे दिसते.

प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत शिक्षण वेळेनुसार बदलत गेले. बदलत्या परिस्थितीनुसार त्या-त्या अनुषंगाने त्यात बदल होत गेल्याचे दिसून आले. मंगळवेढा नगरपरिषदेने देखील नगरपरिषद स्थापनेपासून शिक्षणासाठी वेगवेगळ्या सोई-सुविधा निर्माण

केल्या व ज्ञानदान देण्याची अखंड पंरपरा चालू ठेवली. मंगळवेढा नगरपरिषदेने शिक्षणासाठी योगदान दिल्याचे दिसते.

मंगळवेढामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात प्राथमिक स्वरुपाच्या सोई होत्या. इ.स. १९३६ मध्ये भारतात प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास झाला. प्राथमिक शिक्षणांचे अधिकार मंगळवेढा स्कूल कमिटीकडे दिला गेला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्राथमिक शिक्षणांची जबाबदारी शासनावर पडली. त्यामुळे बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७ अन्वये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात येऊन ते डिस्ट्रीक्ट स्कूल बोर्डाकडे सोपविण्यात आले. मंगळवेढा मध्ये नगरपरिषदेची स्थापना १८७४ साली झाली व तेथून मंगळवेढा नगरपरिषदेने अंतर्गत विविध भागामध्ये प्राथमिक शाळेच्या सोयी उपलब्ध केल्या.

स्थापना झाल्यापासून नगरपालिकेने शिक्षण व्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल दिसून आले. नगरपालिकेच्या आठ शाळांमधून विद्यादान कार्य अविरत चालू आहे. सध्याच्या युगात जिथे इंग्रजी माध्यम शाळेचे पेव फुटले आहे. तिथे नगरपालिकेच्या शाळांनी चांगला आदर्श शिक्षण व्यवस्थेत राखला आहे.

मंगळवेढा शहरात त्यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या उणीवा होत्या. आरोग्यविषयक आवश्यक असणाऱ्या सोईसुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून आले. दुष्काळ हा प्रशासनासमोरील मोठा अडथळा होता. दुष्काळ आणि प्लेग सारख्या संकटामुळे नगरपरिषदेच्या महसूलामध्ये घट झाली. त्यामुळे पाठीमागील वर्षाच्या तुलनेत खर्चामध्ये वाढ झाली आणि शिल्लक कमी राहिली. त्यामुळे प्रशासन आर्थिक संकटात सापडले. त्यासाठी अनेक उपाययोजना आखण्यात आल्या. त्यामुळे नंतरच्या काळात नियोजनाप्रमाणे खर्चामध्ये घट होत गेली. परिस्थिती सुधारली व प्रशासन बळकट होवू लागले. पुढील राजकीय योजनांच्या काळात अनेक समाजोपयोगी योजना आखण्यात आल्या.

सन १८७४ ते २०१० पर्यंत त्याकाळातील राजकीय व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, मंगळवेढा संस्थान पूर्वी सांगलीच्या संस्थानाचा भाग होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मंगळवेढ्यास सांगली संस्थातून वगळून स्वतंत्र नगरपालिकेचा दर्जा दिला. लोकशाही संविधानानूसार निवडणूका घेण्यात आल्या. मंगळवेढा

नगरपालिका मध्येही नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या निवडणूका होवून राजकीय प्रवास चालू झाला. या नगरपालिकेस सन १९४५ ते सन १९५५ या काळात पहिले नगराध्यक्ष होण्याचा मान श्रीमंत हरिहरराव बापूसाहेब पटवर्धन यांना मिळाला. त्यांनी विविध राजकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्यानंतर सन १८७४ ते सन २०१० पर्यंत अनुक्रमे हरिहरराव बापूसाहेब पटवर्धन, विठ्ठल यशवंत ताड, आप्पासाहेब मोडक, लक्ष्मण नागणे, आप्पासाहेब ताड, ज्ञानोबा नागणे, अनंत कुलकर्णी, रतनचंद शहा, शिवदास चिंचकर, युवराज कलुबर्मे, प्रकाश गायकवाड, बाबुभाई मकानदार, सौ.ललिता माळी, महादेव माळी, पांडुरंग ताड, अशोक माळी, भारत नागणे इ. सोळा कर्तृत्ववान नगराध्यक्ष झाले.

सांगली संस्थानामार्फत नगरपरिषदेला अनुदान दिले जात होते. सर्व नगराध्यक्ष शहराच्या विकासासाठी सतत प्रयत्नशील होते. १८७४ ते २०१० या कालावधीत मंगळवेढा नगरपरिषदेचा खूप विकास झाला.

मंगळवेढा नगरपरिषदेत अध्यक्ष म्हणून कारभारी काम पाहत होता. तेव्हा हा कारभारी सांगली संस्थानाच्या दरबारातून नियुक्त केला जात होता. मंगळवेढा संस्थानात म्युनिसिपालिटीच्या कारभारासाठी प्रशासक नेमले जात होते. नगरपरिषदेवर नेमणूक करण्यासाठी निवडणूका घेतल्या जात होत्या.

मंगळवेढा नगरपरिषदेची विविध खाती होती. त्यामध्ये सामान्य प्रशासन विभाग, सार्वजनिक बांधकाम खाते, बांधकाम विभागाने केलेली कामे, गटारे बांधणी, सार्वजनिक संडास, सार्वजनिक मुताऱ्या, समाज मंदिरे, धर्मशाळा, माकेट, मंडई, भाजीपाला मार्केट, मासे मार्केट, फळफळावळ मार्केट, शाळा इमारती, पाणीपुरवठा समिती, आरोग्य समिती, जकात विभाग, नगदी खाते, विद्युत विभाग, दप्तर खाना, करविभाग, नगर वाचनालये, अन्ननिरीक्षक, विभाग, वृक्ष विभाग, आग प्रतिबंधक विभाग, इत्यादी मंगळवेढा नगरपरिषदेची खाती चांगल्याप्रकारे कार्य करीत आहेत. नगरपालिका शिक्षण, नगरपरिषदेची स्वच्छता, साथीचे, आजारासंबंधी, बांधकामासंबंधीच्या उपाययोजना नगरपरिषदेने केल्या आहेत.

मंगळवेढा नगरपालिकेत या सोळा नगराध्यक्षांच्या भूमीका महत्त्वाच्या आहेत. संस्थानातून बाहेर पडल्यानंतर मंगळवेढा नगरपालिका बऱ्याच समस्यांना सोमोरे जात होती.

सन १८७४ चा विचार करता प्रथम प्राथमिक सोई उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यानुसार त्याकाळचे नगराध्यक्ष व नगरसेवक यांनी प्राथमिक अवस्था योग्य प्रकारे हाताळल्याचे दिसते. अगदी सुरुवातीस दिवाबत्तीपासून ते पिण्याच्या पाण्याची दोन वेळची सोईपर्यंत विविध उपक्रम राबविल्याचे दिसते. दिवाबत्तीच्या सुविधेसाठी जी पूर्वापार चालत असलेली सुविधा होती. त्यामध्ये सुधारणा घडवून आणून जनरेटरच्या सहाय्याने मंगळवेढा नगरपालिकेअंतर्गत विद्युत दिव्यांची सुविधा देण्यात आली. पुढे मंगळवेढा नगरपालिकेतील लोकसंख्या वाढू लागली. मंगळवेढा नगरपालिकेने त्यावेळचे जे धोरण आवश्यक होते ते करण्याचा पूर्ण प्रयत्न केला. नगरपालिकेच्या सन १८७४ ते २०१० या काळात खरे तर आज ज्या सोई उपलब्ध असल्याचे आपणास दिसत आहे. त्याच काळात तयार झाल्याचे दिसते. आज मंगळवेढा नगरपालिका सर्व व्यवसायाने परिपूर्ण आहे. रस्त्याचे डांबरीकरण तसेच खडीकरण, वेगवेगळ्या प्रभागात शौचालयाची व्यवस्था, मुताऱ्यांचे काम तसेच आठवडा बाजारातील शॉपिंग सेंटर, २७ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना, मंगळवेढा शहराला तीर्थक्षेत्राचा 'ब' दर्जा, मंगळवेढा नगरपालिकेअंतर्गत विविध शिक्षण संस्था, मंगळवेढा शहरातील मंगलकार्यालय, नाट्यगृह या सगळ्या सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य याच काळात  झाल्यामुळे सन १८७४ ते सन २०१० मधील या नगरपालिकेचा राजकीय इतिहास महत्त्वाचा आहे. त्याचप्रमाणे याकाळातील नगरसेवक व नगराध्यक्ष यांचेही योगदान भरीव स्वरूपाचे दिसून येते.

मंगळवेढ्याचा सामाजिक इतिहास मंगळवेढ्यातील सामाजिक सद्भावनीकतेच्या दृष्टीने सलोख्याचा आहे. नगरपालिकेच्या हद्दीत भारतीय परंपरेनुसार अनेक जाती-धर्माचे लोक राहतात. मंगळवेढा नगरपालिकेच्या इतिहासात या जातीय सलोख्यामुळे विकास कधीच खुंटला नसल्याचे आढळले. त्याचप्रमाणे समाजरचना विशिष्ट पध्दतीची असली तरी काळानुरुप त्यामध्ये बदल झाल्याचे दिसले. मंगळवेढा नगरपालिकेचा सामाजिक इतिहास हा सन १८७४ ते सन २०१० पर्यंतच्या यशाची अनुभूती सांगतो. त्यामुळे त्याचा उहापोह करणे अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

# संदर्भग्रंथ सूची


## • प्राथमिक साधने

➢ **इंग्रजी**

**A) Bombay Archives:**

**१) History account : Poona and Solapur**

**२) Gazetteer of India, Maharashtra State Gazetteer Solapur District, १८८५.**

**३) Political and services Department, File No. २३२५/४६, XXXVII, ३४४५/४६,८९/C-३५५ of १९४८.**

**B) Pune Archives:**

**१) Deecan Commissioner files Vol.Nos.:२७३, २७७, ४१७, २४३, ४२७, ४३५.**

**२) Alienation daftar/rumal No.१७(१४)**

**C) Mangalwedha Taluka Record office:**

**Rumal No.३, १०, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २७, ३१, ४३, १११, २०५, २४३, २५६.**

**D) Gazetteer**

१) सोलापूर गॅझेट, भारत सरकारद्वारा प्रकाशन, १८८५.

२) सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, १९८९.

- **प्राथमिक साधने प्रकाशित:**

➢ **इंग्रजी :**

**A) Remarks of the general Administration of the Mangalwedha, Poona: Mangalwedha State Karbhar for the year.**

1) Remark of the general Ad.of the Mangalwedha State 1906-1944

**B) Remakrs of the general administration report of the Mangalwedha State Poona: Mangalwedha State Karbhar for the year.**

1) Remark of the Administration report of the Mangalwedha State1983-1992.

**C) Report of the Administration of the Bombay presidency Bombay: Government General press for the year.**

1) Report of the Administration of the Bombay presidency 1874-1911

## Muncipal records:

1) Audit Notes
2) Inspection Notes
3) Market Demand Register
4) Muncipal Hospital's record
5) Muncipal School Board records
6) Public works Departments record
7) Recipt Books.

**E) Mangalwedha State Gazeett 1924-2010**

## • प्राथमिक साधने प्रकाशित

### ➢ मराठी

**अ) मंगळवेढा संस्थानांचे वार्षिक प्रशासकीय अहवाल**

१) मंगळवेढा नगरपालिकेचे वार्षिक अहवाल  १८८६-२०१०

**इ) मंगळवेढा दरबार आज्ञापत्रिका मंगळवेढा, संस्थान कारभारी**

१) मंगळवेढा दरबार आज्ञापत्रिका  १९२५-१९४८

## • दुय्यम साधने:

### ➢ मराठी


१) अभ्यंकर शंकर वासुदेव, भारतीय तीर्थक्षेत्र व मंदिरे, भक्तिकोष पंचम खंड, आदित्य प्रतिष्ठान, पुणे,३० मार्च २००६.

२) अभ्यंकर शंकर वासुदेव, भारतीय तीर्थक्षेत्र व मंदिरे, भक्तिकोष पंचम खंड, आदित्य प्रतिष्ठान, पुणे,३० मार्च २००६

३) आपटे गोविंद विनायक, संस्थानिकः पटवर्धन घराण्याचा इतिहास (भाग १), १९१९,

४) आपटे डी.व्ही., महाराष्ट्र इतिहास मंजिरी, निवडक ऐतिहासिक उतारे, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९२३,

५) आवताडे नानासाहेब व्यंकटेश, श्रीसंत दामाजी चरित्र, श्रीसंत दामाजी संस्था मंगळवेढा, २००६.

६) इंगोले कृष्णा ज्योतिराम, माणदेशः स्वरूप आणि समस्या, माणगंगा प्रकाशन, सांगोला, प्रथमावृती, १९८८.

७) एल.पी.शर्मा, प्राचीन भारत, लक्ष्मी नारायण अग्रवाल प्रकाशन, आग्रा.

८) कदम एस.बी., संत चोखामेळा, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, १९९८.

९) कामत अशोक, महात्मा बसवेश्वर, सत्संग प्रतिष्ठान, प्रकाशन पुणे, १९९९.

१०) कुंदळे अशोक, महात्मा बसवेश्वर आद्य समाजसुधारक, सुविद्या प्रकाशन, सोलापूर.

११) कुलकर्णी जी.टी., कटक एम.आर., चव्हाण, माटे, रानडे यु.आर., शिवछत्रपतीः इतिहास आणि चरित्र खंड पहिला, शिवपूर्व काल (राजकीय, सांस्कृतीक, इ.स.१३००-१६५०), मॅकमिलन इंडिया लिमिटेड, प्रथमावृत्ती, २००१.

१२) केतकर व्य.श्री., महाराष्ट्र ज्ञानकोश, महाराष्ट्र ज्ञानकोश मंडळ, १९५६.

१३) खाडे कृष्णराव, माणदेशी संस्कृती आणि अस्मिता, श्रीशंभू महादेव प्रकाशन, मुंबई.

१४) खोब्रागडे वि.गो., मराठ्यांच्या स्वाज्यांचा मुक्काम, इतिहास संशोधन मंडळ, मुबई प्रथमावृत्ती, १९७७.

१५) गडगळ रंजना, माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक शिक्षणाचा विकास, प्राजक्ता प्रकाशन, नाशिक,२००३.

१६) गायकवाड, सरदेसाई व व्हनमाने, इतिहास लेखन शास्त्र, फडके बुक सेलर्स, कोल्हापूर, १९९०

१७) गोसावी र.रा., श्री संत सकलगाथा, सारथी प्रकाशन, पुणे, २०००.

१८) ग्रोवर बी.एल., आधुनिक भारताचा इतिहास, यशचंद्र आणि कंपनी, दिल्ली, २००३.

१९) चौधरी डी.एम., पंढरपूर नगरीचा इतिहास, अप्रकाशित पीएच.डी.प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर २००६

२०) चौधरी, स.गा. पाटील, महराष्ट्रातील शिक्षण विकास व शैक्षणिक समस्या, सुविचार प्रकाशन, १९७३.

२१) छाबरा जी.एस., ॲडव्हान्सड स्टडी इन दी हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, खंड-२, ओमप्रकाशन, दिल्ली, १९६८.

२२) जक्कल विठ्ठल नरसप्पा, सोलापूर शहराचा इतिहास, स्टीम प्रकाशन, सोलापूर, १९२८.

२३) जैन सहयोग, जैन समाज पुरस्कृत मासिक, सन २०१०.

२४) जोशी एस.एन., मराठाकालीन समाजदर्शन, अंत विद्यार्थी प्रकाशन, पुणे, १९६०.

२५) जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोश, खंड (६), भारतीय संस्कृती कोश निर्मीती मंडळ, पुणे, १९७०.

२६) जोशी लक्ष्मणशास्त्री खंड ५ वा, उपरोक्त, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६.

२७) जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश खंड (१२), महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९८५.

२८) जोशी लक्ष्मीशास्त्रे, संपा., मराठी विश्वकोश खंड-८, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ, मुंबई,१९८७.

२९) जोशी व.श. व कायमखाने लिला, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५, ज्ञानदिप प्रकाशन, १९५५.

३०) डांगे चंद्रकुमार, भारत आणि जगातील शिक्षणृ, नुतन प्रकाशन, पुणे, जून १९७८.

३१) ताम्हणकर श्री.दा., शैक्षणिक प्रशासन व नियोजन, नुतन प्रकाशन पुणे, १९९९.

३२) दळवी गो.दा., मराठा कुळाचा इतिहास, मुंबई, १९१२.

३३) दायमा ब्रीजमोहन, सकल संतवाणी, गीता प्रेस, गोरखपूर, १९९९, पृ.१२६.

३४) दिक्षीत नी.सी., आधुनिक भारत, पिंपळापूरे अँड कंपनी पब्लिकेशन, नागपूर, २००३.

३५) देशपांडे प्र.न., राजवाडे वि.का., संशोधन मंडळ, धुळे, त्रैमासिक, २४ मार्च २००१.

३६) देशमुख एल.जी., शिक्षणाचे तंत्त्वज्ञानात्मक अधिष्ठान, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००३.

३७) देशमुख गोपाळ मारुती, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास (मराठा कालखंड), भाग-१,(इ.स.१६००-१८५०), रेवू प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००९.

३८) देशमुख विजय, शककर्ते शिवाजी (उत्तरार्ध), छत्रपती सेवा प्रतिष्ठान साहित्य सांस्कृती मंडळ, मुंबई, १९७८.

३९) धागे रामचंद्र, संत चोखामेळा एक अभ्यास, करूणा प्रकाशन, कोल्हापूर, १९९६.

४०) नागपूरे व.रा., प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, १९८८.

४१) निखील पुंजाळ, महाराष्ट्र स्टेट नगरपालिका, भारत सरकारद्वारा प्रकाशित, नई मुंबई, १९८८.

४२) पटवर्धन वि.अ., संस्थानातील लोकशाहीचा लढा, पुणे, १९४०.

४३) पटवर्धन वि.ई., दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानाच्या विलीनीकरणाची कथा, पुणे, १९६६.

४४) पाठक आ.रा., संपा, महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९९.

४५) पुरुषोत्तम निलकंठ, विठोबा, चंद्रोदय प्रकाशन, १९५३.

४६) प्रतिनिधी श्रीनिवास परशुराम, सातारचे पंतप्रतिनिधी घराण्याचा इतिहास (भाग-१).

४७) प्रभाकर देव, प्राचीन भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९५.

४८) बहिरट भा.प. व भालेराव प्र.ज्ञा, वारकरी सांप्रदायाचा उदय व विकास, व्हिनस प्रकाशन, १९७२.

४९) बेंद्रे वा.सी. (संपा.), विजापूरची आदिलशाही, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय,मुंबई १९६८.

५०) बेंद्रे वा.सी., महाराष्ट्राच्या इतिहासाची साधने, खंड-२, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय,मुंबई १९६६.

५१) भाटवडेकर मो.वि., शिक्षणाचे अर्थशास्त्र, व्हिनस प्रकाशन, मुंबई, १९७८.

५२) भावे वासुदेव कृष्णा, महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास (मुसलमान पूर्व महाराष्ट्र) खंड पहिला, वरदा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९८.

५३) भिडे जी.एल., पाटील एन.डी, प्राचीन भारत, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९८.

५४) मंगळवेढा तीर्थक्षेत्र विकास आराखडा, मंगळवेढा नगरपरिषद मंगळवेढा, सन २००४-२००५.

५५) मंगळवेढा नगरपालिका सभेचे इतिवृत्त व गणपूर्ती प्रशासकीय अहवाल, सन १९९०.

५६) महाराष्ट्र राज्य परिचय खंड पहिला, महाराष्ट्र स्थलदर्शन.

५७) माटे श्री.म., संत पंत आणि तंत लेख, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९५०.

५८) माळी आ.ल., मध्ययुगीन शिक्षणाचा इतिहास, नुतन प्रकाशन, पुणे.

५९) मिरासी वि.वि., शिलार घराण्याचा इतिहास व कोरीव लेख, १९७९.

६०) मीराशी वी.वी., कलचुरी नृपती आणि त्यांचा काळ, २६ ऑक्टोबर १९५६, नागपूर.

६१) मुंजळ वा.ल., संत चोखामेळा विविध दर्शन, सुगाव प्रकाशन, पुणे, २००१.

६२) मेहता, जे.एल., मध्यकालीन भारत का इतिहास खंड तिसरा, जवाहर पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, नई दिल्ली, पुनमुद्रित, २००५.

६३) मोगलेवार सुधारक, शिवयोगी बसण्णा, कल्पना प्रकाशन, लातूर, १९९४.

६४) रणजित चव्हाण, नगरपालिका सभाशास्त्र, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था प्रकाशित, २०१०. राकेश देशपांडे, नगरपालिका अधिनियम, वृत्तविद्या प्रकाशन, औरंगाबाद, २००१.

६५) राजवाडे वि.का., शिवकालीन घराणे, पुणे, १९१५.

६६) राजेश चौधरी, मुंबई प्रांतिक नगरपालिका अधिनियम, १९४९, चौधरी लॉ.पब्लिशर्स, २०१०.

६७) रामचंद्र एस.सी., डिस्ट्री ऑफ इंडिया मॉडर्न इंडिया, ओरियंट प्रकाशन, १९८०.

६८) विजय पोथी, दामाजी चरित्राचा अभ्यास, संतनाथ प्रकाशन, पंढरपूर.

६९) विठ्ठल नाईक, दामाजी पंतांचे चरित्र, पुरंदरे प्रकाशन, मुंबई, १९०४.

७०) विराट शर्मा, भारत में शास्त्रीय राजनीति, शर्मा पब्लिकेशन, नई दिल्ली, १९९०.

७१) शर्मा आर.एस., भारत में सरकार और राजनीति, दिल्ली प्रकाशन, दिल्ली, २०१५.

७२) शर्मा एम.पी., लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन इंडिया, ओरियंट प्रकाशन, १९९४.

७३) श्री.श्रीमद्. ए.सी. भक्तिवेदांत, भगवत्गीता पार्श्वभूमी.

७४) सचदेव डी.आर. स्टडीज इन इंडियन ॲडमिनिस्ट्रेशन, सिमला प्रकाशन, मुंबई, २००१.

७५) सतीश चंदू, मध्यकालीन भारत (भाग १) दिल्ली सल्तनत, जवाहर पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, नई दिल्ली, पुनमुद्रित, २००५.

७६) समीर इंगळे, सोलापूर जिल्ह्यातील जमाती, कल्पना प्रकाशन, १९८०. सोलापूर.

७७) सरकार जदुनाथ, औरंगजेबाचा इतिहास (भाषांतर), कुंटे भ.ग., महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७८.

७८) सरदेसाई ओ.स., मराठी रियासत, पुणे, १९९३.

- **मासिके, वृत्तपत्रे**

➢ **वृत्तपत्रे**

१) दैनिक सकाळ वृत्तपत्र, सोलापूर आवृत्ती, ७ ऑगस्ट १९९९, पृ.१२.

२) दैनिक सकाळ वृत्तपत्र, सोलापूर आवृत्ती अंक १०३, १४ एप्रिल २००१.

३) दैनिक सोलापूर समाचार, २७ ऑगस्ट १९७२, पृ.१२.

४) दैनिक सोलापूर समाचार, १९७२, पृ.१५.

५) दैनिक संचार वृत्तपत्र, ७ ऑगस्ट १९९९, पृ.१५.

६) दैनिक संचार वृत्तपत्र, उपरोक्त, सोलापूर आवृत्ती.

७) दैनिक लोकमत, २४ ऑक्टोबर २००८, पृ.२८६.

८) दैनिक मंगळवेढा, सन १९९५, पृ.१०.

➢ **मासिके:**

१) लोकराज्य,

२) शिक्षणसंक्रमण

३) दिपस्तंभ

## ● प्रत्यक्ष मुलाखती

१. प्रत्यक्ष मुलाखत, नागणे, मंगळवेढा, दि.१५-१-२०१३.

२. प्रत्यक्ष मुलाखत, युवराज कलुबर्मे (माजी नगराध्यक्ष), दि.१०-३-२०१३.

३. प्रत्यक्ष मुलाखत, ललिता माळी (माजी नगराध्यक्ष), दि.१८-३-२०१३.

४. प्रत्यक्ष मुलाखत, राहूल शहा (माजी नगराध्यक्ष रतनचंद शहा यांचा नातू), दि.२०-२-२०१३

५. प्रत्यक्ष मुलाखत, महादेव माळी (माजी नगराध्यक्ष), दि.२०-४-२०१३.

६. प्रत्यक्ष मुलाखत, मा.प्रकाश गायकवाड (माजी नगराध्यक्ष), दि.३०-४-२०१३.

७. प्रत्यक्ष मुलाखत, बाबू गैबीसाो मकारनदार (माजी नगराध्यक्ष), दि.०२-०५-२०१३.

८. प्रत्यक्ष मुलाखत, पांडुरंग विठ्ठल ताड (माजी नगराध्यक्ष), दि.१०-०५-२०१३.

९. प्रत्यक्ष मुलाखत, महादेव आबा माळी (माजी नगराध्यक्ष), दि.२१-०६-२०१३.

१०. प्रत्यक्ष मुलाखत, अशोक गुराप्पा माळी (माजी नगराध्यक्ष), दि.३०-०६-२०१३.

११. प्रत्यक्ष मुलाखत, नागणे भारत दादा (माजी नगराध्यक्ष), दि.०५-०८-२०१३.